# अर्थसंवाद

खंड 22, अंक 4
जानेवारी - मार्च, 1999
भारतीय सौर पौष - फाल्गुन, 1920

- महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल : समस्या व उपाय
- अमर्त्यकुमार सेन यांचे अर्थशास्त्र
- भारतातील बेकारी : आंतरराज्य तुलना
- दारिद्र्याची मीमांसा
- बाविसावे आणि तेविसावे वार्षिक अधिवेशन

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 22, अंक 4 | जानेवारी-मार्च, 1999

● प्रमुख संपादक
रवीन्द्र दोशी

● सल्लागार मंडळ
(1997-2000)

कुमुद पोरे
एस.के.जी सुंदरम
भगवान म्हस्के
विनायक देशपांडे

● संपादकीय पत्रव्यवहार
रवीन्द्र दोशी
526/1, सूर्यवंशी लेआऊट,
प्लॉट नं. 3, 'एलोरा गार्डन'
अपार्टमेंटस् समोर, सम्राट नगर,
कोल्हापूर - 416 008
दूरध्वनी :
(0231) 656963

## अनुक्रमणिका

300 महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल: समस्या आणि उपाय
*र.पु. कुरुलकर*

322 अमर्त्यकुमार सेन यांचे अर्थशास्त्र
*शरद शंकर जोशी*

345 भारतातील बेकारी : आंतरराज्य तुलना
*ज.फा पाटील / पां. ना. गावडे*

352 दारिद्र्याची मीमांसा (ग्रंथ परीक्षण)
*वि.ज. गोडबोले*

356 अर्थ शब्दांची वाट पाहे
*शिवकुमार खोबरे*

359 बाविसावे वार्षिक अधिवेशन : अहवाल
*संतोष दास्ताने / सर्जेराव ठोंबरे / श्रीराम पेडगांवकर / शरद बोकील / रवीन्द्र दोशी / आ. गो. पुजारी*

407 तेविसावे वार्षिक अधिवेशन : विषयांची रूपरेषा
*स. ह. देशपांडे / शशिकांत गंधे / रवीन्द्र दोशी*

*मराठी अर्थशास्त्र परिषद*

**कार्यकारी मंडळ**

(1998-99)

**अध्यक्ष**

र.पु. कुरुलकर

**कार्याध्यक्ष**

व्यं. सु. पाटणकर

**कार्यवाह - खजिनदार**

आ.गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

रवीन्द्र दोशी

**सदस्य**

बाळकृष्ण कुलकर्णी
नंदकिशोर सुदा
कृष्णराव भोसले
विनायक देशपांडे
सुभाष माने
सुरेंद्र देसाई
गुरुशांतप्पा हरकूड
कालिदास जोशी
श्रीहरी मिसाळ
श्रीराम पेडगांवकर
प्रतिभा बोरवणकर
देविदास अग्रवाल

**● कार्यालयीन पत्रव्यवहार :**

(वर्गणी व जाहिरात पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, इत्यादी)

डॉ. आ.गो. पुजारी,

कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद,

प्रपाठक, नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे - 411 037

दूरध्वनी : निवास : 468650, कार्यालय : 464699

**● परिषदेचे प्रमुख कार्यालय :**

मराठी अर्थशास्त्र परिषद,

द्वारा / सेंटर फार द स्टडी ऑफ सोशल चेंज,

न्यू इंग्लिश स्कूल जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.

**● वर्गणी:**

**(अ) परिषदेचे सदस्य**

(1) आजीव सदस्य : रु. 800 (एकरकमी)
(2) साधारण सदस्य : रु. 100 (वार्षिक)
(3) संस्था सदस्य:
शैक्षणिक संस्था : रु. 100 (वार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु. 150 (वार्षिक)

(* परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)

(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार
ग्रंथालये : रु. 100 (वार्षिक)

(इ) वर्षगणना 1 एप्रिल ते 31 मार्च

* वर्गणी डिमांड ड्राफ्ट / मनी ऑर्डरने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पुण्याला पाठवावी.

**'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

(1) पश्चिम विभागीय केन्द्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद मुंबई.

(2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (टीप : म. रा. सा. सं. मंडळाकडे अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

# महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल : समस्या आणि उपाय *

र.पु. कुरुलकर **

## प्रास्ताविक

अमरावतीसारख्या एका महत्त्वपूर्ण ऐतिहासिक नगरीत संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या बाविसाव्या अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून आपण सर्वांनी माझी बिनविरोध निड केली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. हा मी माझा मोठा बहुमान समजतो.

सन 1998 हे वर्ष शासकीय विदर्भ महाविद्यालयाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. या आनंदोत्सवाचा एक भाग म्हणून या महाविद्यालयाने मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बाविसावे अधिवेशन आयोजित केले आहे. माझ्यातर्फे व आपणा सर्वांतर्फे मी महाविद्यालयाच्या प्राचार्या, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी वर्गाचे या अमृत महोत्सवी वर्षात अभिनंदन करतो आणि भविष्यात सुयश चिंतितो.

सर्व भारतीयाना व विशेषत: भारतीय अर्थशास्त्रज्ञांना अभिमान वाटावा अशी घटना म्हणजे अमर्त्य सेन याना मिळालेले सन 1998 सालचे अर्थशास्त्र विषयातील नोबेल पारितोषिक होय. आपणा सर्वांतर्फे व मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे मी अमर्त्य सेन यांचे हार्दिक अभिनंदन करतो. अमर्त्य सेन यानी आपल्या विद्वत्तापूर्ण लिखाणाने कल्याणाच्या अर्थशास्त्रास तत्त्वज्ञान आणि नैतिक मूल्यांची जोड देऊन अर्थशास्त्र विषयास खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केले आहे. लॉर्ड केन्सच्या लिखाणामुळे दुसऱ्या महायुद्धोत्तर कालात भांडवलशाही देशांनी फार मोठी आर्थिक प्रगती केली आणि त्यामुळे केन्स याना 'भांडवलशाहीचा त्राता' म्हणून गौरविले गेले. त्याचप्रमाणे, अमर्त्य सेन यांच्या लिखाणाचा प्रभाव एकविसाव्या शतकात सबंध जगाच्या अर्थकारणावर पडल्यास नवल वाटू नये. कदाचित त्याना 'गरिबांचा त्राता' म्हणूनही गौरविले जाईल. अमर्त्य सेन यांच्या लिखाणाचा मूळ गाभा दुष्काळ, दारिद्र्य, विषमता व

** मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अमरावती येथील बाविसाव्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण (13 नोव्हेंबर, 1998).*

*** भूतपूर्व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

बेकारी या विषयालाच धरून असल्यामुळे त्यांचे विचार आजच्या माझ्या अध्यक्षीय भाषणास पुष्टी देणारेच ठरतील याची मला खात्री वाटते.

माझ्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल: समस्या आणि उपाय ' हा हेतूपूर्वक निवडला आहे. कारण सद्य:स्थितीत तो सर्वांच्या जिव्हाळ्याचा तर आहेच, याशिवाय स्वतंत्र विदर्भाच्या मागणीमुळे त्यास राजकीय महत्त्वही प्राप्त झाले आहे. परंतु माझ्या भाषणात मी या प्रश्नाचे विवेचन केवळ आर्थिक सिद्धान्त व उपलब्ध शासकीय आकडेवारीच्या साह्याने करणार आहे. या प्रश्नाचे आर्थिक विश्लेषण करताना कोणत्याही प्रकारचा प्रादेशिक अभिनिवेश निर्माण होणार नाही याचीही काळजी घेणे मला जरुरीचे वाटते. तसेच सन 1960 साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतरच्या कालखंडात (1960-1994), म्हणजे साधारणत: 34 वर्षांत महाराष्ट्रात एकाच पक्षाचे सरकार कार्यरत होते (अल्पकाल वगळता). या कालात शासनाचे प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे धोरण आर्थिक सिद्धान्तास अनुसरून होते किंवा नव्हते यासंबंधी निर्भीडपणे मत मांडणे हे अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांचे व इतर अभ्यासकांचे एक कर्तव्य आहे असे मी मानतो. तसेच प्रादेशिक असमतोल खरोखरीच कमी करावयाचा झाल्यास शासनाचे धोरण कुठे चुकले हे निदर्शनास आणून देणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय कशा प्रकारचे उपाय योजल्यास प्रादेशिक असमतोल कमी होऊ शकेल यासंबंधी सूचना करणे हेसुद्धा अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांचे एक कर्तव्य आहे असे मी समजतो.

माझ्या भाषणाचे विवेचन पुढील तीन भागात केले आहे : (1) पहिल्या भागात प्रादेशिक असमतोलाचे काही प्रमुख सिद्धान्त मांडले असून महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात आजपर्यंत झालेल्या काही अभ्यासांची व शासकीय अहवालांची संक्षिप्त चर्चा केली आहे. (2) दुसऱ्या भागात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येविषयी आकडेवारीसह विश्लेषण केले आहे. (3) तिसऱ्या व शेवटच्या भागात प्रादेशिक असमतोलावरील उपाययोजनेसंबंधी चर्चा केली आहे.

### भाग 1

## प्रादेशिक असमतोलावरील काही प्रमुख सिद्धान्त

प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा केवळ एखाद्या राज्यापुरताच मर्यादित नसून त्याचे अस्तित्व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरही असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट होते. जगातील प्रत्येक देशात प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न अस्तित्वात असून अमेरिका, इंग्लंड, इटली, स्पेन, इत्यादी प्रगत देशसुद्धा यातून सुटलेले नाहीत. ज्याप्रमाणे गरीब आणि श्रीमंत वर्गांच्या उत्पन्न पातळीत अनेक कारणांमुळे (उदाहरणार्थ: शिक्षण, कौशल्य, संपत्ती) फार मोठी तफावत आढळते तसेच प्रदेशाप्रदेशांमध्ये काही मूलभूत कारणांमुळे (उदाहणार्थ : नैसर्गिक संपत्ती, जमीन, भांडवल, उपक्रमशीलता) प्रादेशिक असमतोल निर्माण होणे अपरिहार्य ठरते. एक गोष्ट येथे स्पष्ट करावयास हवी ती म्हणजे, गरीब आणि श्रीमंत गटांच्या उत्पन्नातील विषमता जशी पूर्णपणे दूर करता येत नाही त्याचप्रमाणे विकसित आणि अविकसित प्रदेशांतील असमतोल पूर्णपणे दूर करणे अशक्य असते. परंतु योग्यप्रकारची आर्थिक धोरणे राबवून हा असमतोल शक्य तेवढा कमी करणे मात्र सहज शक्य असते हे येथे नमूद करावयास हवे. अशा प्रकारचा प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे उपाय विकसित आणि विकसनशील देशांमध्ये सातत्याने चालू असून भारतही त्याला अपवाद नाही.

(1) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सायमन कुझनेटस्[1] यांच्या सिद्धान्ताप्रमाणे, भांडवलशाही स्वरुपाच्या अर्थव्यवस्थेत सुरुवातीच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतच देशातील प्रादेशिक असमतोल वाढत जातो आणि ती अर्थव्यवस्था पूर्ण विकासाच्या टप्प्यावर (maturity stage) येईपर्यंत ही प्रक्रिया चालूच राहते. परंतु त्यानंतर मात्र प्रादेशिक असमतोल हळूहळू कमी होत जातो. अर्थात, एवढी विकासाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी त्या अर्थव्यवस्थेस दीर्घ कालातून जावे लागते (50 ते 100 वर्षे). कुझनेटस् यानी अनेक भांडवलशाही देशांच्या अर्थवस्थेचा दीर्घकालीन

अभ्यास करून वरील सिद्धान्त मांडला आहे. त्यानी मांडलेला असमतोलाचा वक्र उलट्या इंग्रजी 'यू' आकाराचा आहे.

(2) सायमन कुझनेट्स् यांच्या वरील सिद्धान्ताची पडताळणी करून पाहण्याचा प्रयत्न नंतरच्या कालात अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केला. त्यामध्ये जे.जी. विल्यमसन [2] यांचा अमेरिकेतील राज्याराज्यांतील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास महत्त्वपूर्ण समजला जातो. राज्याचे दरडोई उत्पन्न व लोकसंख्या या दोन प्रमुख चल घटकांच्या साह्याने विल्यमसन यानी 'असमतोल गुणांकाच्या' साह्याने प्रादेशिक असमतोलाचे मापन केले.

(3) जॉफ्रे जे.डी. ही विंग्ज [3] या ब्रिटिश अर्थतज्ज्ञानी आपल्या ग्रंथात प्रादेशिक असमतोलाची सैद्धान्तिक बाजू अतिशय उत्तम रीतीने मांडली आहे. त्यांच्या मते कोणत्याही देशात भांडवली गुंतवणूक करताना सरकारला उच्च दराचे अभिवृद्धी उद्दिष्ट साध्य करताना सामाजिक उद्दिष्टाकडे काणाडोळा करून चालणार नाही. मोठ्या विकास दराचे राष्ट्रीय उद्दिष्ट कार्यदक्षतेशी निगडित असते तर अविकसित प्रदेशांच्या विकासाचे उद्दिष्ट हे सामाजिक न्यायावर आधारलेले असते. साहजिकच भांडवल गुंतवणुकीवर मिळणारा प्रत्याय अविकसित प्रदेशात कमी असतो. त्यामुळे, उच्च अभिवृद्धी दर (राष्ट्रीय उद्दिष्ट) व सामाजिक न्याय (प्रादेशिक उद्दिष्ट) या दोन उद्दिष्टांत परस्पर विरोध (trade-off) असतो असे मत त्यानी व्यक्त केले आहे. त्यामुळे मागास प्रदेशाचा विकास करावयाचा झाल्यास एकूण गुंतवणुकीचा योग्य तो वाटा प्रगत प्रदेशाकडून मागास प्रदेशाकडे वळविणे आवश्यक आहे, कारण कोणत्याही क्षणी एकूण भांडवलाचा साठा हा सीमित असतो. अर्थात असे धोरण अमलात आणल्यास राष्ट्रीय / राज्य पातळीवरील सर्वसाधारण अभिवृद्धी दरात घट होणार हे उघड आहे. विकास दरातील ही घट म्हणजे 'सामाजिक न्यायासाठी' दिलेली किंमत होय. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल खऱ्या अर्थाने कमी करावयाचा झाल्यास महाराष्ट्र शासनाने वरील सिद्धान्ताचा स्वीकार करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सुदैवाने उशिरा का होईना, सध्याच्या युती शासनाने नवव्या पंचवार्षिक योजनेच्या (1997-2002) मसुद्यात मागास प्रदेशाच्या विकासासाठी कालबद्ध विकास योजनांची तरतूद केली आहे, त्यामुळे त्वरीत विकासाचे (accelerated development) धोरण आता मान्य झाल्याचे दिसते.

## महाराष्ट्र राज्यातील असमतोलावरील काही प्रमुख अभ्यास

आतापर्यंत आपण प्रादेशिक असमतोलावरील काही प्रमुख सिद्धान्तांविषयी संक्षिप्त माहिती घेतली. भारतीय पातळीवर प्रादेशिक असमतोलावर अनेक अभ्यास व शासकीय समित्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. त्यात चक्रवर्ती समिती, पांडे समिती व इतर समित्यांचे अहवाल सुपरिचित आहेत.

महाराष्ट्र राज्य पातळीवरही प्रादेशिक असमतोलावर प्रकाश टाकणारे अनेक अभ्यास व अहवाल प्रसिद्ध झाले असून त्यापैकी काहींचा उल्लेख करणे उपयुक्त ठरेल. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात (1960) राज्याच्या 4 महसुली विभागात विकासाची पातळी कशी होती हे काही निकष वापरून प्रथमच जनतेपुढे मांडले. सन 1975 साली पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेने, मराठवाड्याच्या विकासावर एक नमुना अभ्यास प्रसिद्ध केला, ज्यात विकास पातळी निश्चित करण्याचे अनेक निकष वापरून राज्यातील बृहन्मुंबई, मुंबई विभाग, पुणे, मराठवाडा व विदर्भ या पाच विभागांची विकास पातळी दर्शविण्याचा प्रयत्न केला. सन 1980 साली, राज्य नियोजन मंडळाचे व दांडेकर समितीचे एक सदस्य नरोत्तम शहा यानी 'महाराष्ट्रातील जिल्ह्यांची विकास पातळी' हा अभ्यास प्रसिद्ध केला. अलीकडेच सप्टेंबर 1992 मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सीता प्रभू व पी. सी. सरकार यांचा 'महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा विकास स्तर' हा एक विस्तृत व अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध झाला. त्यात महाराष्ट्रातील 11 जिल्हे उच्च विकास पातळीवर, तीन जिल्हे मध्यम विकास पातळीवर तर बाकीचे 15 जिल्हे न्यून विकास (मागास) पातळीवर असल्याचे म्हटले आहे.

सन 1983 मध्ये महाराष्ट्र शासनाने सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका सत्यशोधन समितीची नेमणूक केली. या समितीचा अहवाल एप्रिल 1984 साली प्रसिद्ध करण्यात आला. या समितीच्या शिफारशी सध्या अमलात येत असल्यामुळे या अहवालावर सविस्तर चर्चा पुढील भागात केली आहे.

सन 1993 साली राज्य नियोजन मंडळाने नेमलेल्या अभ्यास गटाने 'महाराष्ट्रातील मागास विभागांचा विकास' हा अहवाल महाराष्ट्र शासनास सादर केला. भुजंगराव कुलकर्णी या अभ्यास गटाचे अध्यक्ष होते. या अहवालात महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे वर्गीकरण 12 निकष वापरून, मागास व प्रगत जिल्हे असे केले आहे. त्यात 17 जिल्हे मागास असल्याचा निष्कर्ष काढला असून प्रत्येक मागास जिल्ह्याची विकासाच्या दृष्टीने कोणती बलस्थाने व कोणत्या उणिवा आहेत हे स्पष्ट केले आहे. या मागास जिल्ह्यांच्या जलद विकासासाठी योजना निधीच्या 15 टक्के भाग या जिल्ह्यांवर आधिक्याने खर्च करावा अशी शिफारस या अहवालात केली आहे. हा अहवाल मराठीत असून सामान्य जनतेपुढे येणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने अजूनही हा महत्त्वपूर्ण अहवाल महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेला नाही.

अलीकडेच महाराष्ट्राच्या राज्यपालांनी नेमलेल्या 'निर्देशांक व अनुशेष समितीने' आपला अहवाल जुलै 1997 मध्ये राज्यपालांना सादर केला आहे. या समितीचा अंतरिम अहवाल सन 1995 मध्ये तर संपूर्ण पहिला खंड जुलै 1997 मध्ये सादर करण्यात आला. राज्यातील नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन वैधानिक विकास मंडळांचे अध्यक्ष या समितीचे सह-अध्यक्ष असून त्यात तिन्ही विभागांतील तज्ज्ञ सदस्य (प्रत्येकी दोन), लोकप्रतिनिधी व बाहेरील तज्ज्ञांचा समावेश आहे. भुजंगराव कुलकर्णी हे या समितीचे आमंत्रक आहेत. दांडेकर समितीच्या शिफारशी अमलात आणल्यानंतर सन 1984 ते 1994 या कालखंडात महाराष्ट्रातील असमतोल घटला किंवा नाही याचा सविस्तर अभ्यास या समितीने केला असून काही महत्त्वपूर्ण शिफारशीही केल्या आहेत.

## भाग 2

## दांडेकर समितीच्या अहवालाचे मूल्यमापन

महाराष्ट्र शासनाने सन 1983 साली सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका सत्यशोधन समितीची नेमणूक केली. या समितीने 'महाराष्ट्र प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल' शासनाला सन 1984 साली सादर केला. या अहवालावर सबंध महाराष्ट्रात वादळी चर्चा झाली तर मागास प्रदेशांतून या अहवालाविरुद्ध प्रतिक्रियाही व्यक्त करण्यात आल्या. विशेष म्हणजे, या अहवालास सर्व सदस्यांची सहमती नव्हती हे ध्यानात घ्यावयास हवे. त्यास दोन 'पूरक टिपणे' व दोन 'असहमती टिपणे' जोडलेली आहेत. साहजिकच, हा अहवाल शासनाने अजूनही अधिकृतपणे स्वीकारल्याचे दिसत नाही. तरीसुद्धा मागील 10 वर्षांपासून प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन आपल्या अर्थसंकल्पात विशेष वित्तीय तरतूद करीत आहे. शासनाने दांडेकर समिती नेमल्यामुळे एक चांगली गोष्ट घडली ती म्हणजे, महाराष्ट्रातील कोणता प्रदेश किती मागास किंवा प्रगत आहे हे चित्र अधिकृत आकडेवारीसह जनतेपुढे आले. अशा प्रकारची सत्यशोधन समिती शासनाने नेमण्याचा प्रयोग भारतात प्रथमच महाराष्ट्राने केला असे वाटते.

दांडेकर समितीने काढलेल्या वित्तीय अनुशेषानुसार, मागील 10 वर्षांत शासनाने बरीच रक्कम अनुशेष दूर करण्यावर खर्च केली आहे. त्याचा अपेक्षित परिणाम झाला का हे पाहणे आपल्या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणूनच या अहवालातील शिफारशींचे मूल्यमापन करणे आता गरजेचे आहे.

### उद्दिष्टे व विषय

दांडेकर समितीच्या विचारार्थ चार प्रमुख विषय देण्यात आले होते. त्यापैकी पहिल्या तीन विषयांत असमतोलाचे मापन करण्यासाठी निवडक निर्देशकांची निवड करणे; निवडक आर्थिक क्षेत्रांत राज्याची सरासरी ध्यानात घेऊन जिल्हानिहाय असमतोल

निश्चित करणे; राज्य व केन्द्र सरकारने दिलेल्या वित्तीय साहय्याचे तसेच त्यांच्या अखत्यारीतील वित्तीय संस्थांनी दिलेल्या साहाय्याचा आढावा घेणे; निवडलेल्या निर्देशकांच्या संदर्भात त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन, शासनाने कोणती कार्यवाही करावी हे निश्चित करणे या बाबी समाविष्ट होत्या. चौथ्या विषयात अंतर्भाव होता तो समितीने निश्चित केलेला सध्याच्या विकासातील असमतोल दूर करण्याचे उपाय सुचविणे आणि अशा प्रकारचा असमतोल पुनःपुन्हा उद्‌भवणार नाही यासाठी दीर्घकालीन उपाययोजना सुचविणे *(दांडेकर अहवाल, पृ. 1)*. यापैकी चौथा विषय आपल्या आजच्या चर्चेचा प्रमुख मुद्दा आहे असे मला वाटते.

### सन 1984 ते 1994 या दशकात प्रादेशिक असमतोल कमी झाला का ?

दांडेकर समितीने प्रादेशिक असमतोल निश्चित करण्यासाठी एकूण 9 आर्थिक क्षेत्रांची (economic sectors) निवड केली आणि प्रत्येक क्षेत्राचा जिल्हावार अनुशेष, त्या क्षेत्राची राज्य सरासरी व जिल्हा सरासरी यातील अंतर ध्यानात घेऊन, काढण्यात आला. जे जिल्हे राज्य सरासरीच्या वर असतील त्यांना अनुशेष देण्यात आला नाही. फक्त राज्य सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांनाच अनुशेष देण्यात आला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अनुशेष काढताना प्रथम तो भौतिक स्वरुपात (physical terms) काढून नंतर त्याचे रूपांतर चालू किमतीला वित्तीय स्वरुपात (financial terms) करण्यात आले. अनुशेष काढताना जिल्हा हा मापनाचा घटक धरण्यात आला. फक्त सिंचन क्षेत्रासाठी मात्र अपवाद करून दुष्काळी तालुक्यांसाठी तालुका हा घटक समजण्यात आला. यावर अनेक तज्ज्ञांनी टीकाही केली आहे. दांडेकर समितीने अनुशेष काढताना फक्त शासकीय व शासन साहाय्यीत खर्चाचाच आपल्या विश्लेषणात समावेश केला; त्यातून खाजगी क्षेत्र पूर्णपणे वगळले. वि. वि. बोरकर यांची असहमती टिपणी याच प्रमुख मुद्यावर आधारित आहे हे येथे सांगितले पाहिजे.

दांडेकर समितीने काढलेला विभागीय अनुशेष तक्ता 1 मध्ये दाखविला आहे. त्यामध्ये सर्वाधिक अनुशेष रु. 1,246.55 कोटी (39.12 टक्के) विदर्भाचा, रु. 884.05 कोटी (27.74 टक्के) पश्चिम महाराष्ट्राचा, रु. 750.85 कोटी (23.56 टक्के) मराठवाड्याचा, रु. 295.62 कोटी (9.28 टक्के) कोकण विभागाचा तर रु. 9.71 कोटी (0.30 टक्के बृहन्मुंबईचा आहे.

वरील विभागीय अनुशेष दूर करण्याच्या उद्देशाने शासनाने सन 1985-86 पासून, दांडेकर समितीच्या आकडेवारीनुरूप वार्षिक अर्थसंकल्पात तरतूद करण्यास सुरुवात केली. यासंबंधीची माहिती तक्ता 6 मध्ये दिली आहे. सुरुवातीला ही रक्कम केवळ 200 कोटी रुपये, म्हणजे योजना खर्चाच्या केवळ 11.76 टक्के होती. नंतरच्या वर्षात ही रक्कम जास्तीत जास्त 500 कोटी रुपयांपर्यंत (1994-95) गेल्याचे दिसते. तरीसुद्धा योजना खर्चाच्या ती फक्त 9.6 टक्केच आहे. अशा रीतीने सन 1985-86 ते 1994-95 या 10 वर्षात अनुशेषापोटी शासनाने एकूण 4080.80 कोटी रुपये खर्च केले आहेत. एकूण योजना खर्चाच्या (रु.28,922 कोटी) ही रक्कम केवळ 14.10 टक्के पडते. ( तक्ता 6 पाहा.)

दांडेकर समितीने काढलेला भौतिक अनुशेष अजूनही बाकी आहे. त्या कामाचे भावफुगवटा ध्यानात घेऊन 1 एप्रिल,1993 रोजी पुनर्मूल्यांकन करण्यात आले; त्याचे मूल्य 3,261 कोटी रुपये झाले. हा अनुशेष भरून काढण्याचे काम सध्या सुरू आहे. साधारणतः सन 2000 पर्यंत हे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

### निर्देशक व अनुशेष समितीचा अहवाल,१९९७

दांडेकर समितीच्या अहवालातील आकडेवारीनुसार शासनाने मागील 10 वर्षांत साधारणतः 4,100 कोटी रुपये विभागीय असमतोल दूर करण्यासाठी खर्च केले. याचा अपेक्षित परिणाम झाला किंवा नाही याचे उत्तर 'निर्देशक व अनुशेष समितीच्या' अहवालाने दिले. त्यासंबंधीची आकडेवारी तक्ता 1 मध्ये दिली आहे. त्याचे विश्लेषण करू.

तक्ता 1 मधील आकडेवारीवरून काही महत्त्वाचे निष्कर्ष आपण काढू शकतो. पहिला निष्कर्ष म्हणजे, सन 1984 ते 1994 या दहा वर्षांच्या कालखंडात

तक्ता 1

**महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोलाचा अनुशेष : 1984 व 1994**

*(कोटी रुपये चालू किमतीस)*

| प्रदेश | दांडेकर समिती, 1984 | | निर्देशक व अनुशेष समिती, 1994 | | बदल (टक्के) घट (-) वाढ (+) |
|---|---|---|---|---|---|
| | अनुशेष | एकूणाशी टक्केवारी | अनुशेष | एकूणाशी टक्केवारी | |
| (1) उर्वरित महाराष्ट्र | 1,189.38 | 37.32 | 3,768.20 | 24.54 | -12.78 |
| (अ) बृहन्मुंबई | 9.71 | 0.30 | | | |
| (आ) कोकण | 295.62 | 9.28 | | | |
| (इ) प. महाराष्ट्र | 884.05 | 27.74 | | | |
| (2) मराठवाडा | 750.85 | 23.56 | 4,626.55 | 30.13 | +6.57 |
| (3) विदर्भ | 1,246.55 | 39.12 | 6,961.02 | 45.33 | +6.21 |
| एकूण | 3,186.78 | 100.00 | 15,355.77 | 100.00 | |

**स्रोत:** *1984 ची आकडेवारी दांडेकर समितीचा अहवाल व 1994 ची आकडेवारी निर्देशक व अनुशेष समितीच्या (1997) अहवालापासून घेतलेली आहे.*

दांडेकर समितीच्या शिफारशीनुसार (अपवाद वगळता) कार्यवाही करूनही महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल कमी होण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. हा निष्कर्ष आपणा सर्वांनाच धक्कादायक वाटल्यास नवल नाही. राज्याचा एकूण अनुशेष 3,186.78 कोटी रुपयावरून 15,355.77 कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. ही वाढ वित्तीय स्वरुपात व चालू किमतीला पाच पट आहे. स्थिर किमतीला हा अनुशेष साधारणतः 6,000 कोटी रुपये होतो. तरीसुद्धा सन 1984 व 1994 मधील अनुशेषाची वाढ 88 टक्के येते. दांडेकर समितीने स्वीकारलेल्या मूळ उद्दिष्टालाच हा निष्कर्ष छेद असून शासनाचे असमतोल दूर करण्याचे धोरण पूर्णपणे फसले आहे असे खेदाने म्हणावे लागते.

तक्ता 1 वरून आणखी एक निष्कर्ष काढता येईल तो म्हणजे, सन 1984 ते 1994 या कालात मागास समजल्या जाणाऱ्या विदर्भ व मराठवाडा विभागांच्या अनुशेषात वाढ झाली असून (अनुक्रमे 6.21 टक्के व 6.57 टक्के) त्याउलट प्रगत अशा उर्वरित महाराष्ट्र विभागातील अनुशेषाच्या प्रमाणात 12.78 टक्क्यांनी घट झाली आहे. याचा अर्थ, मागास प्रदेश अधिक मागास तर प्रगत प्रदेश अधिक प्रगत झाले असे दिसते. ही एक गंभीर बाब म्हटली पाहिजे.

विभागीय अनुशेषात दरडोई वाढ झाली आहे. यासंबंधीची आकडेवारी तक्ता 2 मध्ये दिली आहे. त्यावरूनसुद्धा प्रादेशिक असमतोल कमी होण्याऐवजी वाढला आहे हे सिद्ध होते.

राज्याचा दरडोई अनुशेष सन 1984 साली 540 रुपये होता तो 1994 मध्ये 1945 रुपयांवर गेला आहे. उर्वरित महाराष्ट्रात तो सर्वात कमी (755

### तक्ता 2

### दरडोई प्रादेशिक अनुशेष : 1984 व 1994

| प्रदेश | दरडोई अनुशेष (रु.) | | दरडोई अनुशेष निर्देशांक | | निर्देशांकातील घट(–) वाढ (+) (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| | 1984 | 1994 | 1984 | 1994 | |
| 1 उर्वरित महाराष्ट्र | 327 | 755 | 61 | 39 | -22 |
| 2 मराठवाडा | 772 | 3,614 | 143 | 186 | +43 |
| 3 विदर्भ | 869 | [illegible],001 | 161 | 206 | +47 |
| राज्य सरासरी | 540 | 1,945 | 100 | 100 | ---- |

**स्रोतः** *निर्देशक व अनुशेष समितीचा अहवाल, 1997, पृ. 351.*

रुपये) असून विदर्भ विभागात तो सर्वाधिक (4,001 रुपये) आहे. दरडोई अनुशेषासंबंधी तीन प्रदेशांची सापेक्ष स्थिती कशी आहे हे तपासण्यासाठी दरडोई अनुशेष निर्देशांक उपयुक्त ठरतो. तक्ता 2 प्रमाणे उर्वरित महाराष्ट्राचा दरडोई अनुशेष निर्देशांक सन 1984 मध्ये 61 होता तो सन 1994 मध्ये 39 अंकापर्यंत घटला आहे. याउलट मराठवाड्याचा याच कालात 143 वरून 186 पर्यंत तर विदर्भाचा 161 वरून 206 पर्यंत वाढला आहे. याचा अर्थ, शासनाने अनुशेषासाठी जो काही खर्च केला आहे त्याचा जास्तीत जास्त चांगला परिणाम उर्वरित महाराष्ट्र प्रदेशावर झाला असून इतर दोन मागास प्रदेशांची स्थिती पूर्वीपेक्षा अधिकच वाईट झाली आहे असा होतो.

दरडोई अनुशेषात जिल्हावार वाढ कशी झाली हे अभ्यासणेही उपयुक्त ठरेल, कारण त्यावरून जिल्ह्याच्या मागासपणाची तीव्रता आपल्या लक्षात येईल. सन 1994 साली राज्याचा दरडोई अनुशेष 1,945 रुपये होता. सर्वात कमी बृहन्मुंबईचा केवळ 90 रुपये तर सर्वाधिक 6,189 रुपये अमरावती जिल्ह्याचा आहे. विशेष म्हणजे, उर्वरित महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग (4,403 रुपये) व धुळे (2,218 रुपये) हे दोन जिल्हे वगळल्यास बाकीच्या सर्व जिल्ह्यांचे दरडोई अनुशेष राज्य सरासरीच्या (1,945 रुपये) खूपच खाली असल्याचे लक्षात येईल. (तक्ता 5 शेवटचा स्तंभ पाहा.) याउलट मराठवाड्यातील नांदेड वगळता सर्व जिल्हे राज्य सरासरीच्या खूप वर आहेत. हीच स्थिती विदर्भ विभागात दिसते. या विभागात नागपूर व वर्धा जिल्हा वगळता बाकीच्या 7 जिल्ह्यांचा दरडोई अनुशेष चिंताजनक आहे.

**दरडोई उत्पन्नाच्या संदर्भात प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषण** (1955-56 ते 1989-92)

दरडोई उत्पन्नाच्या संकल्पनेस आधुनिक अर्थशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे याचे कारण त्यावरून त्या देशाच्या /राज्याच्या/ प्रदेशातील सामान्य जनतेचे जीवनमान कोणत्या पातळीवर आहे हे समजते. दरडोई उत्पन्नातील वाढ आर्थिक प्रगतीचे एक गमक समजले जाते तर घट हे सामान्य जनतेची आर्थिक स्थिती खालावल्याचे लक्षण मानले जाते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील तीन प्रदेशांतील दरडोई उत्पन्नात कसे बदल झाले हे पाहणे निश्चितच उद्बोधक ठरेल. यासंबंधीची आकडेवारी तक्ता 3 मध्ये दिली आहे. (आलेख 1 पाहा.)

तक्ता 3


महाराष्ट्र राज्यातील दरडोई उत्पन्नाचे प्रादेशिक चालू किमतीप्रमाणे निर्देशांक (1955-56 ते 1989-92)

| | दरडोई उत्पन्न (रु.) व निर्देशांक | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | महाराष्ट्र राज्य |
|---|---|---|---|---|---|
| | **1955-56** | | | | |
| 1 | दरडोई उत्पन्न (रु.) | 231 | 174 | 345 | 292 |
| 2 | निर्देशांक | 79.0 | 50.0 | 118.0 | 100.0 |
| | **1978-79** | | | | |
| 1 | दरडोई उत्पन्न (रु.) | 1,082 | 1,036 | 1,886 | 1,570 |
| 2 | निर्देशांक | 68.9 | 66.0 | 120.1 | 100.0 |
| | **1983-87 (सरासरी)** | | | | |
| 1 | दरडोई उत्पन्न (रु.) | 2,094 | 2,047 | 3,406 | 2,899 |
| 2 | निर्देशांक | 72.2 | 70.6 | 117.5 | 100.0 |
| | **1989-92 (सरासरी)** | | | | |
| 1 | दरडोई उत्पन्न (रु.) | 5,354 | 4,711 | 8,363 | 7,107 |
| 2 | निर्देशांक | 75.3 | 66.0 | 117.7 | 100.0 |

**स्रोत:** भुजंगराव कुलकर्णी, *मराठवाड्याचा विकास: अभ्यास व चिंतन,* पद्मा प्रकाशन, औरंगाबाद, 1998, पृ. 279.

आलेख 1

महाराष्ट्रातील प्रादेशिक दरडोई उत्पन्न निर्देशांक (1955-56 ते 1989-92)



सन 1955-56 या वर्षी महाराष्ट्राचे (द्वैभाषिक मुंबई) दरडोई उत्पन्न 292 रुपये होते. त्याच वर्षी उर्वरित महाराष्ट्राचे 345 रुपये, मराठवाडा 174 रुपये तर विदर्भाचे 231 रुपये होते. राज्य सरासरी 100 गृहीत धरून दरडोई उत्पन्नाचे निर्देशांक तक्ता 3 मध्ये दिले आहेत. या निर्देशांकातील बदल प्रत्येक विभागाची स्थिती दर्शवितात. सन 1955-56 ते 1989-92 या कालखंडात उर्वरित महाराष्ट्राचा निर्देशांक 120.1 वरून 117.7 पर्यंत खाली आला. तरीसुद्धा तो राज्य सरासरीच्या 18 अंकांनी व सातत्याने वरच आहे. याउलट मराठवाड्याचा निर्देशांक 50 वरून 66 वर म्हणजे 16 अंकाने सुधारला आहे. विदर्भाचा मात्र 79 अंकावरून 75.3 अंकांपर्यंत घसरला आहे. परंतु हे दोन्ही प्रदेश राज्य सरासरीच्या सातत्याने खालीच आहेत. या दोन प्रदेशांनी या कालात आर्थिक प्रगती केली असली तरी सापेक्षतेने ती महाराष्ट्र राज्य व उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेने खूपच कमी आहे.

## दरडोई उत्पन्नातील प्रादेशिक विषमता

आतापर्यंत आपण सन 1984 च्या तुलनेने 1994 साली प्रादेशिक असमतोलात प्रचंड वाढ झाल्याचे अधिकृत आकडेवारी घेऊन स्पष्ट केले आहे. आता दरडोई उत्पन्नातील प्रादेशिक विषमता कमी झाली की वाढली हे काही साध्या सांख्यिकीय सूत्रांच्या साह्याने अभ्यासू. यासाठी सन 1983-87 व सन 1989-92 या दोन वर्षातील प्रादेशिक दरडोई उत्पन्नाचा विचार करू. कारण ही दोन वर्षे दांडेकर समिती (1984) व नंतरचा काल यात मोडतात. त्यामुळे दांडेकर समितीच्या शिफारशींचा दरडोई उत्पन्नातील विषमतेवर कसा परिणाम झाला हे कळेल. तक्ता 4 पाहा.

अपस्करणमान गुणांकाच्या साह्याने (Coefficient of Range) आपणास कमाल आणि किमान दरडोई उत्पन्नातील तफावत किती आहे हे कळते. सन 1983-87 या कालात उर्वरित महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक तर मराठवाड्याचे सर्वात कमी होते. या वर्षी अपस्करणमान गुणांक (0.249 किंवा 24.9 टक्के) होता. सन 1989-92 या कालात कमाल व किमान दरडोई उत्पन्नातील तफावत (0.279 किंवा 27.9 टक्के) वाढली आहे; म्हणजे विषमतेत वृद्धी झाली आहे.

याच सूत्राने जिल्हा स्तरावर कमाल व किमान दरडोई उत्पन्न यातील तफावत पाहणे उद्बोधक ठरेल. तक्ता 5 मध्ये महाराष्ट्रातील 30 जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न दाखविले आहे. यातील आकडेवारीवरून पुढील निष्कर्ष काढता येतात.

(1) सन 1983-87 या कालात बृहन्मुंबईचे दरडोई उत्पन्न कमाल (6,218 रुपये) तर धुळ्याचे सर्वात कमी (1,801 रुपये) होते. या दोहोंतील अपस्करणमान गुणांकाची किंमत 0.550 किंवा 55 टक्के होती. सन 1989-92 या कालात बृहन्मुंबईचे दरडोई उत्पन्न (13,453 रुपये) सर्वाधिक तर गडचिरोली जिल्ह्याचे सर्वात कमी (3,755 रुपये)

**तक्ता 4**

**अपस्करणमान गुणांकाच्या साह्याने महाराष्ट्रातील प्रादेशिक दरडोई उत्पन्नातील विषमतेचे मापन**

| वर्ष | कमाल दरडोई उत्पन्न (रु.) | किमान दरडोई उत्पन्न (रु.) | कमाल-किमान फरक | अपस्करणमान गुणांक |
|---|---|---|---|---|
| 1983-87 सरासरी | 3,406 (उर्वरित महाराष्ट्र) | 2,047 (मराठवाडा) | 1,359 | 0.249 |
| 1989-92 सरासरी | 8,363 (उर्वरित महाराष्ट्र) | 4,711 (मराठवाडा) | 3,652 | 0.279 |

होते. या दोहोतील तफावत किंवा अपस्करणमान गुणांकाची किंमत 0.563 किंवा 56.3 टक्के येते. याचा अर्थ या कालात जिल्ह्याजिल्ह्यातील विषमतेत वृद्धी झाली आहे असा होतो.

(2) बृहन्मुंबई वगळून वरील दोन कालखंडांतील कमाल व किमान दरडोई उत्पन्नाचे अपस्करण गुणांक सन 1983-87 साठी (0.422 किंवा 42.2 टक्के) तर 1989-92 या कालासाठी (0.508 किंवा 50.8 टक्के) होते. याचा अर्थ, मुंबई वगळून जिल्ह्यांच्या विषमतेत अधिक वाढ झालेली दिसते.वरील विश्लेषणावरून एक महत्त्वाचा निष्कर्ष काढता येईल तो म्हणजे, सन 1983 ते 1992 या कालात महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नात मोठी विषमता निर्माण झाली आहे.

(3) विषमता मापन करण्याचा आणखी एक सांख्यिकीय प्रकार म्हणजे प्रचरण गुणांक (Coefficient of Variation) होय. या पद्धतीत राज्याच्या दरडोई उत्पन्नापासून जिल्ह्यांच्या विचलनाची सरासरी किती आहे हे कळते. तक्ता 5 मधील जिल्हा दरडोई उत्पन्नाची आकडेवारी वापरल्यास सन 1983-87 च्या प्रचरण गुणांकाची किंमत 33.02 टक्के तर 1989-92 ची किंमत 37.18 टक्के येते. यावरूनसुद्धा विषमता वाढल्याचे स्पष्ट होते.

**सन 1984 ते 1994 या कालात असमतोल वाढण्याची कारणमीमांसा**

महाराष्ट्र राज्याच्या तीन प्रदेशांत असमतोल पूर्वीपेक्षा अधिक वाढल्याचे आपण आकडेवारीसह पाहिले, तसेच आंतर्जिल्हा असमतोल वाढल्याचाही निष्कर्ष काढला. आता हा असमतोल कोणकोणत्या कारणांमुळे वाढला यासंबंधी काही प्रमुख मुद्दे विचारात घेऊ.

(1) दांडेकर समितीने अनुशेष दूर करण्यासाठी 85:15 हे सूत्र सुचविले होते. याचा अर्थ, प्रत्येक योजनेवरील खर्चाचा 85 टक्के निधी अनुशेष असलेल्या जिल्ह्यांत खर्च करावा व बाकी 15 टक्के सर्व जिल्ह्यांच्या नैसर्गिक वाढीसाठी व चालू असलेल्या योजनांसाठी वापरावा असे सुचविले. परंतु प्रत्यक्षात शासनाने हे सूत्र पाळलेच नाही. व्यावहारिक दृष्टीने ते अशक्य आहे असे सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येक योजनेतील फार मोठा निधी अनुशेष दूर करण्यासाठी मिळालाच नाही.

(2) दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, एकूण वार्षिक योजना खर्चाच्या केवळ 14 टक्के रक्कम मागील दहा वर्षांत अनुशेष दूर करण्यासाठी वापरण्यात आली. साहजिकच एवढ्या अल्प रकमेचा परिणाम विभागीय अनुशेष दूर करण्यावर होईल हे पटण्यासारखे नाही. (तक्ता 6 पाहा.)

(3) तिसरी व अधिक गंभीर स्वरूपाची बाब म्हणजे, प्रत्येक विभागाला मिळणारे एकूण अनुशेषातील प्रमाण व प्रत्यक्षात त्या प्रदेशावर खर्च झालेली अनुशेषाची रक्कम यात फार मोठी तफावत आढळते.

तक्ता 5

**महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, विकासस्तर, दरडोई अनुशेषाची जिल्हावार माहिती**

| | जिल्हा/प्रदेश | लोकसंख्या 1991 (लाखात) | दरडोई उत्पन्न (1983-87 सरासरी) (रु.) | दरडोई उत्पन्न निर्देशांक (1983-87) | सर्वसाधारण विकास निर्देशांक (1985-86) | दरडोई उत्पन्न (रु.) (1989-92) | दरडोई अनुशेष (रु.) (1994) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | बृहन्मुंबई | 99.25 | 6,218 | 0000 | 0000 | 13,453 | 90 |
| 2 | ठाणे | 52.49 | 4,439 | 163.9 | 143.2 | 10,572 | 570 |

| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | रायगड | 18.24 | 3,920 | 115.2 | 110.2 | 11,522 | 1,574 |
| 4 | रत्नागिरी | 15.44 | 2,312 | 85.4 | 87.8 | 4,763 | 1,605 |
| 5 | सिंधुदुर्ग | 8.32 | 2,709 | 100.0 | 91.0 | 6,142 | 4,403 |
| 6 | नाशिक | 38.51 | 2,712 | 100.1 | 138.5 | 6,187 | 847 |
| 7 | धुळे | 25.35 | 1,801 | 66.5 | 84.3 | 4,030 | 2,218 |
| 8 | जळगांव | 31.87 | 2,666 | 98.4 | 122.1 | 5,120 | 747 |
| 9 | अहमदनगर | 33.72 | 2,275 | 84.0 | 117.5 | 4,980 | 557 |
| 10 | पुणे | 55.32 | 4,227 | 156.1 | 166.2 | 9,797 | 590 |
| 11 | सातारा | 24.51 | 2,777 | 102.5 | 111.5 | 5,498 | 536 |
| 12 | सांगली | 22.09 | 2,733 | 100.1 | 110.0 | 5,807 | 824 |
| 13 | सोलापूर | 32.31 | 2,631 | 97.2 | 108.9 | 5,230 | 438 |
| 14 | कोल्हापूर | 29.88 | 2,938 | 108.5 | 160.4 | 6,753 | 564 |
| | उर्वरित महाराष्ट्र | 487.30 | 3,750 | 138.5 | - | 8,354 | 755 |
| 15 | औरंगाबाद | 22.13 | 2,186 | 80.7 | 116.1 | 6,211 | 5,152 |
| 16 | जालना | 13.64 | 1,916 | 70.8 | 63.4 | 4,126 | 5,338 |
| 17 | परभणी | 21.17 | 2,770 | 102.3 | 62.8 | 4,987 | 2,238 |
| 18 | बीड | 18.22 | 2,435 | 89.9 | 64.0 | 4,489 | 4,264 |
| 19 | नांदेड | 23.30 | 2,123 | 78.4 | 78.4 | 4,263 | 1,124 |
| 20 | उस्मानाबाद | 12.77 | 2,135 | 78.8 | 59.2 | 4,589 | 5,401 |
| 21 | लातूर | 16.77 | 1,808 | 66.8 | 66.0 | 4,026 | 3,102 |
| | मराठवाडा | 128.00 | 2,217 | 81.9 | - | 4,738 | 3,314 |
| 22 | बुलढाणा | 18.86 | 1,996 | 73.70 | 75.5 | 3.904 | 5,733 |
| 23 | अकोला | 22.14 | 2,029 | 74.9 | 88.7 | 4,643 | 5,747 |
| 24 | अमरावती | 22.00 | 2,152 | 79.5 | 103.9 | 4,807 | 6,189 |
| 25 | यवतमाळ | 20.77 | 1,930 | 71.3 | 68.7 | 4,556 | 5,826 |
| 26 | वर्धा | 10.67 | 2,223 | 82.1 | 97.9 | 5,310 | 2,990 |
| 27 | नागपूर | 32.87 | 3,099 | 114.4 | 142.9 | 7,778 | 744 |
| 28 | भंडारा | 21.07 | 2,192 | 80.9 | 97.2 | 4,729 | 1,111 |

| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | चंद्रपूर | 17.70 | 2,539 | 93.8 | 89.6 | 6,437 | 4,806 |
| 30 | गडचिरोली | 7.96 | 2,129 | 78.6 | 53.8 | 3,755 | 4,511 |
| | विदर्भ | 174.60 | 2,318 | 85.6 | - | 5,358 | 4,001 |
| | महाराष्ट्र | 789.36 | 3,190 | - | - | 7,107 | 1,945 |
| | महाराष्ट्र (मुंबई वगळून) | 690.11 | 2,708 | 100.0 | 100.0 | 6,193 | - |

तक्ता 6

**योजना खर्चात रकमेची तरतूद व प्रत्यक्ष अनुशेष खर्चाचे प्रमाण (1985-95)**

*(कोटी रूपये)*

| वर्ष | एकूण योजना खर्च (रु.) | अनुशेषासाठी नियतपरिव्यय (रु.) | प्रत्यक्ष अनुशेष खर्च (रु.) | स्तंभ 3 चे स्तंभ 2 शी प्रमाण (टक्के) | स्तंभ 4 चे स्तंभ 3 शी प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1985-86 | 1,700 | 200 | 133.04 | 11.76 | 66.52 |
| 1986-87 | 2,110 | 250 | 184.89 | 11.84 | 73.96 |
| 1987-88 | 2,320 | 300 | 244.06 | 12.93 | 81.35 |
| 1988-89 | 2,430 | 400 | 365.41 | 16.46 | 91.35 |
| 1989-90 | 2,640 | 500 | 432.83 | 18.94 | 86.57 |
| 1990-91 | 2,550 | 450 | 412.92 | 17.64 | 91.76 |
| 1991-92 | 3,000 | 485 | 414.99 | 16.17 | 85.56 |
| 1992-93 | 3,160 | 498 | 485.26 | 15.75 | 97.44 |
| 1993-94 | 3,804 | 497 | उ.ना. | 13.08 | - |
| 1994-95 | 5,208 | 500 | उ.ना. | 9.60 | - |
| एकूण | 28,922 | 4,080 | - | 14.10 | - |

**स्रोत:** *Report of the Indicators and Backlog Committee : Interim Report, 1995, p. 189.*

तक्ता 7

**विभागवार अनुशेष व प्रत्यक्षात खर्च केलेली अनुशेषाची रक्कम (1985-95)**

***(कोटी रुपये)***

| विभाग | दांडेकर समितीने काढलेला अनुशेष (1984) | एकूणाशी टक्केवारी | प्रत्यक्ष केलेला खर्च | एकूणाशी टक्केवारी | खर्चातील तूट (-) किंवा अधिक्य (+) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टक्के | रक्कम |
| विदर्भ | 1,246.55 | 39.12 | 1,382.66 | 37.54 | -1.58 | 58.20 |
| मराठवाडा | 750.80 | 23.56 | 813.09 | 22.07 | -1.49 | 54.88 |
| उर्वरित महाराष्ट्र | 1,189.38 | 37.32 | 1,487.70 | 40.39 | +3.07 | -113.08 |
| एकूण | 3,186.78 | 100.00 | 3,683.45 | 100.00 | - | - |

**स्रोत:** *Report of the Indicators and Backlog Committee : Interim Report, 1995 Table 5.3 p. 179.*

तक्ता 7 मध्ये विदर्भाचा अनुशेषाचा वाटा 39.12 दाखविला आहे, पण प्रत्यक्षात विदर्भात झालेला खर्च 37.54 टक्के आहे. याचा अर्थ, विदर्भात अनुशेषापोटी 1.58 टक्के (58.20 कोटी रुपये) कमी खर्च करण्यात आले. हीच गोष्ट मराठवाड्याच्या बाबतीतही दिसून येईल. या विभागातसुद्धा 23.56 टक्के खर्च अपेक्षित होता, पण प्रत्यक्षातील अनुशेष खर्च 22.07 टक्के आहे. म्हणजेच 1.49 टक्के (54.88 कोटी रुपये) रकमेची घट आहे. याउलट उर्वरित महाराष्ट्र विभागाचा वाटा 37.32 टक्के असताना या विभागावर मात्र 40.39 टक्के किंवा 3.07 टक्के (113.08 कोटी रुपये) अधिक रक्कम खर्च करण्यात आली. शासनाने या प्रकाराची गंभीरतेने दखल घेणे जरुरीचे आहे, कारण अशा धोरणामुळेही अनुशेष वाढण्यास मदतच झाली आहे.

(4) तक्ता 6 वरून एक गोष्ट सहज लक्षात येईल ती म्हणजे दर वर्षीच्या अनुशेषासाठी ठेवलेल्या नियत व्ययापेक्षा त्याच वर्षी प्रत्यक्ष खर्च झालेली अनुशेषाची रक्कम कमीच आहे. उदाहरणार्थ, 1985-86 साली हे प्रमाण केवळ 66.52 टक्के तर 1986-87 साली 73.96 टक्के आहे. याचा अर्थ अनुशेष रकमेपैकी एक - तृतीयांश व एक - चतुर्थांश रक्कम वापरलीच गेली नाही असा होतो. सन 1992-93 साली मात्र 97.44 टक्के रक्कम वापरल्याचे दिसते. प्रशासन अधिक कार्यदक्ष व विकासाभिमुख असणे किती गरजेचे आहे हे वरील आकडेवारीवरून लक्षात येईल.

(5) राज्याच्या सर्व भागांत, विशेषत: प्रगत भागांत, अनेक प्रकारच्या विशेष योजना मोठ्या प्रमाणावर हाती घेतल्या जातात. उदाहरणार्थ, पश्चिम घाट विकास योजना (ज्यामध्ये पुण्यासारख्या प्रगत विभागाचा समावेश होतो), डोंगरी विभाग योजना, कृष्णा खोरे योजना, इत्यादी योजनांमुळे प्रचंड पैसा विशिष्ट भागात खर्च होतो. कृष्णा खोरे योजना महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे हे जरी खरे असले तरी ती पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्रातील अनुशेष प्रचंड वाढेल हेसुद्धा मान्य करावे लागेल.

याशिवाय आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांचे (जागतिक बँक, आशियाई बंक, इत्यादी) अनेक प्रकल्प राज्याच्या वेगवेगळ्या भागांत कार्यान्वित केले जातात. या सर्वांचा परिणाम विभागीय असमतोल वाढण्यावर होतो. तसेच बिगर-योजना खर्चाचा आकारसुद्धा सतत वाढत असून त्याचे विभागीय वाटप असमतोल वाढल्यास नवल नाही.

## भाग 3

मागच्या भागात आपण विभागीय असमतोल कसा

निर्माण झाला या प्रमुख समस्येविषयी सविस्तर विवेचन केले. या शेवटच्या भागात या समस्येवर कोणकोणते उपाय शक्य आहेत हे पाहू.

**दांडेकर समितीच्या पद्धतीचे मूल्यमापन**

प्रथम दांडेकर समितीने अनुशेष मापनाची जी पद्धती स्वीकारली होती त्याविषयी नव्या संदर्भात विचार करणे गरजेचे वाटते.

**(1) भौतिक अनुशेष**

राज्य सरासरी व जिल्हा सरासरी यातील क्षेत्रीय अंतरास दांडेकर समितीने 'भौतिक अनुशेष' म्हटले आहे. जे जिल्हे राज्य सरासरीच्या खाली असतील त्याना राज्य सरासरीपर्यंत आणण्याचा उद्देश या पद्धतीत अभिप्रेत आहे. या पद्धतीत दोन प्रमुख अडचणी आहेत. एक म्हणजे, मागास जिल्हे राज्य सरासरीपर्यंत येण्यास साधारणत: 5 ते 10 वर्षे लागतात. परंतु अर्थव्यवस्था गतिमान असल्यामुळे या कालखंडात सबंध राज्य सरासरीच वर सरकते आणि मागास जिल्हे पुनश्च मागासच राहतात. त्यामुळे या पद्धतीत मागास जिल्हे मागास ठेवण्याचाच गुणधर्म अंगभूत आहे असे दिसते. दांडेकर समितीनेही यावर भाष्य केले असून अनुशेष दूर करीत राहणे ही एक सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ, मागास जिल्ह्यांनी राज्य सरासरी गाठणे म्हणजे मृगजळाच्या मागे धावण्यासारखे आहे, कारण अशी सरासरी गाठणे त्याना कदापि शक्य नसते !

राज्य सरासरीच्या पद्धतीत सिंचनासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील काही नैसर्गिक मर्यादांचाही आता पुनर्विचार करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, सध्या महाराष्ट्रात सिंचन क्षेत्राचे राज्य सरासरी प्रमाण 21 टक्के आहे. परंतु अनेक जिल्ह्यांत अंतिम सिंचन क्षमताच ( ultimate irrigation potential) मुळी 21 टक्क्यांपेक्षा कितीतरी कमी आहे. (उदाहरणार्थ, जालना 15.21 टक्के, लातूर 19.45 टक्के, बुलढाणा 16.74 टक्के, अकोला 11.01टक्के, उस्मानाबाद 11.3 टक्के व अमरावती 19.27 टक्के). नैसर्गिक मर्यादेमुळे या जिल्ह्यांत पुरेसे पाणीच उपलब्ध नसल्यामुळे या जिल्ह्यांना राज्य सरासरीपर्यंत कसे आणणार? त्यांचा सिंचनाचा अनुशेष कसा काढणार हा मूलभूत प्रश्न होय.

तसेच एखाद्या जिल्ह्यात फार मोठे क्षेत्र जंगल व्याप्त असल्यास राज्य सरासरीएवढ्या रस्त्यांची लांबी त्याना कदाचित आवश्यक वाटत नसेल; त्याऐवजी शाळा किंवा दवाखाने अधिक हवे असतील. अशा स्थानिक गरजा या पद्धतीत विचारात घेता येत नाहीत.

**(2) खाजगी क्षेत्र**

खाजगी क्षेत्राला पूर्णपणे वगळणे योग्य आहे का याचाही आता नव्याने विचार होण्याची गरज आहे. भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने जुलै 1991 पासून नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार करून त्यावर कार्यवाहीही सुरू केली आहे. या धोरणात खाजगी क्षेत्राला सर्वच आर्थिक क्षेत्रांत प्रोत्साहन देण्याचे अभिप्रेत आहे. दांडेकर समितीने जिल्ह्याचा अनुशेष काढताना फक्त शासकीय व शासन साहाय्यीत खर्चाचाच समावेश आपल्या विश्लेषणात केला आहे; खाजगी शाळा, दवाखाने, तांत्रिक महाविद्यालये, उद्योग, व्यापार, इत्यादी वगळले आहे. समितीचे एक सदस्य वि. वि. बोरकर यानी आपल्या असहमती टिपणात (Note of Dissent) खाजगी क्षेत्राला पूर्णपणे वगळल्याबद्दल तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आहे. (पाहा : *दांडेकर समिती अहवाल*, पृष्ठे 396-402.)

वास्तविक पाहता विकासाचा स्तर मोजताना खाजगी आणि शासकीय असा भेद करणे योग्य नव्हे. कारण खाजगी शाळा, दवाखाने, तांत्रिक शिक्षण संस्था, इत्यादीपासून समाजाला तोच लाभ होतो जो शासकीय संस्थांकडून मिळत असतो. उलट खाजगी संस्थांकडून अधिक श्रेष्ठ व कार्यदक्ष सेवा मिळते असा समज आहे. आरोग्य सेवा, शाळा, तांत्रिक शिक्षण संस्था इत्यादी महत्त्वाच्या सामाजिक क्षेत्रांचा अनुशेष काढताना खाजगी क्षेत्र वगळल्यामुळे अविश्वसनीय असे चित्र निर्माण झाले आहे. उदाहरणार्थ, तांत्रिक शिक्षणात बृहन्मुंबई मागास ठरले आहे तर 'प्रतिलक्ष लोकसंख्येमागे शासकीय दवाखान्यांची संख्या या निकषावर पुणे जिल्हा मागास ठरला असून (1.87 दवाखाने) धुळे (3.32 दवाखाने), रत्नागिरी (3.60 दवाखाने), अमरावती

(6.77) असे मागास जिल्हे प्रगत ठरले आहेत (*दांडेकर अहवाल*, पृ. 176), कारण ते सरासरीच्या वर आहेत !

सन 1991 पासून शासनाने खाजगीकरणास अनेक आर्थिक क्षेत्रांत (रस्ते, सिंचन, दळणवळण, शिक्षण, वगैरे) प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे पुढील काही वर्षांत खाजगी क्षेत्रांचा विस्तार फार वेगाने व मोठ्या प्रमाणावर होणे अपेक्षित आहे. उदाहरणार्थ, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर 1,500 कोटी रुपयांची गुंतवणूक खाजगी क्षेत्राकडून होणार आहे. पण या सर्व प्रकल्पांना आपणास वगळावे लागल्यास रस्ते विकासाचे वास्तव चित्र समोर येईल का? माझ्या मते या धोरणात पुढील बदल आवश्यक आहे.

अनुशेष काढताना (अ) शासकीय व शासन साहाय्यीत आर्थिक क्षेत्रांची सरासरी वेगळी असावी; (आ) खाजगी क्षेत्राची वेगळी सरासरी असावी; (इ) वरील (अ) आणि (आ) ची एकत्रित सरासरी असावी. वरील तीन प्रकारची प्रत्येक राज्याची सरासरी ( प्रत्येक क्षेत्रात) काढल्यास कोणकोणत्या जिल्ह्यात खाजगी क्षेत्र प्रभावी आहे हे कळेल. ज्या जिल्ह्यांत खाजगी क्षेत्र 50 टक्क्यांपेक्षा अधिक प्रभावी असेल, अशा जिल्ह्यांतील शासकीय गुंतवणूक कमी करून ज्या भागात खाजगी क्षेत्र अत्यल्प आहे अशा क्षेत्राकडे ज्यादा गुंतवणूक वळविता येईल. सध्याच महाराष्ट्रात खाजगी क्षेत्रातील आरोग्य सेवा 50 टक्के असल्याचा एक अंदाज आहे. खाजगी व शासकीय संस्थांची एकत्रित सरासरी काढल्यामुळे प्रत्येक जिल्ह्याचे वास्तव चित्र जनतेसमोर येईल. म्हणून काही प्रमुख आर्थिक क्षेत्रांचा अनुशेष काढताना वरील बदल करणे आवश्यक वाटते.

(3) **अनुशेष मापनासाठी घ्यावयाचा घटक**

अनुशेषाचे मापन करण्यासाठी कोणता घटक (Unit) असावा याबद्दलही बराच ऊहापोह व वादंग निर्माण होत आहे. यासाठी (अ) विभाग/प्रदेश, (आ) जिल्हा व (इ) तालुका यापैकी एका घटकाची निवड करणे शक्य आहे. 'प्रदेश' हा घटक घेऊन अनुशेष काढल्यास, अनुशेषाची रक्कम खूपच घटेल आणि सरकारी तिजोरीवरील ताण खूप कमी होईल. वास्तविक पाहता दांडेकर समितीच्या मूळ शीर्षकातच 'प्रादेशिक असमतोल' हे शब्द आहेत. त्यामुळे प्रादेशिक अनुशेष काढताना प्रदेशाची सरासरी घेऊन अनुशेष काढला असता तर ते समितीच्या मूळ शीर्षकास धरूनच झाले असते. या संदर्भात दांडेकर समितीने विस्तृत चर्चा केली असून शेवटी 'जिल्हा' हा आर्थिक नियोजनाचा योग्य घटक असल्यामुळे अनुशेष काढताना 'जिल्हा' हा घटक स्वीकारला आहे आणि ते योग्यही आहे. परंतु अलीकडेच 'तालुका' घटक घेण्याची मागणी पुढे येत आहे. यासाठी प्रगत जिल्ह्यातसुद्धा काही तालुके फार मागास असतात हे कारण पुढे केले जात आहे. परंतु हे कारण फारसे टिकण्यासारखे नाही.

(अ) वास्तविक पाहता प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांचा समतोल विकास साधणे हे त्या जिल्ह्यातील जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे कर्तव्य आहे. प्रत्यक्षात तालुक्या-तालुक्यात होणारे विकास निधीचे वाटप योग्य पद्धतीने होत नाही असे दिसून येते. ज्या तालुक्यातील राजकीय पुढारी प्रभावी असतात त्या तालुक्याकडे जास्तीत जास्त विकास योजना वळविल्या जातात हे एक कटुसत्य आहे. परिणामत: जिल्ह्यातील तालुक्यांचा विकास असमतोल पद्धतीने झालेला दिसतो. हे टाळण्यासाठी काही वस्तुनिष्ठ पद्धतीचा वापर करून विकास निधीचे वाटप तालुक्या-तालुक्यात व्हावयास हवे. उदाहरणार्थ, 50 टक्के निधीचे वाटप प्रत्येक तालुक्याच्या लोकसंख्येच्या आधारे आणि 50 टक्के त्या तालुक्याच्या भौगोलिक क्षेत्रफळाच्या आधारे केल्यास मागास तालुक्यांचा प्रश्न आपोआपच सुटेल याची खात्री वाटते. जिल्हा नियोजन व विकास मंडळांनी वरील सूत्र वापरणे आवश्यक आहे असे सुचवावेसे वाटते.

(आ) सन 1997 सालच्या 'निर्देशांक व अनुशेष समितीच्या' अहवालास उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या अध्यक्षांनी आपले पूरक टिपण जोडले असून त्यात अनुशेष काढताना तालुका घटक घ्यावा असे सूचित केले आहे आणि त्यासाठी आकडेवारी

मिळवावी असे म्हटले आहे. सैद्धान्तिक दृष्टीने तालुका घटक घेण्यास काहीच हरकत नसावी, पण प्रत्यक्ष व्यवहारात त्याचे परिणाम कसे होतील याचा विचार होणे गरजेचे आहे.

दांडेकर समितीने जिल्हा घटक धरून 3,177 कोटी रुपयांचा एकूण अनुशेष काढला. सन 1985-86 ते 1997-98 या 12 वर्षांत, हा अनुशेष शासन दूर करू शकले नाही. 3,000 कोटी रुपयांचा (पुनर्मूल्यांकन करून ) अनुशेष अजूनही शिल्लक आहे. दांडेकर समितीने मूळ अनुशेष 5 वर्षांत (सातव्या योजनेत) पूर्ण करण्याचे सुचविले होते, पण निधीच्या अभावी 15 वर्षांत तरी हे काम पूर्ण होईल का याबद्दल शंका वाटते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अलीकडेच 'निर्देशक व अनुशेष समितीने' (1997) जिल्हा घटक धरूनच काढलेला एकूण अनुशेष 15,355.77 कोटी रुपये एवढा प्रचंड आहे. एवढा अनुशेष दूर करण्यास शासनास, सध्याच्या गतीने, किमान 15 वर्षे किंवा 3 पंचवार्षिक योजना लागतील. (प्रत्यक्षात समितीने 7 वर्षांत सर्व अनुशेष दूर करावा असे सुचविले आहे.)

जर तालुका घटक धरून अनुशेष काढला तर ही रक्कम जवळजवळ 30 हजार कोटी रुपयांच्या घरात जाईल आणि एवढा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाला साधारणतः 30 वर्षे (6 पंचवार्षिक योजनांचा काल) लागतील. हे सर्व गणित हास्यास्पद ठरेल. लॉर्ड केन्सनी म्हटल्याप्रमाणे, '' एवढ्या दीर्घ कालात आपण सर्वजण मृत झालेले असू! '' सामान्य जनतेस अशा अनुशेषात फारसा रसही नसणार हे उघड आहे. त्यामुळे 'जिल्हा' घटक घेणे हेच अधिक शहाणपणाचे आहे.

**वैधानिक विकास मंडळाची स्थापना** (1994)

महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे, 1960 रोजी झाली. पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा विभाग व मध्य प्रदेशातील विदर्भ विभाग मराठी भाषिक 'संयुक्त महाराष्ट्रात' सामील झाला. मराठवाडा विभाग व विदर्भ हे दोन विभाग पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात खूपच मागासलेले असल्यामुळे नवनिर्मित महाराष्ट्र राज्यात त्यांच्या विकासाची हमी देणारा ऐतिहासिक नागपूर करार 1953 साली मान्य करण्यात आला. नागपूर कराराचे पालन करण्याचे आश्वासन त्यावेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी विधिमंडळाच्या सभागृहात दिले होते ते असे: '' नागपूर करार हा केवळ विदर्भासाठीच नसून मराठवाड्यालाही त्यातील मुख्य तरतुदी लागू आहेत. या करारातील शर्तीचे पूर्णपणे पालन केले जाईल. इतकेच नाही तर, शक्य असेल तेथे त्याहूनही अधिक माप त्यांच्या पदरात टाकले जाईल.'' परंतु या आश्वासनाचे पालन पुढील कालात झालेच नाही. विदर्भ, मराठवाडा व कोकण विभाग सतत मागेच पडत गेले; विकासासाठी या विभागातील जनतेला मोठा संघर्ष करावा लागला आणि त्यातूनच नागपूर करारास अनुसरून घटनेच्या 371(2) कलमानुसार वैधानिक विकास मंडळाची मागणी पुढे आली. दांडेकर अहवालात भुजंगराव कुलकर्णी यांची भिन्न मतपत्रिका आहे. त्यात कलम 371(2) विषयी सविस्तर चर्चा केली असून अशा विकास मंडळांच्या स्थापनेची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. शेवटी या सर्व प्रयत्नांना यश येऊन 26 जुलै, 1984 रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी तीन विकास मंडळे स्थापन करावीत असा ठराव मंजूर झाला. परंतु प्रत्यक्ष 10 वर्षांनतर ही तीन मंडळे अस्तित्वात आली. मागास भागांच्या विकासाचे साधन किंवा उपाय म्हणून या मंडळांची स्थापना झाली ही गोष्ट नमूद करावयास हवी.

महाराष्ट्र विधिमंडळाचा ठराव ध्यानात घेऊन 9 मार्च, 1994 रोजी केन्द्र सरकारच्या गृह मंत्रालयाने राष्ट्रपतींच्या वतीने एक अध्यादेश काढून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी तीन विकास मंडळे स्थापन केली. या मंडळांची मुदत 5 वर्षांची असून राष्ट्रपती त्यात वाढ करू शकतील किंवा त्यास गुंडाळूही शकतील. राष्ट्रपतींच्या या अध्यादेशात महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी टाकली असून राज्यपालांनी या विकास मंडळांची कार्यकक्षा व भौगोलिक क्षेत्र निश्चित करावेत असे आदेश दिले आहेत. या आदेशास

अनुसरून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी 30 एप्रिल, 1994 रोजी एक अध्यादेश काढून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी अशी तीन स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन केली आहेत. मागील चार वर्षांत या मंडळांनी केलेल्या कार्याचा आपण संक्षिप्त आढावा घेऊ.

**विकास मंडळांची कार्ये**

राज्यपालांच्या आदेशानुसार प्रत्येक वैधानिक मंडळावर पुढील कार्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

(1) राज्याच्या सरासरी विकास स्तराच्या तुलनेत त्या विभागाचा विकास स्तर कसा आहे याचा अभ्यास करणे. त्यासाठी योग्य अशा निर्देशकांचा वापर करणे;

(2) विविध विकास योजना त्या भागातील अनुशेष दूर करण्यात कितपत यशस्वी होतात हे शोधणे आणि त्याचबरोबर त्या विभागाचा एकूण विकास साधण्याच्या बाबतीत विकास कार्याचे मूल्यमापन करणे;

(3) पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना कालात त्या भागात होणाऱ्या विकास खर्चाचे प्रमाण सुचविणे;

(4) विकास मंडळाचा वार्षिक अहवाल विधिमंडळापुढे सादर करण्यासाठी राज्यपालांना पाठविणे.

**विकास खर्चाचे विभागीय वाटप**

वरील कार्ये लक्षात घेता हे स्पष्ट होते की, विकासाच्या एकूणच आर्थिक नियोजनाबाबत वैधानिक विकास मंडळे रीतसर अभ्यास करून आपल्या शिफारशी राज्यपालांना पाठवू शकतात. या मंडळांनी केवळ दांडेकर समितीने काढलेल्या अनुशेषापुरतेच आपले कार्य मर्यादित न ठेवता विकास खर्चासाठी निरनिराळ्या विभागांना निधी कसा वाटावा याबाबतही शिफारस वैधानिक विकास मंडळे राज्यपालांना करू शकतात. सबंध राज्याची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्राचे राज्यपाल उरलेल्या विकास खर्चाचे न्याय्य वाटप तीन विभागात करतील. 'न्याय्य वाटप' याचा अर्थ प्रत्येक विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाटप असा घेण्यात येतो. सन 1991 च्या जनगणनेनुसार मराठवाड्याची लोकसंख्या राज्याच्या लोकसंख्येच्या 16.22 टक्के, विदर्भाची 22.04 टक्के तर उर्वरित महाराष्ट्राची 61.74 टक्के आहे. 'सबंध राज्याची गरज लक्षात घेऊन' या शब्दप्रयोगाचे स्पष्टीकरण आवश्यक आहे. याचा अर्थ राज्य पातळीवर करावा लागणारा असा खर्च की ज्याचे विभागवार विभाजन करता येत नाही; उदाहरणार्थ, प्रशासन, पोलिस खाते, ऊर्जा उत्पादन, न्यायदान, विधिमंडळ खर्च, इत्यादी. राज्य पातळीवरील खर्च जसजसा वाढत जाईल तसतसा विकास मंडळांना मिळणारा निधी घटत जाईल हे उघड आहे. म्हणूनच मागासपणा दूर करण्यासाठी मिळणारा निधी अत्यंत तुटपुंजा आहे.

**तांत्रिक शिक्षण, धंदेवाईक शिक्षण व रोजगाराच्या संधी :** 'सबंध राज्याची गरज लक्षात घेऊन' राज्यपाल प्रत्येक वैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रात तांत्रिक शिक्षण, धंदेवाईक शिक्षण व राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील नोकऱ्यांत पुरेशा संधी न्याय्य पद्धतीने (म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात) उपलब्ध करून देण्याची काळजी घेतील. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यपाल राज्य सरकारला वेळोवेळी योग्य ते आदेश देऊ शकतात.

**कार्याचे मूल्यमापन**

तीन वैधानिक विकास मंडळांची स्थापना होऊन आता जवळजवळ 4 वर्षे पूर्ण झाली आहेत. साहजिकच जनतेच्या अपेक्षा या मंडळांनी कितपत पूर्ण केल्या आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मराठवाड्यातील 'जनता विकास परिषदेने' उमरगा येथे भरलेल्या (मे,1997) वार्षिक अधिवेशनातील काही ठराव जनतेचे मत प्रदर्शित करतात. ते असे. विकास मंडळांकडून ज्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची अपेक्षा आहे त्यामानाने त्यांचा कर्मचारी वर्ग व साधने तोकडी आहेत. विकास मंडळांच्या कामात सरकारचे सहकार्य आवश्यक आहे

या नावाखाली मंडळांच्या रचनेत राजकीय भूमिकेतून वाढता हस्तक्षेप केला जातो. त्यामुळे विकास मंडळे निष्प्रभ होत आहेत. निर्णय घेऊन बराच काळ लोटला तरी त्यांच्या अमलबजावणीसाठी पाठपुरावा करण्यात येत नाही आणि निर्णय पडून राहतात. बांधिलकीचा अभाव आहे. मंडळाच्या कार्यपद्धतीचे निकष अजून रुळावयाचे आहेत. विकास मंडळे व जनता यांच्यात मुळीच संपर्क नाही !

आणखी एक कायदेविषयक त्रुटी म्हणजे , राज्यपालांनी राज्य सरकारला अनौपचारिक सूचना देऊन त्या शासनाकडून मान्य करून घेण्यापेक्षा आपल्यावरील 'विशेष जबाबदाऱ्या' पूर्ण करण्यासाठी 'औपचारिक आदेश' काढणे अधिक योग्य व कायदेशीर होईल असेही मत व्यक्त केले आहे.

**समतोल प्रादेशिक विकासाकरिता व्यूह**

महाराष्ट्र राज्यातील तीन प्रमुख प्रदेशांचा समतोल विकास साधण्यासाठी, किंवा दुसऱ्या शब्दांत, सध्याचा असमतोल कमी करावयाचा झाल्यास, राज्य सरकारने कोणत्या प्रकारचे धोरण अमलात आणणे गरजेचे आहे हे सांगणे आवश्यक आहे.

*(1) 'मागास' व 'प्रगत' जिल्ह्यांचे वर्गीकरण आवश्यक*

या धोरणासाठी पहिली पायरी म्हणजे संबंध राज्यात मागास जिल्हे कोणते व प्रगत जिल्हे कोणते यांचे वर्गीकरण करणे होय. दांडेकर समितीने असे वर्गीकरण करण्याचे टाळले आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रीय पातळीवर चक्रवर्ती समितीने मागास जिल्हे निश्चित करण्यासाठी वापरलेल्या तीन पद्धतींची सविस्तर चर्चा करून या तिन्ही पद्धतीत कसे दोष आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न दांडेकर अहवालात केला आहे. (पाहा : *दांडेकर अहवाल*, पृष्ठे 19 ते 26.) शेवटी यासंदर्भात पुढील मत प्रदर्शित केले आहे. '' कोणताही एकच एक निर्देशांक वापरून, मग तो एकटा असो वा अनेक गमके एकत्रित करून तयार केलेला संयुक्त निर्देशांक असो, प्रदेशांचे वा जिल्ह्यांचे मागासलेपण निश्चित करणे, राष्ट्रीय समितीप्रमाणेच आम्हालाही फारसे योग्य वाटत नाही. किंबहुना, जिल्ह्यांचे 'मागास' आणि 'विकसित' अशा दोन गटांत वर्गीकरण करणे हा आमचा मुख्य हेतू नाही. ''

मागास जिल्हे निश्चित करण्याच्या तीन पद्धतीत (क्रमवारी पद्धती, निर्देशांक पद्धती व प्रमुख विश्लेषण पद्धती) दोष आहेत हे जरी खरे असले तरी त्यांचा वापर चक्रवर्ती समितीने व इतर अभ्यासकांनी केला आहे हे विसरून चालणार नाही. तसे म्हटल्यास राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन किंवा किंमत निर्देशांकातसुद्धा अनेक त्रुटी आहेत तरीही त्यांचा वापर आपण करीतच आहोत. तेव्हा दांडेकर समितीची यासंबंधी भूमिका मुळीच पटण्यासारखी नाही. मागास जिल्ह्यांवर विशेष लक्ष केन्द्रित करण्यासाठी शासनाने असे वर्गीकरण करणे अतिशय गरजेचे आहे. वरील तीन पद्धतींपैकी 'भारान्वित निर्देशांक पद्धती' (Weighted Index Number) अधिक दोषरहित आहे असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. नमुन्यादाखल तक्ता 5 मध्ये स्तंभ 4 मध्ये सीताप्रभू व पी. सी. सरकार यांनी महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे 20 निकष वापरून तयार केलेले जिल्हावार भारांकित निर्देशांक दाखविले आहेत. आकडेवारी सन 1984-85 ची असून त्यावरून महाराष्ट्रातील 15 जिल्हे मागास आहेत (100 निर्देशांकाच्याखाली) हे स्पष्ट होईल. नियोजन मंडळाच्या अभ्यास गटानेही महाराष्ट्रातील मागास जिल्हे निश्चित करण्यासाठी वरील तीन पद्धतींचा वापर करून एकूण 17 जिल्हे मागास असल्याचे म्हटले आहे.

*(2) मागास जिल्ह्यांचा जलद विकास*

राज्यात मागास जिल्हे कोणते आहेत हे एकदा निश्चित केले की दुसरी पायरी म्हणजे त्यांच्या जलद विकासासाठी विशेष निधीची व्यवस्था करणे होय. भुजंगराव कुलकर्णी समितीने ज्या 17 जिल्ह्यांची मागास म्हणून निवड केली आहे त्यात उर्वरित महाराष्ट्राचे तीन जिल्हे (त्यातील कोकणचे दोन), मराठवाड्याचे 6 जिल्हे तर विदर्भाचे 8 जिल्हे येतात. यापैकी 11 जिल्हे तर 9 पैकी 9 आर्थिक क्षेत्रांत

राज्य सरासरीच्या कितीतरी खाली आहेत. यावरून मागासपणाची तीव्रता लक्षात येईल. साहजिकच अशा जिल्ह्यांना ज्यादा विकास निधी देणे तर्कसंगतच आहे. भुजंगराव कुलकर्णी समितीने या 17 जिल्ह्यांसाठी वार्षिक योजना निधीपैकी 15 टक्के भाग ज्यादा वाटून द्यावा असे सुचविले आहे, तो असा : विदर्भ 7.5 टक्के, मराठवाडा 5 टक्के, उर्वरित महाराष्ट्र 2.5 टक्के मागास जिल्ह्यांची लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता ढोबळमानाने ही विभागणी योग्य वाटते.

मागास जिल्ह्यांना विशेष निधी उपलब्ध करून देणे कसे गरजेचे आहे या संदर्भात नरोत्तम शहा यांचे विचार तर्कशुद्ध वाटतात. त्यांच्या मते, '' जे जिल्हे विकसित असतील ते प्रगती करतीलच, फक्त त्यांच्या वार्षिक विकासाचा दर राज्य सरासरीपेक्षा थोडा कमी असेल; याउलट जे जिल्हे मागास ठरतील त्यांच्या विकासाचा दर राज्य सरासरीच्या थोडा अधिक असेल. '' अशा प्रकारचे आर्थिक धोरण राज्य सरकारने स्वीकारले तरच पुढील काही वर्षांत प्रादेशिक असमतोल कमी होण्याची शक्यता वाटते, अन्यथा नाही. वर सांगितलेली 15 टक्के ज्यादा निधीची व्यवस्था मागास जिल्ह्यांचा विकास इतर जिल्ह्यांच्या तुलनेने अधिक वेगाने व्हावा या उद्देशाने केली आहे. त्यामुळे राज्य शासनाने व राज्यपालांनी मागास जिल्ह्यांच्या जलद विकासासाठी वार्षिक योजना खर्चातील 15 टक्के रक्कम उपलब्ध करून देणे विकासातील प्रादेशिक समातोल राखण्यासाठी जरुरीचे आहे; नसता भविष्यात प्रादेशिक असमतोल अधिक तीव्र होईल हे सांगण्याची आता गरज नाही.

**मराठवाडा, विदर्भ व कोकण विभागासाठी कालबद्ध विकास योजना**

महाराष्ट्र शासनाने आपल्या नवव्या पंचवार्षिक योजनेच्या (1997-2002) मसुद्यात महाराष्ट्रातील निरनिराळ्या प्रदेशांचा विकास साध्य करण्यास शासन वचनबद्ध आहे असे म्हटले आहे. विशेष म्हणजे प्रादेशिक समतोल विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मागास प्रदेशांचा विकास तुलनात्मक दृष्टीने अधिक वेगाने होणे गरजेचे आहे हे तत्त्व शासनाने मान्य केले आहे. महाराष्ट्र शासनाचा हा धोरणात्मक बदल अतिशय महत्त्वाचा असून यापूर्वी सांगितलेल्या अनेक अर्थशास्त्रीय सिद्धान्तांस धरून असाच आहे.

या कालबद्ध विकास कार्यक्रमाअंतर्गत वरील तीन मागास विभागांत सिंचन, रस्ते, कृषी, उद्योग, घरबांधणी अशा एकूण 22 क्षेत्र/उपक्षेत्रांवर एकूण 7,984.11 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी 4,308.03 कोटी (53.95 टक्के ) विदर्भ विभागात, 1,768.13 कोटी (22.15 टक्के) मराठवाड्यात तर 1,907.95 कोटी (23.90 टक्के) कोकण विभागावर खर्च केले जातील.

**जिल्हा नियोजनात 'अभिवृद्धी केन्द्र' दृष्टिकोनाचा अवलंब**

प्रादेशिक अर्थशास्त्रात 'अभिवृद्धी केन्द्र' सिद्धान्ताचे महत्त्व अनन्यसाधारण समजले जाते, कारण या सिद्धान्तात 'तळातून नियोजन' ही संकल्पना अंतर्भूत आहे. या प्रकारच्या नियोजनात लोकसंख्या हा प्रमुख घटक मानून आर्थिक सेवा पुरविल्या जातात. विशेष म्हणजे, या सेवा वित्तीय दृष्टीने व्यवहारक्षम असणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या आधारे खेड्यांचे/गावांचे तीन स्तरावर विभाजन केले जाते, ते म्हणजे: (1) केन्द्रीय खेडे, (2) सेवा केन्द्रे आणि (3) अभिवृद्धी केन्द्रे. लहान खेड्यांचा समावेश सर्वात खालच्या स्तरात, मोठ्या खेड्यांचा दुसऱ्या स्तरात तर तालुक्यांच्या गावाचा समावेश सर्वात वरच्या स्तरात केला जातो. उदाहरणार्थ, शासनाच्या नियोजन विभागाने नाशिक जिल्ह्यासाठी अभिवृद्धी केन्द्र सिद्धान्तावर आठव्या योजनेचे एक प्रतिमान तयार केले होते. त्यात 125 केन्द्रीय खेडी, 32 गावे सेवा केन्द्रे व 7 अभिवृद्धी केन्द्रे निश्चित करण्यात आली. प्रत्येक खेड्यात कोणकोणत्या सेवा व्यवहार्य व आवश्यक आहेत याचे नियोजन केले जाते. उदाहरणार्थ, प्रत्येक खेड्यात पिण्याचे पाणी, प्राथमिक शाळा, बस स्टॉप, किराणा दुकान, खत विक्री दुकान, इत्यादी किमान सेवा असाव्यात. यापैकी काही सुविधा शासकीय तर

काही सहकारी व खाजगी असू शकतात. यापैकी ज्या शासकीय सेवा मानकाप्रमाणे (norms) नसतील त्या प्रथम नियोजनाद्वारे पुरविल्या जातील. याच पद्धतीने सेवा केन्द्राच्या ठिकाणी लोकसंख्या मोठी असल्यामुळे तेथे अधिक सुविधा पुरविल्या जातात. उदाहरणार्थ, उच्च प्राथमिक शाळा, दूध संकलन केन्द्र, प्राथमिक आरोग्य केन्द्र, पोस्ट ऑफिस, आठवडी बाजार, न्हावी, दुरुस्ती दुकाने, पशुवैद्यकीय सेवा, वगैरे. अभिवृद्धी केन्द्रातील गावाची लोकसंख्या 50 हजार ते 1 लक्ष असल्यामुळे येथे सर्वाधिक सोईसुविधा उपलब्ध कराव्या लागतील. उदाहरणार्थ, माध्यमिक शाळा, महाविद्यालय, ग्रामीण रुग्णालय, सिनेमागृह, कपड्यांची व इतर दुकाने, फर्निचर व इतर छोटे कारखाने, धोबी, न्हावी, उपाहारगृहे, दूरध्वनी, तार ऑफीस, वगैरे. नाशिक जिल्हा नियोजनात अशा प्रकारची 42 कार्ये/सेवा नमूद करण्यात आल्या आहेत.

शासकीय मानकाप्रमाणे ज्या सेवा जिल्ह्यातील काही खेड्यांत असावयास हव्यात पण नसतील त्या पुरविणे हे नियोजनात अभिप्रेत आहे. त्यामुळे प्रत्येक खेड्याचा विकास योग्य पद्धतीने होऊन असमतोलाचा प्रश्न आपोआपच निकालात निघतो.

महाराष्ट्र शासनाने या सिद्धान्तावर आधारित नाशिक जिल्ह्यासाठी एक दीर्घकालीन योजना (1990-95) दोन खंडांत प्रसिद्ध केली आहे. परंतु प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी झाल्याचे दिसत नाही. नाशिक जिल्ह्याच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांचे दीर्घकालीन नियोजन नवव्या योजनेअंतर्गत (1997-2002) तयार करून वस्तुनिष्ठ पद्धतीने ते अमलात आणल्यास प्रादेशिक असमतोलावर तो एक रामबाण उपाय ठरू शकेल असा विश्वास वाटतो.

**महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा अहवाल** (1994)

सन 1993-94 साली केन्द्र सरकारने 73 वी घटना दुरुस्ती (पंचायत राज) व 74 वी घटना दुरुस्ती (नगरपालिकांसाठी) करून सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आता दर पाच वर्षांनी पंचायत संस्था व नगरपालिकांच्या निवडणुका घेणे घटनेनेच बंधनकारक झाले आहे. त्याचप्रमाणे, पंचायत राज व नगरपालिकांच्या नियमित आर्थिक तरतुदींसाठी राज्य वित्त आयोगाची स्थापना करणेही घटनेने बंधनकारक झाले आहे. प्रत्येक राज्याचे राज्यपाल दर 5 वर्षांनी आपल्या राज्यासाठी राज्य वित्त आयोगाची स्थापना करतील. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी 23, एप्रिल, 1994 रोजी पहिल्या महाराष्ट्र वित्त आयोगाची नियुक्ती केली आहे. या आयोगाने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला असून सध्या तो सरकारच्या विचाराधीन आहे.

राज्य वित्त आयोगाची स्थापना केन्द्रातील केन्द्रीय वित्त आयोगाच्या धर्तीवर असल्यामुळे दोन्ही आयोगाच्या कामाचे स्वरूप बऱ्याच अंशी सारखेच आहे. दोन्ही आयोगांना कर उत्पन्नाचे विभाजन दोन पातळ्यांवर करावे लागते. (1) प्रथम कर उत्पन्नाचे वाटप एका बाजूने राज्य सरकार तर दुसऱ्या बाजूने पंचायत राज व नगरपालिका यांच्यामध्ये करावे लागते. याला निधीचे ऊर्ध्व वाटप असे म्हणतात. (2) त्यानंतर जी रक्कम पंचायत राज व नगरपालिकांना मिळते त्याचे वाटप विशिष्ट नियमाने प्रत्येक पंचायत राज व नगरपालिकेत केले जाते. याला निधीचे समस्तर वाटप असे म्हणतात.

दहाव्या केन्द्रीय वित्त आयोगाने कर उत्पन्नाचे केन्द्र व राज्यात वाटप करताना मागास राज्यांचा अतिशय सहानुभूतीपूर्वक विचार केला आहे. उत्पन्नाचे वाटप करताना शास्त्रशुद्ध पद्धतींचा व सूत्रांचा वापर करून मागास राज्यांना अधिक प्रमाणात निधी कसा उपलब्ध होईल या गोष्टीकडे लक्ष दिले आहे. दहाव्या वित्त आयोगाने पुढील पद्धती स्वीकारली आहे: (1) लोकसंख्या - 20 टक्के भार; (2) दरडोई उत्पन्नातील तफावत - 60 टक्के भार; (3) मागासपणाचा निकष - 10 टक्के भार (यात 5 टक्के भौगोलिक क्षेत्र व 5 टक्के मागासपणास) दिला आहे.; (4) करप्रयत्न - 10 टक्के भार. महाराष्ट्र वित्त आयोगानेसुद्धा दहाव्या वित्त आयोगाप्रमाणेच वरील पद्धती वापरून राज्य सरकारच्या कर उत्पन्नाचे वाटप करणे अगत्याचे आहे असे सुचवावेसे वाटते. त्यामुळे मागास जिल्ह्यांतील पंचायत राज संस्थांना व नगरपालिकांना थोड्या वाढीव दराने

उत्पन्नाचा वाटा मिळू शकेल. कारण, मागास भागातील या संस्थांचे उत्पन्न फारच अल्प असल्यामुळे जनतेला या संस्था किमान सोईसुद्धा पुरवू शकत नाहीत. जिल्हा दरडोई उत्पन्न अल्प असल्यामुळे कर प्रयत्नही फारसे यशस्वी होत नाहीत. वरील सूत्रांचा आयोगाने वापर केल्यास मागास भागातील पंचायत राज संस्थांच्या विकासाला फार मोठी चालना मिळेल यात शंका नाही.

**समारोप**

आतापर्यंत आपण महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोलाची कारणमीमांसा करून त्यावर कोणती उपाययोजना करणे शक्य आहे यासंबंधी सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्र राज्याचे ऐक्य अबाधित राहण्यासाठी आणि प्रगत भागातून होणाऱ्या अडथळ्यांना बळी न पडता काही कठोर धोरणे स्वीकारणे अगत्याचे आहे. कोणत्याही मागास भागाच्या विकासात अनेक स्वरुपाच्या अडचणी असतात (उदाहरणार्थ, सामाजिक मागासलेपण, शैक्षणिक मागासपण व आर्थिक मागासपण). त्यामुळे अशा भागात दारिद्र्याचे मोठे प्रमाण, जमीनधारणेचे केन्द्रीकरण, स्त्री साक्षरतेचे अल्प प्रमाण व बेकारीचे तीव्र स्वरूप ही लक्षणे समान असतात. मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्हयांत आपणास वरीलपैकी अनेक गुणधर्म सापडतील. साहजिकच अशा भागात विकास साधण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे निकडीचे आहे. भारतीय अर्थशास्त्रज्ञांना या सर्व गोष्टींची दखल घेणे आज काळाची गरज आहे असे मला वाटते. अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन या संदर्भात म्हणतात: '' वास्तविक पाहता अर्थशास्त्रसुद्धा समाजातील दरिद्री, पीडित व मूलभूत सामाजिक हक्कांपासून वंचित अशा समूहाशी संबंधित असते. हीच गोष्ट माझ्या अत्यंत जिव्हाळ्याची आहे.'' (" The fact is that Economics is also concerned with the poor, the downtrodden, the underdogs of the society is something that is very close to my heart.") महाराष्ट्रातील राज्यकर्ते या विचाराशी सहमत असतील याची मला खात्री आहे. लॉर्ड केन्स यानी त्यांच्या सुप्रसिद्ध अशा 'जनरल थिअरी' या ग्रंथाचा समारोप मोठा समर्पक केला आहे.'' अर्थशास्त्र आणि राजकीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत नव्या सिद्धान्ताने प्रभावित होणारे फार थोडे असतात व तेही 25-30 वर्षांनंतर व जे विचार सनदी नोकर व राजकारणी चालू प्रश्न सोडविण्यासाठी वापरतात ते विचार अगदी नवे असल्याची शक्यता नसते.'' (" For in the field of economic and political philosophy there are not many who are influenced by new theories..... so that the ideas which civil servants and politicians and even agitators apply to current events are not likely to be the newest" J.M. Keynes, *General Theory,* p. 384.). परंतु यास महाराष्ट्र राज्य अपवाद म्हणावे लागेल, कारण भारतात अनेक नवे प्रकल्प व नव्या योजना प्रथम सुरू करण्याचा मान महाराष्ट्र राज्याने मिळविला आहे. साहजिकच राज्यांतर्गत प्रादेशिक असमतोल दूर करण्याचा प्रयोग महाराष्ट्र शासन जाणीवपूर्वक करून या क्षेत्रातही आघाडीवर असेल अशी इच्छा व्यक्त करून माझे हे अध्यक्षीय भाषण पूर्ण करतो.

## संदर्भ सूची


1 **Kuzents, Simon** (1963),Quantitative Aspects of the Economic Growth of Nations: VIII, Distribution of Income by Size,' *Economic Development and Cultural Change,* January.

2 **Williamson, J.J.** (1975), 'Regional Inequality and Process of National Development,' *Regional Policy: Readings in Theory and Application.* Ed: John Friedman and William Alonso, The M.I.T. Press, Mass.

3 **Geffrey, J.D. Hewings** (1977), *Regional Industrial Analysis and Development,* Metheun Co. Ltd., London.

4 ***Ninth Five Year Plan** (1997 - 2002 ), Maharashtra State, Part I,* Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

5 *महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल* (1984), महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मुंबई, एप्रिल.

6 *महाराष्ट्रातील मागास विभागाचा विकास* (1993), राज्य नियोजन मंडळाच्या अभ्यास गटाचा अहवाल, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मुंबई, जून.

7 *Report of the Indicators and Backlog Committee, Interim Report* (1995).

8 *Report of the Indicators and Backlog Committee, Vol. I, Relative Levels of Development, Backlog and Removal of Regional Imbalances,* (July 1997).

9 Seetaprabhu, K. and P.C. Sarkar (1992), Identification of Levels of Development: Case of Maharashtra,' *Economic and Political Weekly.*

10 Kurulkar, R. P. (Ed.) (1991), *District Planning - Some Issues,* Dastane Ramchaandra & Co. Pune.

11 *Pilot Project on District Planning. Perspective Planning (1990-95), Nashik District, Maharashtra, Vol. I & II.*

12 *India Today,* October 26, 1998.

13 Keynes, J.M. (1961), *General Theory of Empolyment, Interest and Money,* Macmillan & Co., London.

14 *Report of the Tenth Finance Commis sion* (Dec. 1994), New Delhi.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### परिषदेचे सदस्य आणि हितचिंतक याना आवाहन

'अर्थसंवाद' या नियतकालिकावरील आणि कार्यालयीन खर्च गेली काही वर्षे सातत्याने वाढत असल्यामुळे आणि परिषदेला मिळणाऱ्या अनुदानात कोणतीही वाढ नसल्यामुळे परिषदेला दरवर्षी अधिकाअधिक तूट येत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी वर्गणीचे दर सुधारणे, जाहिराती मिळविणे, इत्यादी निर्णय परिषदेच्या कार्यकारी मंडळाने वेळोवेळी घेतले आहेत. त्याचबरोबर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नावे एक स्वतंत्र कायम निधी उभारावा असेही ठरले आहे. या कायम निधीसाठी सदस्यांकडून आणि परिषदेच्या हितचिंतकांकडून देणग्या / अनुदाने मिळवावीत असेही वार्षिक साधारण सभेत सातत्याने ठरविण्यात आले आहे. 'अर्थसंवाद' चे वाचक, परिषदेचे साधारण सदस्य आणि अन्य हितचिंतकही या निधीसाठी स्वयंस्फूर्तपणे, यथाशक्ती आपले आर्थिक साहाय्य देतील आणि परिषदेला आर्थिक स्थैर्य मिळवून देतील असा आम्हांस विश्वास वाटतो.

या निधीसाठी पाठवावयाचे बँक ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डर 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावेत आणि ते पुणे येथील कार्यालयीन पत्त्यावर पाठवावेत.

देणगीदारांची नावे वेळोवेळी 'अर्थसंवाद' च्या अंकात दिली जातील.

**आ.गो. पुजारी**
**कार्यवाह-खजिनदार**

# अमर्त्यकुमार सेन यांचे अर्थशास्त्र *

शरद शंकर जोशी **

* हा लेख प्रथमत: 'अर्थमंथन' च्या दि. 27 डिसेंबर,1998 आणि 3 जानेवारी, 1999 या दोन अंकांत 'अमर्त्य सेन यांचे अक्षर अर्थशास्त्र' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला. तोच लेख याठिकाणी देत आहोत.

** प्रपाठक व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे.

विविध विद्याशाखांचे गाढे अभ्यासक आणि भुकेचे कल्याणकारी अर्थशास्त्र मांडणारे, केंब्रिजच्या ट्रिनिटी महाविद्यालयातील प्राध्यापक अमर्त्यकुमार सेन याना 1998 चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. अर्थशास्त्राच्या चौकटीत आदर्शवादी विचारसरणीला महत्त्वाचे स्थान देऊन कल्याणकारी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात मौलिक योगदान करून सेन यानी अर्थशास्त्राला नीतिमूल्यांचे परिमाण दिले. त्यानी कल्याणकारी अर्थशास्त्राला तत्त्वज्ञानाच्या पातळीवर नेले. अर्थशास्त्र म्हणजे एक उद्वेगजनक शास्त्र हा आतापर्यंचा गैरसमज त्यानी दूर केला. कौटिल्य आणि ॲरिस्टॉटल याना जवळचे विचारवंत मानणाऱ्या सेन यानी बहुमिती स्वरुपाच्या अर्थशास्त्राची मानवतावादी बाजू प्रकाशझोतात आणली. सखोल विचार करता, अर्थशास्त्र हा विषय म्हणजे वैश्विक नीतितत्त्वज्ञानच होय. सध्याच्या अनियंत्रित, बेलगाम जागतिकीकरणारच्या युगात नवअभिमत (नवउदारमतवादी) अर्थशास्त्राच्या गंभीर स्वरुपाच्या मर्यादा लक्षात घेऊन त्याला खंबीरपणे प्रतिकार करण्याच्या गरजेतून सेन यांचे संशोधन आले. समाजातील कमकुवत घटकांना, पददलितांना पुरेशी खरेदीशक्ती आणि (परिणामरूप) हक्क प्राप्त होऊन त्यांचे आर्थिक व अन्य सामर्थ्य वाढेल अशा प्रकारच्या सरकारी धोरणाचा सेन अत्यंत उत्कटतेने पुरस्कार करतात. परंपरागत तत्वविश्लेषणाला नवे आयाम प्राप्त करून देऊन सेन यानी सिद्ध केलेली भक्कम तात्त्विक बैठक देशातील दरिद्री नारायणाला केन्द्रस्थानी ठेवणारी, माणुसकीवर भर देणारी आणि अशा रीतीने गोरगरिबाना दिलासा देणारी, त्यांचे मनोबल वाढविणारी आहे. महत्त्वाचे संकेत देण्याचे कार्य करणारी खुली बाजारयंत्रणा (खुली अर्थप्रणाली) मनातून पार काढून टाकण्याचा त्यांचा हेतू कधीच नव्हता, नाही. सेन स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते आहेत, पण खुल्या बाजारयंत्रणेपुढे गुढगे टेकणारे ते नाहीत आणि त्याचबरोबर आदेशाधिष्ठित नियोजनाचा

अनुनय त्याना कधीच रुचणार नाही. खुल्या अर्थप्रणालीचा उद्‍गाता ॲडम स्मिथ तसेच डेव्हिड रिकार्डो यांच्याच पठडीतील सेन यानी बाजारयंत्रणेचे गुण मान्य केले आहेत. पण खुल्या बाजारयंत्रणेविषयींच्या दुराग्रही मतामुळे सामान्य माणूस (अनारोग्य, अज्ञान किंवा अन्य अपूर्णतांचा परिणाम म्हणून) बाजूस पडत असेल, दुर्लक्षित केला जात असेल तर मात्र कार्ल मार्क्ससारख्या आपल्या सदुपदेशकांचा सल्ला मानून मानवतावादी सेन राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाची जोरदार शिफारस करतात. सेन केवळ डाव्या किंवा उजव्या विचारसरणीचे नाहीत; ते त्यापलीकडे असून (संकुचित) अर्थशास्त्राच्या पलीकडे जाण्याची त्यांची प्रवृत्ती सुरुवातीपासूनच स्पष्ट दिसते. तत्त्वज्ञाच्या दिव्य दृष्टीने ते जगाकडे पाहतात.

1 भांडवलसघनता

विकसाभिमुख नियोजनात भांडवलसघन तंत्राचे स्थान कोणते किंवा तशा तंत्राची निवड करण्यात कितपत वाव असतो याविषयी सेन यानी लिहिलेला शोधनिबंध [1] बराच गाजला. तत्पूर्वीच्या कालात विकासाचे अर्थशास्त्र या विषयाची मांडणी बव्हंशी वर्णनात्मक निबंधाच्या शैलीत होती. त्यामध्ये विश्लेषणात्मक आणि विशेषत: व्यष्टीय अर्थशास्त्रीय शैलीतील चिकित्सा क्वचितच आढळत असे. आल्फ्रेड मार्शल यांच्या लिखाणात पीक भागीदारी विषयाच्या विवेचनाला मात्र ही बाजू होती. सेन यांच्या लिखाणात हा पैलू विशेषत्वाने दिसतो. त्यानी विकासाच्या अर्थशास्त्राला व्यष्टीय विश्लेषणात्मक परिमाण दिले. योजनाबद्ध आर्थिक विकासाच्या तत्त्वविश्लेषणाची ही बाजू त्यानी महत्त्वाची मानली. या दृष्टिकोनातून विचार करता विकसनशील अर्थव्यवस्थेत उत्पादन तंत्राची निवड कशी करता येईल, केली जावी या प्रश्नाचा ऊहापोह करणाऱ्या त्यांच्या ग्रंथाची [2] बीजे उपरोक्त शोधनिबंधात सापडतात.

2 उत्पादनतंत्राची निवड

रोस्टोसारख्या अर्थवेत्यांनी आर्थिक अभिवृद्धी संबंधाने काही संकल्पना मांडल्या. उड्डाणावस्थेतून स्वयंपोषित अभिवृद्धी, समतोल विकासाचे तत्त्व, असमतोल विकासाचे तत्त्व, इत्यादी संबंधीचे विश्लेषण त्या विचारवंतांच्या अंतर्दृष्टीची साक्ष देणारे आहे यात शंकाच नाही. तथापि, आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीची सैद्धान्तिक चर्चा अपवाद म्हणून वगळली तर त्या विषयाची एकूण मांडणी स्थूलमानाने समष्टीय स्वरुपाची होती. त्यात व्यष्टीय विश्लेषणाचा भाग फारसा नव्हता. व्यष्टीय स्वरुपाची विधाने आणि त्या दिशेने जाणारे अनुभवाधिष्ठित विश्लेषण अभावाने आढळत होते. ही कमतरता सेन यानी भरून काढली. आतापर्यंत लक्ष न दिल्या गेलेल्या क्षेत्राकडे ते वळले; व्यष्टीय अर्थशास्त्रीय विश्लेषणाची तंत्रे, साधने वापरून अविकसित देशांच्या समस्या समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यानी केला. विकसनशील अर्थव्यवस्थांतील परिस्थिती साक्षात अभ्यासून त्यानी आपले निष्कर्ष आणि सिद्धान्त जगासमोर ठेवले आहेत. 'उत्पादनतंत्रांची निवड' याविषयीच्या त्यांच्या लिखाणात व्यष्टीय तपशिलावर भर स्पष्टपणे दिसतो. विशिष्ट वेळी विशिष्ट प्रश्नाच्या बाबतीत आढळणारी परिस्थिती लक्षात घेऊनच इष्टतम तंत्रनिवडीसंबंधीचा निर्णय घ्यावा लागतो असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या या सुरुवातीच्या रचनेवर मॉरिस डॉब यांच्या सोव्हिएत देशाचा आर्थिक विकास आणि नियोजनाचे प्रश्न यासंबंधीच्या लिखाणाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो.

सेन यांच्या मते काही विशिष्ट कालमर्यादेत सेवनीय (किंवा अन्य) वस्तूंचा काही एक उत्पादनप्रवाह सिद्ध करणे हे आर्थिक विकासाचे अंतिम उद्दिष्ट असते. उत्पादन किती कालावधीत करावयाचे हे प्रथम ठरवावे लागते. विशिष्ट उत्पादनपातळी गाठण्यासाठी गुंतवणुकीच्या अनेक पर्यायी पद्धती असू शकतात. त्यामधून निवड करताना नजीकच्या भविष्यकाळात शक्य असणारी उत्पादनपातळी आणि दीर्घकालात संभवणारी उत्पादन पातळी यांचा तौलनिक अभ्यास करावा लागतो. उत्पादनासाठी श्रमसघन तंत्राची निवड करावयाची किंवा भांडवलसघन तंत्राचा अवलंब करावयाचा याचे उत्तर उपरोक्त कालमर्यादेविषयी संबंधित समाजाचा विचार कोणता आहे यावर प्रामुख्याने अवलंबून

राहील. याचा अर्थ, उत्पादनतंत्रविषयक निवडीचा प्रश्न हा केवळ तांत्रिक कार्यदक्षतेचा किंवा अभियांत्रिकी प्रश्न राहात नसून सामाजिक प्रश्न ठरतो. तंत्रनिवडीला असणारी ही मानवी बाजू अधिक विशद करून सांगताना भारतीय अर्थव्यवस्थेच्या तत्कालीन काही प्रमुख प्रश्नांच्या संदर्भात त्यानी आपल्या तत्त्वाची प्रयुक्ती समर्थपणे दाखवून दिली. सूतकताई आणि विणाईकरिता तंत्राची निवड करताना सापेक्ष सामाजिक लाभ विचारात घेतला पाहिजे. अर्थात यामध्ये मूल्यांविषयीचा निर्णय अनुस्यूत असतो हे उघड आहे.

विकसनशील देशांचा आर्थिक अभिवृद्धी दर अत्यल्प असतो; तो कसा वाढविता येईल हा प्रश्न त्यांच्यासमोर असतो. अशा परिस्थितीत गुंतवणूकयोग्य वाढावा वाढविण्यावर भर आणि त्यासाठी उत्पादनघटकांची उच्चतर उत्पादकता या गोष्टी निर्णायक महत्वाच्या ठरतात. कोणत्या उत्पादनतंत्राची निवड करावयाची याविषयीचे विश्लेषण त्या दृष्टिकोनातून केले जाण्यास एकोणीसशे पन्नाशीच्या काळातच सुरुवात झाली होती. त्याला सेन यांचा याविषयीचा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर अधिक चालना मिळाली. त्यांच्या ग्रंथाच्या आवृत्याही येऊ लागल्या. त्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीची [3] प्रस्तावना विशेष महत्त्वाची ठरते ती या दृष्टीने की, त्यामध्ये मागील विश्लेषणाचा मागोवा घेऊन इष्टतम बचत-गुंतवणूकविषयक प्रश्नाचा सखोल विचार ग्रथित करण्यात आला. बचत व गुंतवणूक पातळी इष्टतम मानल्यास तंत्राच्या निवडीचा फारसा प्रश्न येत नाही; त्या प्रश्नाची परंपरागत मांडणी तशा सोईस्कर गृहितावर आधारित होती. त्यामुळे उत्पन्ननिर्मितीतील जो भाग पुनर्गुंतवणुकीकडे वळविला जातो ते प्रमाण भांडवलसघनतेच्या निवडीच्या प्रश्नाच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे मानले गेले नाही. पण याचा अर्थ तो प्रश्न सर्व देशांत आपोआपच सुटतो असा नव्हे.

सोईस्कर (जे सिद्ध करावयाचे तेच) गृहीत धरण्याची चूक टाळावयाची तर उत्पादनतंत्राच्या निवडीचा प्रश्न उरतोच. विकसनशील देशांत बचत इष्टतम नसल्याचे सर्वसाधारणपणे आढळते. अशा परिस्थितीत कोणते गुंतवणूक प्रकल्प हाती घ्यावयाचे हे ठरविताना तंत्र निवडीसंबंधी सेन यानी केलेले विश्लेषण अचूक मार्गदर्शक ठरते. सर्व जमेस धरता प्रत्यक्षात आढळणारा गुंतवणूक दर काही अडचणींमुळे इष्टतम दरापेक्षा कमी असल्यास श्रमसघन तंत्र आणि भांडवलसघन तंत्र यामधून योग्य निवड करण्याचा प्रश्न हाताळताना सेनप्रणीत विश्लेषण प्रस्तुत ठरते.

भांडवली वस्तू आणि सेवनीय वस्तू यांच्या खुल्या बाजारातील सापेक्ष किमती (एका अर्थाने) दिशाभूल करणाऱ्या असतात. हे लक्षात घेता श्रमविपुल अर्थव्यवस्थेत श्रम या घटकाचा सामाजिक खर्च धन स्वरुपाचा राहतो. असे असले तरी उपलब्ध श्रमशक्तीचे पूर्णतः सेवायोजन होत नसेल तर श्रमाची छाया किंमत (बाजारातील किमतीच्या मानाने अधिक अचूक रीतीने वास्तव व्यक्त करणारी किंमत) शून्य राहते हा सेन यांचा निष्कर्ष त्यांच्या एकूण मांडणीशी विसंगत ठरत नाही.

### 3 अवेतनी श्रम (non - wage labour)

तंत्रज्ञानाच्या निवडीविषयीच्या प्रश्नांची (खरे तर वादप्रश्नांची) सखोल चिकित्सा करताना सेन यानी रोजगार आणि कार्यदक्षताविषयक पायाभूत संकल्पनांची विस्तृत चर्चा केलेली आहे. जागतिक रोजगार कार्यक्रमाच्या चौकटीत आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेकरिता त्यानी पूर्ण केलेला या संदर्भातील अभ्यासप्रकल्प [4] अत्यंत प्रशंसनीय ठरतो. सरकारी धोरणाचे एक उद्दिष्ट म्हणून रोजगारनिर्मितीच्या कार्यात, अनेक प्रश्न गुंतलेले असतात. समुचित तंत्रज्ञानाची निवड करताना श्रम या उत्पादन घटकाच्या तरोब अन्य उत्पादन घटकांच्याही छाया किमती लक्षात घ्याव्या लागतात.

विकसनशील अर्थव्यवस्था दुपाखी (द्विदल) स्वरुपाच्या अर्थव्यवस्था असतात; अशा अर्थव्यवस्थांतील श्रम बाजारांच्या बाबतीत द्विदलतावाद (dualism) हे वैशिष्ट्य आढळते. त्यामुळे स्थूलमानाने एकाच प्रकारच्या श्रमासाठी दिल्या जाणाऱ्या मजुरीत तफावत असते. व्यवसाय संस्थांची मालकी, संरचना आणि त्यांचा संघटनप्रकार

यांच्याशी हे मजुरीतील फरक संबंधित असतात. विकसनशील अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये लक्षात घेता कुटुंब पातळीवरील व्यवसाय संस्थांमध्ये त्याचप्रमाणे सरकारी प्रकल्पांमध्येही अवेतनी श्रमाच्या वापरास भरपूर वाव असतो. रोजगार संधी वाढविण्यासाठी पर्यायी धोरणात्मक उपाययोजनांविषयी विचार करताना 'अवेतनी श्रम' पद्धतीचे संभाव्य लाभ लक्षात घेतले पाहिजेत. यादृष्टीने सेन यांचे हे विचार वेधक आणि उद्बोधक आहेत. ते अद्याप प्रस्तुत ठरतात.

### 4 आर्थिक अभिवृद्धीची प्रमेये

स्थूलमानाने सन 1960 ते 1970 या दशकात विकासाचे अर्थशास्त्र या क्षेत्रात अर्थशास्त्रज्ञ विशेष रस घेऊ लागले. संशोधनाच्या विषयांची निवड करताना विकासाचे अर्थशास्त्र या विषयाचा विचार अग्रक्रमाने करण्याकडे अभ्यासकांचा कल होता. सेन यानी भांडवलविषयक आणि आर्थिक अभिवृद्धीसंबंधी केलेले विश्लेषण म्हणजे एक मौलिक योगदान असून त्यांच्या लेखन कार्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून याचा उल्लेख करता येईल.

हॅरॉड-डोमर प्रतिमान पुढे आल्यानंतर आर्थिक अभिवृद्धीसंबंधीची अनेक प्रमेये मांडण्यात येऊ लागली; काल्डर आणि पॅसिनेट्टी (पायाभूत प्रतिमानाची दीर्घकालीन समतोलाच्या परिस्थितीच्या संदर्भात मांडणी); जोन रॉबिन्सन, कान (आर्थिक अभिवृद्धीविषयक केंब्रिज तत्त्वाची मांडणी); सोलो (अभिवृद्धी प्रक्रियेच्या विश्लेषणात अभिमत उत्पादन फलाचा वापर); स्वान (अभिवृद्धीचा दीर्घकालीन दर लोकसंख्या वाढ आणि तंत्रवैज्ञानिक प्रगती या घटकांकडून ठरविला जातो); फेल्प्स् (संचयाविषयीच्या सुवर्ण नियमाचे विश्लेषण आणि दीर्घकालात उत्तम परिणाम कसा प्राप्त करून घेता येईल याविषयीचे विश्लेषण); स्वान (पायाभूत अभिवृद्धी प्रतिमानांची टीकात्मक चिकित्सा); जेम्स टोबिन (पैसाविषयक प्रश्नांचा व विश्लेषणाचा अंतर्भाव); सोलोहान (द्विक्षेत्री अभिवृद्धी प्रतिमान); कूपमन (अभिवृद्धीच्या कमाल शक्यता दराविषयीच्या फॉन न्यूमन यानी मांडलेल्या प्रतिमानाचे मूल्यमापन); काल्डर - मिरलीज आणि हान - मॅथ्यूज (तांत्रिक प्रगतीचे परिणाम); सोलो (सन 1909 ते 1949 या कालातील अमेरिकेच्या आर्थिक अभिवृद्धीत भांडवलसंचय आणि तांत्रिक प्रगती या घटकांच्या सापेक्ष हिश्शांचा अंदाज ); जॉर्गेन्सन- ग्रिलिचेस (उत्पादकतेतील बदलांचे स्पष्टीकरण देताना त्यांच्या दृष्टिकोणात अभिप्रेत असलेला उत्पादनविषयक आर्थिक सिद्धान्त); फेल्प्स् (आर्थिक अभिवृद्धीवर विशिष्ट दिशेने परिणाम घडवून आणण्यासाठी सरकारी धोरणाचा अवलंब का करावा याविषयी मीमांसा) यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. सेन यानी संपादित केलेल्या ग्रंथात [5] या सर्व शोधनिबंधांबरोबरच त्यांच्या स्वतःच्या एका शोधनिबंधाचा ('व्याज, गुंतवणूक आणि अभिवृद्धी') समावेश आहे.

आर्थिक अभिवृद्धीविषयक अभिमत प्रतिमान उत्पादन घटकांच्या पर्यायतेच्या गृहितावर आधारित आहे तसे ते उत्पादन घटक किमतीच्या नम्यतेवरही आधारित आहे. किमती नम्य (flexible) नसतील तर कोणत्या अडचणी येतील? विशेषत: केन्सच्या रोखता सापळ्यामुळे व्याज दर विशिष्ट पातळीपेक्षा निम्न पातळीवर येऊ शकणार नाही आणि त्यामुळे भांडवल-उत्पादन गुणोत्तर अभिवृद्धी समतोलासाठी जितक्या उच्च पातळीवर राहणे आवश्यक असते तितकी उच्च पातळी ते गाठू शकणार नाही. पण या प्रश्नाची तीव्रता एका कारणामुळे कमी होऊ शकते. उदाहरणार्थ, किंमत बदलांच्या दरावर वास्तव व्याज दर अवलंबून असतो. प्रत्यक्षात नफ्याचा वास्तव दर भांडवलसघनतेच्या निवडीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. तरीही आणखी एक प्रश्न राहतोच. किमतीतील बदलाचा आवश्यक तो दर प्रत्यक्षात येण्यासाठी अर्थव्यवस्था यथायोग्य समायोजन घडवून आणील काय? नवअभिमत चौकटीतील गृहिते मान्य केल्यास ते शक्य आहे; विशेषत: नियोजित बचतीवरून एकूण गुंतवणूक ठरत असेल आणि पैशातील मजुरीच्या वाढीचा दर व बेकारीचे प्रमाण यांचा संबंध (म्हणजेच फिलिप्स वक्र विश्लेषण) मान्य केल्यास ते शक्य आहे. [6]

पण नवअभिमत गृहितांच्याबाबतीतील विजोडपणा या संदर्भात अधिक प्रकर्षाने उघड होतो; कारण,

समायोजन प्रक्रियेत वास्तव व्याज दरातील वाढीमुळे अभिवृद्धी दर वाढण्यास प्रवृत्त केले जाते असे अनुमान निघेल. पण खरे तर वास्तव व्याज दरातील वाढीमुळे अभिवृद्धी दर गुंतवणूक फलाद्वारे कमी होईल अशी रास्त अपेक्षा असू शकते तथापि नवअभिमत प्रतिमानात गुंतवणूक फलाचा अभाव असून गुंतवणूक केवळ बचतीवरून ठरते असे गृहीत धरलेले आहे. या संदर्भात सेन यांचे नेमके प्रतिपादन असे की, (राष्ट्रीय उत्पन्न) अभिवृद्धीचा शक्य कमाल दर (warranted rate of growth) आणि अभिवृद्धीचा नैसर्गिक दर (natural rate of growth) यातील विरोध उत्पादन घटकांच्या बदलत्या लाभदरांद्वारे मिटविला जातो; पैशातील व्याज दर बाजारातील वास्तव घटकांना प्रतिसाद देतो असे येथे गृहीत धरलेले आहे. पैसा हा घटक विचारात घेता उद्‌भवणारी गुंतागुंत या विश्लेषणात समाविष्ट करू पाहता ते गृहीत सयुक्तिक ठरत नाही. सेन यानी पुढे असे प्रतिपादन केले आहे की, येथे पैशातील व्याज दर प्रस्तुत ठरत नसून 'स्वतःचा व्याज दर' (वास्तविक व्याज दर) ही संकल्पना या प्रश्नाच्या दृष्टीने समर्पक ठरते. त्यादृष्टीने पाहता बेकारी व पैशातील मजुरीतील बदलाचा दर यातील संबंधाविषयी निदान वरपांगी पटणारे गृहीत मान्य केले तर कमाल शक्य दर आणि नैसर्गिक अभिवृद्धी दर यात समानता येण्याच्या दृष्टीने स्वतःच्या व्याज दरात आवश्यक ते बदल घडून येतील; पैशातील व्याज दर स्थिर ठेवला तरीही हा परिणाम घडून येईल. [7]

या ग्रंथाला सेन यानी लिहिलेली प्रस्तावना एका मूलभूत प्रश्नाकडे लक्ष वेधून घेते. तर्कसंगत मांडणीच्या दृष्टीने उपरोक्त निबंध उल्लेखनीय आहेत. पण या शोधनिबंधांच्या मालिकेतील कच्चा दुवा म्हणजे त्यांच्या मुळाशी असणारे अनुभवाधिष्ठित अभिवृद्धी सिद्धान्त. प्रत्यक्षातील आर्थिक अभिवृद्धी प्रक्रियेच्या सम्यक् व सुजाण आकलनातून आर्थिक अभिवृद्धीविषयक धोरणात अनेक सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. अशा संभाव्य सुधारणांविषयीचा पूर्ण अभ्यास अद्याप केला गेलेला नाही. कित्येक संशोधकांनी दोनतीन दशकांच्या कालात आर्थिक अभिवृद्धीविषयक प्रश्नांचा अभ्यास करूनही आर्थिक अभिवृद्धी हे एक कोडे ठरते; यावरून ही प्रक्रिया किती गुंतागुंतीची आहे याचा अंदाज येतो. दुसरे असे की, आपली विशिष्ट मूल्ये त्यातून प्रतिबिंबित होतात. आपल्या बुद्धिकौशल्याला आव्हान ठरणाऱ्या कठीण समस्यांविषयीच्या सैद्धान्तिक विचारात गढून जाणाऱ्या पोथीपंडितांच्या निष्ठाही त्यातून व्यक्त होतात. आर्थिक अभिवृद्धीच्या क्षेत्रातील संशोधन विषयाची निवड करताना तार्किक जिज्ञासा अधिक प्रभावी ठरलेली दिसते; ती अभ्यासविषयक व्यवहाराच्या दृष्टीने कितपत समर्पक, प्रस्तुत ठरते याचा फारसा विचार केला जात नाही, ही खंत त्यानी उपरोक्त संपादित ग्रंथाच्या प्रस्तावनेत [8] व्यक्त केली आहे.

### 5 विकासाच्या अर्थशास्त्राचे स्थान व भूमिका

विकसनशील देशातील आर्थिक विकासाची प्रक्रिया हा सेन यांचा जिव्हाळ्याचा विषय. विकासाच्या अर्थशास्त्रासंबंधीचे त्यांचे शोधनिबंध वाखाणले गेले आहेत. त्यापैकी काही संस्था आणि प्रेरणा या गटात मोडणारे तर अन्य काही एकाकीपणा आणि सामाजिक गुंतवणूक यावर भाष्य करणारे आहेत. छाया किमतनिश्चिती आणि रोजगार याविषयींचे विश्लेषण करणाऱ्या शोधनिबंधांखेरीज अर्थशास्त्रात नीतीतत्त्वांचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट करणारे त्यांचे शोधनिबंध सर्वत्र चर्चिले गेलेले आहेत. वस्तू आणि कल्याण या गटातील शोधनिबंध देखील मोलाचे योगदान ठरले आहेत. विकासाच्या अर्थशास्त्राला नवी परिमाणे प्राप्त करून देणारा त्यांचा सन 1984 चा लेखसंग्रह [9] म्हणजे त्यांच्या विविधांगी सामर्थ्याचा एक उत्कृष्ट नमुनाच होय.

विकसनशील अर्थव्यवस्थांमधील संस्थात्मक व्यवस्था वेगवेगळ्या असतात. त्यांचे परिणाम अभ्यासण्यासाठी किंमतनिश्चितीचे तत्त्व कसे वापरता येते हे त्यानी शेतकरी आणि द्विदलतावाद याविषयीच्या लेखात दाखवून दिले आहे. श्रम या उत्पादन घटकाची सीमान्तिक उत्पादकता शून्य असणे आणि श्रम हा घटक विपुल असणे या दोहोंमध्ये फरक असून त्यापैकी कोणतीही एक बाब अन्य उर्वरित घटनेवर अवलंबून नसते हे लक्षात

घ्यावयास हवे.

ज्याच्यापाशी अतिरिक्त श्रमशक्ती उपलब्ध नाही अशा शेतकऱ्याचे प्रश्न तसेच ज्यादा श्रमशक्ती ज्याच्याजवळ उपलब्ध आहे अशा शेतकऱ्याचे प्रश्न हाताळताना एका अर्थाने विकसनशील देशातील अशा कुटुंब पातळीवरील व्यवसाय संस्थेच्या प्रश्नांचे विश्लेषण करताना व्यष्टीय अर्थशास्त्राची नेहमीची साधने वापरण्यास वाव आहे; तशा अभ्यासातून महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेऊ शकतात. म्हणजे अर्थशास्त्रीय विश्लेषण करताना विकासाभिमुख दृष्टिकोणालाही त्यात स्थान असू शकते हे सेन यानी दाखवून दिले. शेतकऱ्याचा व्यवसाय हाही एका अर्थाने व्यवसाय संस्था मानता येईल; तेथेही इष्टतमीकरणाचा विचार आणता येतो. अशा रीतीने विकासाचे अर्थशास्त्र हे उर्वरित अर्थशास्त्रापेक्षा पूर्णपणे वेगळे मानण्याची गरज नाही. त्यांचबरोबर हेही खरे की, विकसनशील देशातील सर्वसामान्य शेतकरी हा सर्व दृष्टीने अन्य संयोजकांसारखा नसतो. त्यामुळे विकासाच्या अर्थशास्त्राचे अशा प्रकारचे काही प्रश्न उर्वरित अर्थशास्त्रात हाताळले गेलेले असणे संभवत नाही; त्यासाठी स्वतंत्रपणे विचार करणे क्रमप्राप्त ठरते. अशा रीतीने विकासाच्या अर्थशास्त्राचे नेमके स्थान आणि त्या शास्त्राची भूमिका स्पष्ट करण्याच्या दृष्टीने 'शेतकरी आणि विद्वदलतावाद' हा त्यांचा लेख उल्लेखनीय ठरतो.

दारिद्र्याविषयी विश्लेषण करताना सेन यानी हेच विश्लेषण पुढे नेऊन अर्थशास्त्राच्या क्षेत्रात विकासाच्या अर्थशास्त्राला विशिष्ट स्थान निर्माण करून दिले आहे. विकासाच्या अर्थशास्त्रात उत्पादनविषयक निर्णय घेणारे शेतकरी व अन्य गरीब व्यक्ती काहीसे वेगळे असतात. अडचणीच्या कालात (पीक हातचे गेले असताना) विकता येण्याजोगी मत्ता त्यांच्यापाशी नसते आणि म्हणूनच त्या परिस्थितीत अन्नधान्याच्या वाढत्या किमतीच्या आपत्तीला ते बळी पडतात. हक्कप्राप्तीचा अभाव हे त्यांच्या उपासमारीचे कारण ठरते.

आर्थिक विकास म्हणजे काय याविषयीच्या निबंधात सेन यानी आर्थिक विकास प्रक्रियेला नवा अर्थ प्राप्त करून दिलेला आहे. आर्थिक विकासासंबंधीचे परंपरावादी विचार बाजूला ठेवून नवा आशय ते विशद करतात. सेन कोणत्या उंचीवरून आणि भूमिकेतून विकासप्रक्रियेकडे पाहतात हे लक्षात घेता तत्त्वज्ञाची बैठक लाभलेला अर्थशास्त्रज्ञ त्या प्रक्रियेकडे वेगळ्या दृष्टीने का पाहतो हे लक्षात येते. हक्क व हक्कप्राप्ती (entitlement) ,शक्यता (capability) ,समन्याय व गरजा, इत्यादींवर ते लक्ष केन्द्रित करतात. खुल्या बाजारयंत्रणेला मोकळीक दिल्यास परिणामत: व्यापक उपासमार ओढवणे संभवते; म्हणून विकास प्रक्रियेत राज्यसंस्थेचा हस्तक्षेप असला पाहिजे, शासनाने त्या प्रक्रियेत सक्रिय लक्ष घातले पाहिजे हा विचार ते हिरिरीने मांडतात. त्यांच्या मते, आर्थिक शक्यता आपण कितपत वाढवितो, विकसित करतो यावरच विकासाच्या अर्थशास्त्राचे भवितव्य अवलंबून राहते. आर्थिक विकास घडवून आणावयाचा तर सामाजिक बदल अपरिहार्य आहे; तसेच विकास साधण्यात कोणते राजकीय अडथळे येतात हे ओळखणे महत्त्वाचे ठरते. उघडपणे दिसणारा अन्याय ओळखणे सर्वाधिक निकडीचे ठरते. सेन यांची विचारधारा समजून घ्यावयाची तर त्यांचे सर्वच शोधनिबंध डोळसपणे अभ्यासणे गरजेचे आहे.

हक्क, हक्कप्राप्ती, शक्यता, नीतीशास्त्र तसेच धोरणाभिमुख अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी सामाजिक शास्त्रे इत्यादींच्या भाषेत आर्थिक विकास-प्रक्रियेचे विश्लेषण केले तरच ती प्रक्रिया खऱ्या अर्थाने अभ्यासली, कार्यवाहीत आणली असे होईल. सेन यांचे साधनसामग्री, मूल्ये आणि विकास याविषयींचे सर्वच शोधनिबंध परंपरावादी पगडा दूर करून संकुचित सीमा ओलांडून नव्या वाटा आणि नवी क्षितिजे दाखविणारे आहेत.

### 6 दारिद्र्य आणि दुष्काळ : हक्कप्राप्ती दृष्टिकोण (entitlement approach)

'दारिद्र्य आणि दुष्काळ' हा सेन यांचा वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ [10] बीजग्रंथ म्हणून वाखाणला जात असून आर्थिक विकासावरील भाष्यकाराने अभ्यासकांना आणि धोरणकर्त्यांना दिलेली एक

अमोल देणगीच होय. अनुभवाधिष्ठित आणि बुद्धिनिष्ठ पद्धतीचा अवलंब करणाऱ्या या ग्रंथाचा केन्द्रबिंदू मनुष्य आहे. अर्थशास्त्राकडे आणि नीतीशास्त्राकडे साकल्याने पाहता नीतीतत्त्वज्ञाचे सामाजिक समर्थन (समाजाभिमुख वकिली) सेन यांच्या दुष्काळविषयक विश्लेषणातून पुढे येते. त्यांच्या लिखाणावर काही टीकाकारांनी आक्षेप घेतले असले तरी नोबेल पारितोषिक विजेते गुन्नर मिर्दाल यांच्या 'Asian Drama' या ग्रंथानंतर मागे पडलेल्या विकासाच्या अर्थशास्त्राला सेन यानी विशिष्ट पद्धतीने संजीवनी देऊन जगाला उपकृत केले हे निःसंशय.

प्रस्तुत ग्रंथात सेन यानी काही आशियाई आणि आफ्रिकी देशांपुढील बिकट समस्यांचे उत्तम रीतीने तात्त्विक विश्लेषण करून त्या प्रश्नांची उकल सुचविली आहे. गरीब लोक बाजारात विनिमय करतात तेव्हा त्यांच्या हाती येणारा मोबदला (हक्कप्राप्ती) अत्यल्प असतो. श्रमसेवेची विक्री असो किंवा जीवनावश्यक वस्तूची खरेदी असो, विनिमय व्यवहारात गरिबांना क्वचितच कधी न्याय मिळतो; त्यांची नेहमी नागवणूक होत असते. विनिमय व्यवहारातून हक्कप्राप्ती गरिबांच्या बाबतीत नगण्य असते. यातून सेन यानी प्रस्तुत ग्रंथात 'निरपेक्ष हानी' (नागवणूक) (absolute deprivation) संकल्पनेचे विश्लेषण केलेले असून त्याआधारे दारिद्र्यावर परिणाम करणाऱ्या विविध सामाजिक, आर्थिक कायद्यासंबंधीचे (कायद्याच्या जोरावर कार्यरत होत असलेले) चल, इत्यादींची मूल्यमापनात्मक चिकित्सा त्यानी केली आहे. सन 1943 चा बंगालचा दुष्काळ तसेच बांगला देश, इथिओपिया, (मॉरिटानिआ, सेनेगल, माली, अपर व्होल्टा, नायजर, चाड हे देश म्हणजेच) सहारा प्रदेशातील देश या देशांतील दुष्काळांच्या अनुभवाधिष्ठित अभ्यासाच्या आधारे त्यानी असा निष्कर्ष काढला की, अन्नधान्याच्या उपलब्धतेत घट झाली नाही तरीही भीषण दुष्काळ ओढवू शकतो. विनिमयातून मिळणाऱ्या (हक्क) प्राप्तीच्या बाबतीत, अंगभूत सामर्थ्याच्या बाबतीत नुकसान हे दुष्काळाचे महत्त्वाचे कारण होय. अन्नधान्याची उपलब्धता घटल्याने दुष्काळ पडतो, असे जे पूर्वी मानले जात होते ते प्रतिपादन (अन्न उपलब्धीचे तत्त्व Food Availability Doctrine) कसे त्याज्य ठरते हे त्यानी दाखवून दिले. त्यानी मांडलेले पर्यायी तत्त्व म्हणजे, 'हक्कप्राप्ती दृष्टिकोण' (Entitlement Approach). अनुभवाधिष्ठित पुरावा याला पुष्टी देणारा आहे. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींच्या शारीरिक व अन्य अंगभूत सामर्थ्यातून ते कुटुंब उत्पन्न मिळविते. सन 1943 च्या बंगालच्या दुष्काळात तांदळाच्या किमती युद्धामुळे भडकल्या होत्या. अन्नधान्य वाढत्या किमतीने खरेदी करणे (रोजगारहीन व खरेदीशक्तीहीन) ग्रामीण जनतेच्या आवाक्याबाहेर होते, म्हणून लक्षावधी लोक मृत्युमुखी पडले. पण शासन मात्र जुन्या तर्कदुष्ट अन्न उपलब्धी तत्त्वाच्या प्रभावाखाली होते. आपत्तीचे स्वरूप, मूळ कारण आणि गांभीर्य न समजल्यामुळे त्यावेळी दुष्काळावर मात करण्यासाठी योग्य धोरण आखण्याच्या बाबतीत शासनाला अपयश आले.

दुष्काळग्रस्त लोकाना धान्य मिळावे म्हणून शासनाने अन्नधान्याचा पुरवठा वाढविला तरीही मृत्यूसंख्या वाढतच होती. सेन यानी असे दाखवून दिलेले आहे की, अन्नधान्याच्या टंचाईपेक्षा पुरेशा खरेदीशक्तीचा अभाव हेच त्या समस्येचे मूळ कारण होते. विशेषतः ग्रामीण जनतेला रोजगाराची संधी न मिळाल्याने त्यांचे उत्पन्न (खरेदीशक्ती) घटले. त्याना पुरेसा रोजगार मिळाल्याने त्यांचे उत्पन्न मिळाले असते तर त्यांच्या उत्पन्नातून महाग धान्यही त्यानी विकत घेतले असते. एकोणीसशे सत्तरीच्या कालात महाराष्ट्रात तसेच आफ्रिकेतील सहारा प्रदेशात अनेकदा दुष्काळ पडले. पण महाराष्ट्रात अन्नधान्याची दरडोई उपलब्धता सहाराच्या मानाने खूप कमी (सुमारे 60 टक्के) असूनही उपासमार टाळणे महाराष्ट्रात शक्य झाले. सहारात मात्र मोठ्या प्रमाणावर मृत्यू ओढवले. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील ग्रामीण रोजगार योजनांमुळे लोकाना मिळालेल्या उत्पन्नातून त्याना धान्य खरेदी करता आले; पण सहारात मात्र अशा रोजगार योजना नव्हत्या. सेन यांचे हक्कप्राप्ती दृष्टिकोणाचे विश्लेषण संयुक्त राष्ट्रसंघाने धोरणनिश्चितीसाठी आधारभूत मानले आहे. प्रत्यक्षात धोरणनिश्चितीच्या बाबतीत भारतातील व अन्य देशांतील धोरणकर्त्यांवरही आता या दृष्टिकोणाचा प्रभावी ठसा उमटलेला दिसतो.

## 7 भुकेचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र

भुकेच्या प्रश्नाची चिकित्सा आणि त्या प्रश्नाची उकल करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सरकारी धोरणाची रूपरेषा देणाऱ्या ग्रंथाने [11] कल्याणकारी अर्थशास्त्राच्या विकासाला मौलिक योगदान दिले आहे. याच अनुषंगाने भुकेचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र मांडताना सेन यानी संपादित केलेल्या ग्रंथाच्या [12] तीन खंडांमध्ये हक्कप्राप्ती व सुस्थिती, दुष्काळाचा प्रतिबंध आणि देशज भूक यासंबंधीच्या प्रश्नांचा लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियाई देशांच्या संदर्भात ऊहापोह करणाऱ्या एकूण सव्वीस शोधनिबंधांचा समावेश करण्यात आलेला आहे.

पुरेसे अन्न आणि अन्य आवश्यक वस्तू संपादन करणे व्यक्तीला ज्यामुळे अशक्य होते अशा कोणत्याही आर्थिक बदलामुळे व्यक्तीवर उपासमारीची पाळी येऊ शकते. याची अनेक कारणे असू शकतात; उदारणार्थ, जमिनीची फारकत (जमीन अन्य व्यक्तीच्या नावे स्वाधीन केली जाणे) आणि आजारपणामुळे श्रमशक्तीचा नाश यासारख्या कारणांमुळे अंगभूत सामर्थ्यात घट किंवा रोजगार गमावला जाणे, मजुरी दरात घट, अन्नधान्याच्या किमतीत वाढ, व्यक्तीकडून विकल्या जाणाऱ्या वस्तूच्या किंवा सेवेच्या किमतीत घट, सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत सोईसुविधांमध्ये कपात इत्यादींमुळे विनिमयाच्या अटींमध्ये प्रतिकूल बदल. सेन यांच्या शोधनिबंधातील हे मर्मग्राही विश्लेषण अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राला नवा आयाम देणारे ठरते. न्यूनपोषित लोक अशक्त, दुबळे असल्यामुळे त्याना रोजगार मिळणे कठीण असते; ते विनारोजगार असतात म्हणून दुर्बल राहतात. दारिद्र्याच्या सापळ्याची (poverty trap) कार्ययंत्रणा थोडक्यात अशी असते. अशा रीतीने भूकविरोधी धोरणाची भूमिका केवळ मृत्यूप्रमाण, मृत्यूसंख्या, अनारोग्यता कमी करण्यापुरती मर्यादित असू शकत नाही; भुकेच्या प्रश्नाची उकल करू पाहणाऱ्या धोरणाने त्या प्रश्नाचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. [13]

भुकेचा प्रश्न आणि व्यापक आर्थिक तसेच सामाजिक बाबी व प्रश्न यांच्यातील आंतरसंबंध निरनिराळ्या दिशांनी दूरवर पसरणारे आहेत. भुकेचा प्रश्न आर्थिक हक्कप्राप्तीच्या हानीशी निगडित करणे जरुरीचे ठरते. यातून असे स्पष्ट होते की, दारिद्र्य हे भूकेचा प्रश्न सूचित करते त्याचप्रमाणे भुकेच्या व्यापक प्रश्नाने लोकांचे दारिद्र्य दर्शविले जाते. म्हणून एकूण उत्पन्न किंवा एकूण खर्चापेक्षाही अन्नधान्यावरील खर्च हा कुटुंबाच्या आर्थिक ऐपतदारीचा अधिक खात्रीचा निर्देशक ठरतो.

## 8 दुष्काळविरोधी सरकारी धोरण

उपरोक्त ग्रंथाच्या दुसऱ्या खंडातील निबंधांमध्ये उपासमार आणि दुष्काळ याविषयीच्या प्रश्नांबरोबरच त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सरकारी धोरणाचा प्रश्न हाताळण्यात आलेला आहे. शेतीमालाच्या किमतींवर, आणि विशेषतः अन्नधान्याच्या किमतींवर, शासनाचे नियंत्रण असले आणि त्या किमती (कृत्रिम रीतीने) निम्न पातळीवर ठेवण्यात आल्या तर लोकांना धान्य स्वस्तात उपलब्ध होऊ शकेल; पण तशा सरकारी धोरणामुळे अन्नधान्याचे उत्पादन खालावणे संभवते. आफ्रिकेतील देशांत तसे अनेकदा घडले आहे असा एक युक्तिवाद केला जातो. म्हणून त्याउलट स्वरुपाच्या धोरणाचा अवलंब केल्यास अन्नधान्याच्या उत्पादनाला चालना मिळू शकते, असाही युक्तिवाद केला जातो. या संदर्भात सेन यांचा युक्तिवाद असा की, धोरणातील चुका दुरुस्त करण्यासाठी वाढत्या, प्रेरक किमतींमुळे अधिक उत्पादनाला अंशतः चालना मिळेल, हे खरे असले तरी हे परस्परांशी निगडित असलेले प्रश्न केवळ उलट स्वरुपाच्या धोरणाने सुटतातच असे नाही; त्या प्रश्नाचे उत्तर असे साधे, सरळ असत नाही. [14] या संदर्भातील एक अडचण अशी की, किमती वाढत्या ठेवण्याचे धोरण अवलंबिले तर गरिबांना अन्नधान्य मिळणे दुरापास्त होईल. दुसरे असे की, त्या प्रकारच्या उपाययोजनेबरोबर सर्वसाधारण उत्पादनांत आणि उत्पन्नात जलद वाढ आवश्यक ठरेल. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अमलात आणले गेलेच पाहिजे असे धोरण आणि सर्वसाधारण उत्पादनातील वाढीसाठी आवश्यक असणारे धोरण या दोहोंमध्ये फरक करणे

जरुरीचे ठरते. म्हणून अन्नधान्याच्या किमतीतील वाढीसारखे कार्यवाहीच्या दृष्टीने सोपे उपाय जितके दिसतात तितके आश्वासक, आशादायक आणि निर्विवाद्य व संशयातील नसणे संभवते. [15]

किमतीतील बदल आणि तशा अन्य धोरणातील (तत्संबंधी चल घटकातील) बदल किती परिणामकारक ठरतात हाच एक केवळ महत्त्वाचा प्रश्न नसून समाजाच्या व अर्थव्यवस्थेच्या बद्धमूल वैशिष्ट्यांमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणणे अधिक गरजेचे आहे. भूधारणाधिकार पद्धती, अन्य संस्था, राजकीय मर्यादा, सांस्कृतिक वैशिष्ट्ये इत्यादींमध्ये बदल घडवून आणणे सहजशक्य नसते. या संदर्भात संस्थात्मक विश्लेषणाचा दृष्टिकोण अवलंबिणे उपयुक्त ठरेल. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक संस्थांमध्ये संरचनात्मक, विधायक स्वरुपाचे दूरगामी बदल गरजेचे ठरतात, हे सेन यानी दाखवून दिले आहे.

### 9 अभिवृद्धीमार्गे सुरक्षा विरुद्ध सार्वजनिक आधाराधिष्ठित सुरक्षा (Growth-mediated Security Vs. Support-led Security)

उपरोक्त ग्रंथाच्या तिसऱ्या खंडात भुकेचा प्रश्न आणि त्याची उकल करण्यासाठी उपाय केन्द्रस्थानी असून देशज न्यूनपोषण व नागवणूक यांच्याशी मुकाबला करण्यासाठी ठोस उपाय सुचविण्यात आले आहेत. वस्तुत: ड्रीझ आणि सेन यांच्या 'भूक व सार्वजनिक धोरण' या ग्रंथात देशज न्यूनपोषण व नागवणूक यांचे उच्चाटन करण्यासाठी सुचविल्या जाणाऱ्या दोन पटनीतींची, धोरणांची तुलना करून त्यातील भेट स्पष्ट केलेला आहे. अभिवृद्धीमार्गे सुरक्षा हा एक उपाय होय. या दृष्टिकोणात जलद आर्थिक प्रगती आणि दरडोई उत्पन्नात वाढ अभिप्रेत असून त्यायोगे भुकेचा प्रश्न सुटेल असे मानले जाते. अर्थात येथे असे गृहीत आहे की, आर्थिक अभिवृद्धीचे लाभ सर्व लोकांपर्यंत पोहोचतात. रोजगाराच्या संधीत जलद व चिरस्थायी वाढ अपेक्षित आहे त्याचप्रमाणे आर्थिक कमकुवत गटातील लोकांसाठी आरोग्य, पोषाहार, शिक्षण, आर्थिक सुरक्षा, इत्यादी सोईसाठी सार्वजनिक व्यवस्थेचा विस्तार शक्य होईल, असेही गृहीत धरले जाते.

पर्यायी पटनीती म्हणजे 'सार्वजनिक आधाराधिष्ठित सुरक्षा' होय. आर्थिक अभिवृद्धीद्वारे देशाचे सामर्थ्य वाढण्याची वाट न पाहता शासकीय यंत्रणेने कमकुवत गटातील लोकांना सुरक्षा उपलब्ध करून देणे या धोरणात अभिप्रेत आहे.

या दोन प्रकारच्या धोरणांमध्ये बराच फरक असला तरी सार्वजनिक आधार उपाय दोन्हींमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात, असे सेन यानी दाखवून दिले आहे. 'सार्वजनिक आधाराधिष्ठित सुरक्षा' व्यवस्थेत सार्वजनिक आधार हे त्या धोरणाचे प्रत्यक्ष व निकटचे साधन ठरते, त्याचबरोबर ते 'अभिवृद्धी मध्यस्थीकृत सुरक्षा' व्यवस्थेच्या यशातील एक महत्त्वाचा घटक ठरते. खरे तर आर्थिक अभिवृद्धीचे लाभ सर्वांपर्यंत पोहोचविण्याची हमी म्हणून सार्वजनिक (वाटप) व्यवस्था अंतर्भूत असावयास हवी; सार्वजनिक व्यवस्थेची अशी गोवणूक नसेल तर जलद आर्थिक अभिवृद्धीबरोबर जनसामान्यांच्या राहणीमानावर विपरित परिणाम संभवतो. 'अभिवृद्धी मध्यस्थीकृत सुरक्षा' व्यवस्थेच्या बाबतीत आलेल्या अनुभवांच्या संदर्भात 'सार्वजनिक आधार उपायांच्या' भूमिकेचे विश्लेषण [16] सार्वजनिक धोरणकर्त्यांना अचूक मार्गदर्शन करणारे आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कक्षेतील सेवा (उदाहरणार्थ, आरोग्य सेवा, शिक्षण) श्रमसघन असल्यामुळे गरीब देशात त्या सापेक्षतेने अधिक स्वस्त ठरतात; त्यामुळे सार्वजनिक आधार योजना व्यापक प्रमाणावर हाती घेणे गरीब देशांना परवडू शकते. दुसरे असे की, उच्च उत्पन्न गटातील लोकांना विशेष प्रगत व महागड्या सेवा न देता सापेक्षतेने स्वस्त असणाऱ्या किमान सेवा बहुसंख्येला देण्याची व्यवस्था परवडणारी ठरेल.

राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीमुळे न्यूनपोषित आणि दारिद्र्यग्रस्त लोकांची नागवणूक दूर करता येणे शक्य असते. 'अभिवृद्धी मध्यस्थीकृत सुरक्षा' पटनीती यावरच भिस्त ठेवते. पण त्याचा अर्थ असा नव्हे की, दरडोई उत्पन्नातील वाढीबरोबर गरिबांची नागवणूक आपोआपच नाहीशी होते. आर्थिक अभिवृद्धीचा प्रकार

(अभिवृद्धीचे सहभागी स्वरूप किंवा सहयोगलक्षी वैशिष्ट्य ) विचारात घेणे जितके महत्त्वाचे तितकीच अभिवृद्धीचा लाभ, सुरक्षा सार्वजनिक आधार उपायांद्वारे जनसामान्यांना उपलब्ध करून देण्याची शासनाची इच्छाशक्तीही महत्त्वाची. ध्येयहीन समृद्धी (unaimed oppulence) खरे तर निरर्थकच. उद्देशरहित संपत्तीऐवजी समावेशक सामाजिक सुरक्षेची ग्वाही देणारे माध्यम म्हणून आर्थिक अभिवृद्धीचा वापर केला गेला पाहिजे.

विकसनशील देशांच्या आर्थिक अभिवृद्धीच्या कार्यक्रमात शेतीच्या प्रगतीला, विस्ताराला विशेष स्थान दिले जाणे जरुरीच ठरते. त्याचे मुख्य कारण असे की, अशा देशांतील बहुजनांची हक्कप्राप्ती शेती क्षेत्राच्या कार्ययंत्रणेवर आणि वाटचालीवर अवलंबून असते. देशज न्यूनपोषणाच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी सेन यानी उत्पादनाच्या आकृतिबंधा बरोबरच शेतीमालाच्या किमतीविषयीचे धोरण, सामाजिक संस्था, तंत्रवैज्ञानिक संशोधन, ग्रामीण भागातील आधारभूत संरचना (infrastructure) , इत्यादींवर भर दिलेला आहे.

राज्यसंस्थेचे धोरण विशिष्ट हेतूने प्रभावित करण्याच्या बाबतीत संघटित स्वरुपाचा राजकीय विरोध सत्तावादी राज्यातही बराचसा परिणामकारक ठरू शकतो. भुकेच्या प्रश्नाविषयी विचार करताना विरोधी पक्षाच्या राजकारणाच्या प्रत्यक्ष व निश्चित भूमिकेची तसेच खुद्द लोकांकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची दखल घेणे उचित ठरेल. सार्वजनिक धोरण म्हणजे केवळ सराकरचे धोरण असे मानण्याची प्रथा, पूर्वापार चालत आलेली पद्धती, संकुचित ठरते; खरे तर, सार्वजनिक धोरण व कृतिकार्यक्रम याचा अर्थ केवळ 'लोकांकरिता धोरण' एवढाच मर्यादित नसून त्यात प्रत्यक्ष लोकानी ठरविलेल्या ध्येयधोरणांचा व तदनुरूप लोकमान्य उपाययोजनांचा समावेश असणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. [17]

## 10 भारतातील अनुभव

केवळ आफ्रिकी आणि दक्षिण आशियातीलच नव्हे तर चीनपासून ब्राझीलपर्यंतच्या कित्येक देशांतील अपार दारिद्र्य व नाहीरे लोकांची नागवणूक सेन यानी अभ्यासली, तद्वतच भारतातील कंगाली हाही त्यांच्या चिंतनाचा विषय होता आणि आहे. आर्थिक अभिवृद्धीच्या प्रमाणभूत निर्देशकांवर लक्ष केन्द्रित करण्यापेक्षा मानवी क्षेमकुशल आणि सामाजिक संधी केन्द्रस्थानी ठेऊन त्यानी आर्थिक विकासाचे व्यापक दृष्टिकोणातून निरीक्षण केले आहे.[18]

भारतातील व्यापक दारिद्र्याचा प्रश्न गेल्या पन्नास वर्षांत सुटू शकला नाही. वंचितांची स्थिती सुधारण्याच्या बाबतीतील अपयशाची मीमांसा करताना सरकारी नियंत्रणांचे दुष्परिणाम, आर्थिक अभिवृद्धीचा वेग वाढविण्यासाठी आर्थिक प्रेरणांची गरज एवढ्यापुरता मर्यादित दृष्टिकोण न ठेवता शिक्षण, सार्वजनिक आरोग्य सामाजिक सुरक्षा आणि तत्संबंधित हक्कप्राप्ती, इत्यादीच्या बाबतीत अत्यंत अपुरे सार्वजनिक प्रयत्न, शासनाचे दुर्लक्ष, राजकीय व सामाजिक दुर्लक्ष, राजकीय सत्तेतील विषमतेतून येणारा धोरण महत्त्वक्रमांचा विपर्यास, इत्यादी घटक कसे जबाबदार ठरतात याकडे त्यांनी लक्ष वेधून घेतले आहे.

## 11 निरक्षरता : व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी

भारताच्या सार्वजनिक धोरणात अन्य सामाजिक उद्दिष्टांना जितके महत्त्व दिले गेले त्यामानाने प्राथमिक शिक्षणाला नेहमीच कमी महत्त्व दिले गेले. याची कारणमीमांसा देताना केला जाणारा एक युक्तिवाद असा की, देशातील निरक्षर लोक ते केवळ निरक्षर आहेत म्हणून दुःखी आहेत असे नाही; आपण शिकलो नाही याचे त्याना वाईट वाटत नाही; शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा वंचितांमध्ये नाही. अशिक्षितांच्या मानसिकतेचे केवळ वर्णन म्हणून हे स्पष्टीकरण अमान्य करता येत नसले तरी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, निरक्षरता म्हणजे स्वातंत्र्याचा अभाव; निरक्षरता म्हणजे केवळ वाचण्याच्या स्वातंत्र्याचा अभाव एवढेच नव्हे तर वाचन, लेखन यावर अवलंबून असणाऱ्या अन्य सर्व स्वातंत्र्यांवर निरक्षरतेमुळे गदा येत असते.

काही बाबतीत असे दिसते की, संकुचित अर्थाने केवळ इच्छा व सुख यासारख्या गोष्टी आधारभूत मानून समाजव्यवस्थेचे जे चित्र रेखाटले जाते त्यापेक्षा वेगळ्या दिशेने मार्गक्रमण करणे स्वातंत्र्यकेन्द्री सामाजिक नीतीशास्त्रामुळे शक्य होईल. व्यक्तीला आपली उद्दिष्टे, ध्येये मुक्तपणे गाठण्यासाठी उत्पन्न, संपत्ती, स्वातंत्र्य, इत्यादी प्राथमिक वस्तूंची गरज असते हे खरे. पण सेन पुढे जाऊन असे प्रतिपादन करतात की, निरनिराळ्या व्यक्तींना मिळणाऱ्या प्राथमिक वस्तूंची तुलना करून त्यावरून विषमता किती आहे हे नेमके समजत नसल्यामुळे अशा तुलनेवर थांबून भागणार नाही. निरनिराळ्या व्यक्तींना स्वातंत्र्याचा प्रत्यक्षात उपभोग किती घेता येतो हेही पाहिले पाहिजे. प्राथमिक वस्तू स्वातंत्र्य मिळविण्याचे साधन ठरतात. पण आपली उद्दिष्टे गाठण्यासाठी प्राथमिक वस्तूंचे प्रत्यक्षात स्वातंत्र्यात रूपांतर करण्याच्या बाबतीत निरनिराळ्या व्यक्तींमध्ये पराकोटीची विषमता आढळते. त्यामुळे व्यक्तीला मिळणाऱ्या प्राथमिक वस्तू त्या व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य किती हे ठरवू शकत नाहीत. उदाहरणार्थ, दोन व्यक्तींना सारख्याच (प्रमाणात) प्राथमिक वस्तू दिल्या तरी जी व्यक्ती विकलांग असेल ती व्यक्ती आपले कल्याण प्राप्त करून घेण्याच्या बाबतीत तितकी स्वतंत्र राहणार नाही, तिला मोकळीक मिळणार नाही. अशा कमकुवत व्यक्तीला विशेष सवलती दिल्या नाहीत, सामईक सामाजिक संस्था-व्यवस्थेत सहभागी होण्यासाठी किंवा सर्वसाधारण राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी, ते निर्णय (विशिष्ट रीतीने) प्रभावीत करण्यासाठी त्या व्यक्तीला विशेष सवलती न दिल्यास ती व्यक्ती स्वातंत्र्यापासून तशीच वंचित राहील.

## 12 भारतातील आर्थिक धोरणाविषयीचा वाद

भारतातील आर्थिक धोरणाविषयीचा वाद सध्या बाजारयंत्रणेला कितपत वाव द्यावा, उदारीकरण असावे की नसावे एवढ्यापुरता मर्यादित असल्याचे जाणवते. पण त्यामुळे मूळ मुद्दा बाजूला पडतो; मूळ प्रश्नाकडून लक्ष काढून घेतले जाऊन अन्यत्र वेधून घेतले जाते. सामाजिक संधीचा प्रश्न हा खरा प्रश्न असून याचा अंतर्भाव करणाऱ्या समावेशक धोरणाचा खुला बाजार कितपत असावा हा एक महत्त्वाचा भाग असला तरी तो एकमेव नसून अत्यंत संकुचित व अपुराही ठरतो. सामाजिक संधी निर्माण करून देऊन सर्वांना समान संधी मिळेल अशी व्यवस्था करून लोकांना त्या संधींचा वापर करून देणे, संधींचा लाभ त्यांना मिळावा यादृष्टीने प्रयत्न करणे ही गोष्ट बाजार मुक्त करण्यापेक्षाही कितीतरी अधिक महत्त्वाची ठरते असे सेन यानी प्रतिपादन केले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रांत सरकारी हस्तक्षेप अतिरिक्त प्रमाणात आहे हे खरे तसेच अन्य अनेक क्षेत्रांत (उदाहरणार्थ, मूलोद्योग शिक्षण, आरोग्य सेवा, सामाजिक सुरक्षा, जमीन सुधारणा, सामाजिक सुधारणा व बदल, इत्यादी) तो अत्यंत अपुरा व परिणामशून्य आहे. गरिबांची नागवणूक, आर्थिक कुंठितावस्था आणि सामाजिक विषमता यासारख्या अनिष्ट गोष्टी गेली कित्येक वर्षे टिकून राहण्यामागे ही कारणे आहेत. या दृष्टिकोणातून पाहता शासनावरील अनेक जबाबदाऱ्या अशा आहेत की त्या व्यवस्थित रीतीने पार पाडल्या जाण्यासाठी काही विशिष्ट क्षेत्रांत सरकारी हस्तक्षेप, सरकारी व्यवहार यांची अधिकांशाने गरज आहे. विकासाभिमुख सार्वजनिक धोरणांची नितान्त आवश्यकता आहे. या दिशेने विचार करता बाजारयंत्रणेला पूरक आणि बाजारयंत्रणेला बाजूला सारणारे सरकारी व्यवहार या दोहोंमध्ये फरक करणे येथे महत्त्वाचे ठरते. आर्थिक उपक्रमशीलतेला मारक ठरणारी नियंत्रणे, विवक्षित औद्योगिक क्षेत्रात खुल्या प्रवेशास प्रतिबंध, इत्यादी प्रकारांमुळे बाजारयंत्रणेचे दूरीकरण झालेले दिसते. परंपरागत सरकारी हस्तक्षेप बराचसा या प्रकारचा आहे. याउलट, मूलोद्योग शिक्षण, विस्तृत व पुरेशा प्रमाणावर सार्वजनिक आरोग्य सेवा कार्यक्रम, इत्यादी पुष्टीदायक स्वरुपाचे सरकारी व्यवहार भारतात गेली कित्येक वर्षे पद्धतशीरपणे दुर्लक्षिले गेले आहेत. बाजारयंत्रणेचे उत्क्रमण (transgression) दूर करण्यासाठी किंमतयंत्रणेला अधिक वाव देणे जितके महत्त्वाचे व गरजेचे आहे तितकेच काही बाबतीतील अक्षम्य दुर्लक्ष लक्षात घेता त्यावर इलाज म्हणून खुल्या बाजाराच्या नियमांचे उल्लंघन करणेही महत्त्वाचे व निकडीचे ठरते. यादृष्टीने विचार करता भारतातील सामाजिक व आर्थिक नागवणूक आणि

भयानक दारिद्र्य दूर करण्यासाठी तसेच सहभागी आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी उदारीकरणाचे पुनर्दिशानिदेशन किती नितांत आवश्यक आहे हे लक्षात येते. बाजारयंत्रणेतील सुधारणा, उदारीकरण, जागतिकीकरण ही अंतिम उद्दिष्टे असूच शकत नाहीत; त्या प्रकारच्या सुधारणांमुळे मानवी विकास जर सुकर होत असेल तर त्या मर्यादेपर्यंत त्या गोष्टी इष्ट ठरू शकतात. त्यादृष्टीने बाजारयंत्रणेचे कार्य सुधारण्यासाठी काही उपाययोजना जशा आवश्यक ठरतात त्याचप्रमाणे सामाजिक विकासाचे सर्वच निर्देशक सुधारण्यासाठी आवश्यक त्या तरतुदींवर आणि उपाययोजनांवर भर दिला पाहिजे.

भारतातील जनसामान्यांची नागवणूक नाहीशी करण्याच्या कामी आर्थिक सुधारणा हातभार लावू शकतात; पण त्यासाठी त्या सुधारणांना पुरवणी जोडणे, पुष्टी देणे निकडीचे आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा व संबद्ध क्षेत्रात शासनाने अधिक क्रियाशील, प्रचालक भूमिका बजावली पाहिजे; मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्याच्या कामात आणि सामाजिक संधी वाढविण्याच्या बाबतीत शासनाने आपला प्रत्यक्ष सहभाग वाढविला पाहिजे. [19]

येथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की, सामाजिक धोरणांच्या बाबतीतील यशामुळे आर्थिक क्षेत्रातील संपादणूक आपोआप शक्य नसते. त्यासाठी आर्थिक प्रेरणांची गरज असते; उत्पादन, गुंतवणूक, व्यापार इत्यादींकरिता योग्य वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. (चीन, दक्षिण कोरिया या देशांत आढळते त्याप्रमाणे) अनुकूल सामाजिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते. पण (केरळच्या उदाहरणावरून स्पष्ट होते त्याप्रमाणे) केवळ तेवढ्याने भागत नसते. [20]

भारतात आर्थिक सुधारणांचे पर्व सन 1985 पासून आणि विशेषतः सन 1991 पासून सुरू झाले असले तरी आर्थिक पुनर्रचनेचा हा कार्यक्रम तसा प्रारंभावस्थेत व अपूर्ण आहे. 'India: Economic Development and Social Opportunity (1989) हा जॉं ड्रीझ यांच्या समवेत लिहिलेला सेन यांचा ग्रंथ त्यांच्या प्रेरणादायी संशोधनाच्या मुख्य विषयाच्या चौकटीतच आहे. त्या ग्रंथात त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी ज्या शिफारशी केल्या आहेत, त्यानुसार देशातील उदारीकरणावर अंकुश ठेवण्याच्या दृष्टीने आर्थिक सुधारणांच्या धोरणात परिस्थितीनुरूप बदल करणे गरजेचे आहे.

या देशातील उदारीकरणाला सरकारी धोरणाची पुष्टी देणे अगत्याचे आहे. आरोग्य, शिक्षण, महिला वर्गाच्या उद्धारासाठी विशेष उपाय, ग्रामीण विकास, विशेषतः आपत्तीच्या कालात परिणामकारक व समावेशक सामाजिक सुरक्षा, इत्यादी क्षेत्रांत सामाजिक गुंतवणूक वाढवून मानवी साधनसामग्रीचा विकास (विशेषतः श्रमिकांच्या क्षमतेत, उत्पादक सामर्थ्यात वाढ) करण्याच्या हेतूने राज्यसंस्थेने गुणात्मक रीतीने व विधायक उपाययोजना करणे निकडीचे आहे. सेन यांनी केलेल्या शिफारशी वरकरणी पाहता विकसनशील देशांच्या दृष्टीने प्रस्तुत ठरत असल्या तरी विकसित देशांवर ओढवलेले वित्तीय व आर्थिक अरिष्ट आणि आर्थिक मंदीचे टांगते भय लक्षात घेता विकसित देशांनाही सेन यांच्या संशोधनातून निःसंदेह शिकण्यासारखे आहे.

## 13 कल्याणाचे आणि दारिद्र्याचे निर्देशांक

लोकांना उपलब्ध होणाऱ्या सामाजिक संधी विस्तारण्याच्या प्रश्नाची चिकित्सा करताना सेन यांनी आर्थिक विषमतेचा प्रश्नही हाताळला आहे. त्यांचे प्रतिपादन असे की, सामाजिक संधी निर्माण करण्यासाठी केवळ बाजार मुक्त करण्याने भागत नाही तर अन्य अनेक गोष्टींबरोबरच विषमता कमी करणे आणि त्याकरिता सर्वसाधारण राजकीय, आर्थिक व सामाजिक कार्यक्रम राबविणे गरजेचे असते.

सन 1972 मध्ये सेन यांनी बारविक विद्यापीठात 'आर्थिक विषमता' या विषयावर 'रॅडक्लिफ व्याख्याने' दिली, ती ग्रथित करण्यात आलेली आहेत.[21] आर्थिक विषमता यासारख्या अत्यंत कठीण आणि निर्णायक महत्त्वाच्या विषयाच्या विश्लेषणासाठी प्रत्येक अभ्यासकाला सर्वप्रथम सेन यांच्या या ग्रंथाकडे वळावे लागते. उत्पन्नाचे प्रचरण (variance of income), कक्षा (the range), गिनी गुणांक (coefficient), तसेच डाल्टन, थील आणि

ॲटकिन्सन् यानी सुचविलेले निर्देशांक, इत्यादी विषमता मापांची चिकित्सा व त्यांचे मल्यमापन करीत सेन यानी आर्थिक विषमता हा विषय अगदी थोडक्यात पण समावेशक रीतीने हाताळला आहे. त्यांचे उत्पन्न-विभाजनविषयक अभिप्राय अचूक मार्गदर्शन करणारे आहेत.

**14 उपयोगितावाद आणि पॅरेटो इष्टतमता**

उपयोगितावाद आणि आधुनिक कल्याणाच्या अर्थशास्त्राचा मूलभूत सिद्धान्त (पॅरेटो इष्टतमता) उपयोगी पडणारे नाहीत हे दाखवून देऊन सेन यानी ते दोन्ही त्याज्य ठरविले आहेत. उपयोगितावादाचा ध्वन्यर्थ असा की, वस्तूच्या उपभोगातून अधिकाधिक उपयोगिता मिळविण्याची कुवत ज्या व्यक्तीच्या ठायी असेल ती व्यक्ती जरी अधिक श्रीमंत असली तरी त्या व्यक्तीला अधिक वस्तू देणे समर्थनीय ठरते. श्रीमंत व्यक्तीच्या अशा गुणवत्तेमुळे त्या व्यक्तीला 'बक्षीस' देणारा हा उपयोगितावाद सेन यांच्या कसोटीला उतरू शकत नाही. पॅरेटो इष्टतमता तर विभाजनविषयक बाबींसंबंधी विशेष काहीच सांगू शकत नाही. इतकेच नव्हे तर, पॅरेटो इष्टतमता एका दृष्टीने निरर्थक ठरते. रोम पेटले तेव्हा निरो फिडल वाजवीत होता; ही पॅरेटो इष्टतम स्थिती म्हणता येईल. आग विझविण्यामुळे अनेकांची स्थिती सुधारली असती पण निरोची स्थिती मात्र अधिक वाईट झाली असती. अशा निरर्थक पॅरेटो पर्याप्तता विश्लेषणाला अर्थशास्त्रात काय स्थान?

उपयोगितावादी दृष्टिकोण उपयोगितांच्या बेरजेचे कमालीकरण करण्याच्या प्रयत्नात असतो. समजा, विशिष्ट उत्पन्नातून 'अ' व्यक्ती 'ब' व्यक्तीच्या मानाने दुप्पट उपयोगिता मिळविते. याचा अर्थ समान उत्पन्न वाटप असूनही 'ब' च्या मानाने 'अ' व्यक्ती दुप्पट सुस्थितीत (सुखवस्तू) राहील. त्यांच्या उपयोगितांच्या बेरजेचे कमालीकरण करावयाचे तर 'अ' व्यक्तीला अधिक उत्पन्न द्यावयास हवे!

जे.ओ.मिरलीज, पीटर हॅमॉण्ड यासारख्या अर्थवेत्त्यांनी उपयोगितावादाचे जोरदार समर्थन करून गोडवे गायले असले आणि त्या तत्त्वावरील धोका टळल्याचा दावा ते करीत असले तरी मानव जातीचे चांगभले चिंतिणारे व सर्व सामाजिक शास्त्रांचा साकल्याने तसेच व्यापक दृष्टिकोणातून विचार करणारे तत्त्वज्ञ '' उपयोगितावादाला अनेकदा जीवदान मिळाले असले तरी आता या तत्त्वाबद्दल कोणत्याही आशा दिसत नाहीत, '' या निष्कर्षाप्रत आलेले आहेत. 'उपयोगितावाद आणि पलीकडे' या विषयीच्या ग्रंथाला [22] सेन आणि बर्नार्ड विल्यम्स यानी जी प्रस्तावना लिहिली आहे त्यात त्यानी मोठा मार्मिक अभिप्राय दिला आहे. ज्या कल्पना आणि संकल्पना सामावेशून घेणे किंवा जी तत्त्वे विशद करणे उपयोगितावादाला केवळ अशक्य आहे अशाच कल्पनांची आणि सिद्धान्तांची मानवी समाजाला निकडीची गरज निःसंशय भासत आहे.

अभिमत अर्थशास्त्राचा आधार (उपयोगितावाद) कमकुवत ठरतो. त्या परंपरेतील कल्याणकारी अर्थशास्त्र मुख्यतः उपयोगितावादी तत्त्वावर आधारलेले असल्याने एका दृष्टीने अर्थशास्त्रच धोक्यात आले आहे. व्यष्टीय अर्थशास्त्र आणि त्याची (संकुचित) बुद्धिनिष्ठतेची गृहिते सतत वाढविल्या जाणाऱ्या गरजांमागे आणि केवळ स्वहितामागे धावणारा आर्थिक मानव केन्द्रबिंदू मानतात. याला प्रखर विरोध करून उपयोगितावाद (आणि त्यातून येणारा उपभोगवाद, चंगळवाद) त्याज्य ठरवून अत्यंत सयुक्तिक स्वरुपाच्या अभिनव संकल्पना, तत्त्वे सेन सुचवितात.

सन 1986 मध्ये बर्कले येथे सेन यानी जी तीन व्याख्याने [23] दिली त्यामध्ये त्यानी बुद्धिनिष्ठ आर्थिक मानव आणि त्याचा उपयोगितावाद यांचा खरपूस समाचार घेतला. प्रत्यक्षानुसारी (positive) नवअभिमत आर्थिक सिद्धान्तांचा आणि तत्वांचा अपुरेपणा दाखवून देऊन मनुष्याच्या वागणुकीमागील एक प्रेरक घटक म्हणून नैतिक विचार ज्यामध्ये अंतर्भूत केलेले आहेत अशा नव्या सिद्धान्तांची व तत्त्वांची गरज सेन यानी विशद केली.

**15 नैतिक अधिष्ठानाची गरज**

एकूण कल्याण ठरविणारी परिस्थिती आणि आर्थिक कल्याण ठरविणारी परिस्थिती यामध्ये पिगू यानी फरक केला. एकूण कल्याणापैकी जो भाग पैसा

या मापनदंडाशी निगडित करता येतो, पैसा या मापनदंडाने मोजता येतो तो भाग म्हणजे आर्थिक कल्याण ही पिगू यानी दिलेली व्याख्या. पिगू यानी केलेल्या या प्रकारच्या मांडणीवर सेन यानी आक्षेप घेतले आहेत. आर्थिक कल्याणाची परिस्थिती वेगळी काढल्यास अर्थशास्त्र हे एक केवळ तांत्रिक शास्त्र बनते. पिगू यांच्या दृष्टिकोणात अभिप्रेत असलेली तर्कपद्धती, विचारसरणी कशी चुकीची ठरते हे सेन यानी दाखवून दिले. कल्याणाचे तसे भाग पाडता येत नाहीत, कल्याण विभाज्य असू शकत नाही, असे प्रतिपादन करून अर्थशास्त्र हे अन्य सामाजिक शास्त्रांशी तसेच नीतीविषयक शास्त्रांशी कसे निगडित आहे हे सेन यानी नेमकेपणाने दाखवून दिले.

सदिच्छा, प्रेम, आपुलकी, कर्तव्य, बंधन, कृतज्ञता, उपकार, सचोटी, सहानुभूती, विश्वास, अन्योन्यता (परस्परता), इत्यादी नैतिक कल्पना आपण मान्य करावयाला हव्यात; आर्थिक अभिकर्त्यांच्या वर्तनाविषयीच्या प्रतिमानात त्या स्पष्टपणे गोवल्या गेल्या पाहिजेत. नीतीशास्त्रातील कल्पनांना, संकल्पनांना आर्थिक प्रतिमानात समाविष्ट करुन न थांबता किंवा मनुष्याच्या वागणुकीच्या परिणामांचे विश्लेषण ज्या रीतीने केले जाते त्यात दुरुस्ती करण्यापुरते सीमित न राहता हे नैतिक विचार मानवाच्या वागणुकीत उतरले पाहिजेत. सेन यानी मांडलेल्या युक्तिवादांचा हा रोख आहे. तशा पद्धतीने मांडलेले आर्थिक सिद्धान्त आणि नीतीप्रभावित मानववर्तन एकमेकांशी सुसंगत राहतील. आर्थिक तत्त्वविश्लेषण आणि धोरणनिश्चिती यांच्या आदर्शवादी आयामांची गंभीरपणे चिकित्सा केली जावी या विचाराला सेन यानी योग्य वेळी उजाळा दिलेला आहे.

वस्तुत: अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र यांच्या समाईक क्षेत्रातील प्रश्न आव्हानात्मक आहेत. अर्थशास्त्रज्ञ जी साधने वापरतात त्यांच्या साहाय्याने हे प्रश्न अधिक नेमकेपणाने मांडता येतात; पण तसे करण्यामुळे त्या प्रश्नांचे नीतीशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे पैलू कदाचित अंधुक होण्याची, दृष्टिआड जाण्याची शक्यता असते. पण म्हणून ते पैलू गौण मानता येणार नाहीत.

सेन यांच्या मते स्वहित हीच एक केवळ मानवी प्रेरणा असते असे मानणे चुकीचे ठरते. त्यानी अन्य मानवी प्रेरणांच्या कारणांचे स्पष्टीकरण देण्याची गरज लक्षात घेऊन विषय मांडणी केलेली आहे. स्वार्थी नसणाऱ्या अनेक प्रेरणा संमिश्र स्वरुपात आढळतात. उदाहरणार्थ, नि:स्वार्थीपणा, निष्ठा, ज्यामध्ये कर्तव्याशी बांधिलकी प्रतिबिंबित होते अशी वागणूक, गटाचे किंवा समूहाचे कल्याण वाढविणाऱ्या नियमांना अगदी काटेकोरपणे धरून असणारी वागणूक, इत्यादी. वैयक्तिक उपयोगितांचे कमालीकरण हे (अभितम अर्थशास्त्रातील) सामान्यत: स्वीकारले जाणारे मानक सेन यांच्या मते निकृष्ट ठरते. वैयक्तिक कल्याण म्हणजे केवळ व्यक्तिनिष्ठ पसंतीपूर्ती असे न मानता त्याकडे व्यापक दृष्टीने पाहिले पाहिजे. मूलभूत गरजांची पूर्तता, साक्षरता, आरोग्य यासारख्या कार्यात्मक शक्ततांची (capabilities) प्राप्ती, इत्यादी गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

हक्क आणि स्वातंत्र्य यासारख्या संकल्पना आर्थिक नीतीशास्त्रात समाविष्ट करणे कसे महत्त्वाचे ठरते हे त्यानी पटवून दिले आहे. हक्कांमुळे व्यक्तीचे कल्याण वाढू शकते. तथापि हक्कांमुळे चांगले परिणाम घडून येतात एवढ्याच केवळ कारणांमुळे हक्कांचे समर्थन होऊ शकत नाही. अन्य व्यक्तीच्या हक्कांचे समर्थन होऊ शकत नाही. अन्य व्यक्तींच्या हक्कांच्या पायमल्लीमुळे एखाद्या व्यक्तीला मिळू शकणाऱ्या तथाकथित अधिक स्वास्थ्याच्या स्वरूपातील अनुकूल परिणाम घडून येणे शक्य आहे. हक्कांचे या अर्थाने रक्षण करणे नि:संशय चुकीचे ठरते. परिणामांचा चांगुलपणा व्यापक दृष्टीने, समग्र संदर्भात असणे जरुरीचे ठरते.

नीतीशास्त्र केवळ आदर्शवादी अर्थशास्त्रापुरतेच महत्त्वाचे ठरते असे नाही. नीतीशास्त्राची प्रस्तुतता केवळ कल्याणकारी अर्थशास्त्रापुरतीच सीमित नसून मानवी वर्तनासंबंधीच्या स्पष्टीकरणात्मक सिद्धान्तांच्या दृष्टीने (प्रत्यक्षानुसारी अर्थशास्त्राच्या दृष्टीने) देखील महत्त्वाची ठरते. नैतिक मूल्याची संकल्पना आणि बोध बहुत्ववादी असला पाहिजे. सर्व मूल्यांचे केवळ उपयोगितेत किंवा हक्कपूर्तीत रूपान्तर करता येणार नाही. अशा व्यापक दृष्टिकोणातून विचार करता

केवळ स्पर्धेच्या बाजार यंत्रणेचा परिणाम नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरणे अशक्य आहे. एकंदरीत अर्थशास्त्र नीतीशास्त्राशी निगडित करण्यावर सेन यानी भर दिलेला आहे. [24]

वर म्हटल्याप्रमाणे उपयोगितावादावर घणाघाती टीका करून त्या तत्त्वावर आधारित निकषांचे सेन यानी खंडन केले. त्याचप्रमाणे वाटपाविषयीच्या निर्णयांकरिता (बक्षिसपात्र) गुणवत्तेचा निकषही (just deserts) त्यानी त्याज्य ठरविला आहे. त्याचे आणखी एक कारण असे की, गुणवत्ता ही संकल्पना अनेक अर्थांनी वापरली जाते. ती उत्पादकताभिमुख असू शकते किंवा कार्यदक्षताभिमुख असू शकते, गुणाभिमुख असू शकते किंवा दर्जाभिमुख असू शकते.

16 **दुर्बल समन्याय सिद्धान्त** (Weak Equity Axiom)

समजा, प्रत्येक वैयक्तिक उत्पन्न पातळीच्या वेळी 'अ' व्यक्तीची कल्याणपातळी 'ब' व्यक्तीच्या कल्याणपातळीच्या मानाने निम्नतर आहे. अशा परिस्थितीत या दोन व्यक्ती समाविष्ट असलेल्या व्यक्तिसमूहात दिलेल्या एकूण उत्पन्नाचे वाटप करताना इष्टतम स्थिती प्राप्त करावयाची झाल्यास 'अ' व्यक्तीला 'ब' व्यक्तीच्या मानाने उच्चतर उत्पन्न द्यावे लागेल. सेन यांचा दुर्बल समन्याय सिद्धान्त [25] 'गरज' या निकषावर आधारित आहे. उत्पन्नवाटपाचा समुचित निकष कोणता या प्रश्नाची चिकित्सा करताना सेन यानी मांडलेला निष्कर्षात्मक युक्तिवाद असा की, 'गरज' हा निकष 'गुणवत्ता' या निकषाच्या तुलनेत अनेक कारणांमुळे सरस ठरतो.

'काम, गरजा आणि विषमता' याविषयीच्या विश्लेषणाच्या संदर्भात 'स्वार्थी नसणारी (non - selfish) वागणूक ' ही संकल्पना मांडून प्राप्ती कराच्या परिणामांच्या चर्चेला त्यानी नवे परिमाण दिले आहे. [26] काम म्हणजे हालअपेष्टा असे व्यक्ती मानीत नसेल, किंवा व्यक्ती स्वतःला मिळाणारी उपयोगिता जितकी महत्त्वाची मानते तितकेच महत्त्व ती व्यक्ती समाजाला मिळणाऱ्या उपयोगितेला देत असेल तर मात्र कर आकारणीमुळे प्रतिकूल परिणाम घडून येणार नाही. 'स्वार्थी नसणारी प्रेरणा' ही संकल्पना किंवा सेन यांच्या अन्य अभिनव संकल्पना संशोधनाची क्षितिजे रुंदावणाऱ्या, विस्तारणाऱ्या ठरतात. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या चौकटीत राहून आर्थिक विषमतेच्या मापनासंबंधीच्या तांत्रिक मुद्यांची चिकित्सा करणाऱ्या या लिखाणात त्यांच्या सूक्ष्म दृष्टीचा प्रत्यय येतो.

उपरोक्त व्याख्यानांच्या ओघात उपस्थित केलेल्या प्रश्नांपैकी एक म्हणजे विषमतेच्या संकल्पनेविषयीचा, त्या संकल्पनेच्या अत्यावश्यक पैलूंविषयीचा मूलभूत प्रश्न तसाच आणखी एक प्रश्न म्हणजे 'समता कशाची'? सुमारे दोन दशकांच्या कालात त्यानी या संदर्भात केलेल्या मौलिक संशोधनाची एक अभिव्यक्ती म्हणजे विषमता संकल्पनेसंदर्भात पुनःपरीक्षा करणारा त्यांचा ग्रंथ. [27] त्यांचे हे योगदान अनेक दृष्टींनी उल्लेखनीय ठरते.

उत्पन्नाच्या व संपत्तीच्या विषम विभाजनामुळे गरिबांना बरीच झळ पोहोचते. त्यामुळे कल्याणकारी अर्थशास्त्राच्या कक्षेतील प्रश्नांशी झटापट करावयाची तर केवळ हस्तिदंती मनोऱ्यात न राहता वास्तवातील वाटप व्यवस्थेवर, विभाजनविषयक विश्लेषणावर भर द्यावा लागतो, हा विचार अमर्त्यकुमार सेन ठामपणे मांडतात.

17 **समता कशाची?**

समता हवी असे प्रत्येकाला अंतर्यामी, मनोमन (कधी ना कधी) वाटतच असते. समता हे मूल्य म्हणजे एक स्वतः सिद्धतत्त्व मानता येईल. सेन याना शक्ततांची (capabilities) समता अभिप्रेत आहे. त्यांच्या मते शक्तता म्हणजे प्राप्य कार्यशीलता (functionings) होय. [28] कार्यशीलता याचा अर्थ 'व्यक्ती जी काही असते आणि जे काही करते त्या सर्व गोष्टी ' होत; उदाहरणार्थ, व्यक्ती निरोगी असणे, तिचे आरोग्य चांगले असणे, तिने सामाजिक जीवनात [illegible] होणे, ती आनंदी असणे, वगैरे. दिलेल्या साधनसामग्रीचा वापर करून ज्या कार्यशीलता प्राप्त करून घेता येणे व्यक्तीला शक्य असते त्या सर्व प्राप्य कार्यशीलतांचा समूह (collec-

tion) व्यक्तीच्या शक्ततांनी दर्शविला जातो.

प्रत्येक व्यक्तीच्या गरजा निरनिराळ्या असतात तसेच क्षमताही (abilities) वेगवेगळ्या असतात. या दृष्टीने पाहता प्रत्येक व्यक्ती अन्य व्यक्तींपेक्षा भिन्न असते. त्यामुळे त्या व्यक्तींची उत्पन्नपातळी सारखी असली तरी त्यातून प्रत्येक व्यक्ती निराळी कल्याणपातळी गाठते. शक्तता म्हणजे त्या व्यक्तीचे उत्पन्न आणि त्या व्यक्तीच्या गरजा यांचे एक प्रकारचे गुणोत्तरच होय. हे गुणोत्तर म्हणजे, व्यक्तीच्या विशिष्ट गरजा असताना आपल्या उत्पन्नातून त्या व्यक्तीला जे काही करता येणे शक्य असते ते होय.

विषमतेची पुन:परीक्षा करणाऱ्या ग्रंथात सेन यानी स्वातंत्र्य हे मूल्य अत्यंत मौल्यवान असल्याचे प्रतिपादन केले आहे. व्यक्तीला किती स्वातंत्र्य उपलब्ध असते याचा निर्देशांक म्हणजे त्या व्यक्तीच्या शक्तता. त्या व्यक्तीचे क्षेम, स्वास्थ्य त्या व्यक्तीच्या शक्ततांवर अवलंबून असते. म्हणूनच व्यक्ती प्रत्यक्षात कशी जगते आणि काय करते याहीपेक्षा त्या व्यक्तीला ज्या शक्तता प्राप्त करून घेता येतील-प्राप्त करून देता येतील-त्या शक्ततांकडे आपण पाहिले पाहिजे, त्या गोष्टींवर लक्ष केन्द्रित केले पाहिजे.

प्रस्तुत ग्रंथातील विश्लेषण अत्यंत व्यापक दृष्टिकोणातून केलेले असून त्याला तत्त्वज्ञानात्मक बैठक लाभली आहे. सेन सामाजिक न्यायाची संकल्पना सैद्धान्तिक पातळीवर विकसित करतात. त्याविषयीच्या विश्लेषणासाठी आवश्यक असलेला दृष्टिकोण शक्तता संकल्पनेतून मिळतो. त्यातूनच पुढे त्या तात्त्विक चिकित्सेची प्रयुक्ती म्हणून लिंगभेदाधिष्ठित विषमता, दारिद्र्याचे मापन, इत्यादी महत्त्वाच्या विषयांचा परामर्श सेन यानी घेतलेला आहे.

पूर्वीच्या अर्थपंडितांनी कल्याणाच्या अर्थशास्त्राची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यातील एक महत्त्वाची अडचण म्हणजे कल्याणाच्या आंतरव्यक्ती तुलनांचा प्रश्न. हा प्रश्न टाळण्याचा प्रयत्न करीत अडचणीतून मार्ग काढण्यासाठी त्यानी सोईस्कर गृहिते कल्पिली; पण मूळ प्रश्न त्याना सोडविता आला नाही. या पार्श्वभूमीवर सेन यांचे उपरोक्त विश्लेषण उठून दिसते. ते सरस ठरते ते या अर्थाने की कार्यशीलतांच्या आंतरव्यक्ती तुलनांच्या बाबतीत तशा अडचणी येत नाहीत.

कार्यशीलता आणि तत्संबंधी अन्य संकल्पना इत्यादीविषयीची सैद्धान्तिक चिकित्सा हाच सेन यानी सन 1982 मध्ये ॲमस्टरडॅम विद्यापीठात हेनिपमन व्याख्याने दिली त्या व्याख्यानांचा मुख्य विषय होता. त्यांच्या 'वस्तू आणि शक्तता' विषयीच्या कृतीत [29] ते अभिनव विश्लेषण ग्रथित करण्यात आले आहे.

व्यक्तीच्या कल्याणाचे मापन कसे करावयाचे या प्रश्नाचे विवेचन करताना त्यानी सुरुवातीला त्यासंबंधी (रूढ अर्थशास्त्रात अवलंबिले गेलेले) प्रचलित दृष्टिकोण असमाधानकारक असल्याचे दाखवून दिले आहे. व्यक्तीचे वास्तव उत्पन्न, व्यक्ती ज्या वस्तूंचे सेवन करते त्या वस्तूंचे बाजारातील मूल्य, इत्यादी स्वरुपाचे मापनदंड तसे काटेकोर नाहीत; त्यादृष्टीने ढोबळ मानाने काही सांगण्यावरून नेमकी कल्पना येत नाही. वस्तूंचा वापर करण्याची निरनिराळ्या व्यक्तींची क्षमता निरनिराळी असते. व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या अन्नाचे परिमाण लिंगभेद, वयोगट, आरोग्यसंपदा इत्यादींपरत्वे बदलते. वस्तूंच्या उपभोगापासून व्यक्तीला मिळणारी उपयोगितादेखील समाधानकारक मापनदंड नव्हे. उपयोगितावादी दृष्टिकोण आंतरव्यक्ती तुलनांकरिता आवश्यक असणारा पाया देऊ शकत नाही. सुख मोजण्याचा मापनदंड म्हणून उपयोगिता दृष्टिकोण स्वीकारणे कठीण आहे; कारण आत्यंतिक दारिद्र्याच्या भोगाला बिनतक्रार सादर झालेली व्यक्ती चांगल्या सांपत्तिक स्थितीतील व्यक्तीइतकीच सुखी असू शकते. पण याचा अर्थ असा नव्हे की दरिद्री व्यक्तीच्या कल्याणाची पातळी आणि श्रीमंत व्यक्तीच्या कल्याणाची पातळी सारखीच असते.

## 18 **शरीरप्रकृती** (being) **आणि कृत्ये** (doings)

व्यक्तीची 'शरीरप्रकृति' आणि तिची 'कृत्ये' या संकल्पना म्हणजे सर्जनशील सेन यांच्या

नवनिर्मितीचा आणखी एक अत्यंत कल्पक नमुना. त्यांच्या मते व्यक्तीची शरीरप्रकृती आणि त्या व्यक्तीची कृत्ये म्हणजेच त्या व्यक्तीची कार्यशीलता (functionings). सेन यानी मांडलेल्या प्रतिमानात कार्यशीलतांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्ती कोणत्या वस्तूंचा उपभोग घेते, कोणत्या सुखाचा आस्वाद घेते याला फारसे महत्त्व नाही. व्यक्तीची कार्यशीलता म्हणजे उपभोग आणि उपयोगिता यांच्यातील दुवा होय. व्यक्ती सुपोषित असणे ही कार्यशीलता म्हणता येईल; हा उपभोगाचा परिणाम आणि उपयोगितेला कारणीभूत घटक होय.

व्यक्तीच्या स्थितीचे वर्णन सेन 'कार्यशीलतांचा स्वदिश' (vector of functionings) याच्या साहाय्याने करतात. ती व्यक्ती जो सदिश प्राप्त करते त्यावर त्या व्यक्तीच्या कल्याणाची पातळी अवलंबून असते. व्यक्तीच्या कार्यशीलता सदिशांची क्रमवारी (ordering of functioning vectors कल्याणाच्या दृष्टीने त्या सदिशांचा क्रम दर्शविते.

निरनिराळ्या व्यक्तींचे कार्यशीलता सदिशांचे मूल्यांकन भिन्न असल्यास त्यावरून त्या व्यक्तींमधील मतभेद स्पष्ट होते. असे असले तरी कित्येक कार्यशीलता सदिशांच्या क्रमवारीच्या बाबतीत सर्वसाधारण एकमत आढळणे शक्य आहे. व्यक्तींच्या अशा क्रमवारींची सामईक क्षेत्रे बरीच विस्तृत असतात. त्यामुळे अशी सामाईक क्षेत्रे अविवादग्रस्त आंशिक क्रमवारी (non-controversial partial ordering) तयार करण्यासाठी वापरता येणे शक्य असते. उदारणार्थ, अधिक पायाभूत कार्यशीलतांच्या सापेक्ष मूल्यांच्या बाबतीत मतैक्य आढळते. विशिष्ट वयोगटातील महिलांमधील मृत्यूचे प्रमाण बरेच अधिक तसेच दुष्काळाच्या परिस्थितीत महिलांमधील कुपोषणाचे प्रमाण पुरुषांच्या मानाने अधिक आढळते. अशा रीतीने कल्याणपातळीच्या बाबतीत पुरुष आणि स्त्रिया यांच्यामध्ये पद्धतशीर फरक आढळतो. अविवादग्रस्त आंशिक क्रमवारीची अशी अनेक उदाहरणे देता येतील.

व्यक्तीच्या कार्यशीलता सदिशांना तसेच (दिलेल्या साधनसामग्रीच्या दृष्टीने प्राप्य कार्यशीलतांचा समूह दर्शविणाऱ्या) शक्ततांना (capabilities) काही किंमती (मूल्ये) देता येणे शक्य आहे. सदिशांच्या ज्या संचांमधून निवड करण्यास मोकळीक असते (तशी निवड करण्यास व्यक्तीला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य असते) त्या सदिश संचांना 'शक्तता' म्हणता येईल. व्यक्तीला विस्तृत संधीक्षेत्र लाभले असेल तर त्या व्यक्तीला ती गोष्ट लाभदायक असते. त्यामधून भरीव निवडीच्या कृती म्हणजेदेखील एक प्रकारची कार्यशीलताच होय.

अशा रीतीने आर्थिक विकासाचे मूल्यमापन करण्याची एक अभिनव पद्धती सेन यानी सुचविली आहे. त्यांचा मुख्य आधारभूत नवोन्मेष विचार असा की अर्थशास्त्राचा संबंध (केवळ) वस्तूंशी जोडला जाऊ नये तर कार्यशीलता आणि शक्तता या जुळ्या संकल्पनांनी दर्शविल्या जाणाऱ्या कृतींशी अर्थशास्त्राचा संबंध आला पाहिजे.[30] एखाद्या व्यक्तीने कोणत्या वस्तूंचे सेवन केले किंवा उपभोग घेतला याहीपेक्षा त्या व्यक्तीची शरीरप्रकृती कशी आहे आणि त्या व्यक्तीने कोणते कार्य केलेले आहे या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात. अशाप्रकारे सेन अगदी नवीन विचार मांडतात. त्यांच्या या प्रकारच्या मांडणीत मानवी व्यवहारांच्या अनुभवाचे सार अधिक चांगल्या रीतीने साठविलेले आहे. अर्थशास्त्रात या गोष्टी अभावाने आढळतात.

### 19 लिंगभेदाधिष्ठित विषमन्याय

विषमता आणि विषमन्याय या गोष्टी गेली कित्येक वर्षे चालत आलेल्या असल्याने ही अन्याय्य स्थिती जणू अटळ आहे असे मानून ती निमूटपणे सहन करण्याची प्रवृत्ती दुर्दैवी व्यक्तींमध्ये प्रकर्षाने दिसते. ज्यांची गेली कित्येक वर्षे नागवणूक होत आलेली आहे आणि आपल्याला अधिक काही मिळावे अशी आशाही जे करू शकत नाहीत अशा लोकांना कधी अत्यल्प अनुकूलता लाभली, काही थोडासा लाभ मिळाला तरी त्याचा त्या लोकांना आनंद वाटतो, खूप काही मिळाल्यासारखे त्याना वाटते. उपयोगिता किंवा सुख अजमावण्याच्या या विपर्यस्त पद्धतीमुळे त्याची नागवणूक तितकीशी तीव्र किंवा गंभीर स्वरुपाची नाही असे भासविले जाते. या

मांडणीचा आधार असलेला उपयोगितावाद मागे म्हटल्याप्रमाणे त्याज्य ठरतो; कारण, अत्यंत कठीण परिस्थितीत असलेल्यांचे खरे दुःख, दैन्य जाणून घेण्यापासून आपण दूर जातो. सामाजिक नीतीशास्त्राच्या दृष्टीने हा अन्याय कधीच समर्थनीय नाही.

लिंगभेदाधिष्ठित विषमतेच्या बाबतीत हीच परिस्थिती आढळते. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांमध्ये व्यापक असमाधान आहे असा दावा करणे कठीण असले किंवा त्या स्त्रीवर्गाला प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेत आमूलाग्र बदल हवा आहे असे म्हणणे प्रस्थापितांना कठीण असले तरी एक गोष्ट निश्चित की ग्रामीण भागात लिंगभेदाधिष्ठित विषमता व विषमन्याय पराकोटीचा आहे. अनुभवाधिष्ठित पुराव्यावरून हे स्पष्ट होते. त्या निरिक्षणाचे महत्त्व कसे दाखवून द्यावयाचे हा एक महत्त्वाचा प्रश्न ठरतो.

ग्रामीण भागातील महिलांना पुरुषांच्या मानाने बरेच कमी स्वातंत्र्य मिळते. तथापि त्यांच्यामधील असंतोषाच्या अभिव्यक्तीचा अभाव असला किंवा आमूलाग्र बदल घडवून आणला जावा ही इच्छा त्यांच्यामध्ये तीव्रतेने जाणवत नसली तरी या विषमतेची नैतिक बाजू कमी महत्त्वाची ठरते अशातला भाग मुळीच नाही. खरे तर व्यक्तीच्या स्थितीचे मूल्यमापन करण्याचे स्वातंत्र्य तसेच त्या परिस्थितीत इष्ट बदल घडवून आणण्याचे स्वातंत्र्य हे एक महत्त्वाचे 'मूल्य' ठरते. प्राप्त परिस्थितीचे समर्थन करणाऱ्यांना उपयोगितावादाच्या उपरोक्त संदर्भातील अन्वयामुळे काहीसा दिलासा मिळाल्यासारखे वाटत असले तरी व्यक्तिस्वातंत्र्य ही सामाजिक बांधिलकी ठरत असल्याने ते समर्थन निराधार ठरते. प्रत्यक्षात अत्यंत शोषित अशा स्त्रीवर्गातील ज्याना त्या परिस्थितीतील बदल निकडीचा वाटत नाही अशांकडून त्या विषमतेचे, विषमन्यायाचे (खोटे) समर्थक मिळविण्याचा प्रयत्न वाढत जात आहे. परिणामतः उपयोगितावादावर आधारित युक्तिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित युक्तिवाद यातील भेद तीव्र होत जातो. त्याचे दूरगामी परिणाम गंभीर स्वरुपाचे संभवतात.

लिंगभेदाधिष्ठित विषमन्याय दूर करण्यासाठी एक महत्त्वाचा उपाय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यामुळे महिलांच्या शक्तता वाढतात आरोग्य-सेवांमुळे त्यांचे विकलतेपासून रक्षण होते. त्यामुळे महिलांना आपली सामाजिक भूमिका पार पाडणे शक्य होते. काही बाबतीत सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा सेन यांचा दृष्टिकोण नाविन्यपूर्ण ठरतो.

राहणीमानाची संकल्पना [31] स्पष्ट करताना देखील त्यानी वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोणाचा अवलंब केलेला आहे. रूढ अर्थशास्त्रात राहणीमानासंबंधीचे अभिप्राय उत्पन्नाच्या भाषेत किंवा साधनसामग्रीवर ताबा मिळविण्याच्या क्षमतेच्या भाषेत मांडले जात असल्याचे दिसते. एकंदरीत ती मांडणी पसंतीनुसार (गरज) पूर्ती (preference satisfaction) किंवा उपयोगितेवर आधारित आहे. सेन यानी यावर मूलभूत आक्षेप घेतले असून स्वतःच्या शैलीतील पर्यायी विश्लेषण सादर केले आहे. त्यांच्या मते, जुन्या दृष्टिकोणामुळे आपले आकलन सदोष राहतेच आणि शिवाय आर्थिक संस्थांसंबंधीची माहिती व त्यांच्या कामकाजाचा (व्यवहारांचा) विपर्यास होतो.

निवड आणि त्यानुसार इच्छापूर्ती इत्यादी बाबी राहणीमानाशी संबंधित असू शकतात, त्या गोष्टी राहणीमानाचा काही भाग असू शकतात पण राहणीमान केवळ त्याच घटकांचे बनलेले नसते. सेन यांच्या मते राहणीमानाची संकल्पना मुख्यत्वेकरून कार्यशीलता आणि शक्तता यावर आधारित राहते.

## 20 सामुदायिक निवड आणि सामाजिक कल्याण

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याप्तीत राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इत्यादी अनेक अभ्यासविषयांचा समावेश होतो. वस्तुतः कल्याणाचा अभ्यास अनेक विषयांना छेद देणारा, बहुस्पर्शी आहे. ह्यांमध्ये तत्त्वांची व्यवहाराशी सांगड घालण्याचे त्यांचे यशस्वी प्रयत्न प्रेरणादायी ठरतात.

व्यक्ती, समाज आणि शासन यांचे आर्थिक व्यवहार कसे असावेत याविषयी किते घालून देणाऱ्या शास्त्रातील मूलभूत समस्यांची उकल करताना त्यानी सामुदायिक निवड तत्त्वाचे प्रतिपादन केले. सामुदायिक निवडीच्या विश्लेषणासाठी भक्कम तात्त्विक बैठक हवी

यादृष्टीने विश्लेषणात्मक पाठलाग करीत सुरुवातीच्या दोन दशकांच्या कालात त्यानी गणिती प्रतिमाने तयार केली. सामुदायिक निर्णयाप्रत येण्यासाठी वैयक्तिक मूल्ये (पसंती, मते) कशी एकत्रित करता येतात हे त्यानी स्पष्टपणे दाखवून दिले. केनेथ ॲरो यांच्या 'Collective Choice and Individual Values' (सामाजिक निवड आणि वैयक्तिक मूल्ये) या कृतीमुळे तसेच त्यानंतर त्या विषयासंबंधीच्या अनेक शोधनिबंधांमुळे सेन यानी या विषयात अधिकच लक्ष घातले. त्या प्रयत्नांचा एक भाग ठरणारी 'सामुदायिक निवड आणि सामाजिक कल्याण' [32] ही त्याची रचना अर्थशास्त्रज्ञांना नव्या वाटा दाखवून देणारी आहे. नीतीतत्त्वज्ञानाशी अतूट बंधांनी निगडित असलेल्या त्यांच्या या कृतीत त्यानी अत्यंत मौल्यवान अशा नव्या संकल्पना मांडल्या आहेत. विश्लेषणात्मक अर्थशास्त्राच्या प्रगत अभ्यासाच्यादृष्टीने प्रेरणादायी असेच हे योगदान आहे. या विषयात वापरल्या जाणाऱ्या संकल्पनांच्या व्याख्या आणि प्रमेयांच्या सिद्धता संख्यात्मक दृष्टिकोणातून (गणिती पद्धतीने) आकारिक विष्लेषण देण्यावर भर असला तरी शाब्दिक रीतीने त्यानी आपले युक्तिवाद गणिती भागांशी संलग्न करून तितकेच प्रभावीपणे मांडले आहेत.

व्यक्तींच्या हक्कांच्या क्षेत्राशी सुसंगत अशा सामुदायिक निर्णयनासाठी काही नियम तयार करणे शक्य असते. एखादा विशिष्ट सामुदायिक निर्णय घेतला गेलेला असताना निरनिराळ्या व्यक्तींना जे कल्याण लाभेल त्या कल्याणाविषयीच्या माहितीचे विश्लेषण करता येईल. अशा विश्लेषणामुळे समाजाच्या कल्याणाची विभागणी दर्शविणाऱ्या निरनिराळ्या आकृतिबंधांची तुलना करण्यासाठी तात्त्विक पाया (आधार) प्राप्त होतो. असा युक्तिवाद सेन यानी मांडला आहे. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील महत्त्वाचे प्रश्न हाताळण्याचा सेन यानी सुचविलेला मार्ग नाविन्यपूर्ण ठरतो तो या अर्थाने की त्याने त्यामध्ये अर्थशास्त्रीय विश्लेषणाची साधने आणि तत्त्वज्ञानान्तर्गत विश्लेषणाची साधने या दोहोंचा सुंदर मिलाफ मार्मिकपणे घडवून आणला आहे. त्यामुळे पूर्वापार भेडसावत आलेल्या प्रश्नांच्या चर्चेला नैतिक परिमाण प्राप्त होते. विभाजनाच्या निरनिराळ्या आकृतिबंधांच्या संदर्भातील व्यक्तींची मूल्ये सबंध समाजाच्या दृष्टीने एकत्रित करण्याचा प्रश्न, उत्पन्नातील विषमतेच्या आणि दारिद्र्य गुणोत्तरातील बदलाच्या मापनाचा प्रश्न तसेच निरनिराळ्या समाजातील कल्याण वाटपाच्या तुलनेचा प्रश्न किंवा तदनुषंगिक अन्य प्रश्नांचा ऊहापोह व त्यांची उकल करताना त्या प्रश्नांचे नैतिक परिमाण विचारात घेणे निर्णायक महत्त्वाचे ठरते.

सामाजिक निवडीतील पसंती-तीव्रतांचा वापर त्यानी प्रस्तुत ग्रंथात विशद केला आहे. पूर्वीच्या संशोधकांनी टोकाची परिस्थिती गृहीत धरली होती. एक तर त्यानी उपयोगितेची पूर्ण तुलनीयता कल्पिली, प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीतील उपयोगिता आणि अन्य प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीतील उपयोगिता परिमाणे यामध्ये एकास एक संलग्नता आहे, असे त्यामध्ये अभिप्रेत आहे. पर्यायाने दुसरे टोक म्हणजे अशा तुलनीयतेच्या अभावाचेच गृहीत. सेन यानी केलेले विश्लेषण या दोन टोकांच्या अलग गृहितांपुरते मर्यादित नाही. त्यानी असे दाखवून दिलेले आहे की, या दोन टोकांच्या दरम्यानच्या परिस्थितीत देखील बुद्धिनिष्ठ सामाजिक निवड शक्य असते. दोन टोकांच्या दरम्यानही गृहितांचा अखंडित अनुक्रम (सातत्य) विकसित करून प्रत्येक प्रकारात बुद्धिनिष्ठ सामाजिक निवड करता येते हे त्यानी सोदाहरण सिद्ध केले. व्यक्तींच्या मूल्यदर्शी उपयोगितांवर (cardinal utility) आधारित सामाजिक कल्याण फलाचे (social welfare utility) एक उदाहरण म्हणून (दोन व्यक्तींपुढे( गटांपुढे) असणाऱ्या सौदासंबंधीच्या प्रश्नाला उत्तर म्हणून नाश यानी सादर केलेल्या) लवाद योजनेवर सेन यानी भर दिला आहे. मूल्यदर्शी उपयोगितांची बेरीज करण्याची पद्धती अवलंबावयाची तर त्यात आंतरवैयक्तिक तुलनीयता आवश्यक ठरते. नाश यांना अभिप्रेत असलेल्या उपयोगितांच्या अंतिम (एकत्रित) परिणामात आंतरवैयक्तिक तुलनीयता अंतर्भूत नाही.

निवड आणि पसंती, पसंतींची एकुणात, कल्याणाची तुलना आणि सामाजिक निवड, उपयोगिता, माहिती आणि सामाजिक मापन, यासारख्या विषयांवर सेन यांचे अनेक शोधनिबंध

प्रसिद्ध झाले. सामाजिक निवडीचे तत्त्व जे अनेक प्रश्न हाताळते त्याची प्रस्तुतता दाखवून देणारे एकूण वीस शोधनिबंध सेन यांच्या 'निवड , कल्याण आणि मापन' विषयीच्या ग्रंथात [33] समाविष्ट आहेत. ते प्रश्न मांडण्याच्या आणि त्यांची उकल करण्याच्या बाबतीत विशेषीकृत आणि प्रकृष्ट स्वरुपाची तंत्रे (प्रगत गणिती पद्धती) किती महत्त्वाची भूमिका बजावतात हे प्रस्तुत ग्रंथावरून स्पष्ट होते. या एकूण विश्लेषणाचे तांत्रिक सादरीकरण समजण्यास काहीसे कमी सुलभ किंवा अधिक कठीण वाटले तरी सेन यांच्या मौलिक संशोधनाचे नीट आकलन होण्याच्या दृष्टीने ते आवश्यक ठरते. आदर्शवादी अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील प्रश्नांची सोडवणूक कशी करावयाची याविषयीचा अभ्यासकाचा दृष्टिकोण, मार्ग व मते योग्य प्रकारे प्रभावित करण्याचे कार्य त्यानी केलेले आहे.

निवडीच्या बाबतीतील सुसंगतीचे अनेक प्रकारे अर्थ लावता येणे शक्य असते. तथापि, बुद्धिनिष्ठतेची कसोटी विचारात घेता त्या मांडणीवर मर्यादा येतात, हे सेन यानी दाखवून दिले आहे. पसंतींची एकुणात अभ्यासणारे त्यांचे शोधनिबंध व्यक्तींच्या पसंती आणि सामाजिक निवड यातील संबंधांचे विश्लेषण करणारे आहेत. पसंतींची एकुणात करताना काही पायाभूत अडचणी येतात हे त्यानी मान्य केले आहे. 'कल्याणाची तुलना व सामाजिक निवड आणि उपयोगितेवर माहिती' याविषयींच्या शोधनिबंधात पर्यायांच्या क्रमवारीच्या प्रश्नांचा ऊहापोह आहे. पर्यायांची अर्थपूर्ण सामूहिक क्रमवारी कशी लावता येईल हे त्यानी दाखवून दिले आहे. मूल्यदर्शित्वाचे (cardinality) प्रमाण आणि आंतरव्यक्ती तुलना गृहीत धरल्यास त्याआधारे वैयक्तिक कल्याण फलाकडून सामाजिक दर्जा निश्चितीकडे जाणे (सामाजिक कल्याणाची पातळी ठरविणे) शक्य आहे. निरनिराळ्या सामाजिक गटांनी स्वीकारलेल्या समतावादाच्या निरनिराळ्या संकल्पना एकत्र करण्याच्या कार्यात अनेक अडचणी उद्‌भवतात, याची सेन याना जाणीव आहे. सामाजिक पसंतीचा दर्जा निश्चित करण्यातील (पातळी ठरविण्यातील) अडचणी त्यानी विस्ताराने मांडलेल्या आहेत. सामाजिक मापन या गटात मोडणाऱ्या शोधनिबंधात त्यानी दारिद्र्य निर्देशांक, विषमता निर्देशांक, राष्ट्रीय उत्पन्नविषयक संख्याशास्त्रीय आधारसामग्री, इत्यादी विविध सामाजिक निर्देशकांचा वापर केलेला आहे. विविध निर्देशकांचे आदर्शवादी दृष्टीने महत्त्व विशद करून सामाजिक कल्याणाचे निर्देशक यादृष्टीने त्या निर्देशकांवर येणाऱ्या मर्यादादेखील सेन यानी उपरोक्त ग्रंथात विशद केल्या आहेत.

## 21 बहुमताधिष्ठित राज्यकारभार

विविध पर्यायांना समाजातील व्यक्ती ज्या निरनिराळ्या किमती देत असतात त्यावरून सबंध समाजाच्या दृष्टीने मान्य अशा एकत्रित किमती निश्चित करता येतील काय आणि तसे करणे युक्त आणि तत्त्वत: सयुक्तिक ठरेल काय? लोकशाही व्यवस्थेतील 'बहुमताचे तत्त्व' हा निर्णयनिश्चितीचा व्यवहार्य नियम ठरतो काय? यासारख्या अनेक प्रश्नांची उकल करून सेन यानी अर्थशास्त्राच्या क्षेत्रात विशेष उल्लेखनीय योगदान केलेले आहे तसेच नवी संशोधन क्षेत्रे दाखवून दिली आहेत.

समाजातील निरनिराळ्या व्यक्तींची पसंती निरनिराळी असणे संभवते. अशा भिन्न पसंतींचा एकत्रित विचार करून सबंध समाजाच्या दृष्टीने सामईक निर्णय घेण्याची एखादी पद्धती शोधून काढावी लागते. लोकशाही व्यवस्थेत धोरणांविषयीचे निर्णय बिगर-हुकुमशाही स्वरुपाचे असावे लागतात.

लोकशाही पद्धतीत सामुदायिक निर्णय बहुमताच्या आधारे घेतले जातात. तथापि, असा बहुमताधिष्ठित राज्यकारभार अनेक दृष्टींनी अपुरा ठरतो. अल्पमताचा आवाज दाबून टाकला जातो, एवढेच नव्हे तर अन्य प्रकारेदेखील त्या व्यवस्थेत उणीवा राहतात. समजा, पहिल्या (बहुमत) गटाला 'ब' धोरणात्मक निर्णयापेक्षा 'अ' हा धोरणात्मक निर्णय पसंत आहे. दुसऱ्या गटाला 'क' पेक्षा 'ब' पसंत आहे आणि तिसऱ्या गटाला 'अ' पेक्षा 'क' पसंत आहे. अशा परिस्थितीत त्या तीन गटांच्या समुदायाच्या दृष्टीने प्रस्तुत धोरणाच्या संदर्भातील चित्र स्पष्ट होत नाही. याचे कारण संक्रामकतेचा अभाव हे होय. जागतिक कीर्तीचे अर्थवेत्ते ॲरो यानी मांडलेल्या तत्त्वात ('ॲरो अशक्यता प्रमेय : वैयक्तिक पसंतीचे लोकशाही पद्धतीने सामुदायिक निवडीत रूपान्तर

करता येत नाही) बहुमत अमलाच्या उपरोक्त संदर्भातील संक्रामकतेचा अभाव सूचित आहे. सदसद्विवेकबुद्धी प्रमाण मानून सामाजिक निवडीचा प्रश्न नीतीतत्त्वाशी, तत्त्वज्ञानाशी निगडित करणारे सेन तथाकथित चिरस्थायी महत्त्वाच्या 'ॲरो अशक्यता सिद्धान्ता'चे सहज खंडन करून पुढील मार्गदर्शन करतात. उपरोक्त 'संक्रामकतेचा अभाव' ही अडचण दूर करणाऱ्या सर्वसाधारण अटी (परिस्थिती) सेन यानी स्पष्ट केल्या आहेत. ॲरो यांच्या तथाकथित अशक्यता प्रमेयामुळे अर्थशास्त्राच्या आदर्शवादी शाखेत निर्माण झालेला निराशावाद सेन यानी निपटून टाकला आणि त्यामुळे सामाजिक निवड तत्त्वविश्लेषणाचे क्षेत्र अधिक संपन्न झालेले आहे.

22 **समष्टीय बुद्धिनिष्ठता** (Macro-rationality)

'सामाजिक निवड' याविषयीच्या रूढ विश्लेषणात व्यक्ती उपलब्ध पर्यायांची क्रमवारी लावू शकते हे आधारविधान (पूर्वपद) असून आंतरव्यक्ती तुलनेचा प्रश्न टाळण्यात आला आहे आणि समाजातील विषमतेच्या ध्वन्यर्थाकडे दुर्लक्ष केलेले आहे. तसे करणे सेन याना मान्य नाही. निरनिराळ्या पर्यायांच्या संदर्भात निरनिराळ्या व्यक्तींच्या बाबतीतील उपयोगिता वेगवेगळी राहणे शक्य आहे. म्हणून उपयोगितेच्या आंतरव्यक्ती तुलनेविषयीची गृहिते स्पष्टपणे मांडणे सामुदायिक निर्णयनिश्चितीच्या शास्त्रात आवश्यक ठरते. या संदर्भात नीतीतत्त्वज्ञानाच्या आधारे सेन यानी मर्मस्पर्शी मार्गदर्शन केले आहे. बुद्धिनिष्ठता (तर्कसंगतता) हे एक मूल्य आहे. व्यष्टीय बुद्धिनिष्ठतेपेक्षा समष्टीय बुद्धिनिष्ठा व्यापक दृष्टीने अधिक महत्त्वाची ठरते, हे लक्षात घ्यावयास हवे. वैयक्तिक पसंती आणि निवड व्यष्टीय बुद्धिनिष्ठतेवर आधारित असू शकतात, पण ती पसंती आणि निवड सामाजिक कल्याणाशी सुसंगत ठरण्यासाठी वैयक्तिक पसंतीला नैतिक अधिष्ठान असावे लागते; नीतीतत्त्वाच्या दृष्टीने ती समर्थनीय असावयास हवी. अशा रीतीने सेन यानी बुद्धिनिष्ठतेच्या गृहिताची व्याप्ती वाढविली असून त्यात नीतीतत्त्वाचाही विचार समाविष्ट केला आहे. 'सामाजिक निवड' या अभ्यासक्षेत्रातील सध्याचे संशोधन सेन यानी केलेल्या विश्लेषणाचा आधार घेते. वैयक्तिक उपयोगितेविषयीचे ज्ञान (माहिती), उपयोगितांची आंतरव्यक्ती तुलना आणि बुद्धिनिष्ठतेबाबतच्या गृहितांची स्पष्ट मांडणी यांचा अवलंब त्यात दिसतो.

## संदर्भ टीपा


1 Sen, Amartya (1957), 'On the Choice of Capital-Intensity in Development Planning', *Quarterly Journal of Economics*, November.

2 Sen, Amartya (1960), *Choice of Techniques: An Aspect of the Theory of Plannd Economic Development*, Oxford, Basil Blackwell.

3 Sen, Amartya (1968), *Choice of Techniques: An Aspect of the Theory of Planned Economic Development, Third Edition*, Oxford, Basil Blackwell.

4 Sen, Amartya (1975), *Employment, Technology and Development* (A Study prepared for the ILO office within the framework of the World Employment Programme), Oxford University Press, Bombay.

5 Sen, Amartya (Ed.) (1970), *Growth Economics* (Selected Readings), Penguin. Harmondsworth, Middlesex, England.

6 *Ibid*, p. 22.

7 *Ibid*, pp. 230-31

8 *Ibid*, p. 33.

9 Sen, Amartya (1984), *Resources, Values and Development*, Cambridge MA, Harvard University Press.

10 Sen, Amartya (1981), *Poverty and Famines: An Essay on Entitlement and Deprivation*, Oxford University Press, Oxford.

11 Dreze, J. P. and Sen, A.K. (1989 a), *Hunger and Public Action*, Oxford University Press, Oxford.

12 Sen, Amartya (ED),

Vol.I : Entitlement and Well-being (1990)

II : Famine Prevention (1990)

III : Endemic Hunger (1991)

Clarendon Press, Oxford.

13 Sen, Amartya (1990), *Entitlement and Well-being,* Introduction, p. 9.

14 Dreze, J.P. and Sen, A.K. (1989 a), *op. cit.* Oxford University Press, Oxford.

15 *Ibid.*

16 *Ibid,* Ch. 10.

17 Ahmad, S.E., Dreze, J.P., Hills, J. and Sen, A.K. (Ed.), *Social Security in Developing Countries,* Oxford University Press, Oxford.

Dreze, J. P. and Sen, A. K. (1989 b), *Public Action for Social Security,* Discussion Paper No. 20, Development Econoomics Research Programme, London School of Economics, London.

18 Dreze, Jean and Sen, Amartya (1995), *India: Economic Development and Social Opportunities,* Oxford University Press, Delhi.

19 Sen, Amartya (Ed.) (1997), *Indian Development - Selected Regional Perspectives,* UNU/WIDER- Studies in Development Economics, A Study prepared for the World Institute for Development Economics Research of the United Nations -University, Oxford University Press, Delhi, Preface, pp. vii - viii.

20 *Ibid,* p. X.

21 Sen, A.K. (1973), *On Economic Inequality,* The Radcliffe Lectures, University of Warwick, Oxford, Clarendon Press.

22 Sen, Amartya and Williams, Bernard (Ed.) (1982), *Utilitarianism and Beyond,* Cambridge University Press, Cambridge.

23 Sen.A.K. (1987), *On Ethics and Economics,* Royal Lectures Series, Basil Blackwell, Oxford.

24 *Ibid* p. 89.

25 Sen, A.K. (1973), *op. cit.*

26 *Ibid,* p. 92.

27 Sen, Amartya (1992), *Inequality Reexamined,* Clarendon Press, Oxford.

28 *Ibid,* p. 38.

29 Sen, Amartya (1985), *Commodities and Capabilities,* North Holland, New York.

30 The International Bank for Reconstruction and Development (May 1998), *The World Bank Economic Review,* Vol. 12, Number 2 , The World Bank, Washington, p. 342.

31 Hawthorn, Geoffrey (Ed.) (1987), *The Standard of Living* ( by Sen, A. K. with Muellbouer , Kanbur Ravi, Hartkeith, Williams Bernard), Cambridge University Press, Cambridge.

32 Sen, A.K. (1970), *Collective Choice and Social Welfare,* Oliver and Boyd. Edinburagh.

33 Sen, Amartya (1982), *Choice, Welfare and Measurement,* MIT Press, Cambridge MA.

## संदर्भ सूची

1 Sen, Amartya (1998), 'Individual Freedom- Basis for a Social Commitment,' *The Times of India,* Mumbai, October.

2 Sengupta, Arjun (1998), 'Health of Nations: Amartya Sen's Vision of Development,' *The Times Of India,* Mumbai, 17 October.

3 Banerji, Abhijit (1998), 'Amartya Sen,

Development Economist', *The Economic Times*, Mumbai, 17 October.

4 Bharat Ram, Vinay (1998), 'Ethics and Economics: Partnership in Prosperity & Poverty,' *The Times of India*, Mumbai, 19 October.

5 Goswami, Omkar (1998), 'Assiduously Appropriating Amartya,' *The Economic Times, Mumbai*, 23 October.

6 Joshi, Sharad (1998), 'Prof. Sen - The High Priest of Welfare Economics,' *The Times of India*, Pune, 4 November. या लेखावर आधारित.


# मराठी अर्थशास्त्र परिषद

***(अ) परिषदेची प्रकाशने***

(१) नी.वि.सोवनी — *अर्थ भ्रान्त : आणखी चिकित्सक निबंध*, 1997 पृष्ठे 226, किंमत रु. 20

(2) मो. वि. भाटवडेकर — *शिक्षणाचे अर्थशास्त्र*, 1978 पृष्ठे 157 (वितरण: व्हीनस प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे), किंमत रु. 20.

(3) भ. ग. बापट — *आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण*, पृष्ठे 333 दुसरी आवृत्ती, 199[illegible], किंमत रु. 160/- (वितरण : कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद).

(4) नी. वि. सोवनी — *अर्थमीमांसा*, 1995, पृष्ठे 345 (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे. क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029), किंमत रु. 250.

***(आ) परिषदेला देणगी रूपाने मिळालेली आणि परिषदेकडून विक्रीस उपलब्ध प्रकाशने***

(1) नी. वि. सोवनी — *साम्य विचारसरणी :* चार व्याख्याने, पृष्ठे ६४ (प्रकाशक नी. वि. सोवनी), किंमत रु. 10.

(2) नी. वि. सोवनी — *अर्थसिद्धान्त:* काही चिकित्सक निबंध, 1972, (प्रकाशक: देशमुख आणि कंपनी , पुणे).

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**आंतरराष्ट्रीय व्यापार – सिद्धान्त व धोरण (लेखक : भ. ग. बापट)**

एम. ए. अर्थशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयासाठी उपयुक्त आणि दर्जेदार म्हणून प्रशंसा लाभलेल्या वरील ग्रंथाच्या पुनर्मुद्रणाचे काम पूर्ण झाले असून वाचकांना तो आता उपलब्ध झाला आहे.

किंमत रु. 160 /– आणि सूट 10 टक्के

सूट वजा जाता रक्कम म. ऑ. ने/डिमांड ड्राफ्टने (ड्राफ्ट 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने आणि पुणे येथील बँक शाखेवर देय) कार्यवाहांकडे पाठवावी. ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**आ. गो. पुजारी**

**कार्यवाह – खजिनदार**

# भारतातील बेकारी: आंतरराज्य तुलना *

ज.फा. पाटील / पा.ना. गादडे * *

* मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केल्या जाणाऱ्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी '. कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक' देण्यात येते. अमरावती येथे संपन्न झालेल्या बाविसाव्या अधिवेशनातील पारितोषिक प्राप्त निबंध.

** अनुक्रमे विभाग प्रमुख, आणि अधिव्याख्याता, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रास्ताविक

1991 च्या जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या 84.6 कोटी होती. त्यापैकी साप्ताहिक निकषांवर 1992-93 च्या सुरुवातीला 30.17 कोटी लोक रोजगारात होते. 1 एप्रिल, 1992 रोजी, म्हणजेच आठव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी, 1.7 कोटी ही थकित बेकारी होती. आत्यंतिक स्वरुपात अपूर्ण रोजगार असणाऱ्यांची संख्या 60 लाख होती. 1987-88 मध्ये सर्वसाधारण बेकारी दर 3.77 टक्के तर 1993-94 मध्ये 2.56 टक्के असा होता. संबंधित वर्षाला पुरुषांमध्ये बेकारीचे प्रमाण 3.60 टक्के व 2.60 टक्के असे तर स्त्रियांमध्ये 4.19 टक्के व 2.44 टक्के अशी परिस्थिती होती. 1993-94 मध्ये सुशिक्षितांच्या बेकारीचे प्रमाण 11.8 टक्के होते. पुरुषांच्यामध्ये हे प्रमाण 9.8 टक्के व स्त्रियांच्यामध्ये 26.7 टक्के असे होते. 1995 च्या शेवटी रोजगार विनिमय केन्द्रात 3.67 कोटी लोकांची नोंदणी होती.

1992-93 ला एकूण श्रमशक्ती 31.9 कोटी होती. आठव्या योजनेच्या अखेरीस त्यात 3.5 कोटी व 2002 साली 3.6 कोटी अशी भर पडणार आहे. गेल्या 10-15 वर्षात लोकसंख्येची वार्षिक 2.3 टक्के या वेगाने वाढ झाली. थकित बेकारी व श्रमशक्तीत होणारी वाढ या गोष्टी लक्षात घेता 1992 ते 2002 या 10 वर्षात 9.4 कोटी लोकांना रोजगार संधी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. वरील सर्व आकडेवारीवरून बेकारीच्या प्रश्नाचे गांभीर्य स्पष्ट होते. सर्वसाधारपणे रोजगार आणि बेकारीसंबंधी सातत्याने माहिती गोळा करण्याचे काम राष्ट्रीय नमुन सर्वेक्षण संस्थेमार्फत (NSSO) केले जाते.

1993-94 ला या संस्थेमार्फत पन्नासाव्या फेरीची

आकडेवारी उपलब्ध करण्यात आलेली आहे. या आकडेवारीच्या आधारे भारतातील बेकारीची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न या निबंधात केलेला आहे. खालील विवेचनासाठी काही महत्त्वाच्या संकल्पना प्रथमच स्पष्ट करणे आवश्यक आहे. बेकारीच्या मापनामध्ये पुढील संकल्पना महत्त्वाच्या ठरतात.

**(1) सर्वसाधारण प्रमुख बेकार स्थिती (Usual Principal Status Unemployment)** : या प्रकारात वर्षातील निम्म्यापेक्षा अधिक दिवस बेकार असल्यास त्याला 'सर्वसाधारण प्रमुख बेकारी स्थिती' असेनाव दिले जाते. वेगळ्या शब्दांत, या वर्गातील बेकार म्हणजेच पूर्णार्थाने किंवा वर्षातील 183 पेक्षा कमी दिवस अधुनमधून किरकोळ रोजगार मिळणारे लोक यांचा समावेश होतो.

**(2) साप्ताहिक बेकारी स्थिती (Weekly Status Uneployment)** : जेव्हा संदर्भ सप्ताहात कामासाठी उपलब्ध असूनदेखील एकही तास रोजगार संबंधित व्यक्तीला मिळत नाही तेव्हा त्या बेकारीस 'साप्ताहिक बेकार स्थिती' असे नाव दिले जाते.

**(3) दैनिक स्थिती बेकारी (Daily Status Unemployment)** : एका आठवड्यात किती व्यक्तींना किती दिवस बेकार राहावे लागले त्या बेकार दिवसांची एकूण संख्या म्हणजे 'दैनिक बेकारी स्थिती.' यात अधिक विस्ताराने विचार करावयाचा झाल्यास संबंधित आठवड्यात संबंधित व्यक्तीला दर दिवशी किती तास काम मिळाले हे लक्षात घेऊन कामाचा दिवस आठ तासाचा मानून एकूण कामाच्या तासाला भागल्यानंतर देखील दैनिक स्थिती बेकारी लक्षात घेता येते.

उघड बेकारीचे मापन करण्यासाठी सामान्यत: सर्वसाधारण प्रमुख बेकार स्थिती या संकल्पनेचा वापर केला जातो. तथापि अलीकडच्या कालात, म्हणजेच 1993-94 च्या पन्नासाव्या फेरीमध्ये , राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने प्रथेप्रमाणे बेकारीचे दर चार पद्धतीने दिलेले आहेत. ते म्हणजे : (अ) सर्वसाधारण प्रमुख बेकार स्थिती (U.P.S.), (आ) सर्वसाधारण प्रमुख आणि पूरक बेकार स्थिती (U.P.S.S.), (इ) साप्ताहिक बेकार स्थिती (W.S) आणि (ई) दैनिक बेकार स्थिती (D.S.). यातील दुसरी संकल्पना थोडी अधिक स्पष्ट करणे गरजेचे आहे.

संबंधित वर्षात ज्याना पूर्ण रोजगार मिळालेला आहे (273 दिवस किंवा अधिक) ते आणि ज्याना 183 दिवसांपेक्षा कमी दिवस काम मिळालेले आहे त्याना सोडून जी बेकारी राहते तिला सर्वसाधारण प्रमुख आणि पूरक बेकारी स्थिती असे मानले जाते.

1997 साली प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या पन्नासाव्या फेरीतील आकडेवारी लक्षात घेतल्यास सर्व देशातील 1993-94 ची बेकारीची परिस्थिती तक्ता 1 प्रमाणे सांगता येईल. याठिकाणी साप्ताहिक स्थिती बेकारीची आकडेवारी वापरलेली नाही.

तक्ता 1

**राष्ट्रीय बेकारी दर**

| बेकारी स्थिती | 1983 | 1988 | 1994 |
|---|---|---|---|
| 1 सर्वसाधारण प्रमुख स्थिती (UPS) | 2.74 | 3.81 | 2.58 |
| 2 सर्वसाधारण प्रमुख व पूरक स्थिती (UPSS) | 2.01 | 2.76 | 1.85 |
| 3 दैनिक स्थिती (DS) | 8.25 | 6.09 | 5.95 |

**स्रोत:** अशोक माथूर, *'एम्प्लॉयमेन्ट, एक्विटी, ॲन्ड ग्रोथ,' दि इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स*, खंड 41, अंक 1, पृष्ठे 15 ते 46.

## नवीन दृष्टिकोण

बेकारीच्या आकडेवारीचा आंतरराज्य समता, विकास आणि दारिद्र्य यांच्या संदर्भात वापर करण्याचा एक नवा दृष्टिकोण अशोक माथूर यानी

1998 मध्ये इंडियन सोसायटी ऑफ लेबर इकॉनॉमिक्सच्या एकोणचाळीसाव्या वार्षिक अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात थिरुअनंतपुरम येथे मांडलेला आहे. त्यातील दृष्टिकोनाचा आधार घेऊन आकडेवारीचे विवेचन करण्याचा प्रयत्न या निबंधात केलेला आहे. सर्वसाधारण प्रमुख व पूरक स्थिती रोजगार प्रमाण लक्षात घेतल्यास पूर्णतः बेकार असणाऱ्यांचे प्रमाण लक्षात येते. तसेच दैनिक स्थिती बेकारीच्या संकल्पनेत अर्धवेळ बेकार असणाऱ्यांचाही समावेश होतो हे लक्षात घ्यावे लागेल. म्हणजेच दैनिक स्थिती बेकारीतून सर्वसाधारण प्रमुख व पूरक स्थिती बेकारी वजा केल्यास एका अर्थाने अपूर्ण रोजगाराचे प्रमाण स्पष्ट होते. याला 'अर्ध खुली बेकारी' (Semi-Open Unemployment) असे नाव माथूर यानी दिले आहे. याचबरोबर उत्पन्न निकषांचा विचार करून, म्हणजेच ज्याना किरकोळ स्वरुपाचे काम मिळालेले आहे परंतु त्यापासून मिळालेल्या उत्पन्नातून दारिद्र्य रेषेच्या निकषाप्रमाणे पोषणासाठी आवश्यक ते उत्पन्न मिळत नाही, अशा लोकांचे वर्णन माथूर यानी न-रोजगार (non-employed) या शब्दांत केलेले आहे. अशा प्रकारचा शब्दप्रयोग पूर्वी जोन रॉबिन्सन आणि गौतम माथूर यानी केलेला होता. याचा आधार घेऊन अशा न-बेकारांची संख्या मोजावयाची झाल्यास दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या शेकडा प्रमाणातून दैनिक स्थिती बेकारीचे शेकडा प्रमाण वजा केल्यास ''न - रोजगारांचे' प्रमाण मिळते. थोडक्यात, वरील स्पष्टीकरण समीकरणाच्या भाषेत खालीलप्रमाणे मांडता येते:

(दैनिक स्थिती बेकारी टक्केवारी)-(सर्वसाधारण प्रमख व पूरक स्थिती बेकारी टक्केवारी) = (अर्ध खुली बेकारी टक्केवारी)

(न-रोजगार) = (दरिद्रय टक्केवारी )- (दैनिक स्थिती बेकारी टक्केवारी)

तक्ता 2

**आंतरराज्य तुलना**

| | राज्य | खुली बेकारी | क्रम | दैनिक स्थिती बेकारी | अर्ध खुली बेकारी | क्रम | दारिद्र्य प्रमाण | न-रोजगार | क्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंध्र प्रदेश | 1.00 | 14 | 6.73 | 5.73 | 4 | 22.19 | 15.46 | 14 |
| 2 | बिहार | 2.02 | 6 | 6.13 | 4.11 | 8 | 54.96 | 48.83 | 1 |
| 3 | गुजराथ | 1.54 | 10 | 5.84 | 4.30 | 7 | 24.21 | 18.37 | 13 |
| 4 | हरियाणा | 1.61 | 9 | 6.55 | 4.90 | 6 | 25.05 | 18.50 | 12 |
| 5 | हिमाचल प्रदेश | 0.49 | 16 | 1.70 | 1.21 | 13 | 28.44 | 26.74 | 7 |
| 6 | जम्मू आणि काश्मिर | 2.91 | 3 | 3.32 | 0.41 | 16 | 25.17 | 21.85 | 11 |
| 7 | कर्नाटक | 1.44 | 11 | 4.55 | 3.11 | 9 | 33.16 | 28.61 | 6 |
| 8 | केरळ | 7.84 | 1 | 15.74 | 7.90 | 2 | 25.43 | 9.69 | 15 |
| 9 | मध्य प्रदेश | 1.39 | 12 | 3.40 | 2.01 | 12 | 42.52 | 39.12 | 3 |
| 10 | महाराष्ट्र | 1.99 | 7 | 4.96 | 2.97 | 10 | 36.86 | 31.90 | 5 |
| 11 | ओरिसा | 2.14 | 5 | 7.41 | 5.27 | 5 | 48.56 | 41.15 | 2 |
| 12 | पंजाब | 1.86 | 8 | 3.07 | 1.21 | 14 | 11.77 | 8.70 | 16 |
| 13 | राजस्थान | 0.58 | 15 | 1.15 | 0.57 | 15 | 27.41 | 26.26 | 8 |
| 14 | तामीळ नाडू | 2.35 | 4 | 11.56 | 9.21 | 1 | 35.03 | 23.47 | 10 |
| 15 | उत्तर प्रदेश | 1.15 | 13 | 3.59 | 2.44 | 11 | 40.85 | 37.26 | 4 |
| 16 | पश्चिम बंगाल | 3.36 | 2 | 10.21 | 6.85 | 3 | 35.66 | 25.45 | 9 |
| | **अखिल भारत** | **1.85** | - | **5.95** | **4.10** | - | **35.97** | **30.02** | - |

स्रोतः तक्ता 1 प्रमाणे.

वरील विश्लेषण लक्षात घेता राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या 1997 च्या पन्नासाव्या फेरीच्या आकडेवारीप्रमाणे 1994 साली खुली बेकारी 1.85 टक्के, अर्ध खुली बेकारी 4.10 टक्के व रोजगार 30.02 टक्के असे चित्र मिळते. यावर्षी दारिद्र्याचे प्रमाण 35.97 टक्के होते. भारतातील आंतरराज्य विविध प्रकारच्या बेकारीची तुलना तक्ता 2 च्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

तक्ता 2 वरून काही निष्कर्ष मांडता येतात ते पुढीलप्रमाणे:

(1) केरळमध्ये खुल्या आणि अर्धखुल्या बेकारीचे कमाल प्रमाण आहे. तथापि त्याचवेळी हे लक्षात घ्यावे लागते की, केरळातील न-रोजगारीचे प्रमाण फारच कमी, म्हणजे पंधराव्या क्रमांकाचे आहे. याचे कारण म्हणून त्या राज्याने सामाजिक विकासासाठी केलेले प्रयत्न लक्षात घ्यावे लागतील.

(2) माथूर यांनी वरील संकल्पनांमधील सहसंबंध गुणांक मोजण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत :

न-रोजगार आणि खुली बेकारी यांच्यातील सहसंबंध गुणांक= - 0.34.

न-रोजगार आणि अर्ध-खुली बेकारी यांच्यातील सहसंबंध गुणांक = - 0.30.

खुली बेकारी आणि अर्ध - खुली बेकारी यांच्यातील सहसंबंध गुणांक = + 0.62

यावरून हे स्पष्ट होते की, पहिले दोन सहसंबंध फारसे अर्थपूर्ण नाहीत, कारण न-रोजगार आणि दारिद्र्य प्रमाण या दोन गोष्टी बहुतेक सर्व राज्यांत एकाच दिशेच्या असतात. याउलट, खुली बेकारी आणि अर्ध - खुली बेकारी यांच्यातील सहसंबंध गुणांक स्पष्ट, अधिक प्रभावी आणि 0.01 या लक्षण पातळीला अर्थपूर्ण ठरतो. वेगळ्या शब्दांत, खुली बेकारी आणि अर्धखुली बेकारी एकाच दिशेने बदलतात.

(3) असेही दिसून येते की, न-रोजगार आणि दारिद्र्य या दोन गोष्टी खुल्या बेकारीपेक्षा अधिक प्रमाणात सर्व राज्यांत एकत्रित नांदतात.

तक्ता 3

**प्रादेशिक बेकारी आणि संबंधित चलांतील सहसंबंध गुणांक**

| | संरचनात्मक दर्शक | खुली बेकारी | दैनिक स्थिती बेकारी | दारिद्र्य प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | द्वितीय क्षेत्रातील बेकारीचे प्रमाण | +0.54 | +0.50 | -0.43 |
| 2 | तृतीय क्षेत्र रोजगाराचे प्रमाण | +0.62 | +0.44 | -0.49 |
| 3 | एकूण रोजगार वृद्धी | -0.10 | -0.43 | -0.01 |
| 4 | द्वितीय क्षेत्रातील रोजगार वृद्धी | -0.20 | -0.18 | -0.52 |
| 5 | तृतीय क्षेत्रातील रोजगार वृद्धी | -0.33 | -0.34 | -0.50 |
| 6 | उत्पन्न वृद्धी | -0.05 | -0.02 | -0.44 |
| 7 | लोकसंख्येची घनता | +0.75 | +0.49 | +0.05 |
| 8 | लोकसंख्येची वाढ | -0.57 | -0.58 | 0.11 |
| 9 | दरडोई उत्पन्न | -0.04 | -0.07 | -0.62 |
| 10 | संरचनात्मक बदल | +0.30 | -0.01 | -0.77 |

## प्रादेशिक बेकारी आणि संबंधित चलांतील सहसंबंध गुणांक

वेगवेगळ्या राज्यांत बेकारीचे प्रमाण कमीअधिक असण्याची कारणमीमांसा करण्याच्या संदर्भात त्या त्या राज्यातील संरचनात्मक दर्शक आणि बेकारी तसेच दारिद्र्यप्रमाण यांच्यातील सहसंबंध गुणांक लक्षात घेण्याचा प्रयत्न माथूर यानी केलेला आहे. या संबंधातील आकडेवारी तक्ता 3 मध्ये दिलेली आहे.

तक्ता 3 च्या आकडेवारीवरून माथूर यानी जे निष्कर्ष काढले ते थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येतील:

(1) अर्धखुली बेकारी आणि दैनिक स्थिती बेकारी हातात हात घालून चालतात.

(2) न-रोजगार आणि दारिद्र्य प्रमाण यांची संगत अधिक घनिष्ट आहे.

(3) ज्या राज्यात बिगरशेती रोजगाराचे प्रमाण जास्त आहे त्या राज्यात अर्धखुल्या बेकारीचे प्रमाण जास्त असते.

(4) साधारणपणे बिगरशेती क्षेत्राच्या विकासाबरोबर खुल्या बेकारीचे प्रमाण वाढत जाते पण त्याचबरोबर दारिद्र्याचे प्रमाण कमी होत जाते.

(5) बिगरशेती क्षेत्रातील रोजगाराच्या प्रमाणात होणारा बदल म्हणजे संरचनात्मक बदल. 1983-94 या कालात संरचनात्मक बदल आणि खुली बेकारी यांच्यातील सहसंबंध गुणांक अत्यंत दुर्बल आहे.

(6) खुल्या बेकारीशी जास्त घनिष्ट प्रमाणात संबंध असणारा घटक म्हणजे लोकसंख्येची घनता. हा सहसंबंध + 0.75 इतका प्रभावी आहे. म्हणजेच लोकसंख्येची घनता अधिक होत गेल्यास खुली बेकारी वाढत जाते.

(7) एकूण उत्पन्नाची वाढ आणि दरडोई उत्पन्नाची वाढ यांच्यामुळे दारिद्र्य प्रमाण आणि न-रोजगार कमी होत असले तरी खुली आणि अर्धखुली बेकारी यांच्यावर मात्र याच बदलांचा फारसा प्रभाव होत असावा असे वाटत नाही.

### रोजगार लवचिकता

माथूर यांच्या मते रोजगार लवचिकता ही संकल्पना आर्थिक विकासामुळे रोजगार निर्मितीवर काय परिणाम होतो हे स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त ठरते. याचे मोजमाप करण्यासाठी त्यानी पुढील संकल्पनांचा वापर केलेला आहे:

(1) समग्रक्षेत्रीय रोजगार लवचिकता = $E_s^e$ (ov)

(2) क्षेत्रीय उत्पन्न लचविकता = $E_s^y$

(3) क्षेत्रीय स्व- रोजगार लवचिकता = $E_s^e$ (on)

वरील समीकरणांत लहान s क्षेत्र या अर्थाने आहे. लहान e व लहान y लवचिकता दाखवितात. कॅपिटल E हा रोजगार या अर्थाने आहे. तसेच खालील समीकरणातील मोठा Y उत्पन्न दाखवितो आणि agg एकूण दाखवितात. ov म्हणजे समग्र व on म्हणजे स्वत:ची असा अर्थ घ्यावा.

याबाबतीतील समीकरणे पुढीलप्रमाणे लिहिता येतील:

$$\overset{e}{\underset{s}{E}}(ov) = \left(E_s^y\right) x \left({}_s^e E(on)\right)$$

कारण

$$\left[\frac{\Delta\ Es/Es}{\Delta Yagg/yagg}\right] x \left[\frac{\Delta\ Ys/Ys}{\Delta Yagg/yagg}\right] x \left[\frac{\Delta\ Es/Es}{\Delta\ Ys/ys}\right]$$

1983 ते 1994 या कालात राष्ट्रीय पातळीवरील एकूण रोजगार लवचिकता 0.31 इतकी होती. परंतु वेगवेगळ्या क्षेत्रातील रोजगार लचचिकतेमध्ये लक्षणीय फरक दिसतो. तो तक्ता 4 मध्ये दाखविलेला आहे.

**तक्ता 4**
**रोजगार व उत्पन्न उवचिकता**

| लवचिकता | क्षेत्र | | |
|---|---|---|---|
| | प्राथमिक | द्वितीय | तृतीय |
| 1 समग्र रोजगार लवचिकता $\left(\overset{e}{\underset{s}{E}}(ov)\right)$ | 0.21 | 0.42 | 0.63 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 क्षेत्राची स्व-रोजगार लचचिकता $\left( E^{e}_{s}(on) \right)$ | 0.45 | 0.26 | 0.52 |
| 3 क्षेत्रीय उत्पन्न लवचिकता $\left( E^{y}_{s} \right)$ | 0.46 | 2.37 | 3.83 |

तक्ता 4 लक्षात घता, समग्र रोजगार लचचिकता प्राथमिक क्षेत्राच्या बाबतीत किमान दिसते. तर ती द्वितीय व तृतीय क्षेत्राच्या बाबतीत वाढत गेलेली दिसते. संबधित क्षेत्राची स्व-रोजगार लवचिकता द्वितीय क्षेत्रात किमान दिसते तर तृतीय क्षेत्रात कमाल दिसते. तसेच क्षेत्रीय उत्पन्न लचचिकता शेतीच्या बाबतीत अत्यल्प, म्हणजे 1 पेक्षा कमी, आहे तर द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात या लचविकता लक्षणीय प्रमाणात मोठ्या आहेत. रोजगार लवचिकतेची एकूण समग्र, स्व-रोजगार आणि उत्पन्न लवचिकता राज्यवार तक्ता 5 प्रमाणे दिसून येते.

**तक्ता 5**

**रोजगार व उत्पन्न लवचिकता**

| | राज्य | एकूण रोजगार लवचिकता | क्षेत्राची समग्र रोजगार लवचिकता | | | क्षेत्राची स्व-रोजगार लवचिकता | | | क्षेत्राची उत्पन्न लवचिकता | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राथमिक | द्वितीय | तृतीय | प्राथमिक | द्वितीय | तृतीय | प्राथमिक | द्वितीय | तृतीय |
| 1 | आंध्र प्रदेश | 0.68 | 0.58 | 0.72 | 1.02 | 1.12 | 0.69 | 0.64 | 0.52 | 1.43 | 5.88 |
| 2 | बिहार | 0.44 | 0.41 | -0.18 | 0.95 | 1.39 | -0.13 | 0.49 | 0.30 | 4.57 | 2.78 |
| 3 | गुजराथ | 0.38 | 0.12 | 1.07 | 0.86 | 0.81 | 0.67 | 0.59 | 0.15 | 2.06 | 6.73 |
| 4 | हरियाणा | 0.41 | 0.24 | 0.71 | 0.74 | 0.32 | 0.53 | 0.61 | 0.75 | 2.17 | 3.18 |
| 5 | हिमाचल प्रदेश | 0.49 | 0.34 | 1.47 | 1.14 | 0.74 | 0.85 | 0.85 | 0.45 | 2.68 | 3.80 |
| 6 | कर्नाटक | 0.38 | 0.29 | 0.39 | 0.78 | 0.50 | 0.33 | 0.55 | 0.58 | 1.72 | 4.67 |
| 7 | केरळ | 0.20 | -0.07 | 0.41 | 0.67 | -0.10 | 0.36 | 0.56 | 0.70 | 1.36 | 7.32 |
| 8 | मध्य प्रदेश | 0.26 | 0.23 | 0.18 | 0.62 | 0.44 | 0.17 | 0.49 | 0.52 | 1.39 | 5.46 |
| 9 | महाराष्ट्र | 0.47 | 0.25 | 0.52 | 1.20 | 0.39 | 0.35 | 0.86 | 0.64 | 2.03 | 5.39 |
| 10 | ओरिसा | 0.56 | 0.57 | 0.39 | 0.67 | 1.83 | 0.25 | 0.34 | 0.31 | 3.20 | 3.76 |
| 11 | पंजाब | 0.10 | -0.14 | 0.34 | 0.79 | -0.16 | 0.21 | 1.05 | 0.90 | 2.62 | 2.02 |
| 12 | राजस्थान | 0.34 | 0.19 | 0.72 | 1.03 | 0.31 | 0.52 | 0.67 | 0.60 | 1.85 | 6.01 |
| 13 | तामीळ नाडू | 0.26 | 0.12 | 0.51 | 0.44 | 0.14 | 0.73 | 0.33 | 0.85 | 0.97 | 4.72 |
| 14 | उत्तर प्रदेश | 0.37 | 0.28 | 0.44 | 0.71 | 0.48 | 0.32 | 0.49 | 0.58 | 2.23 | 3.73 |
| 15 | प. बंगाल | 0.49 | 0.17 | 1.03 | 0.79 | 0.17 | 1.41 | 0.67 | 1.00 | 1.13 | 3.38 |
| | **भारत** | **0.31** | | | | | | | | | |

*स्रोत : तक्ता 1 प्रमाणे.*

माथूर यांनी तक्ता 5 मधील आकडेवारीच्या आधाराने एकूण रोजगार लवचिकता आणि समग्र रोजगार लचचिकता, क्षेत्राची स्व-रोजगार लचचिकता व उत्पन्न लवचिकता यांच्यातील सहसंबंध गुणांक काढलेले आहेत. त्याची माहिती तक्ता 6 मध्ये दिलेली आहे.

**तक्ता 6**
**आंतरराज्य रोजगार लवचिकता सहसंबंध गुणांक**

| | | |
|---|---|---|
| 1 | एकूण लवचिकता व समग्र प्राथमिक क्षेत्र रोजगार लवचिकता | 0.88 |
| 2 | एकूण लवचिकता व समग्र द्वितीय क्षेत्र रोजगार लवचिकता | 0.32 |
| 3 | एकूण लवचिकता व समग्र तृतीय क्षेत्र रोजगार लवचिकता | 0.48 |
| 4 | एकूण लवचिकता व प्राथमिक क्षेत्र स्व-रोजगार लवचिकता | 0.72 |
| 5 | एकूण लवचिकता व द्वितीय क्षेत्र स्व-रोजगार लवचिकता | 0.30 |
| 6 | एकूण लवचिकता व तृतीय क्षेत्र स्व-रोजगार लवचिकता | -0.15 |
| 7 | प्राथमिक क्षेत्र उत्पन्न लवचिकता | -0.38 |
| 8 | द्वितीय क्षेत्र उत्पन्न लवचिकता | 0.17 |
| 9 | तृतीय क्षेत्र उत्पन्न लवचिकता | -0.01 |

*स्रोत : तक्ता 1 प्रमाणे.*

तक्ता 6 च्या आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, अर्थव्यवस्थेची एकूण रोजगार लवचिकता ही मुख्यत: प्राथमिक क्षेत्राच्या समग्र रोजगार लचचिकतेवर अधिक स्पष्टपणाने अवलंबून आहे तसेच ती प्राथमिक क्षेत्राच्या स्व-रोजगार लचचिकतेवर देखील अधिक स्पष्टपणे अवलंबून आहे. इतर सहसंबंध गुणांक फारसे अर्थपूर्ण दिसत नाहीत.

आणखी एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, रोजगार लचचिकता व दारिद्रय प्रमाण यांच्यातील सहसंबंध गुणांकदेखील काही गोष्टींवर प्रकाश टाकतात. यातील काही सहसंबंध गुणांक तक्ता 7 मध्ये दिले आहेत.

**तक्ता 7**
**रोजगार लवचिकता व दारिद्रयप्रमाण सहसंबंध गुणांक**

| | | |
|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय एकूण रोजगार लवचिकता आणि दारिद्रय प्रमाण | 0.31 |
| 2 | प्राथमिक क्षेत्राची समग्र रोजगार लवचिकता आणि दारिद्रय | 0.54 |
| 3 | प्राथमिक क्षेत्राची स्व-रोजगार लवचिकता आणि दारिद्रय प्रमाण | 0.57 |
| 4 | द्वितीय क्षेत्राची समग्र रोजगार लवचिकता आणि दारिद्रय प्रमाण | -0.47 |
| 5 | तृतीय क्षेत्राची स्व-रोजगार लवचिकता आणि दारिद्रय प्रमाण | -0.63 |

*स्रोत : तक्ता 1 प्रमाणे.*

यावरून असे म्हणता येईल की, दारिद्रय प्रमाण कमी करावयाचे असेल तर द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र यांच्यात अधिक रोजगार निर्माण होईल अशा पद्धतीने कार्यक्रमांची आखणी केली पाहिजे.

## संदर्भ सूची


1 Mathur, Ashok (1998), 'Employment, Eqity and Growth,' *The Indian Journal of Labour Economics,* Vol. 41 , No. 1, January-March, 1998, pp-15-46.

2 Srivastav, O.S., 'Employment and Unemployment Trend in India: Inter-state Scieario,' *Indian Economy in Inter-regional Perspective,* Vol.1, Pointer Publishers, Jaipur, pp. 161-231.

3 'Employment: Past Trends and Prospects,' *Quarterly Economic Report of the Indian Institute of Public Opinion,* Vol. 33, No. 3, July-September, 1990, pp.23 - 36.

4 'Policy Pronouncement, Labour Employment and Training : 1996-97-An Overview.' IAMR, *Manpower Journal,* Vol. 33, No. 4, January - March, 1998, pp. 99- 107.

ग्रंथ परीक्षण

# दारिद्र्याची मीमांसा

**खेर, सी.पं., *दारिद्र्याचा अर्थ*, दास्ताने, रामचंद्र आणि कं., पुणे, 1997, पृष्ठे 146, किंमत रु. 75.**

**वि.ज. गोडबोले** *

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर युरोपातील देशांच्या, विशेषत: इंग्लंडच्या, साम्राज्याचा अस्त झाला. साम्राज्य असताना झालेल्या आर्थिक शोषणामुळे आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देश गरीब झालेले होते. स्वतंत्र झाल्यानंतर या बहुतेक देशांनी आरंभी लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केलेला होता. साहजिकच बहुसंख्य लोकांच्या दारिद्र्याच्या समस्येला सर्वाधिक महत्त्व येणे क्रमप्राप्तच होते. दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमांचा बहुतेक देशांत स्वीकार करण्यात आला. या संदर्भात केवळ देशांच्याच नव्हे तर जागतिक पातळीवरही दारिद्र्याची चिकित्सा प्राधान्याने करण्यात आली. 'विकासाचे अर्थशास्त्र' या अर्थशास्त्राच्या नव्या शाखेत न्यूनविकसित देशांच्या समस्या व त्यावरील उपाययोजनांचा शोध घेतला गेला. जागतिक बँकेनेही आपल्या प्रत्येक वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या अहवालात दरडोई वार्षिक उत्पन्नाच्या निकषावर जगातील सर्व देशांची वर्गवारी केलेली आहे. त्यानुसार आजही 49 देश गरीब आणि न्यूनविकसित आहेत.

दारिद्र्याच्या प्रश्नाचा वेध घेणारी पुस्तके विविध भाषांत प्रसिद्ध झालेली आहेत. भारताच्या संदर्भातही दादाभाई नौरोजी यांच्यापासून ते वि.म.दांडेकर व नीळकंठ रथ, दांतवाला, मिन्हास, अमर्त्यकुमार सेन या आजच्या अर्थशास्त्रज्ञांपर्यंत अनेकानी भारतातील दारिद्र्याची चिकित्सा केलेली आहे. 'दारिद्र्याचा अर्थ' या पुस्तकात सी.पं.खेर यानी दारिद्र्याची मीमांसा करताना भारतातील दारिद्र्याच्या समस्येवर अधिक भर दिलेला आहे.

खेर यानी प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे भारतीय दारिद्र्याचे मूळ हे हिंदू धर्माच्या निवृत्तीपर तत्त्वज्ञानात आहे. दारिद्र्याचे संदर्भ अगदी पौराणिक काळापासून मिळतात. महाभारतातही दुधासाठी हट्ट धरणारा अश्वत्थामा, देवाजवळ दारिद्र्य देण्याचे वरदान

* *अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सी.टी. बोरा महाविद्यालय, शिरुर (जि. पुणे).*

मागणारी कुंती, वगैरे व्यक्ती प्रसिद्ध आहेत. दारिद्र्य हे आपले प्रारब्ध मानण्याची मनोवृत्ती तर पूर्वीपासून आजतागायत आढळून येते. जनतेच्या अल्पसंतोषी वृत्तीमुळेच 1890-91 च्या बंगाल प्रांतातील शासकीय अहवालात लोक इंग्रजांच्या राजवटीत समाधानी असल्याचे नमूद करण्यात आलेले हाते. ते मत रमेशचंद्र दत्त यानी 1901 मध्ये खोडून काढले.

दादाभाई नौरोजी यानी सर्वप्रथम हिंदुस्थानच्या दारिद्र्यास ब्रिटिशांची त्यांच्या लौकिकाला न शोभणारी राजवट (Un-British Rule in India) जबाबदार असल्याचे मत सन 1871 मध्ये मांडले. त्या राजवटीमुळे हिंदुस्थानच्या संपत्तीचे निस्सारण कसे झाले याविषयीचा त्यांचा सिद्धान्त सर्वपरिचित आहे.

त्यामुळेच हिंदुस्थानमधील स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीचा संबंध दारिद्र्यनिर्मूलन, सावकारी पाशातून मुक्तता, स्वदेशी यासारख्या कार्यक्रमांशी जोडण्यात आला. त्यामुळेच ही चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचू शकली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक नियोजनामध्ये आर्थिक विकासावर भारत सरकारने भर दिला. विकासाचा लाभ गरीब जनतेपर्यंत पोचेल अशी सरकारची अपेक्षा होती. तथापि त्याबाबत भ्रमनिरास झाल्यामुळे 'दारिद्र्य निर्मूलन', 'विभाजनविषयक न्याय' यासारख्या संकल्पना नियोजनात स्वीकारल्या गेल्या. यास्तव अर्थशास्त्रात दारिद्र्याच्या प्रश्नाची चिकित्सा महत्त्वपूर्ण ठरली.

प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात खेर यानी दारिद्र्य म्हणजे काय याचे विवेचन करताना मार्टिन रीन यांच्यापासून ते अमर्त्यकुमार सेन यांच्यापर्यंत वेगवेगळ्या तज्ज्ञांनी मांडलेल्या दारिद्र्यविषयक संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. जीवनोपयोगी वस्तू व सेवा पुरेशा प्रमाणात न मिळणे, मानवी विकासाचे विविध निकष देशातील बहुसंख्य जनतेच्या बाबतीत लागू न होणे, दरडोई सरासरी उत्पन्न कमी राहणे, जगण्यासाठी आवश्यक ते उष्मांक मिळू शकणाऱ्या अन्नासाठी खर्च करण्याची जनतेची क्षमता नसणे, असे वेगवेगळे दारिद्र्याचे निकष दाखविले गेलेले आहेत. 'दारिद्र्य रेषा,' 'दारिद्र्याचा निर्देशांक' यासारखी संख्यात्मक विश्लेषणाची साधनेही दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी मांडली गेलेली आहेत. त्यांच्याबाबतीत असलेल्या वादांचाही खेर यानी थोडक्यात परामर्श घेतलेला आहे. विषमता निर्मूलन , भूमीविषयक सुधारणा किंवा सार्वजनिक वाटप व्यवस्था या मार्गांऐवजी उद्योगीकरण आणि रोजगार वाढ हा मार्ग दारिद्र्य निर्मूलनासाठी अधिक प्रभावी ठरल्याचे खेर यानी दर्शविले आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात ग्रामीण आणि शहरी विभागातील दारिद्र्याच्या प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार करण्यात आला आहे. ग्रामीण विभागाचा विचार करताना भूमीहीन शेतमजूर, अत्यल्प भूधारक, हंगामी मजूर, छोटे व्यावसायिक वगैरेंच्या राहणीमानाचा आढावा घेऊन सन 1983 च्या आकडेवारीनुसार 51.55 टक्के कुटुंबे दारिद्र्यपीडित असल्याचे दर्शविले आहे.

शहरी विभागासाठी बेकार, हंगामी रोजगार, झोपडपट्ट्यांतून राहणाऱ्या व्यक्ती, वगैरे निकष खेर यानी विचारात घेतलेले आहेत. तथापि यासंदर्भात त्यानी मांडलेले निष्कर्ष योग्य वाटत नाहीत. उदाहरणार्थ, पान 46 वर 1987-88 च्या त्यानी दिलेल्या आकडेवारीनुसार शहरी भागात फक्त 6.1 टक्के पुरुष व 8.5 टक्के स्त्रिया पूर्णपणे बेकार होते. याचा अर्थ, 93.1 टक्के पुरुषांना आणि 91.5 टक्के स्त्रियांना पूर्ण वा अंशकालीन रोजगार उपलब्ध होता. याचा अर्थ, शहरी भागात उपजीविकेच्या संधी विपुल आहेत असा होतो. अशा स्थितीत लेखकांचे 'ग्रामीण भागापेक्षा शहरातील दारिद्र्य जास्त उठून दिसते,' हे विधान सयुक्तिक वाटत नाही. पुढे राज्यवार अभ्यासातही ग्रामीण दारिद्र्याच्या संदर्भात 15 राज्ये तर शहरी दारिद्र्याच्या संदर्भात 8 राज्ये राष्ट्रीय सरासरीच्या खाली आहेत, हा निष्कर्षही पूर्वी काढलेल्या निष्कर्षाशी विसंगत वाटतो.

आंतरराष्ट्रीय पातळीवर दारिद्र्याच्या प्रश्नाचा विचार खेर यानी तिसऱ्या प्रकरणात मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात केलेला आहे. आयुर्मानातील वाढ, शिक्षण आणि दरडोई वास्तव उत्पन्न या

तीन निकषांवर 160 देशांच्या संदर्भात मानव विकास निर्देशांक 0 ते 1 या दरम्यान प्रत्येक देशातील परिस्थितीनुसार काढला जातो. प्रगत देशांत तो 1 च्या जवळ येतो तर मागास देशात तो शून्याजवळ राहतो. 1992 च्या आकडेवारीनुसार भारताचा निर्देशांक 0.297 होता तर अमेरिकेचा 0.976 होता. अर्थात स्वातंत्र्य आणि पर्यावरण या घटकांचा विचार नसल्याने या विकास निर्देशांकालाही मर्यादा पडतात. 1994 मध्ये माळगांवकर यानी भारतातील घटक राज्यांचाही मानव विकास निर्देशांक काढून बिहार हे राज्य सर्वात मागासलेले (0.307) तर केरळ हे सर्वात पुढारलेले (0.520) असल्याचे दर्शविले. त्याबाबतीत आधारभूत संरचना (रस्ते, रेल्वे, वीज, शिक्षण, आरोग्य, संपर्क सेवा, बँका) यांचा राज्यातील विस्तार विचारात घेऊन सामाजिक व आर्थिक परिस्थिती, आयुर्मान, शिक्षण, स्त्रियांची परिस्थिती, असे निकष लावले आहेत.

पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणात खेर यानी भारताच्या दारिद्र्याचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या राजवटीमुळे दारिद्र्य निर्माण झाले ही समजूत चुकीची असून इतिहासात आठव्या शतकापासून बहुसंख्य लोकासमोर दारिद्र्याची समस्या असल्याचे लेखकानी सप्रमाण मांडले आहे. परकीयांची आक्रमणे राज्याराज्यातील युद्धे, डोंगराळ, आदिवासी जनतेची दुरवस्था, जातिसंस्था, शेतसारा वसुली पद्धतीने होत असलेले शेतकरी वर्गाचे शोषण, राज्य विस्ताराच्या संघर्षात होणाऱ्या युद्धांमध्ये सर्रास होणारी लूट, दुर्बलांचे आर्थिक व्यवहारात होत असलेले शोषण, अशा वेगवेगळ्या कारणांनी हिंदुस्थानात ब्रिटिश येण्याआधीच दारिद्र्याचा प्रश्न होता. '' सामान्य जनता दरिद्री राहिली, अर्धपोटी राहिली आणि दुष्काळात मृत्युमुखी पडली '' (पृ. 70).

शेती क्षेत्रात सारावसुली पद्धतीमुळे, लढायांत होणाऱ्या लुटीमुळे, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरीवर्ग हा नेहमीच दरिद्री राहिला होता, तर अन्य व्यवसाय उद्योग यांच्या क्षेत्रात बलुतेदारी, दादनी, जजमानी पद्धतींमुळे कारागिरांना जरी उत्पन्नाची शाश्वती असली तरी जीवनमान उंचावणे कधीच शक्य होत नसे. म्हणजेच उच्च उत्पन्न स्तरात राजे, सरदार, जमीनदार, व्यापारी, सावकार, शासकीय नोकरवर्ग, उच्चवर्णीय हेच समाविष्ट होते. निम्न स्तरातील बहुसंख्य लोक हे दरिद्री, अडाणी, निरक्षर, व्यसनाधीन, अस्वच्छ व सतत न्यूनगंडाने ग्रस्त बनले. श्रमाच्या साहाय्याने उपजीविका करणाऱ्या बहुसंख्य जनतेला सामाजिक प्रतिष्ठा कधीच मिळाली नाही आणि शोषणामुळे त्यांची प्राप्तीही नेहमीच खालच्या स्तरावार राहिली होती.

आर्थिक प्रगतीसाठी उपक्रमशीलता, नवप्रवर्तन, ज्ञान, विज्ञान व संशोधन यांचा विकास, श्रमांना महत्त्व देणारी भौतिक उन्नतीची आकांक्षा बाळगणारी मनोवृत्ती यांचे स्थान महत्त्वाचे आहे. निवृत्तीपर धर्माच्या प्रभावामुळे हिंदुस्थानात रूढी, कर्मकांड, परंपरा, अंधश्रद्धा असे वातावरण कधीच निर्माण होऊ शकले नाही. देशात एकेकाळी सोन्याचा धूर निघत असे, असे गौरवाने नेहमीच म्हटले जाते. परंतु हा धूर फक्त थोड्याथोडक्या श्रीमंतांच्याच घरातून निघावयाचा हेही ध्यानात घ्यावयाला हवे. वास्तविक मूळ हिंदू धर्मातील तत्त्वज्ञान हे प्रवृत्तिपर आहे तथापि नंतरच्या काळात समाज स्थितिशील बनला आणि दुःखवाद प्रभावी ठरला. इंद्रियांना कोंडणे हाच दुःखवाद्यांना पुरुषार्थ वाटून प्रपंचाच्या व समाजाच्या उन्नतीसाठी शास्त्रे ही अपुरी विद्या मानून त्यांची उपेक्षा झाली. दंभमिथ्याचार व बुवाबाजी यांचे स्तोम माजले. जैन धर्माच्या अनुयायांनी मात्र ही पारंपरिक विचारसरणी झुगारून ऐहिक प्रगतीला महत्त्व देणारी व्यवस्था स्वीकारली. मारवाडी, शीख, पारशी, रागढी, वगैरे जातीधर्मातील लोकानीही हिंदु धर्मातील प्रभावी असलेल्या ब्राम्हण्याला झुगारून उद्योग व व्यापाराच्या क्षेत्रात पदार्पण करून आपली ऐहिक उन्नती घडविली.

खेर यांच्या मते हिंदुस्थानच्या दारिद्र्यास केवळ इंग्रजानाच जबाबदार धरता येणार नाही. हिंदी लोकांचे हित पाहणे हे जरी त्यांचे उद्दिष्ट नसले तरीही त्यांच्या काळातच हिंदुस्थानात एकछत्री अमल निर्माण झाला. गुन्हेगारीचा बंदोबस्त होऊन शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. पश्चिमेची खिडकी उघडली गेल्याने नवे विचार, ज्ञान, विज्ञान यांचे वारे देशात

आले आणि देशात नव्या युगाचा आरंभ झाला. हिंदुस्थानच्या दारिद्र्यासाठी ब्रिटिशांना जबाबदार धरणे हे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आंदोलन करताना ठीक होते. तथापि आजतागायत तेच धरून चालणे हे वास्तवाशी विसंगत आहे. भारतियांनी स्वत:त बदल घडविल्याखेरीज दारिद्र्याचा प्रश्न सुटू शकणार नाही हे लेखकानी आग्रहाने प्रतिपादन केलेले आहे.

त्यानंतरच्या दोन प्रकरणात खेर यानी भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजनांचे मूल्यमापन केलेले असून दारिद्र्य निर्मूलनासाठी काय करावयाला हवे याविषयी आपले विचार मांडले आहेत. अगदी स्वातंत्र्यारंभी हाती घेतलेल्या सामुदायिक विकास योजनेपासून ते चालू दशकाच्या आरंभी सुरू झालेल्या जवाहर रोजगार योजनेपर्यंत सर्व योजनांचा परामर्श घेऊन या सर्व योजनांतील अनुत्पादक स्वरूप, दिलेल्या कर्जांची थकबाकी, कार्यक्रमात शिरलेले राजकारण, राबविणाऱ्यांनी केलेला भ्रष्टाचार, ग्रामीण जनतेचा मिळालेला साधारण प्रतिसाद, वगैरे विविध उणिवांवर बोट ठेवले आहे. त्यातही प्रगतिशील समजला जाणारा महाराष्ट्र इतर राज्यांपेक्षा, किंबहुना राष्ट्रीय सरासरीच्याही, खालच्या पातळीवर कसा राहिला आहे हे स्पष्ट होते. त्याचबरोबर प्रत्येक योजना अधिक फलद्रूप होण्यासाठी खेर यानी त्या त्या योजनेचा परामर्श घेताना विधायक व उपयुक्त सूचना केलेल्या आहेत.

दारिद्र्य निवारणाची दिशा स्पष्ट करताना खेर यानी प्रथम सैद्धान्तिक विश्लेषण समजावून दिले आहे. बचत व भांडवल निर्मिती, तंत्रविज्ञान व शिक्षण यांचा विकास, सार्वत्रिक साक्षरता प्रसार, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे व जनतेवरील दैववादाचा पगडा कमी करणे, सामाजिक प्रबोधन व विज्ञानाभिमुखता यांचा प्रसार अशा विविध घटकांचा विचार करण्यात आला आहे. खेर यानी आपली स्वत:ची मतेही व्यक्त केली आहेत.

दारिद्र्याचा प्रश्न हा केवळ भारताचाच प्रश्न नाही. विसाव्या शतकात विकसित आणि न्यूनविकसित देशांमधील तफावत वाढतच गेली. आज एकूण लोकसंख्येच्या दोन-तृतीयांश लोकसंख्या ही गरीब देशांची आहे. त्याखेरीज प्रगत देशांतही अल्पप्रमाणात का असेना परंतु कनिष्ट उत्पन्न स्तरावर काही लोकसंख्या आहेच. वेळोवेळी शस्त्रास्त्रे, अण्वस्त्रे यावर खर्च कमी केला गेला तर विकासाची किती कामे होऊ शकतील याचे दाखले दिले जातात. जागतिक आर्थिक विकासाच्या संदर्भात विशेष परिषदा वेळोवेळी घेण्यात येतात जेम्स टोबिन यानी प्रगत देशांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ 0.5 टक्के रक्कम गरीब देशांसाठी देण्याची सूचना केलेली आहे. जोपर्यंत भांडवलशाही देशांचा समूह आणि साम्यवादी देशांचा समूह यांच्यात जागतिक वर्चस्वासाठी स्पर्धा होती त्यावेळी आपल्याला अनुकूल देशांची संख्या वाढविण्यासाठी अमेरिका आणि रशिया हे देश अधिक आर्थिक साहाय्य गरीब देशांना देत असत. परंतु या दशकात मात्र साम्यवादी समूहच निष्प्रभ झाल्याने असे साहाय्य कमी झाले आहे. याचाच अर्थ असा की, प्रगत राष्ट्रे आपले हितसंबंध सुरक्षित राखून सोयिस्कर अटी घालून मगच न्यूनविकसित देशांना अर्थसाहाय्य देतात. यामुळेच सन 1995 मध्ये कोपनहेगन येथे झालेली 190 देशांची आर्थिक विकासाची जागतिक परिषद ही निष्प्रभ आणि वांझोटी ठरली.

पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणात खेर यानी दारिद्र्यनिर्मूलनाचे तात्कालिक आणि दीर्घकालीन मार्ग स्पष्ट करून एकूण पुस्तकाचा आशय थोडक्यात मांडला आहे.

असे हे या पुस्तकाचे स्वरुप आहे. पुस्तकात अखेर दिलेली संदर्भ पुस्तकांची सूची व पुस्तकात वेळोवेळी त्यांचा केलेला वापर हे खेर यानी पुस्तक लिहिताना घेतलेले परिश्रम दर्शवितात. हे पुस्तक केवळ अर्थशास्त्राचे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यापुरतेच नव्हे तर शासन यंत्रणेपर्यंत, विकास योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांपर्यंत, ग्रामीण भागातील स्वयंसेवी संघटना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचावयाला हवे. त्यामुळे त्याना समस्येचे नेमके आकलन होऊ शकेल. अर्थशास्त्रीय विषयावरील मराठी पुस्तकात या पुस्तकाने चांगली भर घातलेली आहे. ■■■■

# अर्थ शब्दांची वाट पाहे

**शिवकुमार खोबरे** *

'अर्थसंवाद', खंड 22, अंक 3 ऑक्टोबर-डिसेंबर, 1999 मधील शि.ना.माने यांचा 'अर्थ शब्दांची वाट पाहे' हा लेख वाचला. लेखात 9 इंग्रजी शब्दांची संक्षेपात पार्श्वभूमी आणि प्रक्रिया स्पष्ट करून त्याआधारे मराठी पर्याय नोंदविण्याचा प्रयत्न लेखकानी केलेला आहे. तथापि, काही पर्यायी शब्द दोषमुक्त वाटले नाहीत. वाजवी पर्याय पुढे यावा, दोषमुक्त पर्यायाचा स्वीकार व्हावा हे या टिपणाचे उद्दिष्ट आहे.

इंग्रजीतून नवीन येणाऱ्या शब्दांचे मराठीकरण करीत असताना अचूकता, अर्थपूर्णता, समर्पकता, आटोपशीरपणा, इत्यादी परिभाषेचे निकष लक्षात घेऊन पर्याय मांडला पाहिजे. तसेच त्या पर्यायांचे मराठीतून इंग्रजीत भाषांतर करताना पूर्ववत अर्थाचा बोध झाला पाहिजे. या निकषाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. लेखकानी ज्या 9 शब्दांची चर्चा केली आहे त्याबाबतची प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे.

**1 Internet**

माने यानी या संकल्पनेचा आशय संक्षिप्तपणे पण नेमक्या शब्दात अर्थपूर्ण रीतीने मांडला आहे. तसेच इंटरनेट शब्दासाठी जे 7 पर्याय दिले आहेत ते असे : (1) महाजाल, (2) आंतरमहाजाल, (3) माहिती तंत्रविज्ञान, (4) माहिती संपर्क तंत्रविज्ञान, (5) माहिती संपर्क महाजाल, (6) माहिती संपर्क महाजाल तंत्रविज्ञान, (7) माहिती संपर्क आंतरमहाजाल. लेखकानी Internet या शब्दासाठी 'आंतरमहाजाल' हा पर्याय रूढ व्हावा अशी सूचना केली आहे. तथापि, या शब्दापेक्षा 'आंतरजाल' हा अधिक आटोपशीर आणि अर्थपूर्ण शब्द वाटतो. म्हणून Internet साठी 'आंतरजाल' शब्द रूढ होणे शास्त्रोक्त ठरेल.

* प्राचार्य, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

## 2 Green GDP

माने यानी Green GDP संकल्पना स्पष्ट करून ती GDP पेक्षा सरस कशी आहे हे सांगितले आहे. या शब्दप्रयोगासाठी त्यानी तीन संभाव्य पर्यायांचा उल्लेख केला आहे. एक शब्दश: रूपांतर केल्यात 'हरित स्थूल देशांतर्गत उत्पादित' होय. तथापि, हा शब्द अर्थपूर्णता या निकषाला सुसंगत ठरत नाही असे लेखकाना वाटते. हे पटवून सांगण्यास त्यानी Bull चा अर्थपूर्ण पर्याय 'तेजीवाला' असा आहे, बैल नव्हे असे म्हटले आहे. त्यामुळे त्याना शब्दश: रूपांतर मान्य नाही. अनेकदा Bull ही संकल्पना Big Bull म्हणून वापरली जाते. हर्षद मेहता यांच्या कीर्तीमुळे हा शब्द विशेष प्रचलित झाला. तसेच Bull म्हणजे 'तेजीवाला' असे म्हणणे सयुक्तिक नाही. शेअर बाजारात 1994 पासून मंदी आहे. हर्षद मेहता यानी BPL या कंपनीच्या शेअर्सची किंमत मंदी असूनही 94 रुपयापासून 495 रुपयापर्यंत वाढवून दाखविली. बाजारात मात्र मंदीच होती. (सूचकांक तेव्हा 3000 पेक्षा कमी होता) म्हणून Bigbull ला 'महाबैल' म्हणणे योग्यच,'तेजीवाला' नव्हे.

लेखकानी Green GDP ला दुसरा पर्याय 'प्रदूषणपरिव्ययेतर स्थूल देशांतर्गत उत्पादित' हा दिला आहे. तो आटोपशीर आणि अर्थपूर्ण आहे. तो तूर्तास स्वीकारण्यास हरकत असू नये असे मत मांडले आहे. सध्या Green GDP तसेच Green Signal हे शब्द शब्दश: भाषांतर करून रूढ आहेतच. Green Belt चे ' प्रदूषणविरहित पट्टा' असे नवीन मराठीकरण करण्याचे प्रयोजन नाही. तसेच 'प्रदूषण परिव्ययेतर स्थूल देशांतर्गत उत्पादित' याचे इंग्रजीत भाषांतर करताना Green GDP असे कसे होईल? म्हणून पहिला सरळ भाषांतरित पर्याय 'हरित स्थूल देशांतर्गत उत्पादित' हाच योग्य होय.

## 3 Circuit breaker

हा एक जोडशब्द प्रामुख्याने भौतिकीत वापरला जातो असे म्हणून माने यानी विज्ञान संदर्भ दिले आहेत. तथापि हा शब्द शेअर बाजारात रोजच वापरला जातो. शेअर बाजारात सट्टा होऊ नये म्हणून 'सेबी' (Secutities & Exchange Board of India) 'Circuit break' लावते. एका उदाहरणाने ही कल्पना सांगता येईल. ACC कंपनीच्या शेअरची किंमत 1,000 रुपये आहे. ती अतिरिक्त जास्त किंवा कमी होऊ नये म्हणून 10 टक्के सर्किट लावले. म्हणजे ACC च्या शेअरची किंमत 900 ते 1,100 या मर्यादेत वरखाली होऊ शकते. प्रत्यक्षात कमाल आणि किमान मर्यादेपेक्षा किमतीत जास्त बदल झाला तर Circuit break झाले असे म्हणतात. हा या संकल्पनेचा अर्थशास्त्रीय अर्थ आहे.

लेखकानी विश्वकोष 18 मधील दोन पर्याय दिले आहेत; एक, 'मंडल खंडक' आणि दोन, 'मंडल विभंजक' होय. तथापि, उपरोक्त शब्दापेक्षा 'परिघ लाट' हा शब्द जास्त समर्पक आहे. शेअर बाजारात जरी Circuit break लावले तरी शेअरच्या किमती त्यापेक्षा कमी जास्त होऊ शकतात. त्यात विद्युत प्रवाहाप्रमाणे अटकाव किंवा खंड नसतो. ही वस्तुस्थिती आहे.

## 4 Economics of Ageing ( Prenury of plenty)

लेखकानी ही संकल्पना स्पष्ट करून सरासरी आयुर्मान वाढत असल्याचे सांगितले आहे. भविष्यकालातही सरासरी आयुर्मान वाढत जाणार आहे. लोकसंख्या संरचनेतील बदलांची कारणमीमांसा म्हणून Economics of Ageing संकल्पना इंग्रजीत रूढ झाली. या नवीन शब्दांसाठी माने यानी 'वयस्क अर्थशास्त्र' किंवा 'वयस्क (लोकसंख्येचे) अर्थशास्त्र' हा पर्यायी शब्द सुचविला आहे. मराठी साहित्यात बालकुमार साहित्य, प्रौढ साहित्य, इत्यादी प्रकार आहेत. 'वयस्क अर्थशास्त्र ' हा शब्द सयुक्तिक वाटत नाही. यापेक्षा जास्त समर्पक शब्द म्हणून 'आयुर्मानाचे अर्थशास्त्र' हा स्वीकार्य ठरावा. कारण एकूण लोकसंख्येतील काही लोकांचे आयुर्मान किंवा सरासरी आयुष्य वाढत आहे; अर्थशास्त्राचे वय नव्हे. तसेच वयस्क अर्थशास्त्राचे इंग्रजीत रूपांतर 'Aged Economics' असे होईल. म्हणून तो दोषमुक्त वाटत नाही.

## 5 Golden Hand-Shake

लेखकानी या शब्दाचा नेमका अर्थ स्पष्ट केलेला

आहे. आपल्या देशात 2 वर्षांपूर्वी SAIL (Steel Authority of India Limited) या सरकारी क्षेत्रातील उपक्रमात मंदीमुळे उत्पादनात कपात करून एकंदर खर्चात कपात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नोकरकपात केली. त्यासाठी सक्तीची स्वेच्छा सेवा-निवृत्ती योजनाही आखण्यात आली होती. सेवापूर्व निवृत्तीमुळे निवृत्त होणाऱ्यांना उर्वरित सेवा लक्षात घेऊन नुकसान भरपाईपोटी मोठी रक्कम देण्यात आली. अशा आशयाच्या घटनेला Golden Hand-Shake असे म्हणतात. असे प्रकार वारंवार घडत असल्याने या शब्दाचा वापर वाढत आहे. म्हणून या शब्दाला शास्त्रोक्त मराठी शब्द रूढ होणे अपरिहार्य ठरते.

माने यानी 'सोनेरी हस्तांदोलन' किंवा 'सोनेरी भेट' असा भावगम्य मराठी पर्याय अर्थपूर्ण ठरत नाही असे म्हटले आहे. तसेच त्यानी 'सेवाकालपूर्व (वेतन) प्रदान' किंवा 'सेवाकालपूर्व प्रदान' हा पर्याय रूढ व्हावा अशी सूचना केली आहे. तथापि, 'प्रदान शब्दाचे इंग्रजीत 'Output' असे भाषांतर रूढ आहे. जे सेवापूर्व स्वेच्छानिवृत्ती घेतात त्याना स्वतःच निवृत्ती स्वीकारल्याने Golden Hand-Shake मिळत नाही. म्हणून माने यानी सुचविलेला 'सेवापूर्वकाल प्रदान' हा शब्द समर्पक वाटत नाही. त्या शब्दाचे इंग्रजी रूपांतर 'Preservice output असे होईल.

सध्या आपण Golden Mean, Golden Jubilee, यांचे सरळ भाषांतर करतो. त्यामुळे 'सुवर्ण भेट हस्तांदोलन,' असा शब्द रूढ व्हावा असे वाटते.

**6 Network**

लेखकानी या नव्याने वारंवार वापरल्या जाणाऱ्या शब्दाचे सुयोग्य विश्लेषण केले आहे. आंतरजालामुळे नजिकच्या कालात 'नेटवर्क सोसायटी' होणार आहे. प्रस्तुत लेखाच्या सुरुवातीला Internet शब्दाला 'आंतर महाजाल' पर्याय सुचविला असतानाही त्यानी Network शब्दाचा ऊहापोह करताना 'आंतरजाल' शब्द मान्य केला आहे. (पाहा: पृ. 254 वरील सहावी ओळ). 'Network' शब्दाला 'जालस्थिती' आणि 'आंतरजालस्थिती' असे दोन शब्द सुचविले आहेत. तथापि, 'Network' शब्दाला प्रतिशब्द 'कार्यजाल' अधिक शास्त्रोक्त होय. 'नेटवर्क सोसायटी' या शब्दसमूहाचे रुपांतर 'कार्यजाल समाज' असे करता येईल. मुळात 'Network' शब्दात गतिमानता अभिप्रेत असल्याने आणि त्यात सातत्य असल्याने 'कार्यजाल' पर्याय योग्य ठरेल. त्यात आटोपशीरपणाचे प्रतिबिंब दिसेल.

**7 Disintermediation**

हा शब्द अधिकोषण क्षेत्रात वापरात आहे. माने यानी यासाठी 6 पर्याय सुचविले आहेत. ते असे :

(1) निर्मध्यस्थी

(2) निर्मध्यस्थिती

(3) मध्यस्थीती निवृत्ती

(4) मध्यस्थी निवृत्ती

(5) मध्यस्थी निवर्तन

(6) मध्यस्थिती निवर्तन

वित्तीय क्षेत्रातील विविध निधींचे सरकारी नियंत्रणातून मुक्त होण्यास वित्तीय संस्थांना पर्यायी साधनांचा वापर करावा लागतो, त्याला Disintermediation' म्हणतात. प्रस्तुत शब्दाला माने यानी सुचविलेल्या पर्यायांमधून सुलभीकरण, आटोपशीरपणा आणि शास्त्रोक्ततेच्या निकषावर 'अपखंडमध्यस्थिती' शब्द रास्त वाटतो; कारण वित्तीय संस्था पर्यायी साधनांचा वापर करूनही प्रत्यक्षात निवर्तन, निवृत्ती किंवा मुक्त होत नसतात.

प्रस्तुत टिपण माने यांची मते खोडून काढण्याच्या हेतूने लिहिलेले नाही. ही चर्चा अधिकाधिक गतिमान व्हावी हा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. हे सदर सतत चालावे ही 'अर्थसंवाद' च्या संपादकांची इच्छा यामुळे साकार होत आहे. तसेच माने यानी अलीकडे वारंवार वापरल्या जाणाऱ्या नवीन शब्दांची निवड केली आहे हे महत्त्वाचे आहे. शास्त्रोक्त पर्यायाची अंतिम निवड करण्यास आणखी काही पर्याय आल्यास उचित ठरेल.

■ ■ ■ ■

बाविसावे वार्षिक अधिवेशन

सूत्रसंचालकांचे अहवाल

**चर्चासत्र पहिले**

# भारतातील बेकारीची समस्या

संतोष दास्ताने *

I

## उपन्यास

भारतातील आर्थिक समस्यांच्या यादीतील प्रमुख समस्या म्हणजे बेकारी. विकसित, विकसनशील, न्यूनविकसित अशा प्रत्येक स्वरुपाच्या अर्थव्यवस्थेत बेकारीची समस्या हटकून आढळते. या समस्येला काळाचेही बंधन नाही. आधुनिक आर्थिक इतिहासात ही समस्या सर्वकाळ व्यापून राहिली आहे. राजकीय अर्थनीतीच्या धोरणकर्त्यांना बेकारीच्या समस्येला प्राधान्य देणे टाळता येत नाही. बेकारीतून जन्माला आलेल्या ताणतणाव, नैराश्य, विमनस्कता या समस्या समाजशास्त्रज्ञांना एक कूटप्रश्न वाटतात. राजकीय पक्षांचे यशापयश बेकारीच्या प्रश्नाच्या सोडवणुकीभोवती फिरत असते. बेकारीच्या प्रश्नावर दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालात अनेक देशांमधील सरकारे वारंवार कोसळलेली आहेत. काम करण्याची पात्रता व इच्छा असूनही काम न मिळणे हे आधुनिक आर्थिक संरचनेचे मोठे अपयश आहे.

बेकारीच्या अभ्यासाचे विविध पैलू आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या पैलूंची येथे थोडक्यात चर्चा केली आहे. सर्वप्रथम म्हणजे या संकल्पनेची सैद्धान्तिक बैठक. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत अर्थशास्त्रात व्यापून राहिलेल्या अभिमत अर्थशास्त्रात बेकारीच्या प्रश्नाचा विचार केवळ व्यष्टीय अर्थशास्त्र पातळीवर केलेला आढळतो. त्या आर्थिक विचारात केन्द्रस्थानी असणाऱ्या उपभोक्त्यांच्या आणि एका व्यवसाय संस्थेच्या विश्लेषणात बेकारी ही फारशी गंभीर समस्या मानली गेली नव्हती. त्या समस्येला समाधानकारक उत्तरही नव्हते. सेच्या बाजाराच्या सिद्धान्ताचा प्रभाव व निर्हस्तक्षेप धोरणाचा पाठपुरावा यामुळे या समस्येचे आकलन व विश्लेषण मर्यादित राहिले. पूर्ण रोजगार हा अभिमत अर्थशास्त्राचा पाया

* परीक्षा नियंत्रक, पुणे विद्यापीठ, पुणे.

असल्याने बेकारीची घटना ही तात्पुरती गैरव्यवस्था मानली गेली. अर्थव्यवस्थेतील मंदीचा वारंवार उद्‌भव पाहून केन्सचे विचार या सर्व घटनाक्रमाच्या मुळाशी गेले व रोजगारनिर्मिती करणाऱ्या घटकांचा एकात्मिक विचार प्रथम मांडला गेला. सर्वंकष क्रान्तीचा पुरस्कार करणाऱ्या मार्क्सच्या विचारांचा प्रभाव असूनही प्रचलित भांडवलशाहीच्या चौकटीत रोजगारनिर्मितीची मीमांसा करणारे केन्सचे विचार क्रान्तीकारी ठरले. समष्टीय अर्थशास्त्रातील विविध घटकांच्या परस्परक्रियेत बेकारी अंगभूत असते आणि ती दूर करण्यासाठी निराळ्या उपाययोजनांची आणि व्यूहाची आवश्यकता असते हा केन्सचा विचार क्रान्तीकारी मानला गेला. अर्थव्यवस्थेत प्रभावी मागणी, गुंतवणूक, व्याज दर, भांडवलाची कार्यदक्षता, रोखता प्राधान्य या सर्व घटकांची परस्परक्रिया एकूण उत्पन्न, उत्पादन व रोजगार ठरवीत असते. अशी सैद्धान्तिक बैठक केन्सनी मांडली. सरकारने राजकोषीय आणि चलनविषयक धोरणामार्फत दृष्ट बदल घडवून आणावेत व उच्च रोजगारपातळी गाठावी असे केन्सच्या मांडणीचे सार होते. सैद्धान्तिक विचारांच्या उत्क्रान्तीची आणखी एक शाखा म्हणजे समाजवादाचे आणि साम्यवादाचे अर्थशास्त्र. त्यात आदेश व पूर्ण नियंत्रणाचे धोरण वापरून रोजगार निर्मितीची उद्दिष्टे गाठण्याचे प्रयत्न झाले.

रोजगारासंबंधीचे कार्यकारण संबंध उलगडत असताना रोजगार आणि बेकारीसंबंधाचे नेमके सत्य स्वरूप काय आहे याचा अभ्यास पुढे येतो. त्यात बेकारीचे प्रकार, वर्गीकरण, त्यामागील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अल्पकालीन-दीर्घकालीन कारणे यांचा समावेश होतो. या संदर्भात विकसित व न्यून विकसित अर्थव्यवस्थांमधील बेकारीची संकल्पना यांचा निराळा विचार साहजिकच होतो. प्रभावी मागणी अपुरी असल्यास अथवा विकसित अर्थव्यवस्था तेजीमंदीच्या चक्रात फिरत असल्यास बेकारीचा उद्‌भव आढळून येतो. प्रभावी मागणी पुरेशी असेल पण रोजगाराच्या बरोबरीने आवश्यक असणारी पूरक साधनसंपत्ती अपुरी असेल तरीही बेकारी आढळून येते. केन्सच्या बरोबरीने जोन रॉबिन्सन यानी यावर अधिक प्रकाश त्यांच्या 'मार्क्स आणि केन्स' या लेखात (1948) टाकलेला आढळतो. बेकारीच्या इतर विवेचनात प्रच्छन्न बेकारी ही संकल्पना मांडून त्या संकल्पनेचेही विवेचन आढळते. नर्क्से, लेविस, जोन रॉबिन्सन यानी प्रच्छन्न बेकारीच्या मापनाचेही प्रयत्न केले आहेत. तर शूल्झ, वायनर यानी मात्र प्रच्छन्न बेकारीच्या संकल्पनेवर टीका केली आहे.

बेकारीच्या सांख्यिकी माहितीसंबंधी थोडे सांगितले पाहिजे. एखादी व्यक्ती जरी बेकार असली तरी जर त्या बेकारीची रोजगार विनिमय केन्द्रासारख्या ठिकाणी नोंद केली तरच बेकारीमध्ये मोजदाद केली जाईल. ही नोंद अनिवार्य नाही तर ऐच्छिक आहे. त्यामुळे बेकारीच्या आकडेवारीत सुरुवातीपासूनच अल्पोक्तीचा दोष येऊ शकतो. भारतासारख्या अर्थव्यवस्थेत हंगामी कामकाज असल्याने दैनिक, साप्ताहिक व सर्वसाधारण तत्त्वावर जी आकडेवारी मांडली जाते तीत मोठा फरक दिसतो. शिवाय त्या त्या क्षेत्राच्या अभिवृद्धीच्या दरावर रोजगारातील विस्तार अवलंबून असतो. संघटित क्षेत्रातील रोजगार विस्ताराची आकडेवारी अधिक विश्वसनीय असते, तर असंघटित क्षेत्रातील रोजगारासंबंधीच्या आकडेवारीत अल्पोक्तीची मात्रा असू शकते. ग्रामीण रोजगाराची माहिती गोळा करताना भारतासारख्या विशाल देशात अधिक अडचणी अनुभवास येतात. स्वयंरोजगार व हंगामी रोजगार असलेल्या व्यक्तींबाबत आकडेवारी अस्थायी स्वरूपाची राहते. पूर्ण बेकार व अल्पबेकार यासंबंधीची आकडेवारी तितक्या शास्त्रशुद्ध पद्धतीने मिळू शकत नाही. औद्योगिक, सेवा क्षेत्र, सरकारी क्षेत्र यातील आकडेवारी अधिक विश्वसनीय व तुलनेसाठी योग्य ठरू शकते. लोकसंख्या वाढीचा जो वार्षिक दर असतो आणि कार्यरत लोकसंख्या गटामध्ये जी वार्षिक वाढ होत असते ते दर रोजगार आकडेवारीसाठी उपयोगी पडू शकतात. सुशिक्षित बेकारीच्या प्रकारात सांख्यिकी माहितीची पडताळणी तुलनेने सोपी असते. दर वर्षी किती जण प्रमाणपत्र, पदविका, पदवी अथवा पदव्युत्तर शिक्षण पुरे करतात यावरून नवे किती जण रोजगारक्षम गटात नव्याने प्रवेश करतात हे समजून येते. भारताच्या नियोजन आयोगाने मे 1990 मध्ये प्रसृत केलेल्या आकडेवारीनुसार भारतातील बेकारांचा जुना अनुशेष

व कार्यरत गटात नव्याने प्रवेश करणारी संख्या यांचा एकत्रित विचार करता 1995 च्या बेतास भारतात सुमारे 6.5 कोटी व्यक्ती बेकार होत्या तर सन 2000 च्या बेतास ती संख्या 10.6 कोटीपर्यंत वाढेल. रोजगाराविषयीचे धोरण, नवे तंत्रविज्ञान व इतर आर्थिक-सामाजिक घटक विचारात घेऊन रोजगार निर्मितीचा दर ठरतो. भारतात आठव्या योजनाकालात हा दर वार्षिक 3 टक्के मानण्यात आला होता. नवव्या पंचवार्षिक योजनेची भूमिका (1997-2002) विशद करणाऱ्या प्रकाशनात सरकारने हा दर वार्षिक 2.23 टक्के इतका मानला आहे.

बेकारीच्या अभ्यासात रोजगारनिर्मितीच्या धोरणांची चिकित्सा अपरिहार्यपणे येते. आजवरच्या रोजगारनिर्मिती योजनांचे मूल्यमापन, त्या योजनांमधून घेतलेला बोध अशा गोष्टी यात मोडतात. महाराष्ट्राची रोजगार हमी योजना किंवा केन्द्र सरकारच्या रोजगार निर्मितीच्या इतर विविध योजना यांचा अभ्यास सतत चालू असतो. त्यातील निष्कर्ष पुन:पुन्हा तपासून पाहता येतील. भारताच्या संदर्भात विशेषकरून रोजगार प्रक्रियेचा संबंध गरिबी, विषमता, प्रादेशिक विषमता, सामाजिक घटकांची गुणवत्ता यांच्याशी जोडणे जरूर ठरते. कितीतरी अभ्यासांमध्ये अशा सर्वसमावेशक व बहुविद्याशाखीय धोरणाचा अभाव राहतो आणि त्यामुळे विवेचन विसंगत तसेच एकांगी बनते. आजवरच्या धोरणाच्या अभ्यासावरून पुढील घडामोडींचा पूर्वअंदाज व्यक्त करणेही शक्य होते. पंचवार्षिक योजनांच्या प्रतिमानासाठी हा अभ्यास पूर्वपत्रिका म्हणून गरजेचा ठरतो. आर्थिक विकासाचा किंवा अभिवृद्धीचा दर, लोकसंख्या वाढीचा दर, रोजगारनिर्मितीचा दर, बचत गुंतवणुकीचे दर, सरकारी क्षेत्राचे एकूण रोजगारातील प्रमाण, सरकारचा खर्च अशा कितीतरी घटकांवर रोजगाराचे यशापयश अवलंबून असते. यातील प्रत्येक चल घटक मोजण्याची पद्धती, त्यातील प्रमादाची मर्यादा यातूनच रोजगाराचे अंतिम चित्र तयार होते. रोजगारनिर्मितीच्या कार्यक्रमांची चिकित्सा होत असताना तत्सम अर्थव्यवस्थांमधील अशा कार्यक्रमांची तुलना असाही अभ्यास होऊ शकतो. जागतिक महामंदीनंतर अमेरिकेत 'न्यू डील' सारख्या कार्यक्रमात गुंतवणूक व रोजगारनिर्मिती यांचे विशेष संघटित प्रयत्न झाले. जर्मनी, जपान यासारख्या देशांनी नवे तंत्रविज्ञान व रोजगारनिर्मिती यांची कसरत बऱ्यापैकी यशस्वीपणे साधली आहे. कोरिया, इंडोनेशिया, थायलंड यांच्या आधुनिक प्रगतीमध्ये रोजगारनिर्मितीकडे दुर्लक्ष करण्यात आले नाही. हेही अभ्यासाचे एक अंग आहे हे विसरून चालणार नाही. रोजगारनिर्मितीचे यशापयश तपासताना त्यासाठी विकासाभिमुख असे प्रशासन व कणखर सामाजिक-राजकीय इच्छाशक्ती हवी असते. या बाबींचाही अभ्यास महत्त्वाचा ठरतो. सन 1991 नंतर भारतात ज्या संरचनात्मक सुधारणांना वेग आला आहे त्यांच्यामागे प्रबळ राजकीय इच्छाशक्ती व संस्थात्मक पूर्वतयारी लागते असा अनुभव येत आहे. त्या मुद्याची या संदर्भात आठवण येते.

2

## निबंधांचा गोषवारा

अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात या गतिमान आणि ज्वलंत विषयावर चर्चा करण्यासाठी एकूण सोळा निबंध सादर करण्यात आले आहेत. या टिपणीच्या पहिल्या भागात सूचित केलेले भारतातील बेकारीच्या संदर्भातील सर्वच मुद्दे येथे विचारात घेतले गेले आहेत असे नाही; जसे, भारतातील बेकारीच्या सांख्यिकी माहितीचे स्रोत, या सांख्यिकी माहितीच्या बदलत्या व्याख्या, या सांख्यिकी आकडेवारीच्या मर्यादा, भारताच्या ग्रामीण-शहरी भागातील स्त्रियांच्या रोजगाराची वैशिष्ट्ये याकडे निबंधलेखक वळलेले दिसत नाहीत. केन्सच्या लेखनापासून बेकारीची संकल्पना ही समष्टीय आर्थिक अभ्यासाचा एक अविभाज्य भाग बनली. त्यानंतर या संकल्पनेत जी जी उत्क्रान्ती झाली, जी नव्या मुद्यांची भर घातली गेली त्या सैद्धान्तिक बैठकीकडे निबंधलेखक वळलेले नाहीत. सन 1958 साली एका शोधनिबंधाद्वारे फिलिप्स यांनी वेतन दर व बेकारी यांचा परस्परसंबंध दाखविणारा जो फिलिप्स वक्र दाखविला त्याची भारताच्या संदर्भात चिकित्सा करण्याचे प्रयत्न करणे शक्य होते.

जे निबंध येथे सादर झाले आहेत त्यांचे वर्गीकरण

पुढीलप्रमाणे दाखविता येईल:

(अ) भारतातील बेकारीची सर्वसाधारण व्याख्या आणि त्या समस्येची उकल करणारे एकूण 6 निबंध आहेत. त्यात काळे व कसबे, सुधाकर अंभोरे, सुमित्रा पवार, रत्नाकर पाटील, बिराजदार आणि हणबंते यांच्या निबंधाचा समावेश आहे. या सर्व निबंधांनी बेकारीची पूर्वपीठिका, कारणे, उपाय असे समन्वित विवेचन केले आहे. त्यातही काही लक्षणीय मुद्दे आहेत. बिराजदार यानी रोजगार लवचिकता दाखविणारा तक्ता मांडला आहे. पण त्यामागील व्याख्या व गृहिते त्यानी स्पष्ट केली नाहीत. त्यामुळे इतर काही निबंधांमधील आणि या निबंधामधील आकडेवारी यात मोठी तफावत दिसते. जसे, खाजगी क्षेत्राची रोजगार लवचिकता भारतात सध्या 1 पेक्षा खूप कमी, काही बाबतीत शून्य व काही बाबतीत उणे आहे. ही तफावत स्पष्ट व्हावयाला हवी. त्यानी दिलेली रोजगार लवचिकता कशाच्या संदर्भात मोजली आहे? ती गुंतवणुकीच्या संदर्भात आहे असे गृहीत धरावे लागते. पवार यानी देशाने श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा वापर करावा असे सुचविले आहे. या सूचनेत संदिग्धता आहे. श्रमप्रधान तंत्र हे जर भांडवलप्रधान तंत्रापेक्षा अधिक खर्चिक असेल तर त्याचा स्वीकार होत नाही असा अनुभव आहे. बेकारी दूर करण्याचा हा उपाय अनेक वेळा सुचविला जातो पण त्याला मर्यादा आहेत हे ध्यानात घ्यावयाला हवे.

(आ) बेकारी दूर करण्याचे जे उपाय अमलात आणले त्यापैकी काही धोरणांची वा प्रयोगांची चिकित्सा करणारे एकूण सहा निबंध आहेत. यात गोसावी व कायंदे कारंडे, कुलकर्णी व भोसले, कायंदे व तायडे, जाधव तसेच मुक्ता जहागिरदार यांचे निबंध यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या कामकाजाने किती रोजगार निर्माण झाला याची चर्चा कुलकर्णी व भोसले यांच्या निबंधात आहे. या मंडळाचा रोजगार शेवटच्या चार वर्षात जवळपास तितकाच राहिला आहे पण या कालात त्यांच्या मजुरीत मात्र 50 टक्के वाढ झाली आहे. या वाढीव मजुरीचा भार सहन करताना या मंडळाच्या लाभप्रदतेवर काय परिणाम झाला हे या निबंधात मांडले असते तर या प्रयत्नांची शास्त्रशुद्ध चिकित्सा झाली असती. कारण रोजगाराचा उपयोग शेवटी उत्पादन व नफ्यासाठी असतो. तेव्हा रोजगाराचा नफ्यावर काय परिणाम झाला याचा विचार केला तरच ही चिकित्सा पुरी होणार. हा अभ्यास एका व्यवसाय घटकाच्या पातळीवर असल्याने रोजगारातील कामगारांची गुणवत्ता, त्यांची उत्पादकता यांचाही विचार मांडण्यास हरकत नव्हती. शहरी भागातील बेकारांची आकडेवारी व तत्सम मीमांसा कायंदे-तायडे यांच्या विस्तृत निबंधात आहे. गोसावी-पाटील यांच्या निबंधात विविध विकास महामंडळांच्या सर्वसाधारण कामकाजाची माहिती देण्यात आली आहे. जाधव यानी महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे थोडक्यात परीक्षण केले आहे. भारतात नियोजनबद्ध आर्थिक प्रयत्नात वृद्धी होत असताना रोजगाराची समस्या गंभीर होत गेली म्हणून विकास व विकास प्रक्रियेसंबंधीच्या कल्पना व धोरणांच्या पार्श्वभूमीवर भारताच्या रोजगार समस्येचे मुक्ता जहागिरदारानी विश्लेषण केले आहे. अभिवृद्धीला सर्वाधिक महत्त्व दिल्यामुळे अभिवृद्धी व रोजगारातील संबंध अधिकाधिक दुरावत गेल्याचे त्यानी निर्देशित केले आहे.

(इ) रसाळ व प्रवीण जाधव यांचे निबंध थोड्या वेगळ्या गटात मोडणारे आहेत. नवे तंत्रविज्ञान आणूनही रोजगार वाढविता येईल असे जाधव यानी म्हटले आहे. पण या मुद्याचे त्यानी अधिक विवेचन केले नाही. लोकसंख्या वाढ व बेकारी यांची चर्चा रसाळ यानी केली आहे. मात्र लोकसंख्येची गुणवत्ता, लोकसंख्येचे स्थलांतर, वयोगटानुसार विभागणी, लिंगानुसार वर्गीकरण या सर्व मुद्यांची रोजगारातील बदलांच्या संदर्भात त्याना चर्चा करता आली असती.

(ई) वि.श्री. देशपांडे तसेच ज.फा. पाटील-गावडे यांचे दोन निबंधही वेगळ्या स्वरुपाचे असल्याने त्यांचा निराळा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय उत्पन्न वाढीबरोबर रोजगारनिर्मिती झाली पण दोहोंच्या दरात तफावत असल्याने त्यामधील दरी रुंदावत गेली, तसेच उत्पादन वृद्धी झाली तरी त्या कालात रोजगार विस्तार कमी दराने झाला असे देशपांडे यानी

म्हटले आहे. मात्र नव्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात त्यांचे विवेचन असण्याऐवजी ते सर्वसाधारण स्वरूपाचे राहिले आहे. ज.फा. पाटील व गावडे यानी भारतातील बेकारीच्या संदर्भात अशोक माथुर यांच्या ताज्या विवेचनाचा आढावा घेतला आहे. त्यात अर्धखुली बेकारी व न-रोजगारी अशा संकल्पना आहेत. या संकल्पना वापरून त्यानी भारतातील बेकारीची आंतरराज्यीय तुलना केली आहे.

3

## चर्चेसाठी मुद्दे

भारतातील बेकारीची कारणे, त्यावर केल्या जाणाऱ्या उपायांची चिकित्सा आणि त्यातून निघणारे सैद्धान्तिक निष्कर्ष अशा स्वरुपाचे निबंध चर्चेसाठी सादर झाले आहेत. या विचारमंथनातून व विचारविनिमयातून या समस्येचा अभ्यास अधिक अर्थपूर्ण, तर्कशुद्ध व हेतुपूर्ण होईल असे वाटते. चर्चा नेटकी व उपयुक्त होण्यासाठी पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत:

(1) देशातील बेकारीचे मापन- बेकारी दरांमधील चढउतार -राज्याराज्यांमधील बेकारीची तुलना- आंतरराष्ट्रीय तुलना.

(2) बेकारांच्या सांख्यिकीय माहितीचे स्रोत - त्यांचे चिकित्सक परीक्षण.

(3) बेकारीची विविध कारणे व त्यावरील उपाययोजना यांची चिकित्सा.

(4) बेकारीच्या अभ्यासामागील सैद्धान्तिक बैठक.

(5) बेकारीच्या दरांचे पूर्वानुमान.

(6) बेकारीच्या नव्या संकल्पना

4

## चर्चेचा गोषवारा

चर्चा साधारणपणे तीन पातळ्यांवर झाली. बेकारी या संकल्पनांचा आजवरचा इतिहास आणि या संकल्पनेमागील सैद्धान्तिक-वैचारिक बैठक. चर्चेसाठी हा प्राथमिक मुद्दा होता आणि एकूण जे सोळा निबंध सादर झाले त्यापैकी या विषयावर सहा निबंध सादर झाले. समष्टीय आर्थिक घडामोडींमध्ये बेकारी नेमकी का निर्माण होते, अशी बेकारी अल्पकालीन असते का दीर्घकालीन असते, बेकारीबाबत काही चक्रीय घडामोडी आढळतात का, व्यष्टीय पातळीवरील रोजगार निर्णय आणि समष्टीय पातळीवरील रोजगार परिस्थिती यातील नेमका परस्परसंबंध कोणता, बेकारीमागील समाजशास्त्रीय-मानसशास्त्रीय कारणमीमांसा कोणती, अशा मुद्यांना चर्चेमध्ये फारसा स्पर्श झाला नाही. मूलभूत आर्थिक समस्यांची बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून चर्चा होणे आवश्यक आहे असे जाणवते. अमर्त्यकुमार सेन यांच्या अर्थशास्त्रीय योगदानाबद्दल सध्या सर्वत्र चर्चा आहे. त्यांचा अशा समस्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा व्यापक व सर्वस्पर्शी आहे हे येथे ध्यानात येते.

रूढी, परंपरा, धार्मिक समजुती, सामाजिक संरचना यानुसार अर्थव्यवस्थेतील कामाच्या पद्धती ठरत असतात. रोजगाराचा आकृतिबंध हा अशा घटकांचा परिपाक असतो. स्वातंत्र्यपूर्वीचा भारतीय समाज व स्वातंत्र्यानंतरचा समाज यांच्या रोजगार आकृतिबंधात कशी उत्क्रांती झाली याची तलस्पर्शी चर्चा झाली. असा ऐतिहासिक मागोवा घेणे हे जरी येथे प्रमुख उद्दिष्ट नसले तरी बेकारीच्या समस्येच्या आकलनामागे ते एक प्रमुख परिमाण आहे हे जाणवले.

असंघटित क्षेत्रातील रोजगाराबाबत चर्चा झाली. या रोजगाराबाबत कोणतीही एकसूत्रता नसते, याबाबतची सांख्यिकी माहिती मिळणे अवघड असते. नव्या आर्थिक नीतीच्या संदर्भात असंघटित क्षेत्रातील रोजगारास अगदी गौण स्थान आहे असे मुद्दे मांडले गेले. पूरक रोजगार, स्त्रियांचा रोजगार, हंगामी रोजगार अशा अनेक बाजूंनी विचार करता या रोजगारास समाजात मोठे संख्यात्मक स्थान असूनही अपुऱ्या माहितीमुळे ही समस्या सोडविण्याच्या कामात अडथळे येतात. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण ही नव्या आर्थिक धोरणाची

मुख्य अंगे आहेत. हा कार्यक्रम आता भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये स्थिरावतो आहे. परंतु यामुळे बेकारीच्या काही संकल्पना पुन्हा तपासून घेणे गरजेचे झाले आहे. उदाहरणार्थ, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कामकाजामुळे येणारी बेकारी तात्पुरत्या स्वरुपाची मानावयाची का? जर या कंपन्यांनी औद्योगिक विकासास चालना दिली असेल तर बेकारी एक अटळ घटना मानून ती स्वीकारावयाची का? नव्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात श्रमबाजाराचे स्वरूप काय असणार आहे? सुमारे पंचवीस ते पन्नास वर्षापूर्वीचा श्रमबाजार आणि आजच्या बदललेल्या परिस्थितीतील श्रमबाजार यात नेमका कोणता गुणात्मक फरक आहे? चर्चेमध्ये हे मुद्दे कमीजास्त प्रमाणात उपस्थित झाले. बेकारीच्या प्रश्नाची व्याप्ती अधिक विस्तृत असून त्यासाठी या संकल्पनेच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत असे सर्वसाधारण मानले गेले.

चर्चेचा मुख्य भर बेकारी दूर करण्याबाबतचा भारतातील जो प्रत्यक्ष अनुभव आहे त्याची चिकित्सा करण्यावर होता. बेकारी हटविण्याचे विविध कार्यक्रम तयार झाले खरे पण त्यांची अमलबजावणी विलंबाने व अपुरी होते आणि त्यात मोठा भ्रष्टाचार आढळतो असे मुद्दे मांडले गेले. पण त्याहीपेक्षा मूलभूत मुद्दा असा की, राज्यकर्ते आणि प्रशासकीय यंत्रणेला या कामांच्या यशस्वितेसाठी जी परखड इच्छाशक्ती हवी असते तिचा अभाव जाणवतो. स्वयंरोजगार कार्यक्रमांचे अपयश हे याचे बोलके उदाहरण आहे. मागासवर्गीय, अल्पसंख्याक, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांच्या रोजगाराबाबतही परिस्थिती कमालीची असमाधानकारक आहे. वित्तपुरवठा वाढविणे या एककलमी कार्यक्रमाने फारसे काही साध्य होणार नाही. बदलत्या ग्रामीण संस्कृतीमध्ये नव्या तऱ्हेचे कोणते रोजगार तयार होतील यांचा फारसा अभ्यासही अद्याप झाला नाही. उदाहरणार्थ, फळशेती, फुलशेती, उतिसंवर्धन, अशा क्षेत्रांचा झपाट्याने विकास होत आहे, पण या क्षेत्रांमध्ये कोणता रोजगार लागणार, किती लागणार आहे, त्या रोजगारासाठी कोणते प्रशिक्षण लागणार आहे याची फारशी माहिती आज हाताशी उपलब्ध नाही. रोजगाराचे आणि पर्यायाने स्वयंरोजगाराचे नियोजन करणे त्यामुळे अवघड होते. राबविलेल्या कार्यक्रमांमध्ये मोठी गळती अनुभवास येते.

स्वयंरोजगारास वित्तपुरवठा करताना अनुभवास येणारी प्रमुख अडचण म्हणजे बँकांसारख्या वित्तीय संस्थांना या कामासाठी वित्तपुरवठा करणे जोखमीचे वाटते. या प्रकरणांमध्ये कर्जवसुलीचे प्रमाण व वेळापत्रक पाळले जात नाही. अशा वेळी व्यक्तींच्या संघटनेस सामूहिक तत्त्वावर जर वित्तपुरवठा झाला तर थकबाकीचा फारसा प्रश्न राहात नाही. स्वयंरोजगार योजनांच्या प्रगतीतील मुख्य अडचण दूर करणारी ही योजना 'सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना' या नावाने 1997 मध्ये देशात सुरू करण्यात आली आहे. या वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या चिकित्सेमध्ये एक प्रमुख मुद्दा पुढे आला. इतर अनेक योजनांप्रमाणे हीही योजना अल्पशिक्षित बेकार युवकांसाठी आहे. पण एकूण निधीपैकी फक्त 5 टक्के निधी प्रशिक्षण आणि पात्रतावृद्धीसाठी राखून ठेवला जावा अशी अपेक्षा आहे. हा निधी अत्यंत अपुरा वाटतो. कोणत्याही कामाची अथवा उत्पादनाची गुणवत्ता प्रशिक्षणावर अवलंबून असते. पण अशा अपुऱ्या निधीने काय साध्य होणार हा प्रश्न शिल्लक राहतो.

महाराष्ट्र राज्य खादी-ग्रामोद्योग मंडळाच्या रोजगारनिर्मिती कार्याचा संदर्भ चर्चेत आला. गेल्या सुमारे पंधरा वर्षांच्या कालात मंडळाच्या कार्यामुळे रोजगार सुमारे अडीच पटीने वाढला, पण मजुरीत मात्र अंदाजे पंधरा पटीने वाढ झाली. रोजगाराच्या बरोबरीने उचित वेतन दर, वेतन दरातील वाढीचे प्रमाण, उत्पादकता, रोजगाराचे क्षेत्रवार वितरण अशा मुद्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही या गोष्टीवर भर देण्यात आला.

नव्या आर्थिक धोरणाच्या संदर्भातही भारतातील रोजगार वाढीची चर्चा झाली. देशात उत्पन्न व उत्पादनात वाढ झाली असली तरी रोजगारात वाढ होईलच याची खात्री देता येत नाही असे सांख्यिकी माहितीच्या आधारे मांडले गेले. नव्या आर्थिक बदलांमुळे सेवा क्षेत्रातील रोजगारात वाढ होत आहे पण वस्तुनिर्माण क्षेत्रातील रोजगार मात्र संकोच पावत

आहे. लघुउद्योग क्षेत्रांतील रोजगाराचा अभिवृद्धी दर इतर क्षेत्रांतील रोजगार वाढीच्या दरांपेक्षा जास्त होता असेही याबाबतीतील सांख्यिकी आकडेवारी सांगते. त्यामुळे लघुउद्योग व स्वयंरोजगार या दोनच मार्गांनी रोजगाराची समस्या काही प्रमाणात सुटू शकते असा निष्कर्ष आपोआप निघतो.

उदारीकरणाचे धोरण आणि भविष्यकालीन धोरणाचा संभाव्य कल या मुद्याला स्पर्श करण्यात आला. भारतातील देशी व विदेशी उद्योगांचा भर आधुनिक उच्च दर्जाचे तंत्रविज्ञान वापरण्यावर राहणार आहे, कारण राष्ट्रीय आर्थिक धोरणाचा भर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारतीय उपक्रमांची स्पर्धात्मकता वाढविणे यावर आहे. यासाठी कमी परिव्ययात अधिक चांगल्या दर्जाचे उत्पादन करण्याचा प्रयत्न होत आहे. परिणामी, नव्या रोजगाराच्या मागणीत आता गुणात्मक बदल होत आहे याची जाणीव ठेवावी लागेल. त्यादृष्टीने नव्या तंत्रविज्ञानाची कौशल्ये असलेल्या कामगारांची-अधिकाऱ्यांची निर्मिती व्हावी लागेल. यासाठी विशेषत: द्वितीय व तृतीय क्षेत्रांतील नव्या रोजगारांच्या संधीचा लाभ रोजगार बाजारात प्रवेश करणाऱ्या नव्या पिढीला घ्यावयाचा असेल तर अशा तंत्रवैज्ञानिक उच्च दर्जाच्या कामासाठी उपयोगी पडेल असे शिक्षण/प्रशिक्षण घ्यावे लागेल. म्हणजेच, भविष्यकालीन परिस्थितीच्या चौकटीत भारताला रोजगाराचा प्रश्न सुकर करण्यासाठी प्रचलित शिक्षण पद्धतीचा ढाचा लवकरात लवकर बदलला पाहिजे. या बदलांची पाउले विद्यापीठीय व व्यावसायिक शिक्षणाच्या स्तरावर लवकरात लवकर उचलली गेली पाहिजेत. भारताच्या संरचनात्मक बदलाच्या प्रक्रियेचा हा एक अविभाज्य घटक मानून त्यासाठीच योग्य ते बदल सुरू केले पाहिजेत या मुद्यावर चर्चेत भर देण्यात आला.

ग्रामीण रोजगाराचा प्रश्नही चर्चेत आला. यासंदर्भात विद्यमान सरकारचा भर प्रामुख्याने शेती, ग्रामीण उद्योग, फलोद्यान, मत्स्यव्यवसाय, स्वयं-रोजगार, इत्यादींवर आहे. हे कार्यक्रम अनेक वर्षांपासून चालू आहेतच. ते राबविणाऱ्या यंत्रणा गतिमान कराव्या लागतील. परंतु आतापर्यंतच्या अनुभवावरून या यंत्रणा पूर्वापार पद्धतीनेच काम करीत राहतील. परिणामी, ग्रामीण रोजगाराच्या वाढीचा दर आजपर्यंतच्या दरापेक्षा लक्षणीयरीत्या वाढणार नाही, ही चिंतेची बाब राहील असा विचार पुढे आला.

चर्चेच्या शेवटी स्पर्श केला गेला तो सरकारचा हस्तक्षेप किंवा सरकारची भूमिका या मुद्याला. आर्थिक उदारीकरण, निर्नियंत्रण, खाजगीकरण या प्रचलित धोरणांच्या संदर्भात सरकारचा हस्तक्षेप किमान असावा हे तर्कशुद्ध आहे. परंतु रोजगाराला पोषक असे वातावरण तयार करणे, त्यासाठी आवश्यक त्या सवलती आणि प्रोत्साहन देणे, अशी जबाबदारी सरकारला टाळता येणार नाही. वित्तपुरवठा, वित्तीय संस्थांचा विस्तार ही जबाबदारी भारतात बव्हंशी सरकारच्या मार्गदर्शनाखाली आहे. वित्तीय संस्थांच्या कामात लवचिकता आणि काही प्रमाणात खाजगीकरण आलेले असले तरी विकासाचा प्राधान्यक्रम ठरविणे, औद्योगिक धोरण ठरविणे, ते राष्ट्रीय प्राधान्यक्रमानुसार राबविणे यासाठी सरकारची सकारात्मक व गतिमान भूमिका अपेक्षित आहे.

उत्पन्न वाटपाची संरचना रोजगारनिर्मितीशी निगडित आहे. विषमतेचे प्रमाण इष्टतम मर्यादेच्या बाहेर गेल्यास अनेक आर्थिक व सामाजिक समस्या आणि ताणतणावांना आमंत्रण दिल्यासारखे होईल. अशा समस्यांचा पृथक् विचार केल्याने आपल्या व्यष्टीय पातळीवरील आर्थिक धोरणात काही मूलभूत त्रुटी राहून गेल्या आहेत. शासनाचा हस्तक्षेप मर्यादित असावा हे तत्त्व जरी स्वीकारले तरी अशा हस्तक्षेपाने राष्ट्रीय पातळीवरील उद्दिष्टे साधली जावीत याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही.

■■■■

चर्चासत्र दुसरे

# महाराष्ट्राची ऊर्जा समस्या

सर्जेराव आसाराम लोंबरे *

1

## प्रास्ताविक

मानवी विकासाला गतिमानता देणारा ऊर्जा हा एक प्रमुख पायाभूत घटक असून मानवी जीवनाची गुणवत्ता ठरविताना दरडोई वीज वापर हा एक प्रमुख निकष मानला जातो. निसर्गात ऊर्जा स्रोताचे रूपांतर विद्युतनिर्मितीत करून त्याचा उपयोग अंतिम उपभोगासाठी व प्रामुख्याने उत्पादक यंत्र चालविण्यासाठी केला जातो. यंत्र चालविण्यासाठी इंधन म्हणून कोळसा व खनिज तेल वापरण्याचा काळ संपून त्यापासून विद्युतनिर्मिती करून त्यावर यंत्रे चालविली जात आहेत. रेल्वेचे विद्युतीकरण गतीने होत आहे तर चार चाकी वाहने विजेवर चालविण्याचे सुलभ तंत्र विकसित करण्याचे प्रयोग चालू आहेत.

दळणवळण, वाहतूक, कृषी व उद्योग या सर्व क्षेत्रांची गतिमानता पूर्णांशाने वीजनिर्भर झाली आहे. क्षणभरही वीजपुरवठा खंडित झाला की सर्व व्यवहार ठप्प होतात आणि उत्पादन क्षेत्राची हानी होते.

घरगुती कामात (उदाहरणार्थ, दळण, कांडण, भांडी, धुणी, इत्यादीसाठी) नवनवीन उपकरणे वापरात येत आहेत. शाळा, दवाखाने व सांस्कृतिक उपक्रमांत विद्युत उपकरणांच्या आधारे सेवा पुरविण्याचे तंत्रज्ञान वेगाने विकसित होत आहे. ऊर्जा मानवी जीवनाचा निसर्गतःच आधार आहे. परंतु ऊर्जेच्या स्रोतांचे रूपांतर मानवाने विजेत करून त्यावर चालणारी विविध उपयोगी उपकरणे शोधून मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविली आहे. परिणामी वीज ही एक मानवाच्या आर्थिक-सांस्कृतिक जीवनातील अपरिहार्य बाब बनली आहे. वीज मानवाला शक्ती देतेच शिवाय त्यापासून सुविधा

* *प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, विवेकानंद कला, सरदार दिलीपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.*

उपलब्ध होतात. मानवी जीवनमानाचा 'शाश्वत विकास' ही संकल्पना आधुनिक अर्थशास्त्रीय चिंतनाचा केन्द्रबिंदू मानला जातो. पर्यावरणीय समतोल हिरावून भविष्यातील मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होणार नाही या बेताने नैसर्गिक साधनसामग्रीचा विनियोग करून वर्तमानातील उपभोग्य वस्तूंची सुबत्ता वाढवावयाची आहे.

मानवी जीवनातील भौतिक वस्तूंची सुबत्ता व विविध स्वरुपातील ऊर्जा वापर यांचा धन सहसंबंध मानवाच्या सर्वच विकास अवस्थेत राहिला आहे. मानव स्वतःच एक ऊर्जा स्त्रोत आहे. मानवी शरीर हे अन्न, पाणी व हवा यापासून ऊर्जा निर्माण करणारे एक साधनच आहे. ज्या दर्जाची व ज्या प्रमाणात साधनसामुग्री, अन्न, पाणी व हवा मिळते त्या प्रमाणात मानवी ऊर्जा प्राप्त होते. प्राथमिक अवस्थेत स्वबळावरच तो स्वतःच्या उपभोगाच्या वस्तू निसर्गातून मिळवीत असे. कालौघात श्रमबलाच्या संचयीकरणाच्या प्रक्रियेतून मानवाने वाहतुकीसाठी जलप्रवाह, उष्णता निर्मितीसाठी लाकूड, चरबी, इत्यादी साधनांचा वापर सुरू केला. पुढे क्रमाक्रमाने कोळसा, खनिज तेल, इत्यादींचा थेट वापर होऊ लागला. आज मोठ्या प्रमाणात प्रगत तंत्राच्या साहाय्याने कोळसा, अणु, जल, हवा, वायु, समुद्राच्या लाटा, इत्यादी साधनांपासून वीज उत्पन्न करून मानवी जीवनाची भौतिक संपदा वाढविली जात आहे.

मानवाच्या आजच्या प्रगत अवस्थेत ऊर्जा वापर ही वैयक्तिक बाब राहिली नसून ती सामूहिक बाब झाली आहे. कुठल्याही वस्तूच्या अथवा सेवेच्या व्यक्तिगत किंवा सामूहिक उपभोगासाठी एखादी सामूहिक व्यवस्था उभारावी लागते आणि या व्यवस्थेला भक्कम स्वरूप देण्यासाठी बहुविध अंगाने आधार द्यावा लागतो. ऊर्जेच्या सामूहिक वापराचे व्यवस्थित विनियमन होण्यासाठी कायद्याचा आधार, त्यातील लाभ परिव्ययाच्या शास्त्रीय विश्लेषणासाठी अर्थशास्त्रीय विचार, मानवी संबंधावर होणाऱ्या परिणामांचा विचार करण्यासाठी समाजशास्त्रीय सिद्धान्ताचा आधार, ऊर्जा वापराच्या प्रक्रियेत नैसर्गिक समतोल तर ढळणार नाही ना यासाठी पर्यावरणशास्त्राचा आधार, वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी ऊर्जानिर्मिती कायम वृद्धिंगत राहण्यासाठी कायमस्वरुपी तंत्रविज्ञानाचा विकास, ऊर्जास्रोत, त्यातून विद्युतनिर्मिती, वहन व वितरण व्यवस्था उभारण्यासंबंधी शासनाचे धोरण व त्यातील राजकारण, इत्यादी पैलूंचा समग्र विचार करूनच ऊर्जा समस्येचे विश्लेषण करूनच त्यावर विविधांगाने उपाययोजना करता येते.

विद्युत विविध स्रोतांपासून उत्पन्न केली जाते. तेव्हा त्यांचा तौलनिक दर एकक निर्मितीचा परिव्यय, वितरणाचा परिव्यय गृहीत धरून ग्राहकांना दर एकक उपभोगास किती दर आकारावेत, सीमान्तिक परिव्यय हा आधार असावा की सरासरी परिव्यय हा आधार असावा, विद्युत उपलब्धता व विकास संबंधाचे विश्लेषण, इत्यादींचे अध्ययन करण्यासाठी अर्थशास्त्रीय सिद्धान्ताचा आधार आवश्यक आहे. परंतु एकूणच ऊर्जा समस्येचे विश्लेषण करून त्यावर पूर्णांशाने उपाययोजना सुचविण्यासाठी केवळ आर्थिक विश्लेषण पुरेसे असणार नाही. इतर सर्व पैलूंच्या बरोबरीनेच आर्थिक विश्लेषणाचा उपयोग होऊ शकतो, नसता हे केवळ विश्लेषणासाठी विश्लेषण ठरेल.

ऊर्जा समस्येच्या आर्थिक बाजूची शास्त्रीय विश्लेषण पद्धती विकसित करण्याची जबाबदारी अर्थशास्त्रज्ञांची आहे. अशी विश्लेषण पद्धती विकसित करण्यासाठी सैद्धान्तिक अर्थतज्ज्ञाला ऊर्जा क्षेत्रातील परस्परावलंबी अनेकविध घटकांच्या आंतरसंबंधाचे प्राथमिक ज्ञान असणे जरुरीचे आहे.

ऊर्जा निर्मितीचा प्रमख आधार त्या प्रकल्पाचा आर्थिक पाया असतो. तंत्रविज्ञानाचा व्यावहारिक आविष्कार नेहमीच आर्थिक बाजूंनी सीमांकित झालेला असतो. समाजाला/ग्राहकांना न परवडणारे तंत्रविज्ञान कधीच व्यवहारात येत नसते. म्हणून ऊर्जा प्रकल्पावर काम करणाऱ्या विद्युत अभियंत्यांनी प्रस्तावित प्रकल्पांचा आर्थिक पाया तपासून पाहण्यासाठी आर्थिक प्रमेयांचा आधार घेतला पाहिजे.

2

## निबंधांचा सारांश

'महाराष्ट्राची ऊर्जा समस्या' या विषयावर एकूण तेरा निबंध सादर झाले आहेत. रा.य. माहोरे यानी वीज दर निर्धारणाच्या सैद्धान्तिक बाजूचे विवेचन केले आहे. या संदर्भातील विविध अभ्यासांचा आढावा घेऊन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला किमान सीमान्तिक परिव्ययाइतके उत्पन्न मिळाले पाहिजे असा निष्कर्ष काढला आहे. लतिका अरगडे यानी प्रतिपगामी विश्लेषण केलेले आहे. 1979 ते 1994 या 16 वर्षांत किमान ऊर्जा वापरून उत्पादनात अधिक भर घालणारा उद्योग वीज उद्योगच आहे हे त्यानी स्पष्ट केले. स्थूल उत्पादनाचा वाढता दर अधिक असूनही केवळ ऊर्जा वापरणारा उद्योग रासायनिक उद्योग आहे याची या निबंधात नोंद आहे. उत्पादक क्षेत्रात ऊर्जा स्रोतांची इष्टतम विल्हेवार (allocation) करण्यासाठी या विश्लेषण पद्धतीचा उपयोग होऊ शकतो.

गंगाधर कायंदे पाटील, अशोक जगताप व श्याम वायसे, रामकृष्ण सोळुंके यानी महाराष्ट्रातील ऊर्जा स्रोतांचा आढावा घेऊन महाराष्ट्राच्या वीज निर्मितीच्या स्थितीवर प्रकाश टाकला आहे. स्थापित विद्युतक्षमता , प्रत्यक्ष निर्मिती, विजेची कमाल व किमान मागणी यातून निर्माण होणाऱ्या समस्येचे विश्लेषण केलेले आहे. कायंदे पाटील यानी ऊर्जा मंत्र्यांची मुलाखत उद्धृत करून महाराष्ट्र शासनाची ऊर्जासंबंधीची भूमिका मांडली. जगताप व वायसे यानी विविध अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा आढावा घेऊन त्यांचे महत्त्व विशद केले आहे. साळुंके यानी वीज मंडळाच्या कार्यदक्षतेसाठी "ओरिसा प्रतिमान उपयुक्त ठरू शकते असे मत व्यक्त केले आहे.

रमेश कटके यानी अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचे महत्त्व वर्णन करून ग्रामीण क्षेत्रासाठी सामुदायिक ऊर्जानिर्मिती व ऊर्जा बचतीकडे विशेष लक्ष वेधले आहे. राजश्री काशीकर यानी 1960-61 पासून 1996-97 पर्यंत महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या विकासाचा आढावा घेऊन वीजनिर्मिती व मागणी संबंधीचे अंदाज दिलेले आहेत. मागणी व पुरवठ्यातील समतोल साधण्यासाठीची उपाययोजनाही त्यानी सुचविली आहे. विविध स्रोतांपासून होणाऱ्या वीजनिर्मितीपैकी गॅसपासून बनविल्या जाणाऱ्या एन्रॉन प्रकल्पातील वीजनिर्मितीचा परिव्यय सर्वांत जास्त, म्हणजे युनिटला रु. 1.25, असून हा प्रकल्प आर्थिक निकषांवर परवडणारा नाही याची लेखिकेने नोंद केली आहे. वीज वापरणाऱ्या ग्राहक समूहांपैकी शेतीला सर्वाधिक अनुदान (77.9 टक्के) दिले जाते तर घरगुती ग्राहकांना 12.9 टक्के अनुदान दिले जाते असे त्यानी निर्देशित केले आहे.

सर्जेराव बामदळे यानी आपल्या निबंधात भारतातील वीजनिर्मितीची प्रगती व ऊर्जेची वाढती मागणी या बाबींचा आढावा घेऊन या क्षेत्रातील महत्त्वाच्या समस्यांचाही ऊहापोह केला आहे. श्याम वि. सोवनी यानी इतर देशांच्या तुलनेत ऊर्जा वापर भारतात कमी आहे हे दर्शविले असून महाराष्ट्रातील वीजनिर्मिती, विविध क्षेत्रांतील वीज वापर याचा आढावा घेऊन पुणे जिल्ह्यातील 1988-98 या दशकातील वीज वापरात विविध ग्राहक समूहांतर्गत कशी वाढ झाली याचे विश्लेषण केले आहे. औद्योगिक व घरगुती वापराच्या विजेत 16 टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. विजेचा मागणी - पुरवठा समतोल साधण्यासाठी वीज चोरीला आळा घालावा आणि भांडवी गुंतवणुकीसाठी ग्राहकांवर प्रत्येक वीज युनिट वापरावर 10 पैसे अधिभार लावावा असे सुचविले आहे.

सवने यानी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची तुलना इतर राज्य वीज मंडळांबरोबर करून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थिती तुलनेने अधिक बरी आहे हे नमूद केले आहे. तरीही भविष्यातील वीज टंचाईवर मात करण्यासाठी पारंपरिक ऊर्जा स्रोतांचा किमान व काटकसरीने वापर व पुनर्निर्माण ऊर्जा स्रोतांचा विकास केला जावा असे त्यानी सुचविले आहे.

जल ऊर्जेच्या समस्येचे विश्लेषण करणारा एक निबंध कायंदे पाटील व नागभिडे यांचा आहे. जलऊर्जेचे महाराष्ट्रातील सध्याचे स्थान त्यानी स्पष्ट

केले असून सध्या कार्यान्वित असलेल्या प्रकल्पांची नोंद घेतली आहे. कमाल मागणीच्या वेळेस जलऊर्जा वापराचे धोरण व्यवहारात आल्यास औष्णिक वीज निर्मितीतील कोळशाची मोठी बचत होईल हे त्यानी स्पष्ट केले. एकूण ऊर्जा निर्मितीतील जलऊर्जा निर्मितीचे सध्याचे प्रमाण केवळ 16 टक्के असून ते 50 ते 60 टक्क्यांपर्यंत वाढवावे असे त्यानी सुचविले आहे.

वीज मंडळाचे खाजगीकरण करण्याच्या प्रश्नांचे विशेषत्वाने विश्लेषण करणारे दोन निबंध आहेत. वा.नि. साळवे यानी सामाजिक न्याय व शेतकऱ्यांचे वीज ग्राहक म्हणून विशेष स्थान लक्षात घेऊन खाजगीकरण करणे अयोग्य ठरेल असे नमूद केले आहे. मात्र शेती पंपांना विजेच्या वारानुसारच वीज दराची आकारणी करावी हेही त्यानी सुचविले आहे. खाजगीकरण करावे असे सुचविणारा निबंध दत्तात्रय चौगुले यांचा आहे. वीज मंडळाच्या कामगिरीचे विश्लेषण करून थकबाकी, विजेची चोरी, राजकारण, वीज मंडळाची अकार्यदक्षता, इत्यादी समस्यांचा ऊहापोह करून त्यावर उपाय सुचविले आहेत.

3

## चर्चेसाठी मुद्दे

आजच्या संदर्भात ऊर्जा समस्येचे दिशादर्शक विश्लेषण होण्यासाठी खालील मुद्यांवर चर्चा व्हावी असे वाटते.

(1) वीजनिर्मिती व ऊर्जा स्रोतांचा वापर आर्थिक पायावर आधारित व्हावा यासाठी अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या पद्धतीचा शोध, उपलब्ध पद्धतींची उपयुक्तता अथवा मर्यादा स्पष्ट व्हाव्यात तसेच नवीन पद्धती सुचविल्या जाव्यात. सर्वच पायाभूत सुविधांच्या आर्थिक विश्लेषणासाठी सैद्धान्तिक अर्थशास्त्राच्या विकासावर आनुषंगिक चर्चा व्हावी.

(2) प्राथमिक क्षेत्राला, विशेषत: शेतीसाठी, वीज मोफत पुरविली जावी अशी चर्चा चालू आहे.

(अ) कृषीसाठी वीज मोफत देणे सयुक्तिक होईल काय ?

(आ) त्याच्या आर्थिक परिणामांची चर्चा व्हावी.

(इ) वीज महामंडळाची स्वायत्तता व वीज दरातील सवलती.

(3) राज्य वीज मंडळाच्या कार्यदक्षतेवर प्रकाश टाकणाऱ्या आर्थिक बाजूवर चर्चा.

(4) विजेचे पर्यायी उपयोग वाढत आहेत. तसेच वीजनिर्मितीचे नवीन पर्यायही पुढे येत आहेत. तेव्हा मागणी व पुरवठ्यातील समतोल साधण्यासाठी पुरवठा किंमत तंत्र असावे की नियंत्रित वाटप व्यवस्था असावी. त्याचे आर्थिक व सामाजिक परिणाम काय होतील ?

(5) विविध ऊर्जा स्रोतांचे पर्यावरणीय पैलू लक्षात घेऊन आर्थिक बाजूंचे विश्लेषण व्हावे.

(6) विविध ग्राहक समूहांना वीज दर आकारण्याचे निकष काय असावेत ?

(7) 'वीज वितरण सहकारी संस्था' हा पर्याय महाराष्ट्रात अजमावून पाहिला आहे, त्याचा मागोवा घेतला जावा.

(8) ऊर्जानिर्मिती हा एक पायाभूत उद्योग आहे. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर कालात राज्यांनी राज्य वीज महामंडळांची स्थापना केली. सरकारी क्षेत्रात हा उद्योग आतापर्यंत आहे. सतत होत असणारा तोटा, निर्मित क्षमतेचा अकार्यदक्ष वापर, वहनातील मोठा क्षय, इत्यादी प्रश्न आता निकडीचे बनले आहेत. यावर खाजगीकरण पर्याय असू शकेल काय?

चर्चेसाठी असलेला विषय 'महाराष्ट्राची ऊर्जा समस्या' असा व्यापक असतानाही चर्चा मात्र महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशीच अधिक फिरत राहिली. त्यातही कृषी क्षेत्रास मोफत वीज पुरवठा याची महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी चर्चा असल्याने तसेच राजकारणावर व कृषी क्षेत्रावर या निर्णयाचे मूलगामी संभाव्य परिणाम होणार असल्याने या

अंगावर जोरदार चर्चा झाली. कृषी क्षेत्राला मोफत वीज पुरविण्याचे समर्थन काही वक्त्यांनी केले. परंतु अधिकतर विचारवंतांनी वीज पुरवठ्याचा आर्थिक पाया ठिसूळ करून कोणाचाच लाभ होणार नाही, शेतकऱ्यांना अनुदाने देणे हा वेगळा भाग आणि मोफत वीज पुरविणे हा वेगळा भाग आहे, कृषी क्षेत्र सक्षम होण्यासाठी इतर उपाय वापरावेत मात्र मोफत वीज घातक ठरेल, असे मत व्यक्त केले. राजकारणाच्या सोयीपेक्षा अर्थकारणाचा पाया मजबूत असला पाहिजे, या मूलभूत तत्त्वाचा पाठपुरावा या निमित्ताने करण्यात आला. विविध घटकांना वीजपुरवठा करण्यासाठी तात्त्विक आधार कोणता असावा या अनुषंगाने काही मुद्दे मांडण्यात आले. वीज ही आधारभूत संरचना (infrastructure) आहे. तिच्या पुरवठ्याची कमतरता राज्यात तीव्रतेने जाणवते. उपलब्ध वीज पुरवठा करतानाही दाबनियमनाचा अवलंब केल्यामुळे सर्वच घटकांना त्याच्या गैरसोईंना तोंड द्यावे लागते आहे. सद्यःस्थितीत वीज दरातून वीज मंडळाच्या खर्चाचीही भरपाई होत नाही. त्यामुळे मंडळाचा तोटा भरून काढण्याचा मोठा बोजा सरकारी तिजोरीवर पडतो. या परिस्थितीत, कोणत्याही वीज वापरणाऱ्या घटकाला मोफत वीजपुरवठा करण्याचे धोरण आर्थिक व्यवहारांच्या व आर्थिक शिस्तीच्या चौकटीत समर्थनीय ठरत नाही. दुर्मिळ निविष्टींचे वाटप किंमत घेऊनच केल्यास त्याच्या वापरावर नियंत्रण ठेऊन इष्टतम वाटपाची व्यवस्था निर्माण करता येईल. वापरणारा घटकही या निविष्टीचा वापर जागरुकतेने व जबाबदारीने करील. साधनसंपत्तीचे इष्टतम विल्हेवार (allocation) करण्याचे कार्य किमतीच्याच माध्यमातून व्यवहार्य पद्धतीने करणे शक्य असते हे मूलभूत अर्थशास्त्रीय सिद्धान्तन आहे. प्रत्यक्षात विविध उपायोगकर्त्या घटकांना वीजपुरवठा करण्यासाठी आकारावयाचे दर मूल्यभेदाच्या तत्त्वानुसार ठरवावेत. किंमत आकारणी करताना सर्व उपयोग कर्त्यांसाठी किमान किंमत ठरवावी आणि मग वेगवेगळ्या घटकांसाठी त्यांच्या किमती देण्याच्या क्षमतेनुसार वेगवेगळे अधिकचे शुल्क आकारावे. या तत्त्वानुसार किंमत सारणी तयार करता येईल. या मार्गाने वीज मंडळ तोट्यात चालणार नाही याची दक्षता घेता येईल.

वीज मंडळातील भ्रष्टाचार, वहनक्षय, कमाल व किमान दैनिक वीज वापर, वीज चोरी, व्यवस्थापनातील अकार्यदक्षता, अतिरिक्त कर्मचारी भरणा अशा महत्त्वपूर्ण पैलूंवर चर्चेत प्रकाश टाकला गेला. त्यातून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाची पुनर्रचना करावी किंवा वीज निर्मितीचे खाजगीकरण करावे असे मत मांडले गेले. राजकीय अश्रयाने औद्योगिक क्षेत्रात होणाऱ्या वीज चोरीकडेही लक्ष वेधले गेले. प्रवरा सहकारी वीज वितरण संस्थेचा दाखला देऊन सहकार हा पर्याय असू शकतो असा एक मुद्दा पुढे आला. एन्रॉन प्रकल्पातून मिळणाऱ्या महागड्या वीज पुरवठ्यावरही काही विचारवंतांनी प्रकाश टाकला. या अनुषंगाने महाराष्ट्राच्या वीज धोरणावरही प्रखर टीका करण्यात आली.

पुर्ननवीकरणीय साधनांपासून पर्यायी विद्युतनिर्मिती बाबत काही मुद्दे पुढे आले. या अनुषंगाने विशेषतः नागरी भागातील कचरा, सौर ऊर्जा व जलविद्युत याबाबत चर्चा झाली. आगामी काळातील वाढती विजेची मागणी कशी पूर्ण करणार, भविष्यातील वीजपुरवठ्याचा शाश्वत आधार काय असणार, विशेषतः कोळशापासून निर्माण होणाऱ्या विजेला जलविद्युत चांगला पर्याय असू शकतो, याबाबत ऊहापोह झाला. आगामी काळात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सिंचन क्षेत्रात आधुनिकीकरण होणार आहे, औद्योगिक क्षेत्रातील आधुनिकीकरण होणार आहे, औद्योगिक क्षेत्रातील मागणीबरोबर कृषी क्षेत्राची मागणी अधिक वेगाने वाढणार आहे, याचा विचार आजच होण्याची गरज स्पष्ट करण्यात आली. वीज वितरणातील लोकसहभागाची आवश्यकता, स्थानिक स्वराज्य संस्थेची वीज बिलाची थकबाकी, वीज व्यवहारातील भ्रष्टाचार अशा बाबींनाही चर्चेत स्पर्श करण्यात आला. घरगुती क्षेत्रातील वाढत्या दराने वाढणारा वीज वापर याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अनुत्पादक व चैनीच्या गरजा पूर्तीसाठी वीज या दुर्मिळ निविष्टीचा होत असलेला वापर घातक ठरणारा आहे. जलविद्युत निर्मितीला महाराष्ट्रात असलेला वाव आणि त्यातून कमाल व किमान दैनिक पुरवठ्याचा समतोल किफायतशीरपणे साधता येण्याची शक्यता याचे मार्मिक विश्लेषण चर्चेच्या ओघात पुढे आले.

बहुतेक निबंध, काही अपवाद वगळता, माहितीचे संकलन व वर्णनात्मक होते. त्यामुळे चर्चाही विश्लेषणात्मक होण्याऐवजी तत्कालिक राजकीय घडामोडींवर अधिक जोर देऊन सद्य:स्थितीचे वर्णन करणारी झाली. वस्तुनिष्ठ आर्थिक सिद्धान्ताच्या आधाराने सर्वच व्यावहारिक क्षेत्रांतील आर्थिक बाबींचे विश्लेषण करणे ही एक अवघड बाब असते. विशेषत: मराठी माध्यमातून आर्थिक सिद्धान्तांचा अभ्यास केलेल्या नवागतांना व्यावहारिक क्षेत्राचे आर्थिक विश्लेषण करण्याच्या पद्धती अवगत करण्याची गरज आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेला हे अंतर भरून काढण्याची योजना करावी लागेल.

■■■■


# मराठी अर्थशास्त्र परिषद, प्रकाशन चौथे

## अर्थमीमांसा– वैज्ञानिक की कलात्मक?

**लेखक : नि. वि. सोवनी**

किंमत रु. 250 (सूट 10 टक्के)

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

सूट वजा जाता निव्वळ किंमत रु. 225/- पुढील पत्त्यावर मनी ऑर्डर / डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक-पोस्टने पाठविला जाईल. डिमांड ड्राफ्ट पुणे येथील व्यापारी बँकेच्या शाखेवर देय असावा आणि तो 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने काढावा.

**पत्ता : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपील अपार्टमेंटस्, सर्व्हे क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे – 411 029.**

## ' अर्थसंवाद ' पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद' चे 1992-93 पासून पुढील वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी कार्यवाहांकडे प्रत्येक वर्षासाठी रु. 100/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने ' प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

## चर्चासत्र तिसरे

# आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप

श्रीराम पेडगांवकर *

1

### उपोदघात

साधारणत: आंतरराष्ट्रीय व्यापार खुला असावा हा सिद्धान्त अर्थशास्त्रात मान्यता प्राप्त आहे. पण प्रत्यक्षात आंतरराष्ट्रीय व्यापार कधीच पूर्णत: खुला नसतो. देशाच्या भौगोलिक मर्यादा ओलांडताना राजकीय हितसंबंधांना विशेष महत्त्व प्राप्त होते. प्रत्येक सार्वभौम राष्ट्राचे व्यापारविषयक धोरण व चलनाच्या परिवर्तनाची समस्या या दोन बाबींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधने येतात.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत सुर्णमान पद्धती अस्तित्वात होती, त्यामुळे आंतरराष्ट्रीय चलनाची समस्या, अंतर्गत स्थैर्याचे मूल्य देऊन का होईना, सुटली होती. आंतरराष्ट्रीय व्यापार फायदेशीर आहे हे मानल्यावर तो वाढला पाहिजे हे ओघाने येते. त्याचप्रमाणे त्याचे फायदे भाग घेणाऱ्या सर्व देशांना, विकसित व अविकसित, कच्चा माल निर्यात करणारे व पक्का माल निर्यात करणारे, या सर्वांना सारख्या प्रमाणात मिळाले पाहिजेत. व्यापार वाढण्यासाठी तो सुलभ व्हावा यासाठी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेची आवश्यकता असते. विदेशी चलनाची मागणी प्रत्येक देशाच्या आयातीच्या प्रमाणावर किंवा निर्यात आधिक्यावर अवलंबून असते. त्यामुळे सर्वच चलनांना मागणी सारखीच वाढणार नाही. अशा परिस्थितीत अधिक मागणी असणाऱ्या चलनाचा योग्य पुरवठा करणारी यंत्रणा हवी. आयातनिर्यातीतील तुटीमुळे काही देशांना अल्पकालीन विदेशी कर्जाची गरज असते ती भागविणारी यंत्रणा हवी. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धिंगत व्हावयाचा असेल तर वस्तू व सेवांचे उत्पादन वाढले पाहिजे. उत्पादन वाढीसाठी भांडवलाची आवश्यकता असते पण अविकसित देशांत भांडवल पुवठा करणारी बचत कमी असते. दारिद्रयाच्या दुष्टचक्रात सापडलेल्या

* पीपल्स कॉलेज, नांदेड

अर्थव्यवस्थांना दीर्घकालीन कर्जपुरवठ्याची अपेक्षा असते. ही गरज प्रगत राष्ट्रांनी पूर्ण करावी, कर्जे, अनुदाने द्यावीत यातून आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेचा जन्म झाला.

आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक या संघटनांची निर्मिती 1944 साली झाली. नाणे निधीने आंतरराष्ट्रीय व्यापार खुला व्हावा या हेतूने सभासद राष्ट्रांना अल्पकालीन साहाय्य करण्यासाठी एक प्रणाली विकसित केली सभासद राष्ट्रांनी आपल्या चलनाचे मूल्य सोन्यामध्ये व्यक्त करावे लागते.

एकदा जाहीर केलेल्या मूल्यात 10 टक्क्यांपेक्षा जास्त बदल करावयाचा झाल्यास नाणे निधीच्या पूर्व परवानगीची आवश्यकता असते. नाणे निधीजवळ सर्वच देशांच्या चलनांचा संग्रह कोटा पद्धतीतून उपलब्ध असे. यातून चलन परिवर्तनाची समस्या सुटण्यास मदत होते. नाणे निधीने सर्वच चलने जमा केली असली तरी डॉलरसारख्या काही चलनांनाच जास्त मागणी होती. डॉलरला महत्त्व येण्याचे दुसरे कारण म्हणजे अमेरिकेने डॉलर व सोने यांच्यातील परिवर्तनीयतेची हमी घेतली होती. त्यामुळे डॉलर हे आंतरराष्ट्रीय चलन बनले. पण 1970 नंतर अमेरिकेला डॉलरचे मूल्य स्थिर ठेवता आले नाही. त्यामुळे तरल विनिमय दराची कल्पना पुढे आली. याच सुमारास नाणे निधीने एस.डी.आर. हे कृत्रिम चलन प्रचलित केले. जर्मनी फ्रान्स, जपान, ब्रिटन, यांच्या चलनांचे महत्त्व ओळखून एस.डी.आर. चे मूल्य या चलनांच्या समुच्चयात व्यक्त केले जाऊ लागले.

डॉलरच्या पिछेहाटीबरोबर आंतरराष्ट्रीय वित्तीय क्षेत्रातील महत्त्वाची घटना म्हणजे यूरो-डॉलर मार्केटचा जन्म व विस्तार. यूरो-डॉलर ही केवळ सामयिक बाजाराची कल्पना नाही, तर तो सामयिक चलनाचा प्रयोग आहे. त्यामुळे राष्ट्रवाद मागे पडून बृहन्‌राष्ट्रशक्ती निर्माण झाल्या. अनेक देशांचे गट एकत्र येऊन आपली स्पर्धात्मकता वाढविण्याचा प्रयत्न करू लागले. गटातील देश परस्परांच्या आयात निर्यातीवरील बंधने दूर करू लागले. युरोपियन एकतेचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न अविकसित अर्थव्यवस्थांनी केला. यातूनच ASEAN, G 77 व 'सार्क' सारख्या संस्था व व्यासपीठे निर्माण झाली!

उत्पादनशक्तीच्या विकासाबरोबर उत्पादन वाढत जाते तेव्हा बाजाराचा विस्तार आवश्यक ठरतो. पण देशांतर्गत मागणी, विशेषतः औद्योगिक राष्ट्रात, त्या प्रमाणात वाढत नाही तेव्हा अविकसित अर्थव्यवस्थेचे बाजार मिळविण्याचे नवे मार्ग पुढे येतात. यातूनच बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रश्न वाढत गेले. अविकसित अर्थव्यवस्थेतील स्वस्त श्रमाचा फायदा घेणे आणि तेथील बाजार काबीज करणे अशा दोन्ही प्रकारे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विस्तार साधला. आज जगातील 15 टक्के उत्पादन 100 बहुराष्ट्रीय कंपन्यांमार्फत केले जाते. त्यांच्या दुय्यम संस्थांचा विचार करता बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जागतिक उत्पादनातील वाटा 30 टक्केपर्यंत जातो. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विस्तारासाठी उदारीकरण व जागतिकीकरण उपयोगी ठरले. 1980 पासून जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे वारे प्रगत देश व त्यांच्या प्रभुत्वाखालील नाणे निधीसारख्या संस्थांमार्फत वाहू लागले. आंतरराष्ट्रीय संस्थांनी आपल्या मदतीला उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या अटी जोडल्या. विकसनशील अर्थव्यवस्थांनी आजवर संरक्षण नियंत्रणे यांच्या नावाखाली उभा केलेला वित्तीय व्यवस्थेचा ढाचा त्याच्या प्रगतीला अडथळा ठरू लागला कारण बंधनांमुळे कार्यदक्षतेवर परिणाम झाला. आंतरराष्ट्रीय संस्था व प्रगत राष्ट्रे यांच्याकडून मिळणारी मदत उत्तरोत्तर कमी होऊ लागली. अविकसित अर्थव्यवस्थांना नाणे निधीचे कर्ज नाणे निधीच्या विकासनीतीला डावलून मिळणे अशक्य झाले. भारताने 1980 साली नाणे निधीच्या अटींना मानले नाही. परिणामी पूर्ण कर्ज मंजूर करून मिळविता आले नाही, पण याच आशिया खंडातील सिंगापूर, मलेशिया, तैवान, कोरिया यासारख्या देशांनी नाणे निधीचा विकासमार्ग स्वीकारून क्रान्तीकारक विकास साधला! त्याचे अनुकरण चीन व भारत यानी केले. पण चीनएवढे यश भारताला प्राप्त झाले नाही. 1991 नंतर भारताने उदारीकरण, जागतिकीकरण मार्ग अवलंबिला असला तरी त्यास पुरेसे राजकीय पाठबळ मिळाले नाही.

उदारीकरणाच्या प्रक्रियेत देशाच्या अंतर्गत धोरणात मोठ्या प्रमाणावर बदल करावे लागतात. अर्थसंकल्पीय तूट कमी करण्यासाठी अर्थसाहाय्ये (विशेषत: कृषी क्षेत्रातील) कमी करावी लागतात. याचा सामान्य माणसाच्या जीवनावर विपरित परिणाम होतो.

1995 नंतर आशियाई वाघांच्या प्रगतीस खीळ बसली. त्या देशांत विनिमय संकट निर्माण झाले. यातून नाणे निधीचा विकास कार्यक्रम टिकाऊ ठरेल का हा प्रश्न निर्माण होतो. तसेच पूर्वीच्या साम्यवादी देशांत नाणे निधीच्या विकास कार्यक्रमामुळे चलनफुगवटा, बेकारी, उत्पादनात घट अशी संकटे निर्माण झाली आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माहिती तंत्रविज्ञानाचा स्फोट हे एक महत्त्वाचे कारण आहे. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलाचे पण जागतिकीकरण झाले. विदेशी भांडवलावरील निर्बंध अनेक देशांनी नष्ट केले. विदेशी भांडवल वित्तीय व प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या रूपात मुक्तपणे वावरू लागले. भांडवल उदारीकरणास साहाय्यभूत आणखी महत्त्वाचा घटक म्हणजे वित्तीय क्षेत्रातील नवीन पतसाधने. आंतरराष्ट्रीय व्यापारातील विविध प्रकारच्या जोखमींचा विचार करून नवनवीन वित्तीय साधने बाजारात येत आहेत. आंतरराष्ट्रीय बँकप्रणाली विकसित होत आहे. नवीन व्यापारी क्षेत्रे विकसित होत आहेत. नवीन मध्यस्थ निर्माण होत आहेत. उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील आणखी एक महत्त्वाचे वादळ म्हणजे जागतिक व्यापार संघटनेची 1995 मध्ये निर्मिती. हो नाही करता भारत या संघटनेचा सभासद बनला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करण्यासाठी सभासद राष्ट्रांवर (विशेषत: अविकसित अर्थव्यवस्थेतील) अनेक बंधने लादण्यात आली आहेत. वस्तूंच्या किंमतीतील विरुपणे टाळण्यासाठी अर्थसाहाय्य कमी करण्याची महत्त्वाची अट या व्यवस्थेने टाकली आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापार व वित्तीय क्षेत्रांतील बदलांचा आढावा घेतल्यनंतरही प्रश्न उपस्थित होतो. आंतरराष्ट्रीय व्यापार खुला आहे का? त्याचा फायदा विकसित व अविकसित अर्थव्यवस्थांना सम प्रमाणात मिळतो का? आंतरराष्ट्रीय व्यापार आजही आर्थिकपेक्षा राजकीय अर्थकारणाचा भाग नाही का? तो खेळाच्या सिद्धान्ताप्रमाणेच चालतो का ? 1974 पासून विकसित अर्थव्यवस्थांनी मान्य केलेली नवीन जागतिक अर्थप्रणाली अजूनही पूर्णपणे अस्तित्वात आली नाही, हे खेदाने मान्य करावे लागते.

2

## निबंधांचा गोषवारा

या चर्चासत्रासाठी केवळ तीन निबंध सादर करण्यात आले. गि.सो. कल्याणकर यानी 'आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या कोटा पद्धतीतील बदल व त्याचे विकसनशील राष्ट्रांवर परिणाम' या निबंधात आंतरराष्ट्रीय नाणे निधीत प्रत्येक राष्ट्राचा कोटा कसा ठरतो हे सांगून वेळोवेळी कोट्यात झालेल्या बदलामुळे अविकसित राष्ट्रांचा, विशेषत: भारताचा, तौलनिक वाटा कसा कमी झाला याचे विवेचन केले आहे. कोट्यामध्ये पाच मोठ्या विकसित देशांचा वाटा 40 टक्के आहे. याचा परिणाम निर्णय प्रक्रियेवर होतो कारण मतांची संख्या कोट्यावर अवलंबून असते हे दाखवून दिले आहे. नाणे निधीच्या सामग्रीचा उपयोग असमान तत्त्वावर ठरविला गेला आहे. खरे तर जास्त फायदा विकसनशील राष्ट्रांना, विशेषत: त्यातील अल्प उत्पन्न गटाला, व्हावयास हवा असे मत लेखकाने मांडले आहे. कोट्याच्या प्रमाणातच राष्ट्राला आहरण अधिकार (drawing rights) असतात. त्यामुळे विकसित राष्ट्रांना अधिक फायदा होतो. लेखकाच्या मते, अधिकाराचे वाटप तरलतेच्या तत्त्वानुसार व्हावयास हवे.

मागील अनेक वर्षांपासून आंतरराष्ट्रीय नाणे निधी अर्थसाहाय्य देताना शिथिलीकरण, खाजगीकरण, वित्तीय तूट आटोक्यात आणणे, विदेशी विविध क्षेत्रे खुली करून स्पर्धा वाढविणे, इत्यादी अटी लादत आहे. या अटींचा बऱ्याच अविकसित अर्थव्यवस्थांवर विपरित परिणाम होतो हे लेखकाने दाखविले आहे.

शेवटी, आंतरराष्ट्रीय मुद्रासंकटाचा विचार केला

आहे. या संकटाची कारणमीमांसा दिली आहे. त्यांच्या मते, या राष्ट्रांतील चलनांचे मूल्य घसरल्यामुळे हे संकट निर्माण झाले. विदेशी भांडवल देशाबाहेर जाऊ लागले. अनुत्पादक कर्ज हे संकटाचे एक महत्त्वाचे कारण आहे. इंडोनेशिया, कोरिया व थायलंड या देशांना संकटकालात नाणेनिधीने अतिशय कमी आर्थिक साहाय्य केल्याचे लेखकाने आकडेवारीसहित दाखविले आहे आणि यावरून आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे अस्तित्व धोक्यात येईल हा लेखकाचा निष्कर्ष आहे; तो वादग्रस्त वाटतो.

धनश्री महाजन यानी 'जागतिकीकरणाचा आशियाई प्रयोग: काही निवडक अर्थव्यवस्थांचा तुलनात्मक अभ्यास' या निबंधात भारत आणि निवडक पूर्व आशियाई राष्ट्रे (फिलिपिन्स, इंडोनेशिया, थायलंड) यांच्या जागतिकीकरणाच्या अनुभवाचा अभ्यास केला आहे. 1980 पर्यंत ही सर्व राष्ट्रे अंतर्मुखी होती. आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँकेला अभिप्रेत असलेले विकास प्रतिमान प्रथम इंडोनेशिया व थायलंडमध्ये तर 1990 नंतर भारत व फिलिपिन्स या देशांनी अवलंबिले. या विकास प्रतिमानाची ढोबळमानाने वैशिष्ट्ये विशद केली आहेत. या विकास प्रतिमानात उदारीकरणाची प्रक्रिया दोन टप्प्यांत केली जावी असे सुचविले आहे. अंतर्गत अर्थव्यवस्थेचे स्थिरीकरण व बहिर्गत व्यापारातील तूट कमी करणे हा पहिला टप्पा तर आर्थिक धोरणाची पुनर्रचना हा दुसरा टप्पा. विविध बाजारांतील समान स्वरुपाचा वस्तूंच्या किमतीतील फरक नाहीसा व्हावा यासाठी किमतीवरील अर्थसाहाय्य बंद करावे तसेच श्रमाच्या बाजारातील अडसर (उदारणार्थ, किमान वेतनाचे विनियमन) दूर करावे अशी अपेक्षा आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात आयात कोट्याऐवजी प्रशुल्काचा वापर करावा आणि पुढे क्रमश: निर्यात अर्थसाहाय्य व आयात प्रशुल्क या दोन्हींत घट करावी तसेच भांडवली खात्याचे उदारीकरणही जागतिक बँकेने सुचविले आहे.

लेखिकेने तौलनिक अभ्यासासाठी स्थूल अर्थव्यवस्थेची कामगिरी मोजणारे नऊ निकष तर जागतिकीकरणाची स्थिती मोजण्यासाठी पाच निकषांचा वापर केला आहे. स्थूल अर्थव्यवस्थेच्या पातळीवर अंतर्गत बचत, गुंतवणूकशेष या निर्देशकांचा अपवाद वगळता थायलंडची कामगिरी सर्वात चांगली आहे. या खालोखाल इंडोनेशिया व शेवटी फिलिपिन्स व भारत असा क्रम लागतो जागतिकीकरणाच्या संदर्भातही सर्व पाच निर्देशकांत थायलंडचा पहिला, फिलिपिन्सचा दुसरा, इंडोनेशिया तिसरा व भारत चौथा असा क्रम लागतो. जागतिकीकरणाची प्रक्रिया व आर्थिक विकास यात प्रत्यक्ष संबंध आहे, असा निष्कर्ष या अभ्यासातून काढता येईल. सदर अभ्यास 1993 पर्यंत मर्यादित होता.

'बदलती जागतिक व्यापार व वित्तीय व्यवस्था आणि त्याचा ध्वनितार्थ: एक टीप ' या निबंधात दि.व्यं. जहागिरदार यानी जागतिकीकरणामुळे विविध देशांमध्ये व्यापार व वित्त यांच्याद्वारे एकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे हे स्पष्ट केले आहे. सन 1985 पासून जागतिक अर्थव्यवस्थेतील घसरण हळूहळू सावरावयाला सुरुवात झालेली असून पुनरुत्थानाची क्रिया जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवृत्तीवर नजर टाकल्यास असे दिसेल की, भांडवलाची गतिक्षमता वाढली असून दिलेली प्रत्यक्ष गुंतवणूक ही विकसित देशांमध्ये केन्द्रित झाली आहे. तसेच विकसनशील देशांमध्ये होणारे भांडवली व वित्तीय चलनवलन हे अनेकदा परिकल्पन हेतूने प्रेरित झालेले दिसते. त्यामुळे देशोदेशींच्या अर्थव्यवस्थेत, पर्यायाने जागतिक वित्तीय व्यवस्थेत अस्थैर्य निर्माण झाले आहे. जहागिरदार यानी दक्षिण-पूर्व आशियातील आर्थिक संकटावर देखील थोडक्यात प्रकाश टाकला आहे. तसेच विकसनशील देशांपुढील काही महत्त्वाची आव्हाने त्यानी विशद केली असून तात्त्विक दृष्टिकोणातून वित्तीय व्यवस्था व उत्पादन पद्धती आणि व्यापार संरचना यांचे विवेचन वाढविणे गरजेचे असल्याचे त्यानी सुचविले आहे.

3

## चर्चेसाठी मुद्दे

सादर झालेल्या निबंधांची अल्पसंख्या लक्षात घेता या निबंधातून आलेल्या विषयांशिवाय काही

महत्त्वाच्या बाजू चर्चेत याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील मुद्दे मांडण्यात आले :

(1) नाणे निधीला आपली उद्दिष्टे साध्य करण्यात अपयश आले आहे का ? असल्यास, त्याची कारणे कोणती?

(2) आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेत बदल कोणत्या कारणाने करावे लागले?

(3) जागतिकीकरण व वित्तीय व्यवस्था यांच्यातील संबंध.

(4) वित्तीय व्यवस्थेतील तांत्रिक बदल-नवीन पतसाधने.

(5) जागतिकीकरणात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा वाटा.

(6) जागतिकीकरणात तिसऱ्या जगातील देशांचा फायदा झाला आहे का ? भारत, चीन यांची तुलना.

(7) युरोपीय सामयिक बाजार व सामयिक चलन यांची प्रगती. मॅस्ट्रीच करारातील कलमांची अमलबजावणी करण्यात अडचणी येतील का?

(8) उत्तर-दक्षिण सहकार्यातील अडचणी.

(9) रशिया व पूर्व युरोपीय देशांचे विशेष प्रश्न. आंतरराष्ट्रीय संघटनेकडून अपेक्षा.

(10) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणाली निर्माण करण्यात कितपत यश आले?

4

## चर्चेचा सारांश

विषयावर चर्चा करण्यापूर्वी सूत्रसंचालकांनी शरद बोकील, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ यांना आपले विचार मांडण्यास पाचारण केले. त्यांनी पुढील मुद्दे मांडले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस युरोपमध्ये प्रारंभ झाला, उदारीकरणामुळे जागतिक व्यापार वाढीला लागला, युरोपच्या एकीकरणामुळे त्यास मदत झाली, या कालात अमेरिकी कंपन्या युरोपमध्ये गेल्या आणि त्यातून बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विकासाला सुरुवात झाली; बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रथम व्यापार, नंतर उत्पादन व शेवटी वित्तीय क्षेत्रात प्रवेश केला. वित्तीय क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.

खुल्या चर्चेमध्ये आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे स्वरूप बदलण्याची कारणमीमांसा करून बदलाचे पैलू स्पष्ट करण्यात आले. कारणमीमांसा करताना पुढे आलेला तपशील असा. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सुरुवातीच्या साधारणतः तीन दशकांच्या कालात वित्तव्यवस्था सामान्यतः एककेन्द्री राहिली. त्यावेळी आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या माध्यमातून जागतिक क्षेत्रात विनिमय दर विनियमनाचे काम होत राहिले. त्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रवाह वाहात राहिले. विशेषतः विकसनशील राष्ट्रांनी वित्तीय प्रवाहांच्या मुक्त वहनात अनेकविध अडथळे निर्माण केले होते ; त्यामुळे वित्तीय प्रवाहांना मर्यादा होत्या आणि त्यांचा संभार आजच्या तुलनेने बराच कमी होता. साधारणतः सत्तरीच्या दशकापासून जागतिक धोरणाने एक मोठे वळण घेऊन जागतिकीकरणाच्या धोरणांचा पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांनी आपल्या अर्थव्यवस्था केवळ वस्तू व सेवांच्या व्यापारासाठीच खुल्या करावयाला सुरुवात केली, एवढेच नव्हे तर त्यातून भांडवल वहनासाठीचे अडसर हळूहळू दूर करण्यासाठीही पाउले उचली गेली. विकसनशील राष्ट्रांच्या विकासासाठीचे जागतिक बँक व नाणे निधीप्रणीत पाचव्या ते सातव्या दशकासाठीचे प्रतिमान अपेक्षित परिणाम साधू शकले नाही असा प्रत्यय हळूहळू येऊ लागला. बहुतेक सर्व राष्ट्रे विदेशी कर्जाच्या सापळ्यात सापडली आणि त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी जागतिक बँक व नाणे निधी यांनी जागतिकीकरणाचा उपचार सुरू केला. नवव्या दशकाच्या उंबरठ्यावर सोविएत रशियाचे विघटन झाले. त्यातून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना पूर्वापार पद्धतीने आपली अर्थव्यवस्था बंदिस्त राखणे अवघड झाले, एवढेच नव्हे तर भांडवलप्रधान आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रवाहात पोहण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. अशा सर्व आंतरराष्ट्रीय घटनांची परिणती पुढीलप्रमाणे

झाली : (अ) खुल्या अर्थव्यवस्थेच्या पद्धतीचा स्वीकार करण्याची जागतिक लाट आली. ही व्यवस्था स्वीकारण्यासाठी विकसित राष्ट्रांचा स्वतंत्रपणे आणि जागतिक बँकेच्या माध्यमातून दबाव वाढत राहिला. (आ) या दबावाखाली विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक क्षेत्रात वित्तीय खुलेपणाचे धोरण अनुसरले. (इ) विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांचे फायदेशीर असणारे बाजार, व्यापार, उद्योग व वित्तीय व्यवहार काबीज करण्याचे धोरण अनुसरले. (ई) बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सर्वत्र शिरकाव करण्याचे धोरण अंगीकारले. त्यातून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला (FDI) भरती आली. रोखे बाजारातील गुंतवणुकीमधून झटपट नफा कमविण्याची विकसित राष्ट्रांची धडपड होती.

या घटनांमधून आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेत जे आमूलाग्र बदल घडताहेत त्याचे सर्वसाधारण स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले. (1) सद्य:स्थितीत आंतरराष्ट्रीय वित्तीय घडामोडी तीन प्रमुख जागतिक केन्द्रांतून घडत आहेत : लंडन, न्यूयॉर्क, टोकियो. यामध्ये अजूनही लंडन केन्द्र प्रभावी आहे; त्याचा हिस्सा 45 टक्के आहे. (2) वित्तीय प्रवाहात दीर्घकालीन प्रवाहापेक्षा अल्पकालीन प्रवाह अधिक प्रभावी आहेत. या प्रवाहांमध्ये मनमानीपणा (volatility) अधिक असल्यामुळे जागतिक आर्थिक व्यवस्थेला काही प्रमाणात अस्थिरता आली आहे. अशियाई आर्थिक संकट हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. (3) भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहांवर कोणाचेच नियंत्रण राहिले नाही. (4) युरोपमध्ये युरो चलनाच्या लवकरच होऊ घातलेल्या उदयामुळे जानेवारी 1999 पासून आंतरराष्ट्रीय चलन म्हणून डॉलरचा प्रभाव कमी होण्याची शक्यता काही प्रमाणात का असेना वाटते. (5) प्रत्येक राष्ट्राचा विनिमय दर, त्यांचे अंतर्गत व्याज दर, रोखे बाजारातील निर्देशांक पूर्वीप्रमाणे स्वतंत्रपणे न ठरता त्यांची एक साखळी निर्माण झाली आहे. (6) आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवहारातील सुकरतेसाठी नवनवीन साधने व पद्धती निर्माण झाल्या आहेत. (7) माहिती क्षेत्रातील तंत्रवैज्ञानिक क्रान्तीमुळे जागतिक वित्तीय प्रवाहांच्या वहनाचे काम अतिजलद झाले असून व्यवहारांचा संभारही (volume) वाढला आहे. एकंदरित, जागतिक वित्तीय प्रवाह मुक्त, गतिमान, संभारी, वैविध्यपूर्ण, विविध वित्तीय चलांना एकत्रित आणणारे आणि बहुकेन्द्री झाले आहेत असे चर्चेतून निष्पन्न झाले.

चर्चेच्या ओघात प्रतिक्रिया म्हणून पुढील विचार मांडले गेले. आंतरराष्ट्रीय नाणे निधीसारख्या संस्था सर्व आशियाई राष्ट्रांसाठी एकच उपचार पद्धती सांगते हे चुकीचे आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे धोरण व अमेरिकेचे संरक्षणात्मक धोरण अविकसित देशांना घातक ठरते आहे.

■ ■ ■ ■

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्य वर्गणीत वाढ

मराठी अर्थशास्त्र परिषदेची आजीव सदस्य वर्गणी रु. 600/- होती. दिनांक 1 एप्रिल, 1999 पासून ती रु. 800/- अशी वाढविण्यात आली आहे. परिषदेचे आजीव सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी 1 एप्रिल, 1999 पासून आजीव सदस्य होण्यासाठी रु. 800/- पाठवावेत.

आ.गो. पुजारी
**कार्यवाह–खजिनदार**

**चर्चासत्र चौथे**

# दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांतील चलनसंकट व भारत

**शरद बोकील** ✲

1

## उपोद्घात

प्रस्तुत विषय हा अधिवेशनाच्या अध्यक्षांनी आयत्या वेळेचा विषय म्हणून जाहीर केलेला होता. परिषदेच्या प्रथेप्रमाणे आयत्या वेळेच्या विषयासाठी निबंध मागविले जात नाहीत. प्रारंभी सूत्रसंचालकानीच विषयाचा उपोद्घात केला. त्यामध्ये आशियाई आर्थिक संकटाची पार्श्वभूमी मांडण्यात आली. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या ताळेबंदात साठच्या दशकात तूट आली होती. तिचा मुकाबला करण्यासाठी तेथील सरकारने सर्व प्रकारच्या विदेशी गुंतवणुकीवर निर्बंध घातले होते. त्याकारणाने युरोपमध्ये पर्यायी डॉलर बाजार अस्तित्वात आला. या बाजारात जगातील प्रमुख बँका हिरिरीने भाग घेऊ लागल्या. या बाजारावर कोणाचेच नियंत्रण नसल्यामुळे या बाजाराची लाभप्रदता अमेरिकेतील गुंतवणूकदारांना डॉलर बाजारापेक्षा जास्त होती. बचतदारांना अर्धा टक्का जास्त आणि कर्जदारांना अर्धा टक्का कमी या तत्त्वावर त्यानी कारभार सुरू केल्यामुळे जगातील सर्व मोठ्या संस्था व प्रचंड श्रीमंत असलेल्या व्यक्ती या बाजाराकडे आकृष्ट झाल्या. कारभार करणाऱ्या बँका नामांकित असल्यामुळे आणि दोन्ही कटिबंधात समान असल्याने जोखमीचा प्रश्न कधीच निर्माण झाला नाही. पुढे तेलसंकट निर्माण झाल्यावर (1973 व 1979) आणि स्थानिक बाजारांचे उदारीकरण झाल्यामुळे डॉलरचा हा बाजार केवळ युरोपपुरताच मर्यादित न राहता जागतिक स्वरुपात पुढे आला एवढेच नव्हे तर तो 24 तास चालू लागला. ही प्रक्रिया इतर चलनांना समाविष्ट करू लागली. बहुविध चलनांवर आधारित या बाजारामुळे विदेशी चलन बाजारदेखील जोमाने वाढू लागला. जगातील वित्तीय विनिमयामुळे जवळजवळ 90 ते 95 टक्के

✲ *अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे.*

व्यवहार वित्तीय बाजारात होऊ लागले. परिणामी, व्यापाराधिष्टित विनिमयाचे प्रमाण 5 ते 10 टक्क्यांपर्यंत घटले. असा बाजार गेली काही वर्षे वार्षिक 15 ते 20 टक्के दराने वाढत आहे. या बाजारात घाऊक प्रमाणावर बचत व कर्जपुरवठा होतो; व्याज दर तरल तत्त्वावर ठरविले जातात. प्रत्येक बचत व कर्ज यावरील व्याज दर फक्त 3 ते 6 महिन्यांकरिताच स्थिर असतात. हे दर लंडन बाजारात रोज दुपारी 11 च्या सुमारास 20 बँकांतर्फे ठरविले जातात आणि त्याचा पुढील 24 तास वापर होतो. त्याला 'LIBOR (London Inter-bank Offer Rate) म्हणतात. प्रत्येक चलनासाठी एक असे अनेक LIBOR जाहीर होतात. चलनाच्या सुदृढतेवर त्यांची पातळी कमीजास्त असते आणि होते. या व्याज दराचा व पर्यायी राष्ट्रीय व्याज दराचा अतिशय जवळचा संबंध आढळतो. बहुविध चलनांमुळे चलन दर देखील तरलबद्धतेवर ठरतात. एका चलनातून दुसऱ्या चलनामध्ये जाण्याची गतिमानता वाढल्यामुळे हे व्यवहार देखील खूपच प्रमाणात वाढले आहेत. सध्या जगात दररोज 1 ट्रिलियन डॉलरची उलाढाल होते; खुद्द लंडनमध्ये 500 अब्ज डॉलरचे व्यवहार होतात. व्याज दर व चलन दर अस्थिर असल्याने विदेश विनिमय व्यवहार जोखमीने करावे लागतात. त्यातील धोका कमी करण्याकरिता 'derivatives' चे बाजार अस्तित्वात आले आहेत; 'Futures,' 'Swaps,' 'Options' अशी त्यांची नावे आहेत. संघटित व 'over the counter' असे दोन प्रकार यात आढळतात. व्याजाधिष्ठित कर्जरोखे व चलनाधिष्ठित व्यवहार यासाठी हे 'derivatives' बाजार अस्तित्वात आले आहेत. व्याज दर व चलन दर यांच्या तरलतेमुळे कधी कधी व्याज दर आकाशाला भिडतील इतके वाढू शकतात (उदाहरणार्थ, 1980-85). अशा वेळी मोठमोठ्या कंपन्या बँकांना बगल देऊन वित्तीय संस्थांकडून सरळसरळ कर्जरूपी निधी उभा करतात. त्या गरजेतून कर्जरोख्यांचा बाजार बँकांना स्पर्धा निर्माण करू लागला. वाढत्या स्पर्धेबरोबर बँकांना देखील आपले व्यवहार या बाजारात जाऊन वाढवावे लागतात. पुढे राष्ट्रीय वित्तीय व्यवहारांचे उदारीकरण झाल्यावर विदेशी भांडवल बाजारात सर्व तऱ्हेचे वित्तीय व्यवहार करणारे महाबाजार (super-markets) निर्माण झाले. हा बाजार आता 10,000 अब्ज डॉलरचा आहे. शिवाय कर्जरोख्यांचा बाजार 5,000 अब्ज डॉलरचा आहे. गुंतवणुकीच्या संधी औद्योगिक देशांत कुंठित झाल्यामुळे या बाजारांतील मुख्य घटक विकसनशील राष्ट्रांना समाविष्ट करू इच्छित आहेत. त्या प्रक्रियेमधूनच दक्षिण-पूर्व आशियात अल्प मुदतीच्या रूपाने प्रचंड प्रमाणावर पैसे गुंतविण्यात आले. तेथील वित्तीय संस्था व उद्योग यांच्या संगनमतामुळे बहुतांश पैसा सटोडियांनी स्थावर मालमत्ता व भांडवल बाजारात जलद नफ्यासाठी गुंतविला. पण हा फुगा फुटल्यावर विदेशी संस्थांनी आपला पैसा परत ओढल्यावर, चलन दर झपाट्याने घसरले, आयात महाग झाली, वास्तविक (real) गुंतवणूक घटली, वास्तविक गुंतवणुकीचे अंदाज चुकले, किमती आटोक्याबाहेर गेल्या आणि चलनसंकट राजकीय संकट होऊन जनता हवालदिल झाली.

## 2

## चर्चेचा गोषवारा

चर्चेच्या ओघात वक्त्यांनी आशियाई संकटाच्या बाबतीत काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले. (1) हे अरिष्ट लोकांच्या भावना/संवेदनांमुळे घडून आले की अर्थव्यवस्था ज्या तत्त्वावर उभारलेली होती ती तत्त्वेच चूक होती? (2) याचा संबंध बाह्य घटकांशी जुळविता येईल की अंतर्गत स्थिती याकरिता कारणीभूत होती ? (3) जर अंतर्गत घटक महत्त्वपूर्ण असतील तर हे घटक समष्टीय धोरणाशी संबंधित होते की व्यष्टीय, म्हणजेच संस्थांशी? (4) कर्जदारांनी जोखमीचे मापन योग्यरीत्या केले नसावे. पैसा अर्थव्यवस्थेतून काढून घेण्यामागे कळपाची वर्तणूक आढळते काय ? हा अनुभव ध्यानात घेता भारताचे धोरण कसे असावे? (5) आशियाई देशांना जागतिक बँक व नाणे निधी यानी दिलेला सल्ला योग्य वेळी न वापरल्यामुळे विलंबामुळे घसरण झाली असे म्हणणे योग्य ठरेल काय ?

मूळ विषयाचा रोख आशियाई संकटाची कारणमीमांसा करण्यापेक्षा त्याचा भारतावर काय

परिणाम झाला असा आहे. तथापि अधिकतर वक्त्यांनी आशियाई संकटाची चिकित्सा करण्यापुरतेच आपले विश्लेषण मर्यादित केले. भारतासंबंधी एकदोन वक्त्यांनी मात्र काही चांगले मुद्दे साधार मांडले. भारत आशियाई संकटापासून बराचसा सुरक्षित राहिला आहे त्याचे प्रत्यंतर पुढील तपशिलातून मिळते:

(अ) स्थूल देशांतर्गत उत्पादित (GDP) अभिवृद्धी दर 1997-98 मध्ये 5 टक्के राहिला.

(आ) भावफुगवट्याचा दर 1997-98 मध्ये जवळपास 5 टक्के राहिला.

(इ) बाह्य क्षेत्राच्या संदर्भात रुपया-डॉलरचा विनिमय दर 1 जुलै, 1997 ला $ 1 = रु. 35.82 होता, तो 16 जानेवारी, 1998 रोजी रु. 40.36 असा झाला, मात्र 31 मार्च, 1998 रोजी परत रु. 35.90 या पूर्वपातळीवर आला.

(ई) विदेशी चलनाचा साठा 31 मार्च, 1997 च्या 22.40 अब्ज डॉलरवरून 31 मार्च, 1998 रोजी 26 अब्ज डॉलरपर्यंत पोचला.

भारताच्या तौलनिक सुरक्षिततेची ही निर्देशके आहेत. भारत या आपत्तीतून कसा बचावला ? सांगितलेली महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

(1) बाह्य क्षेत्राचे व्यवस्थापान विशेष कटाक्षाने आणि काळजीपूर्वक केले गेले. रंगराजन समितीने शिफारस केलेल्या धोरणात्मक चौकटीत भारतीय रिझर्व्ह बँकेने आपली उपाययोजना केली. या उपाययोजनेचे महत्त्वाचे पैलू असे होते :

(अ) नम्य (flexible) विनिमय दर;

(आ) चालू खात्यावरील तूटीचे सातत्य;

(इ) बिगर - कर्ज वित्तीय आवकेला प्राधान्य;

(ई) बाह्य कर्जाचा संभार (volume) , उपयोग व परिव्यय (cost) यावर मर्यादा;

(उ) अल्पकालीन कर्जे भारतात येण्याबाबतीत कडक नियंत्रणात्मक धोरण.

(2) रोखे बाजारातील सट्टेबाजीला ऊत येण्याची दाट शक्यता ध्यानात घेऊन रिझर्व्ह बँकेने वेळीच (16 जानेवारी, 1998 रोजी) उपाययोजना केल्या. तेव्हाची भारतातील राजकीय अस्थिरता आणि येऊ घातलेली सार्वजनिक निवडणूक यामुळे रोखे बाजारात सट्टेबाजी वाढण्याची शक्यता होती. रिझर्व्ह बँकेची उपाययोजना योग्य वेळी झाली.

(3) आशियाई संकटग्रस्त देशांशी भारताचा निर्यात व्यापार जेमतेम 7 टक्क्यांच्या जवळपास असल्याने त्या राष्ट्रांच्या चलनांच्या अवमूल्यनाचा प्रतिकूल परिणाम भारताच्या निर्यातीवर फारसा घडला नाही.

(4) आशियाई देशांतून काढून घेतलेला पैसा भारताकडे वळेल असा दाट संभव आहे. तथापि भारताने स्वीकारलेल्या 'निर्बंधित उदारीकरणा'च्या (restricted liberalisation) धोरणामुळे येणाऱ्या वित्तीय प्रवाहांचे धोके टाळता येतील.

(5) संकटग्रस्त आशियाई देशांत रोखे बाजार व मालमत्ता बाजारात मंदी येण्याची शक्यता आहे. मात्र ती मंदी भारताला ग्रासण्याचा संभव व तीव्रता कमी आहे. कारण, त्या देशांतील व भारतातील रोखे बाजार व मालमत्ता बाजार यांच्यातील दुवा अत्यंत कच्चा आहे.

(6) भारताने रुपयाचे भांडवली खात्यावरील परिवर्तन न केल्याने भारताला या आपत्तीतून स्वतःचा बचाव करता आला.

■■■■

# 'अर्थसंवाद' वार्षिक अहवाल
1997-98

रवीन्द्र दोशी *

'अर्थसंवाद' चा सन 1997-98 चा वार्षिक अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सदस्यांपुढे सादर करण्यात मला आनंद वाटतो. या वर्षाबरोबरच 'अर्थसंवाद' चा एकविसावा खंड पूर्ण होतो; तसेच 'अर्थसंवाद'च्या वाटचालीतील तिसऱ्या दशकातील पाहिले वर्षही पूर्ण होते आहे. म्हणून 'अर्थसंवाद' च्या वार्षिक अहवालांकडे केवळ एक उपचार या दृष्टीने न पाहता मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याचे स्थायीरूप असणारे ते एक अंग आहे यादृष्टीने पाहावे अशी माझी सर्व सदस्यांना विनंती आहे. तसे झाल्याखेरीज या नियतकालिकाच्या संबंधातील वर्षभराच्या घडामोडींचे पूर्ण आकलन आपल्याला होणार नाही आणि त्याच्या अधिक सुदृढतेसाठी आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची कार्यवाही करण्यात आपण सहभागी होऊ शकणार नाही.

सन 1997-98 या वर्षातील एकविसाव्या खंडाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे, जुलै-सप्टेंबर, 1997 (अंक 2) हा अंक 'महाराष्ट्र सिंचन विशेषांक' म्हणून प्रसिद्ध झाला. आजपर्यंतच्या विशेषांकांच्या मालिकेतील हा तिसरा अंक होय. मराठी अर्थशास्त्र परिषद आणि महाराष्ट्र राज्य दुसरा सिंचन आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सिंचन आयोगाच्या निमंत्रणावरून परिषदेने मे 1997 मध्ये सांगली येथे एक कार्यशाळा आयोजित केली होती. दोन दिवसांच्या या कार्यशाळेत 'सिंचनाचे आर्थिक पैलू' या मुख्य विषयावर चर्चा करण्यासाठी 12 तज्ज्ञांकडून खास विनंती करून शोधनिबंध लिहवून घेतले होते. त्यातील बहुसंख्य निबंध आणि कार्यशाळेतील चर्चासत्रांचा गोषवारा एकत्रित करून 'अर्थसंवाद' या सिंचन विशेषांक तयार करण्यात आला. एखाद्या विषयाला धरून प्रकाशित झालेला 'अर्थसंवाद' चा हा पहिलाच विशेषांक आहे. अंक नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकारचा होता. त्याचे सर्व

* प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद',

संबंधितांकडून चांगलेच कौतुक झाले. हे समाधान मोठे आहे. जर संभाव्य लेखक मंडळींकडून चांगला प्रतिसाद मिळाला तर वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने 'अर्थसंवाद' चे खास अंक तयार होऊ शकतील. याबाबत सर्वांनी गांभीर्याने विचार करून आपल्या मौलिक सूचनांसह संपादकांशी अवश्य संपर्क साधावा.

आता एकविसाव्या खंडाचा सर्वसाधारण आढावा घेऊ. यामध्ये नेहमीप्रमाणे दिली जाणारी परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण, पां.वा. गाडगीळ स्मृती भाषण आणि जमनालाल बजाज स्मृती उपक्रमातील भाषणे याव्यतिरिक्त 17 स्वतंत्र लेख, 5 ग्रंथ परिक्षणे, 1 'अर्थ शब्दांची वाट पाहे', 2 टिपणे, 2 सांख्यिकी पुरवण्या, परिषदेच्या एकविसाव्या वार्षिक अधिवेशनाचा सर्व वृत्तांत आणि बाविसाव्या वार्षिक अधिवेशनासाठीच्या विषयांवरील रूपरेषा असा विविधांगी मजकूर देता आला. गतवर्षीच्या नोबेल विजेत्यांसंबंधीचा लेख खंड 20 मध्ये देता आला नव्हता. तथापि हा उपक्रम अखंडित चालू राहण्यासाठी खंड 21 मध्ये तो लेख दिला, शिवाय नेहमीप्रमाणे 1997-98 च्या विजेत्यांवरही यथाकाल स्वतंत्र लेख दिला आहे. असे असले तरी, 'अर्थसंवाद' ने सातत्याने अर्थशास्त्रीय परिभाषा समृद्ध करण्यासाठी 'अर्थ शब्दांची वाट पाहे' या सदरात सातत्याने लिखाण करावे ही अपेक्षा मात्र संदर्भातील वर्षात विशेष साध्य होऊ शकली नाही. या सदराचा प्रारंभ नी.वि. सोवनी यांनी केला आणि तेच फक्त या वर्षात लिहिते झाले. इतर कोणाकडूनही यासाठी लेखणी कामाला आली नाही. खरे तर, अलीकडच्या काही वर्षात असे अनेक नवीन शब्द दैनिक उपयोगात आले आहेत की त्यांच्यासाठी चपखल असे मराठी प्रतिशब्द उपलब्ध नाहीत. 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' ही प्रसिद्ध होऊन बरीच वर्षे झालीत. त्याच्यावरही पुन्हा हात फिरवून त्याला अधिक उपयुक्त बनवायला हवा. त्यादृष्टीने 'अर्थ शब्दांची वाट पाहे' हे सदर सातत्याने उपयोगी पडणारे आहे. तसेच 'परिभाषा कोश' सुधारून वाढविण्यासाठी 'भाषा संचालनालया'ला जागे करावे लागणार आहे एवढेच नव्हे तर परिषदेच्या तज्ज्ञांनी त्यासाठी योगदान द्यावे लागणार आहे. दुसरे, आर्थिक इतिहासातील विषयांवरही लेखन यावे अशी अपेक्षा आहे. हे क्षेत्रही दुर्लक्षिले जात आहे हे बरे नाही.

लेखकांच्या योगदानाबद्दल 1997-98 हे वर्ष थोडेसे बरे ठरले. गतवर्षीच्या 33 लेखकांच्या तुलनेत चालू वर्षातील 39 ही संख्या उत्साहवर्धक मानावी लागेल. असा प्रतिसाद लेखकांकडून मिळत राहिला तर संपादकांना प्रत्येक अंकाच्या वेळी मजकुराची प्रतीक्षा करावी लागणार नाही. अर्थात या आकड्यांमुळे आत्मसंतुष्टता येऊ नये. कारण, सिंचन विशेषांकासाठी चांगली पूर्वतयारी करून 12 ते 13 तज्ज्ञांकडून विशिष्ट पैलूंवर लेख लिहवून मागितले होते ते मिळाले., म्हणून त्यापुढील अंकांसाठी मजकुराची अडचण भासली नाही एवढेच. दुसरे, अधिवेशनातील चर्चासत्रांच्या सूत्रसंचालकांडून वेळेत संपूर्ण अहवाल मिळत नाहीत. यासाठी त्या त्या वर्षाच्या अध्यक्षांनी याचा पाठपुरावा करून छपाईचे वेळापत्रक साधायला मोलाचा हातभार लावला पाहिजे. अधिवेशन संपले की आपली जबाबदारी संपली असे अध्यक्षांनी न मानता त्यानंतरचे उत्तरदायित्व स्वतः लक्ष घालून पूर्ण केले पाहिजे. दुर्दैवाने ही सर्व कामे संपादकांनाच करावी लागताहेत.

लेख व लेखक यांच्या संख्येत वाढ झाली असली तरी लेखकांच्या भौगोलिक प्रदेशानुसार वर्गीकरण केले तर ते अतिशय असममिती स्वरुपाचे आढळते. यामध्ये सिंहाचा वाटा पश्चिम महाराष्ट्राचा आहे. तपशील पाहिल्यास, स्वतंत्र लेखांच्या 24 लेखकांपैकी 20 लेखक, ग्रंथ परिक्षणाच्या 5 लेखकांपैकी 4 लेखक आणि टिपणांच्या 3 लेखकांपैकी 2 लेखक पश्चिम महाराष्ट्रातील होते. विदर्भातील केवळ एकाच लेखकाने या प्रत्येक गटात स्थान मिळविले तर मराठवाड्यातून फक्त एका लेखकाने स्वतंत्र लेखाच्या गटात आपली हजेरी लावली. मराठी अर्थशास्त्र परिषदेने संपर्ण महाराष्ट्राला व्यापले असले तरी आजीव सदस्यांच्या बाबतीत मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश खूपच मागे आहेत. त्याचप्रमाणे 'अर्थसंवाद' च्या जडणघडणीतही या दोन्ही प्रदेशांचे योगदान नगण्य आहे. या दोन्हीतही मराठवाडा तर सर्वसाधारणतः निष्क्रिय आहे असेच म्हणावे लागेल. हा मुद्दा यापूर्वीही मी वार्षिक अहवालांतून निदर्शनास आणला होता. तथापि, या बाबीकडे विदर्भ-

मराठवाड्यातील मंडळींनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे असे नाईलाजास्तव म्हणावे लागते. आता तरी ही मंडळी सक्रिय बनतील काय? यापुढे तरी टोकाची विषमता आढणार नाही यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न करावयाला हवेत.

पुन:पुन्हा सांगावा लागणारा आणखी एक मुद्दा. वार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या बरीच वाढावी ही अपेक्षा अजून पूर्ण होत नाही. संपूर्ण वर्षात ही संख्या जेमतेम 200 पर्यंत पोचते, त्यापुढे सरकत नाही. परिषदेच्या सदस्यांनी आपापल्या महाविद्यालयात 'अर्थसंवाद' घेतला जाईल याकडे आवर्जून लक्ष द्यायला पाहिजे. तसे का घडत नाही हे समजत नाही. दुसरे, एप्रिल महिना उजाडल्यानंतर वर्गणीदाराचे नूतनीकरण करावयाचे असते असे असूनही संपूर्ण वर्षभरात केव्हाही नूतनीकरण करण्यासाठी पैसे पाठविले जातात; अगदी फेब्रुवारी - मार्चपर्यंतही पैसे येत असतात. यामुळे इतक्या उशिरा महाविद्यालयांना मागील अंक देणे शक्य होईलच असे नसते. परिषदेच्या सदस्यांनी आपापल्या महाविद्यालयाची वार्षिक वर्गणी नवीन आर्थिक वर्ष सुरु होताच लवकरात लवकर पाठविली जाईल याची दक्षता घेतल्यास 'अर्थसंवाद' नियमितपणे ग्रंथालयात वाचकांना उपलब्ध होऊ शकेल.

'अर्थसंवाद' च्या वितरणाचे काम पूर्वीप्रमाणेच कोल्हापूरातून झाले. तथापि, अंक 2 आणि 4 यांच्या वितरणाला काहीसा उशीर झाला. अंक 2 हा 'सिंचन विशेषांक' होता. त्यासाठीच्या लेखांची अंतिम हस्तलिखिते संबंधित लेखकांकडून लवकर उपलब्ध झाली नाहीत. शिवाय काही लेखांच्या मूळ इंग्रजीचे मराठीत रूपान्तर करून घेण्याचा प्रश्नही उभा होता. लेखकांनी भाषांतराची असमर्थता दर्शविली तर भाषांतर करणारे सक्षम लेखक लवकर हाताशी लागेनात. अंक 4 हा एकविसाव्या वार्षिक अधिवेशनावर आधारित आहे. याबाबतीतही अध्यक्षीय भाषणाचा बिनचूक मसुदा, सूत्रसंचालकांचे अहवाल आणि विषयांची रूपरेषा यांची हस्तलिखिते मिळण्यात बराच उशीर झाला. त्यामुळे छपाईचे काम लांबून अंक वितरणालाही विलंब झाला. या सर्व बाबी टाळता येण्यासारख्या होत्या. त्यासाठी सर्व संबंधितांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पार पाडणे आवश्यक होते.

आता 'अर्थसंवाद' च्या आर्थिक बाबींचा विचार. छपाईसंबंधीचा महत्त्वाचा तौलनिक तपशील पुढे दिला आहे (तक्ता 1).

**तक्ता 1**

| | तपशील | 1990-91 (खंड 14) | 1996-97 (खंड 20) | 1997-98 (खंड 21) |
|---|---|---|---|---|
| 1 | चारही अंकांच्या एकूण प्रती | 3,200 | 4,300 | 4,400 |
| 2 | चारही अंकांची एकूण पृष्ठे | 302 | 428 | 430 |
| 3 | चारही अंकांचा एकूण खर्च (रु.) | 37,999 | 98,878 | 1,14,167 |
| 4 | दर नगाचा सरासरी छपाई खर्च (रु.) | 11.87 | 22.95 | 25.95 |
| 5 | दर पानाचा सरासरी छपाई खर्च (रु.) | 0.15 | 0.21 | 0.23 |
| 6 | जाहिरातीपासून उत्पन्न (रु.) | 16,900 | 29,000 | 29,455 |

तक्ता 1 वरून पुढील बाबी ध्यानात घेता येतील;

(1) आता 'अर्थसंवाद' च्या प्रत्येक अंकाच्या 1,100 प्रती छापल्या जाताहेत. खंड 20, अंक 4 पासून याची सुरुवात झाली, ती अहवाल वर्षातही चालू राहिली. आजीव सदस्य व वार्षिक वर्गणीदार यांची संख्या वाढती राहिल्यास लवकरच प्रतींची संख्या 1,200 पर्यंत पोचण्याची शक्यता आहे.

(2) चारही अंकांच्या एकूण पृष्ठसंख्येबाबत गतवर्षी 428 चा उच्चांक गाठला होता. चालू वर्षात 430 पानांपर्यंत आपण पोचलो असून एक नवीन शिखर निर्माण केले आहे. आपल्याला आणखी काही वर्षे पानांची संख्या 400 ते 430 या मर्यादेतच स्थिर ठेवावयाची आहे. म्हणजे, प्रत्येक अंक साधारणतः 100 पानांच्या जवळपास राखावयाचा आहे. याचा गेल्या वर्षीच्या अहवालातही मी उल्लेख केला होता.

(3) चारी अंकांच्या एकंदर छपाई खर्चाने अहवाल वर्षात एक लाख रुपयांची मर्यादा ओलांडली आहे. छपाईचा वाढता खर्च याला मुख्यतः कारणीभूत आहे. विशेषतः सिंचन विशेषांकाचे मुखपृष्ठ तसेच 'अर्थसंवाद' ला मिळालेल्या महाराष्ट्र फाऊंडेशन स्मृतिचिन्हाची छपाई यासाठीच्या अधिकच्या खर्चाचा वाटा यात अधिक आहे. एकूण खर्चात कागदाचा खर्च साधारणतः 36 टक्के आहे.

(4) सन 1997-98 मध्ये दर अंकाचा छपाई खर्च गतवर्षीच्या तुलनेने 13.07 टक्क्यांनी वाढला आहे; कालौघात या वाढी अपरिहार्य आहेत आणि त्यासाठी आपल्याला आवश्यक त्या वित्तीय तरतुदी कराव्याच लागतील.

(5) जाहिरातींपासून एकंदर उत्पन्न रु. 29,455 मिळाले. गतवर्षीपेक्षा हे थोडे जास्त आहे आणि आतापर्यंतच्या उत्पन्नात सर्वाधिक आहे. असे असले तरी, हे उत्पन्न मिळविण्यासाठी संपादकांनाच मोठी खटपट करावी लागली याकडे सदस्यांनी डोळेझाक करू नये. व्यंकटेश पाटणकर, अजित डांगे, विनायक देशपांडे एवढ्या तिघानीच जाहिरात मिळवून देऊन हातभार लावला. खरे तर, कार्यकारी मंडळातील अध्यक्षांसह प्रत्येकाने किमान एक जाहिरात मिळवून द्यावी असा आपला संकेत व ठराव असतानाही बहुतेकांनी याकडे सहजपणाने पाठ फिरविली आहे. सर्वांनीच जर हातभार लावला तर जाहिरातीपासून मिळणाऱ्या एकंदर उत्पन्नातून एका अंकाचा संपूर्ण खर्च भागविता येतो. तरी याबाबतीत परिषदेचे पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे सल्लागार मंडळ या सर्वांनीच ठोस पावले उचलली पाहिजेत.

'अर्थसंवाद'ची जमाखर्चाची स्थिती पाहिल्यास सातत्याने तुटीच्या परिस्थितीला आपणास तोंड द्यावे लागते. तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ आणि भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (पश्चिम विभागीय केन्द्र) यांच्याकडून अनुदान मिळत असले तरी ते अपुरे पडते. वर्गणीदार वाढविणे, आजीव सदस्यांची संख्या वाढविणे, जाहिराती मिळविणे आणि व्यक्तिगत अनुदाने मिळविणे या आपल्या हक्काच्या मार्गांवर आपण लक्ष केन्द्रित केले पाहिजे. यासाठी सर्व सदस्यांच्या प्रामाणिक मदतीची गरज आहे. विशेषतः कार्यकारी मंडळावर निवडून येणारे सदस्य यांची याबाबतीत फार मोठी नैतिक जबाबदारी आहे. ती त्यांनी स्वेच्छेने पेलावी असे मी आवाहन करतो.

बदलत्या कालाबरोबर 'अर्थसंवाद' लाही बदलावे लागणारच आहे. त्यानुसार 1997-98 वर्षातील चौथ्या अंकापासूनची 'अर्थसंवाद' ची छपाई आता परंपरागत लेटर-प्रेस पद्धतीची न करता ऑफसेट पद्धतीची करण्यास सुरुवात केली आहे. वास्तविकतः खंड 14 पासून 'अर्थसंवाद' ची छपाई कोल्हापुरात सुरू करण्यापूर्वी काही काल त्याची छपाई पुण्यात ऑफसेट पद्धतीने सुरु होती. संपादकीय बदलामुळे छपाईचे स्थान पुण्याऐवजी कोल्हापूर असे बदलले. परंतु 1990-91 पासूनच्या कालखंडात ऑफसेटपेक्षा लेटर प्रेस छपाई अधिक किफायतशीर होत असल्याने आपण ती स्वीकारली होती. मात्र आता ऑफसेट छपाईचा प्रसार कोल्हापुरातही बराच झाल्याने तिकडे वळणे आपल्याला सोईचे वाटते म्हणून या बदलाचे पाऊल उचलले आहे. त्यामुळे 'अर्थसंवाद' च्या अंतर्बाह्य रूपात सुखद बदल झाल्याचे जाणवेल.

त्यामुळेही अंकाची सर्वसाधारण प्रतिमा उजळून दिसेल. या बदलाचे अनेक वाचकांनी स्वागत केले आहे याचे समाधान आहे.

'अर्थसंवाद' च्या एकविसाव्या खंडाची जडणघडण करण्यासाठी अनेकांचे हात मदतीला आले. लेखक, जाहिरातदार, अनुदान देणाऱ्या संस्था, परिषदेचे पदाधिकारी, 'अर्थसंवाद' सल्लागार मंडळाचे सदस्य आणि हेमंत मुद्रण, कोल्हापूचे मालक व कर्मचारी या सर्वांचा मी ऋणी आहे.

शेवटी, या अहवालाच्या निमित्ताने उपस्थित केलेल्या बाबींची परिषदेच्या सदस्यांनी गांभीर्याने दखल घेऊन 'अर्थसंवाद' ला अधिक प्रभावी नियतकालिक बनविण्यासाठी आपापल्या परीने यथाशक्ती हातभार लावावा हीच सर्वांना कळकळीची विनंती.

■■■■

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन फॉर्म 4, नियम 8 नुसार

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रकाशन स्थळ | मराठी अर्थशास्त्र परिषद', द्वारा/डॉ.आ.गो. पुजारी, प्रपाठक, नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी पुणे - 411 037 |
| 2 | नियतकाल | त्रैमासिक |
| 3 | मुद्रकाचे नाव | डॉ. आ.गो. पुजारी |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | प्रपाठक, नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी पुणे - 411 037 |
| 4 | मुद्रण स्थळ | आर्च ग्राफिक्स, 1897, ई वॉर्ड, राजारामपुरी, 10 वी गल्ली, कोल्हापूर - 416 008. |
| 5 | प्रकाशकाचे नाव | बाब क्र. 3 प्रमाणे |
| 6 | संपादकाचे नाव | डॉ. रवीन्द्र रा. दोशी |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय |
| | पत्ता | 526/1, सूर्यवंशी लेआऊट, सम्राटनगर, कोल्हापूर- 416 008. |
| ७ | मालकाचे नाव | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, बांद्रे (पूर्व) मुंबई - 400 051. |

मी, आ. गो. पुजारी, असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**आ.गो. पुजारी**

मुद्रक व प्रकाशक

# कार्यवाहांचा अहवाल

आ.गो. पुजारी *

## (अ) वार्षिक अहवाल, 1997-98

### 1 वार्षिक अधिवेशन

परिषदेचे एकविसावे वार्षिक अधिवेशन दिनांक 22,23 व 24 नोव्हेंबर, 1997 रोजी नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर यांच्या विद्यमाने पार पडले. दि.व्यं. जहागिरदार हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

### 2 परिषदेचे उपक्रम

(2.1) धुळे जिल्हा अर्थशास्त्र संघाच्या विद्यमाने मराठी अर्थशास्त्र परिषद चतुर्थ अधिवेशन स्मारक व्याख्यानमाला प्रतिवर्षी आयोजित केली जाते. गेल्या तीनचार वर्षाप्रमाणे संयोजकांच्या काही अडचणींमुळे अहवाल वर्षातही व्याख्यानमालेचे आयोजन केले गेले नाही. 1998-99 या वर्षात या उपक्रमाचे पुनरुज्जीवन व्हावे यादृष्टीने परिषदेचे कार्यालय प्रयत्नशील आहे.

(2.2) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने प्रतिवर्षी मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या अर्थशास्त्रविषयक सर्वोत्कृष्ट ग्रंथाच्या लेखकास एक हजार रुपयाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' पारितोषिक दिले जाते. 1996-97 या वर्षासाठी मुक्ता जहागिरदार यांच्या 'अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेपनीती' या ग्रंथास ते देण्यात आले.

(2.3) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने घेतलेल्या एप्रिल-मे 1997 च्या एम. ए. अर्थशास्त्र परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या भोजप्पा बी. शोक्के (चित्रदुर्ग) याना 1996-97 चे 'मराठी अर्थशास्त्र परिषद, पाचवे वार्षिक अधिवेशन पारितोषिक' विद्यापीठाकडून देण्यात आले.

*कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि प्रपाठक, नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.*

(2.4) अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी प्रदान केले जात असलेले 'कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक' यंदा विभागून देण्यात आले. अंजली कुलकर्णी यांच्या 'औद्योगिक क्षेत्रातील संरचनात्मक बदलांची परिणती: :अल्पाधिकार, मक्तेदारी, पूर्ण स्पर्धा?' आणि सुलोचना मानकर यांच्या 'अकोला जिल्ह्यातील जलसंपत्ती-नियोजन, वाटप व वापर' या लेखांना देण्यात आले.

(2.5) 'अर्थसंवाद' मध्ये वर्षभरात प्रकाशित केलेल्या लेखांतून सर्वोत्तम लेखास 'प्रा.मो.स. भावे पारितोषिक' देण्यात येते. 1996-97 या वर्षाचे पारितोषिक नी.वि.सोवनी यांच्या '1931-39 मध्ये हिंदुस्थानातून झालेली सोन्याची अभूतपूर्व निर्यात आणि त्यासंबंधी हिंदी अर्थशास्त्रज्ञात झालेला वादविवाद' या लेखास देण्यात आले.

(2.6) कै. पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानाचे आयोजन मराठी अर्थशास्त्र परिषद आणि खोलेश्वर महाविद्यालय, अंबेजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 18 एप्रिल, 1997 रोजी अंबेजोगाई येथे करण्यात आले. मो.वा. पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'आर्थिक सुधारणांचा कालखंड आणि भारतातील भांडवल बाजार' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकासराव डुबे होते.

(2.7) स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रमांतर्गत दिनांक 7 फेब्रुवारी, 1998 रोजी मराठी अर्थशास्त्र परिषद व प्रताप महाविद्यालय, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सुबोध वागळे व श्री.आ. करंदीकर होते. 'ग्रामीण विद्युतीकरण' या विषयावर त्यानी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी र.पु. कुरुलकर होते.

(2.8) स्वतंत्र भारताच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मराठी अर्थशास्त्र परिषदेने यंदा दोन विशेष कार्यक्रम राबविले. पाहिला उपक्रम शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक 3 ऑक्टोबर, 1997 रोजी झाला. 'भारतातील विषमता आणि दारिद्र्य' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाचे उद्घाटन इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनचे अध्यक्ष डी.एस. अवस्थी यानी केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या विजया डबीर यांच्या प्रास्ताविकानंतर वरील विषयाच्या विविध पैलूंवर निमंत्रित वक्त्यांनी आपले विचार मांडले. श्री. वि. खांदेवाले, विनायक देशपांडे, रा.य. माहोरे, व्यं.सु. पाटणकर, इत्यादींचा त्यामध्ये अंतर्भाव होता. दि.व्यं. जहागिरदार यानी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.

दुसरा उपक्रम मराठी अर्थशास्त्र परिषद आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 26 फेब्रुवारी, 1998 रोजी झाला. आनंद नाडकर्णी हे प्रमुख वक्ते होते. त्यानी 'शासकीय क्षेत्राचे अलीकडील काळातील अर्थसंकल्पीय धोरण: प्रयोजन आणि निष्पत्ती' या विषयावर विवेचन केले. हिरा अद्यंताया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

(2.9) मराठी माध्यमातून अर्थशास्त्रविषयक ग्रंथांचे प्रकाशन हा परिषदेच्या विविध उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा भाग आहे. आतापर्यंत निधीअभावी परिषदेला हे काम पुढे चालू ठेवता आले नव्हते. यंदा बी. एन. दातार यानी परिषदेला विनाअट एक लाख रुपयांची देणगी दिल्यामुळे त्याचा विनियोग ग्रंथ प्रकाशनासाठी करावा असे ठरले. त्यातूनच भ.ग. बापटलिखित 'आंतरराष्ट्रीय व्यापार-सिद्धान्त आणि धोरण' या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाला प्राधान्य देण्यात यावे असे ठरले. याच निधीच्या साहाय्याने परिषदेने आणखी काही पुस्तकांचे पुनर्मुद्रण वा नव्या आवृत्तीचे प्रकाशन करावे असेही ठरले.

### 3 परिषदेचे सदस्य व 'अर्थसंवाद' चे वर्गणीदार

परिषदेचे आजीव, साधारण आणि संस्था सदस्य असे सदस्यत्वाचे तीन प्रकार असून 'अर्थसंवाद' चे वर्गणीदार हा स्वतंत्र गट मुख्यत: ग्रंथालयांचा आहे. या सर्वांची स्थिती अलीकडच्या काही वर्षांत कशी होती हे यासंबंधीच्या तक्ता 1 वरून ध्यानात येईल.

गेल्या तीन वर्षांपासून प्रतिवर्षी सरासरी 35 याप्रमाणे आजीव सदस्यांची संख्या वाढत आहे.

तक्ता 1

| वर्ष | आजीव सदस्य | वार्षिक सदस्य | संस्था सदस्य | | अर्थसंवादचे वर्गणीदार |
|---|---|---|---|---|---|
| | | | शैक्ष-णिक | व्याव-सायिक | |
| 1989-90 | 485 | 46 | 7 | - | 157 |
| 1990-91 | 569 | 42 | 7 | - | 130 |
| 1991-92 | 588 | 22 | 7 | - | 149 |
| 1992-93 | 600 | 11 | 8 | 2 | 165 |
| 1993-94 | 621 | 67 | 6 | 3 | 135 |
| 1994-95 | 652 | 20 | - | 3 | 135 |
| 1995-96 | 719 | 13 | - | 4 | 146 |
| 1996-97 | 761 | 28 | 5 | - | 175 |
| 1997-98 | 821 | 41 | - | 2 | 193 |

अहवाल वर्षात त्यात 60 नी वाढ झाली आहे. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील एकूण आजीव सदस्य संख्येची प्रदेशवार विभागणी केल्यास ढोबळ स्वरुपाचे चित्र तक्ता 2 प्रमाणे दिसेल.

तक्ता 2

| | | |
|---|---|---|
| 1 | पुणे | 151 |
| 2 | मुंबई | 112 |
| 3 | कोल्हापूर | 90 |
| 4 | नाशिक | 52 |
| 5 | जळगांव | 52 |
| 6 | सांगली | 41 |
| 7 | नागपूर | 40 |
| 8 | सोलापूर | 37 |
| 9 | अहमदनगर | 31 |
| 10 | सातारा | 30 |
| 11 | औरंगाबाद | 30 |
| 12 | अमरावती | 25 |
| 13 | धुळे | 23 |
| 14 | ठाणे | 23 |
| 15 | अकोला | 17 |
| 16 | नांदेड | 17 |
| 17 | सिंधुदुर्ग | 6 |
| 18 | बुलढाणा | 5 |
| 19 | चंद्रपूर | 5 |
| 20 | उस्मानाबाद | 4 |
| 21 | भंडारा | 4 |
| 22 | वर्धा | 4 |
| 23 | लातूर | 4 |
| 24 | यवतमाळ | 4 |
| 25 | परभणी | 3 |
| 26 | बीड | 3 |
| 27 | रायगड | 2 |
| 28 | गडचिरोली | 1 |
| 29 | जालना | - |
| 30 | बेळगांव | 8 |
| 31 | दिल्ली | 4 |
| 32 | गोवा | 3 |
| 33 | लखनौ | 1 |
| 34 | बेंगळूर | 1 |
| 35 | विशाखापट्टनम् | 1 |

आजीव सदस्यांच्या संख्येबाबत पुणे, मुंबई, कोल्हापूर तसे आघाडीवर आहेत. महाराष्ट्राच्या इतर भागांतून ही संख्या वाढण्याची आवश्यकता आहे. परिषदेचे पदाधिकारी, विशेषकरून त्या त्या परिसरातील कार्यकारी मंडळ सदस्यांनी, यादृष्टीने प्रयत्न केल्यास निश्चित अनुकूल प्रतिसाद मिळेल असे वाटते.

वार्षिक साधारण सदस्यांच्या संख्येत समाधानकारक वाढ होत नाही. आज ती संख्या केवळ 41 आहे. वार्षिक अधिवेशनात सहभागी होण्यासाठी सदस्यत्वाची अट असल्याने अधिवेशन कालात सदस्य संख्येत थोडीफार भर पडते. परंतु

पुढच्या वर्षी त्यांचे नूतीनकरण होतेच असे नाही. या संख्येत वाढ व्हावी व शक्यतो ते आजीव सदस्य व्हावेत याचा पाठपुरावा सर्वांनी मिळून करावयास हवा.

संस्था सदस्यांची संख्या फारच रोडावली आहे. परिषदेच्या कामकाजात शैक्षणिक व व्यावसायिक संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरावे यासाठी ही संख्या वाढण्याच्या दृष्टीने सर्व सदस्यांनी पुढाकार घेणे जरुरीचे आहे.

'अर्थसंवाद' वर्गणीदारांची या वर्षी संख्या 193 आहे. गतवर्षाच्या मानाने ही संख्या 18 ने वाढली, परंतु गेल्या दोनतीन वर्षात 200 संख्या गाठता आली नाही. वर्गणीदार होण्यासाठी प्राचार्य/ग्रंथपाल याना पत्र लिहिले तर प्रतिसाद चांगला मिळतो असा अनुभव आहे. परिषदेच्या सदस्यांनी आपल्या परिसरातील महाविद्यालये व विद्यापीठातील ग्रंथालयात 'अर्थसंवाद' नियमित येतो किंवा नाही तसेच प्रतिवर्षी 'अर्थसंवाद'चे नूतनीकरण झाले किंवा नाही याचा थोडा जरी दरवर्षी पाठपुरावा केला तरी याबाबतीत मोठे यश मिळू शकेल.

### 4 स्थायी निधी

गेल्या काही वर्षांपासून परिषदेच्या सदस्यांनी आणि हितचिंतकांनी स्थायी निधीतील वाटा यथाशक्ती उचलला आहे. अहवाल वर्षात या निधीत 7,590 रुपयांची भर पडली. परिषदेचे मुखपत्र 'अर्थसंवाद' याची पृष्ठसंख्या वाढत आहे. त्याचबरोबर छपाईचा खर्च व कागदाच्या किमतीदेखील वाढत आहेत. तेव्हा वर्षभर 'अर्थसंवाद'च्या छपाईची तोंडमिळवणी करण्यासाठी संपादकाबरोबरच परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनाही बरीच धावपळ करावी लागते. त्यातून अंशत: का होईना सुटका करून घेण्यासाठी स्थायी निधी वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी आणि सहकार्य करावे.

### 5 अर्थसंवाद

मराठी भाषेमध्ये आर्थिक विचारांना वाहिलेल्या सर्व नियतकांमध्ये परिषदेच्या वतीने प्रकाशित होणारे 'अर्थसंवाद' हे निश्चितच उजवे आहे. प्रतिवर्षी याचे चार अंक प्रकाशित केले जातात. प्रत्येक अंकासाठी लागणारे साहित्य, त्यासाठी करावा लागणारा पाठपुरावा, छपाई व वितरण ही सर्व जबाबदारी 'अर्थसंवाद' चे प्रमुख संपादक रवीन्द्र दोशी यानी अतिशय समर्थपणे सांभाळलेली आहे. या नियतकालिकाचा तपशिलवार अहवाल प्रमुख संपादकांनी स्वतंत्रपणे दिलेला आहे.

'अर्थसंवाद' साठी प्रतिवर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ तसेच पश्चिम विभागीय केन्द्र भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई यांच्याकडून अनुदान मिळते. याबद्दल या दोन्ही संस्थांचे आम्ही ऋणी आहोत.

### 6 महाराष्ट्रातील सिंचनाच्या अर्थशास्त्रीय समस्या: कार्यशाळेचा उपक्रम

महाराष्ट्र शासनाने माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य, दुसरा सिंचन आयोग नियुक्त केल्यानंतर आपल्या कार्यकक्षेत अंतर्भूत होणाऱ्या सर्व विषयांवर संबंधित जाणकार आणि तज्ज्ञांबरोबर विस्तृत चर्चा घडवून आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आयोगाने घेतला. त्याचा एक भाग म्हणून सिंचन आयोगाचे एक सदस्य आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ज्येष्ठ आजीव सदस्य श्री.आ. देशपांडे यांच्यामार्फत सिंचनाच्या अर्थशास्त्रीय पैलूंवर एक कार्यशाळा आयोजित करण्यासंबंधी पुढाकार घेण्याविषयी विनंती करणारे पत्र परिषदेला नोव्हेंबर, 1996 मध्ये आयोगाकडून परिषदेला मिळाले. अमळनेर येथील अधिवेशनाच्या प्रसंगी त्यावर अनौपचारिक चर्चा होऊन अशा कार्यशाळेच्या आयोजनाची जबाबदारी परिषदेने स्वीकारावी असे ठरले. या उपक्रमासाठी रवीन्द्र दोशी यानी निमंत्रक म्हणून काम पाहावे असाही त्यावेळी निर्णय घेण्यात आला.

दिनांक 14 व 15 मे, 1997 रोजी सांगली येथील सांगली अर्बन बँकेच्या सभागृहात परिषद व सिंचन आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महाराष्ट्रातील

सिंचनविषयक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेखन करण्यासाठी काही मान्यवरांना मुद्दाम पाचारण करण्यात आले. त्यात आर. के. पाटील, एस.एन. लेले, एस.बी. साने, एन.वाय. कुलकर्णी, वसंत जुगळे, अशोक मित्रा, नीळकंठ रथ, र.पु. कुरुलकर, राम देशपांडे, नारायण मूर्ती, द.ना. कुलकर्णी, सुधाकर तासगांवकर, सुधाकर कुलकर्णी, विनायक देशपांडे, रवीन्द्र दोशी व आ.गो. पुजारी यांचा समावेश होता. माधवराव चितळे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. त्याच दिवशी तीन सत्रांत व दुसऱ्या दिवसाच्या तीन सत्रांत पाण्याच्या अर्थशास्त्रीय प्रश्नांविषयी सविस्तर चर्चा झाली. सिंचन आयोगाचे सर्व सदस्य जातीने उपस्थित होते. चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी आपल्या अहवाल लेखनासाठी बरीच उपयुक्त माहिती व मार्गदर्शन मिळाल्याचे समाधान माधवराव चितळे यानी व्यक्त केले. आत्तापर्यंत परिषदेला केवळ लोकमान्यता होती, आता राजमान्यताही मिळाल्याचे या उपक्रमाद्वारे सिद्ध झाले. परिषदेच्या एकवीस वर्षाच्या कारकिर्दीतील एक उल्लेखनीय कामगिरी म्हणून त्याची नोंद घेतली जावी. कार्यशाळेच्या आयोजनात सिंचन आयोगाचे सदस्य बापूसाहेब पुजारी आणि सांगली अर्बन बँकेचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी यानी अतिशय परिश्रम घेतले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार

## 7 कार्यालयीन व्यवस्था व आभार

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे नोंदणीकृत कार्यालय मुंबई येथे 'सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज' या संस्थेच्या कार्यालयात प्रारंभापासून आहे. 'सेंटर'च्या बहुमोल सहकार्याबद्दल त्या संस्थेचे विश्वस्त, कार्यकारी मंडळ आणि कार्यालयीन सेवकवर्ग यांचे आम्ही ऋणी आहोत. कार्यालयीन जबाबदारी पार पाडण्यात मला अनेकांचे सहकार्य सातत्याने लाभले आहे. परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि विश्वस्त यांच्याकडून दैनंदिन व नैमित्तिक कामकाजाबाबत अनेक उपयुक्त सूचनांचा लाभ झाला. 'अर्थसंवाद' चे संपादक, परिषदेचे सर्व सदस्य, हितचिंतक, व्यक्ती व संस्था, जाहिरातदार, इत्यादींनी केलेल्या साहाय्याचा आणि मार्गदर्शनाचा मुद्दाम उल्लेख करणे जरूरीचे आहे. या सर्वांचे या निमित्ताने आभार मानतो.

# (आ) बाविसावे वार्षिक अधिवेशन

## 1 उद्घाटन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बाविसावे वार्षिक अधिवेशन शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक 13,14 व 15 नोव्हेंबर, 1998 रोजी संपन्न झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील निवृत्त प्राध्यापक र.पु. कुरुलकर हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते. विदर्भ महाविद्यालयाच्या प्राचार्या विजया डबीर अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षा होत्या. देविदास अग्रवाल स्थानिक कार्यवाह होते.

दिनांक 13, नोव्हेंबर, 1998 रोजी सकाळी 10 वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात अधिवेशनाचा उद्घाटनाचा सोहळा संपन्न झाला. देविदास अग्रवाल यानी अधिवेशन आयोजित करण्याचे औचित्य सांगून प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्षा विजया डबीर यानी शासकीय विदर्भ महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयाने वर्षभर हाती घेतलेल्या काही महत्त्वाच्या उपक्रमांपैकी प्रस्तुत अधिवेशनाचे आयोजन हा एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. विदर्भाची व अमरावती शहराची महती सांगत असताना या भूमीने मराठी सारस्वताला जी अनेक नररत्ने दिली त्यांचा आदराने त्यानी आवर्जून उल्लेख केला. महाविद्यालयाच्या उभारणीपासूनच्या पंचाहत्तर वर्षांच्या कालावधीत महाविद्यालयाने या परिसरात अविरतपणे शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामाचा आढावाही त्यानी घेतला. या पार्श्वभूमीवर मराठी अर्थशास्त्र परिषदेचे बाविसावे वार्षिक अधिवेशन अमरावती येथे आयोजित करण्यामागील औचित्याकडे त्यानी लक्ष वेधले. मराठी अर्थशास्त्र परिषदेने गेल्या बावीस वर्षांच्या काळात केलेल्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कामगिरीचा विस्तृत परिचय कार्याध्यक्ष व्यं.सु. पाटणकर यानी करून दिला आणि भविष्यातील सर्वांगीण प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु श्री. तु. देशमुख यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन झाले. अर्थशास्त्राचे साहित्य मराठी माध्यमातून लिहिण्याचे परिषदेचे उपक्रम केवळ स्तुत्य नसून प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटणारी घटना आहे. बऱ्याच विकसित राष्ट्रांत त्यांच्या मातृभाषेत त्याना शिक्षण मिळते. म्हणून मातृभाषेतून अभिव्यक्ती सुलभ होते. आपल्या देशातील प्राध्यापकांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण होत नाहीत म्हणून त्यांच्याकडून होणारे संशोधन देखील कसदार होत नसल्याची खंत त्यानी व्यक्त केली. प्रत्येक परिसरात विकासाचे विचार रुजले पाहिजेत, त्या त्या परिसरातील समस्यांचा विचार करून नियोजन करावयास हवे. पुण्या-मुंबईचे लोक येऊन विदर्भाचा विकास करणार नाहीत. र.पु. कुरुलकर यांचे 'महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल: समस्या आणि उपाय' या विषयावर अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाच्या शेवटी परिषदेच्या वतीने कार्यवाह आ.गो. पुजारी यानी आभार मानले तर संयोजकांच्या वतीने स्थानिक कार्यवाह देविदास अग्रवाल यानी आभार मानले.

## 2 चर्चासत्रे

पूर्वनियोजित विषयावर चर्चासत्रे हा अधिवेशनाचा महत्त्वाचा भाग होय. यावर्षी एकूण 35 निबंध सादर करण्यात आले होते. ही संख्या अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने सूत्रसंचालकांच्या मार्गदर्शनाखाली काही निबंध पूर्ण तर काही निबंध गोषवारांच्या स्वरुपात छापले गेले. पूर्वनियोजित सूत्रसंचालकांनी आपापल्या विषयाच्या निबंधांचे परिशीलन करून त्यातील प्रतिपादनाचा आशय लक्षात घेऊन, त्यांचे सोयिस्कर वर्गीकरण करून त्यातील ठळक मुद्दे आणि निष्कर्ष यावर आधारलेले टिपण त्या त्या चर्चासत्राच्या प्रारंभी प्रास्ताविकादाखल सादर केले. र.पु. कुरुलकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व चर्चासत्रे पार पडली.

दिनांक 13 नोव्हेंबर, 1998 रोजी पहिले चर्चासत्र झाले. चर्चेसाठी 'भारतातील बेकारीची समस्या' हा विषय होता. संतोष दास्ताने यानी सूत्रसंचालन केले. सुधाकर अंभोरे, सुमित्रा पवार, रत्नाकर पाटील, शकुंतला बिराजदार, प्र.ब. कुलकर्णी, नितीन जाधव, मुक्ता जाहगिरदार, रामचंद्र रसाळ, प्रवीण जाधव, विनायक देशपांडे, ज.फा. पाटील आणि उत्तम वाकोडकर यानी निबंध वाचले. आ.गो. पुजारी, रवीन्द्र दोशी, वसंत जुगळे, सुभाष दगडे, ख्वाजाभाई पठाण, शंकर खोकले, दिलीप पाटील, अ.रा. पडोशी, गो.नी. हडप, सर्जेराव ठोंबरे, मृणालिनी फडणवीस, सु.दा. तुपे, मेधा देशपांडे, वसंत पाटील, मोहन चौधरी, खासेराव शितोळे, नंदकिशोर सुदा, कारमोरे व पुष्पा इंदूलकर यानी चर्चेत सहभाग घेतला.

भारताचे सुपुत्र अमर्त्यकुमार सेन याना यंदाचे अर्थशास्त्र विषयातील सर्वोच्च बहुमानाचे नोबेल पारितोषिक मिळाल्याचे औचित्य साधून संयोजकानी 'सेन यांचे अर्थशास्त्रातील योगदान' या विषयावर याच दिवशी संध्याकाळी 5-30 वाजता एक विशेष चर्चासत्र आयोजित केले होते. त्यात मुक्ता जहागिरदार यानी 'अर्थशास्त्र व नीतीशास्त्र' श्रीनिवास खांदेवाले यानी 'कल्याणकारी अर्थशास्त्र व समानता,' आणि ज.फा. पाटील यानी 'दारिद्र्य व दुष्काळ' या विषयावर विवेचन केले. औचित्याला धरून कार्यक्रम आयोजित करण्याची संयोजकांची कल्पकता निश्चितच स्तुत्य आहे.

दुसरे चर्चासत्र दिनांक 14 नोव्हेंबर, 1998 रोजी सकाळी 9-00 वाजता सुरू झाले. 'महाराष्ट्रातील ऊर्जा समस्या' हा चर्चेचा विषय होता. सर्जेराव ठोंबरे यानी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी रा.य. माहोरे, लतिका अरगडे, सोळुंके, कटके, राजश्री काशीकर व दत्तात्रय चौगुले यानी निबंध सादर केले. या विषयावरील चर्चेत सु.दा. तुपे, शं.तु. खोकले, आ.गो. पुजारी, सुभाष दगडे, रवीन्द्र दोशी, मोहन चौधरी, गंगाधर शिरवडे, मिसाळ, दिलीप पाटील, रसाळ, श्रीराम पेडगांवकर, उत्तम वाकोडकर, कारमोरे, पाटील, संजिव लाटे, मेघा देशपांडे, यानी भाग घेतला.

याच दिवशी दुपारी 3.00 वाजता आयत्या वेळेचा विषय म्हणून नियोजित केलेल्या 'दक्षिण-पूर्व आशियातील चलन संकट व भारत' या विषयावर चर्चासत्र झाले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून शरद बोकील याना पाचारण केले होते. त्यानी या विषयावर

सविस्तर विवेचन केल्यानंतरच्या चर्चेत रवीन्द्र दोशी, मृणालिनी फडणवीस, दि.व्यं. जहागिरदार,अ.रा. पडोशी, विनायक देशपांडे, भगवान मस्के, ज.फा. पाटील, बिराजदार, गि.सो. कल्याणकर आणि रामदास माहोरे यानी भाग घेतला.

चौथे चर्चासत्र दिनांक 15 नोव्हेंबर, 1998 रोजी सकाळी 8.30 ला सुरू झाले. श्रीराम पेडगांवकर हे सूत्रसंचालक होते. 'आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप' हा चर्चेसाठीचा विषय होता. गि.सो. कल्याणकर, धनश्री महाजन, दि.व्यं. जहागिरदार यानी निबंध वाचन केले तर रवीन्द्र दोशी, शरद जोशी, वसंत जुगळे, सर्जेराव ठोंबरे, अ.रा. पडोशी, मृणालिनी फडणवीस, बिराजदार आणि गंगाधर शिरवडे यानी चर्चेत सहभाग घेतला.

याच दिवशी दुपारी 11.30 वाजता अधिवेशनाचा समारोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी अधिवेशनाचे अध्यक्ष र.पु. कुरुलकर होते. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू उलेमाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. समारोपाच्या शेवटी परिषदेच्या वतीने आ.गो. पुजारी यानी आणि संयोजकांच्या वतीने देविदास अग्रवाल यानी आभार मानले.

### 3 पारितोषिके

'अर्थसंवाद' मध्ये वर्षभरात प्रकाशित केलेल्या लेखांतून एका सर्वोतम लेखास 'मो. स. भावे पारितोषिक' देण्यात येते. 1997-98 या वर्षाचे पारितोषिक, र.पु. कुरुलकर यांच्या 'महाराष्ट्रातील सिंचनाच्या पाण्याची दर आकारणी: एक आढावा' या लेखास प्रदान करण्यात आले. अधिवेशनातील चर्चासत्रासाठी सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट निबंधासाठी प्रदान केले जात असलेले 'ग. प्र. पिंपरकर पारितोषिक' ज.फा. पाटील व पां.ना. गावडे यानी संयुक्तपणे लिहिलेल्या 'भारतातील बेरोजगारी: आंतरराज्य तुलना' या निबंधास देण्यात आले. दरवर्षी मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या अर्थशास्त्रविषयक सर्वोत्कृष्ट ग्रंथाच्या लेखकास दिले जाणारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक' 1997-98 या वर्षासाठी सी.पं.खेर यांच्या 'क्रांतीकारी अर्थशास्त्रज्ञ: जॉन मेनार्ड केन्स' या ग्रंथास देण्यात आले.

### 4 कार्यकारी मंडळाची सभा

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभा 12 नोव्हेंबर, 1998 रोजी सायंकाळी 5.30 वाजता आणि 13 नोव्हेंबर, 1998 रोजी रात्री 9.00 वाजता या दोन दिवशी शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे झाल्या. सभेच्या अध्यक्षस्थानी र.पु. कुरुलकर हे होते. सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आले.

(1) थोर अर्थतज्ज्ञ एम.एल. दांतवाला यांचे नुकतेच देहावसान झाले. त्याना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

(2) भारताचे थोर सुपुत्र अमुर्त्य सेन याना अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

(3) दिनांक 21 व 22 नोव्हेंबर, 1997 रोजी सायंकाळी 5.00 वाजता नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर येथे झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभांच्या कार्यवृत्तांताना मंजुरी देण्यात आली.

(4) कार्यवाह-खजिनदारानी सादर केलेला 1997-98 चा वार्षिक अहवाल स्वीकारण्यात आला.

(5) 'अर्थसंवादच्या' प्रमुख संपादकांनी सादर केलेला 'अर्थसंवाद'चा 1997-98 चा वार्षिक अहवाल त्यातील परिच्छेद सहा मधील सहाव्या ओळीतील 'अक्षम्य' हा शब्द वगळून स्वीकारण्यात आला.

(6) लेखापालांच्या 1997-98 या वर्षाच्या तपासणी हिशोबास मंजुरी देण्यात आली.

(7) 1999-2000 या वर्षाच्या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली.

(8) 1998-99 या वर्षासाठी आनंद करवंदे, सोलापूर या लेखापालांची नियुक्ती करून त्याना

मेहेनताना रु. 750/- देण्याचे ठरविण्यात आले.

(9) परिषदेच्या तेविसाव्या वार्षिक अधिवेशनाचे स्थान व चर्चासत्राचे विषय यासबंधी सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात आली.

(10) कार्यवाह - खजिनदार यानी घटना दुरुस्ती उपसमितीचा अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 1997-98 च्या एकविसाव्या वार्षिक अहवालात दिलेला होता. त्यावर चर्चा होऊन घटना दुरुस्तीचा संमत झालेला मसुदा या अहवालाच्या 'परिशिष्ट' मध्ये दिला आहे.

**(11) अध्यक्षांच्या संमतीने चर्चिले गेलेले आयत्यावेळचे विषय**

(अ) भ.ग. बापट यांच्या 'आंतरराष्ट्रीय व्यापार-सिद्धान्त आणि धोरण' या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे काम पूर्ण झाल्याची कल्पना सभेला देण्यात आली. पुस्तकाचे पुनर्मुद्रण करण्यासाठी बापट यानी संमती दिल्याबद्दल परिषदेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

(आ) परिषदेचे ज्येष्ठ सदस्य श्री. आ. देशपांडे यानी आपल्या 75 व्या वाढदिवसानिमित्त 'अर्थसंवाद'च्या स्थायी निधीस रु. 5,000/- देणगी दिली त्याबद्दल परिषदेच्या वतीने ऋण व्यक्त करण्यात आले.

(इ) ग.प्र. पिंपरकर लिखित 'मूल्य व वितरण: सैद्धान्तिक विवेचन,' विद्या प्रकाशन, नागपूर या ग्रंथाच्या दोनही भागांचे पुनर्मुद्रण परिषदेने करावे असे ठरले. या संदर्भात लेखक व त्यांच्या कुटुंबियांकडून रीतसर मान्यता मिळविणे, योग्य त्या ठिकाणी ग्रंथाच्या पुनर्मुद्रणाचे काम करण्याची पूर्ण जबाबदारी व हक्क कार्याध्यक्ष आणि कार्यवाह-खजिनदार याना देण्यात आले.

(ई) परिषदेला एक स्वतःची कायमस्वरूपी वास्तू असावी यासाठी प्रयत्न करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आली. अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, के.जी. पठाण, ज.फा. पाटील, विनायक देशपांडे, दि.व्यं. जहागिरदार, श्रीराम पेंडगावकर व भगवान मस्के हे त्या उपसमितीचे सदस्य राहतील.

(उ) 1998-99 या वर्षापासून 'अर्थसंवाद' च्या संपादकाना प्रत्येक अंकास रु. 500/- मानधन द्यावयाचे ठरले होते. परंतु सध्याचे संपादक रवीन्द्र दोशी यानी परिषदेची सध्याची आर्थिक परिस्थिती आणि विनामोबदला संपादकीय जबाबदारी पेलण्याची आजवरची परंपरा लक्षात घेऊन मानधन घेण्याचे विनयपूर्वक नाकारले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

(ऊ) महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रादेशिक अर्थशास्त्र परिषदा संघटित होत आहेत. त्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या भगिनी परिषदा आहेत. त्याना परिषदेच्या कामकाजामध्ये प्रातिनिधिक स्वरुपात सामावून घ्यावे या आशयाचे पत्र नी.वि. सोवनी यानी परिषदेकडे दिले होते. त्याविषयी विचार करून शिफारशी करण्याचे काम (इ) मध्ये नमूद केलेल्या उपसमितीकडे सोपविण्यात आले.

(ए) परिषदेच्या वतीने ज्या नवीन गुंतवणुका प्रतिवर्षी कराव्या लागतात त्यासाठीचे योग्य ते निर्णय घेण्याचा अधिकार कार्याध्यक्ष व कार्यवाह खजिनदार याना देण्यात आला.

(ऐ) प्राध्यापक अमर्त्य सेन यांच्या अर्थशास्त्रातील योगदानाविषयी परिषदेने शक्य झाल्यास एक परिसंवाद आयोजित करावा.

(ओ) 1999-2000 या वर्षातील जमनालाल बजाज उपक्रमाचे आयोजन करण्यास अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर या महाविद्यालयास संमती देण्यात आली.

(औ) मुंबई येथे सिंचन आयोग व परिषदेच्या संयुक्त विद्यमाने 'मुंबई महानगरामधील उपनगरी पाणी पुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन यांच्या अर्थशास्त्रीय समस्या' या विषयावर डिसेंबरमध्ये होणाऱ्या चर्चासत्राची माहिती दिली.

## 5 वार्षिक सर्वसाधारण सभा

मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 14 नोव्हेंबर, 1998 रोजी सायंकाळी 5.00 वाजता शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी र.पु. कुरुलकर हे होते. सभेत खालील निर्णय घेण्यात आले.

(1) थोर अर्थतज्ज्ञ एम.एल. दांतवाला यांचे नुकतेच देहावसान झाले. त्याना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

(2) भारताचे सुपुत्र अमर्त्य सेन याना नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

(3) दिनांक 23 नोव्हेंबर, 1997 रोजी सायंकाळी 5.00 वाजता नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली.

(4) कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेला 1997-98 चा वार्षिक अहवाल स्वीकारण्यात आला.

(5) 'अर्थसंवाद' च्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला 'अर्थसंवाद' चा 1997-98 चा वार्षिक अहवाल त्यातील परिच्छेद सहा मधील सहाव्या ओळीतील 'अक्षम्य' हा शब्द वगळून स्वीकारण्यात आला.

(6) लेखापालांच्या 1997-98 या वर्षाच्या तपासणी हिशोबास मंजुरी देण्यात आली.

(7) 1999-2000 या वर्षाच्या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली.

(8) 1998-99 या वर्षासाठी आनंद करवंदे, सोलापूर या लेखापालांची नियुक्ती करून त्यांचा मेहेनताना रु. 750/- ठरविण्यात आला.

(9) परिषदेच्या तेविसाव्या वार्षिक अधिवेशनासाठी लेखी स्वरुपात कोणाचेही निमंत्रण आले नसल्याकारणाने निमंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याचे अधिकार कार्याध्यक्ष व कार्यवाह-खजिनदार याना देण्यात आले. चर्चासत्रांचे विषय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले:

1 वि. म. दांडेकर यांचे आर्थिक विचार

2 भारतातील शेतीमालाचे विपणन

3 महाराष्ट्रातील आधारभूत संरचना: सद्यःस्थिती व भविष्यातील वाटचाल

(10) सन 1999-2000 या वर्षासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आणि तेविसाव्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पुणे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मधील प्राध्यापक सु.दा. तुपे यांची निवड करण्यात आली.

(11) 1999-2002 या कालावधीसाठी कार्याध्यक्ष म्हणून त्र्यं.सु. पाटणकर यांची निवड करण्यात आली.

(12) 1999-2002 या कालावधीसाठी कार्यवाह-खजिनदार म्हणून आ.गो. पुजारी यांची निवड करण्यात आली.

(13) 1999-2002 या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावर पुढील तीन सदस्यांची निवड करण्यात आली:

1 सुधाकर नामदेवराव अंभोरे

2 पांडुरंग नागू गावडे

3 संपत नामदेव गंभिरे

(14) 1999-2001 या कालावधीसाठी परिषदेचे एक विश्वस्त म्हणून श्रीनिवास खांदेवाले यांची निवड करण्यात आली.

(15) कार्यवाह-खजिनदार यानी घटना दुरुस्ती उपसमितीचा अहवाल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या

1997-98 च्या एकविसाव्या वार्षिक अहवालात दिलेला होता. चर्चेनंतर तो परिशिष्टात दिल्याप्रमाणे स्वीकारण्यात आला.

**(16) अध्यक्षांच्या संमतीने चर्चिले गेलेले आयत्या वेळचे विषय**

(अ) भ.ग. बापट यांच्या 'आंतरराष्ट्रीय व्यापार-सिद्धान्त आणि धोरण' या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे काम पूर्ण झाल्याची कल्पना सभेला देण्यात आली. लेखकांनी पुस्तकाचे पुनर्मुद्रण करण्यासाठी संमती दिल्याबद्दल परिषदेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

(आ) परिषदेचे ज्येष्ठ सदस्य श्री. आ. देशपांडे यानी आपल्या 75 व्या वाढदिवसानिमित्त 'अर्थसंवाद'च्या स्थायी निधीस रु. 5,000/- देणगी दिली त्याबद्दल परिषदेच्या वतीने ऋण व्यक्त करण्यात आले.

(इ) ग.प्र. पिंपरकरलिखित 'मूल्य व वितरण : सैद्धान्तिक विवेचन,' विद्या प्रकाशन, नागपूर या ग्रंथाच्या दोनही भागांचे परिषदेने पुनर्मुद्रण करावे असे ठरले. या संदर्भात लेखक व त्यांच्या कुटुंबियांकडून रीतसर मान्यता मिळविणे, योग्य त्या ठिकाणी ग्रंथाच्या पुनर्मुद्रणाचे काम करण्याची पूर्ण जबाबदारी व हक्क कार्याध्यक्ष आणि कार्यवाह - खजिनदार याना देण्यात आले.

(ई) परिषदेला एक स्वतःची कायमस्वरूपी वास्तू असावी यासाठी प्रयत्न करण्यासाठी एक उपसमिती नेमण्यात आली. अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, के.जी. पठाण, ज.फा. पाटील, विनायक देशपांडे, दि.यं. जहागिरदार, श्रीराम पेडगावकर व भगवान मस्के हे त्या उपसमितीचे सदस्य राहतील.

(उ) 'अर्थसंवाद' च्या संपादकाना प्रत्येक अंकास रु. 500/- मानधन द्यावयाचे ठरले होते. परंतु सध्याचे संपादक रवीन्द्र दोशी यानी परिषदेची सध्याची आर्थिक परिस्थिती आणि विनामोबदला संपादकीय जबाबदारी पेलण्याची आजवरची परंपरा लक्षात घेऊन मानधन घेण्याचे विनयपूर्वक नाकारले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

(ऊ) महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रादेशिक अर्थशास्त्र परिषदा संघटित होत आहेत. त्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या भगिनी परिषदा आहेत. त्याना परिषदेच्या कामकाजामध्ये प्रातिनिधिक स्वरुपात सामावून घ्यावे या आशयाचे पत्र नी.वि. सोवनी यानी परिषदेकडे दिले होते. त्याविषयी विचार करून शिफारशी करण्याचे काम (इ) मध्ये नमूद केलेल्या उपसमितीकडे सोपविण्यात आले.

**6 'अर्थसंवाद' सल्लागार मंडळाची सभा**

सल्लागार मंडळाची सभा दिनांक 12 नोव्हेंबर, 1998 रोजी दुपारी 4.30 वाजता शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती येथे झाली. एम.एल. दांतवाला याना श्रद्धांजली वाहिल्यानंतर प्रमुख संपादकांनी सादर केलेल्या 1997-98 वर्षाच्या अहवालावर साधकबाधक चर्चा झाली आणि तो अहवाल मान्य करण्यात आला. जाहिराती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. लेखन साहाय्य मिळत राहण्यासाठी सर्वांनीच जागरूक राहावे असे ठरविले. प्रमुख संपादकांना 1998-99 पासून प्रत्येक अंकाला रु. 500/- मानधन देण्याचे परिषदेने गेल्या अधिवेशनात ठरविले होते. ते न घेण्याचे परिषदेला कळविले असल्याची माहिती प्रमुख संपादकांनी दिली. अमर्त्य सेन याना अर्थशास्त्राचे 1998 चे नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# परिशिष्ट (घटना दुरुस्ती - अंतिम मसुदा)

<table>
<tr><th>घटनेतील मूळ कलम</th><th colspan="3">घटनेतील दुरुस्ती</th></tr>
<tr><td rowspan="13">कलम 10:<br>निवडणुका : पोटकलम (6)<br>मतदान हस्तप्रदर्शनाने होईल. परंतु कोणाही सदस्याने मागणी केल्यास अध्यक्षांच्या अनुमतीने मतदान गुप्त पद्धतीने होईल.</td><td colspan="3">कलम : 10: निवडणुका : पोटकलम (6)<br>(अ) कार्यकारी मंडळावरील नऊ निर्वाचित सदस्यांची निवड गटवार पद्धतीने होईल. त्यासाठीचे गट व सदस्य संख्या पुढीलप्रमाणे</td></tr>
<tr><th>गट क्र.</th><th>विद्यापीठ</th><th>सदस्य संख्या</th></tr>
<tr><td>1</td><td>पुणे विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>2</td><td>मुंबई विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>3</td><td>शिवाजी विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>4</td><td>नागपूर विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>5</td><td>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>6</td><td>अमरावती विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>7</td><td>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>8</td><td>स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ</td><td>1</td></tr>
<tr><td>9</td><td>गोवा विद्यापीठ, श्रीमती ना.दा. ठाकरसी विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, अन्य अभिमत विद्यापीठे, कृषि विद्यापीठे व उपरोक्त (गट 1 ते 8) क्षेत्र वगळता इतर क्षेत्रांतील सदस्य</td><td>1</td></tr>
<tr><td colspan="3">टीप :<br>(1) 'गट' म्हणजे एखाद्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये ज्या सदस्याचे वास्तव्य आहे ते त्या गटामध्ये समाविष्ट होतील.<br>(2) त्या त्या गटामधील सदस्यांनाच कार्यकारी मंडळावरील जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येईल.<br>(3) प्रत्येक वर्षी ज्या गटातून सदस्य निवृत्त होतील त्याच गटातून नवीन सदस्यांची निवड केली जाईल.<br>(4) ज्या गटात उमेदवारांची संख्या निवडावयाच्या उमेदवाराच्या संख्येपेक्षा अधिक असेल त्या गटासाठीची निवड मतदान पद्धतीने करण्यात येईल. परिषदेचे अध्यक्ष ही प्रक्रिया पूर्ण करतील आणि निवड जाहीर करतील.</td></tr>
<tr><td colspan="3"></td></tr>
<tr><td>कलम : 4 : कार्यकारी मंडळ<br>2 (ग)<br>प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद' पदसिद्ध : एक</td><td colspan="3">कलम 4: कार्यकारी मंडळ - 2 (ग)<br>प्रमुख संपादक, नियतकालिक - पदसिद्ध : एक</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| कलम 10 : निवडणुका<br>(4) निवडणुकीसाठी उभी राहणारी व्यक्ती वार्षिक सभेपूर्वी निदान दोन महिने आधी परिषदेची वर्गणी पूर्णपणे भरलेली सदस्य असली पाहिजे.<br><br>(5) सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्यांसहित उमेदवारीसाठीचा अर्ज परिषदेच्या कार्यवाह-खजिनदारांकडे वार्षिक सभेस आरंभ होण्यापूर्वी किमान एक तास अगोदर पोहोचला पाहिजे. | कलम 10 : निवडणुका -<br>निवडणुकीसाठी उभी राहणारी व्यक्ती वार्षिक सभेपूर्वी किमान पुढील तीन (4) वर्षांची वर्गणी पूर्णपणे भरलेली वार्षिक सर्वसाधारण सदस्य अथवा आजीव सदस्य असली पाहिजे.<br><br>(5) सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्यांसहित उमेदवारीसाठीचा अर्ज परिषदेच्या कार्यवाह - खजिनदारांकडे वार्षिक सभेस आरंभ होण्यापूर्वी किमान *एक दिवस* अगोदर पोहोचला पाहिजे. |
| कलम 6 : कार्यकारी मंडळाचे कार्य: (11) नियतकालिकांच्या संपादन सल्लागार मंडळाची नियुक्ती करणे, त्याची मुदत ठरविणे. त्याची पुनर्रचना करणे व ते विसर्जित करणे. | कलम 6 : कार्यकारी मंडळाचे कार्य - (11)<br>(अ) नियतकालिकांच्या संपादकांची नियुक्ती करणे.<br>(आ) संपादकांच्या शिफारशीनुसार सल्लागार मंडळाची नियुक्ती करणे, त्याची पुनर्रचना करणे, त्याची मुदत ठरविणे वा ते विसर्जित करणे. संपादन सल्लागार मंडळाची मुदत तीन वर्षांची राहील. |
| कलम 5 : (5)<br>दैनंदिन खर्चाकरिता कार्यवाह-खजिनदारांना स्वत:जवळ जास्तीत जास्त रुपये *शंभर* एवढी रक्कम ठेवता येईल. | कलम 5 : (5)<br>दैनंदिन खर्चाकरिता कार्यवाह- खजिनदारांना स्वत:जवळ जास्तीत जास्त रुपये *एक हजार* एवढी रक्कम ठेवता येईल. |

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# वार्षिक वर्गणी संपली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे वार्षिक वर्गणीदार याना आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की, 'अर्थसंवाद' च्या जानेवारी-मार्च, 1999 या अंकाबरोबर ज्यांची वार्षिक वर्गणीची मुदत संपली आहे त्यानी 1 एप्रिल 1999 ते 31 मार्च 2000 या वर्षासाठी आपल्या सदस्यत्वाचे आणि 'अर्थसंवाद' च्या वर्गणीदाराचे नूतनीकरण करून घ्यावे ही विनंती. ही वर्गणी कार्यवाह-खजिनदार, डॉ. आ.गो. पुजारी, पुणे यांच्या पत्त्यावर पाठवावी.

**आ.गो. पुजारी**
कार्यवाह-खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## खर्च – उत्पन्न पत्रक : दिनांक : 31-3-1998 अखेरचे

### (अ) अर्थसंवाद

| | | | |
|---|---|---|---|
| छपाई | 86,962.00 | 'अर्थसंवाद' वार्षिक वर्गणी | 18,805.00 |
| कागद | 34,100.00 | जाहिरात | 26,748.00 |
| टपाल खर्च | 8,483.90 | सा.सं.म. मुदत ठेव व्याज (अनुदान) | 12,496.00 |
| मेहेनताना | 1,900.00 | | |
| टायपिंग व झेरॉक्स | 146.10 | तूट: मराठी अर्थशास्त्र परिषदेकडे वर्ग | 72,870.74 |
| वाहतूक खर्च | 133.74 | | |
| किरकोळ खर्च | 62.00 | | |
| बँक चार्जेस | 32.00 | | |
| | 1,30,919.74 | | 1,30,919.74 |

### (आ) मराठी अर्थशास्त्र परिषद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रवास | 6,252.50 | वार्षिक सदस्य वर्गणी | 200.00 |
| मुंबई कार्यालयास सेवाशुल्क (1996-97 व 1997-98) | 4,800.00 | ग्रंथ व अंक विक्री | 3,526.00 |
| | | बचत खात्यावरील व्याज | 2,932.55 |
| पारितोषिक | 1,575.00 | पां.वा. गाडगीळ स्मृती अनुदान | 5,000.00 |
| टेलिफोन | 2,213.60 | मुदत ठेवीवरील व्याज/लाभांश | 84,824.24 |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | 7,111.00 | तूट: | 23,860.80 |
| टपाल | 3,729.00 | | |
| मेहेनताना | 4,750.00 | | |
| बँक चार्जेस | 1,351.05 | | |
| टंकलेखन व झेरॉक्स | 1,850.40 | | |
| बांधणी खर्च | 1,400.00 | | |
| जमनालाल बजाज उपक्रम खर्च | 5,970.00 | | |
| पां.वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान | 5,570.00 | | |
| ऑडिट फी | 750.00 | | |
| किरकोळ खर्च | 150.30 | | |
| 'अर्थसंवाद'ची तूट | 72,870.74 | | |
| | 1,20,343.59 | | 1,20,343.59 |

स्थळ : सोलापूर

ता. 22-06-1998

स्वतंत्र श्रेयास पात्र राहून तपासले आणि बरोबर आढळले.

**आनंद करवंदे,** चार्टर्ड अकौंटंट

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## 31 मार्च, 1998 अखेरचा ताळेबंद

| देणे | रक्कम (रु.) | जिंदगी | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| **निकाय निधी** | 8,321.00 | गुंतवणूक | 7,83,607.00 |
| गेल्या वर्षाची शिल्लक 6,231.00 | | | |
| चालू वर्षातील जमा 2,010.00 | | **बँक शिल्लक** | 23,580.49 |
| **आजीव सदस्य वर्गणी** | 3,18,631.00 | स्टेट बँक ऑफ | |
| गेल्या वर्षाची | | इंडिया, दादर 20,287.24 | |
| शिल्लक 2,89,821.00 | | बँक ऑफ | |
| चालू वर्षातीलजमा 28,810.00 | | इंडिया, पुणे 1,166.75 | |
| **प्रकाशन निधी** | 10,590.07 | स्टेट बँक ऑफ | |
| | | इंडिया, मंगळवेढा 1,295.50 | |
| गेल्या वर्षीची | | विद्या सहकारी | |
| शिल्लक 10,090.07 | | बँक, पुणे 452.00 | |
| चालू वर्षातील जमा 500.00 | | स्टेट बँक ऑफ | |
| | | इंडिया, नाशिक 379.00 | |
| **'अर्थसंवाद' देणगी** | 90,000.00 | **रोख शिल्लक** | 6,509.20 |
| इंडियन ऑईल | | पुणे कार्यालय 22.25 | |
| कॉर्पोरेशन 40,000.00 | | कोल्हापूर कार्यालय 285.20 | |
| महाराष्ट्र फाऊंडेशन 50,000.00 | | मंगळवेढा कार्यालय 1,894.15 | |
| निर्दिष्ट निधी व देणग्या | 3,67,024.81 | नाशिक कार्यालय 1,058.45 | |
| 'अर्थसंवाद' आगाऊ | | मुंबई कार्यालय 3,249.15 | |
| वर्गणी | 1,145.00 | 'अर्थसंवाद' वार्षिक | |
| यूको बँक, कोल्हापूर | 13,964.00 | वर्गणी येणे | 20.00 |
| **पां.वा. गाडगीळ** | | तूट | 1,709.19 |
| **स्मृती व्याख्यान** | 5,000.00 | वर्षातील तूट 23,860.80 | |
| गेल्या वर्षाची शिल्लक 5,000 | | वजा गेल्या वर्षातील | |
| अधिक चालू | | आधिक्य 22,151.61 | |
| जमा 5,000 | | | |
| 10,000 | | | |
| वजा खर्चाची तरतूद 5,000 | | | |
| ऑडिट फी | 750 | | |
| | **8,15,425.85** | | **8,15,425.85** |

स्थळ : सोलापूर

ता. 22-06-1998

स्वतंत्र शेऱ्यास पात्र राहून तपासले आणि बरोबर आढळले.

**आनंद करवंदे**, चार्टर्ड अकौंटंट

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सन 1999 - 2000 साठी उत्पन्न - खर्चाची अंदाजपत्रके

### (अ) अर्थसंवाद

| | | | |
|---|---|---|---|
| छपाई (कागदासह) | 1,28,000.00 | 'अर्थसंवाद' वार्षिक वर्गणी | 20,000.00 |
| टपाल | 12,000.00 | जाहिरात | 30,000.00 |
| टेलिफोन | 1,000.00 | सा.सं.मं. मुदत ठेवीवरील व्याज | 10,000.00 |
| मेहेनताना | 2,000.00 | भारतीय सामाजिक विज्ञान | |
| टायपिंग व झेरॉक्स | 2,000.00 | अनुसंधान परिषद अनुदान | 10,000.00 |
| प्रवास | 1,000.00 | तूट: मराठी अर्थशास्त्र परिषदेकडे | 77,500.00 |
| किरकोळ खर्च | 1,000.00 | वर्ग | |
| बँक चार्जेस | 500.00 | | |
| | **1,47,500.00** | | **1,47,500.00** |

### (आ) मराठी अर्थशास्त्र परिषद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रवास | 8,000.00 | वार्षिक सदस्य वर्गणी | 2,000.00 |
| मुंबई कार्यालयास सेवाशुल्क | 2,400.00 | ग्रंथ विक्री | 5,000.00 |
| पारितोषिके | 1,600.00 | बचत खात्यावरील व्याज | 200.00 |
| टेलिफोन | 3,000.00 | पां.वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान | |
| | | अनुदान | 5,000.00 |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | 9,000.00 | मुदत ठेवीवरील व्याज/लाभांश | 85,000.00 |
| मेहेनताना | 4,000.00 | तूट: | 28,750.00 |
| बँक चार्जेस | 5,000.00 | | |
| टायपिंग व झेरॉक्स | 2,000.00 | | |
| जमनालाल बजाज उपक्रम खर्च | 7,500.00 | | |
| पां.वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान | 5,000.00 | | |
| ऑडिट फी | 750.00 | | |
| किरकोळ खर्च | 200.00 | | |
| 'अर्थसंवाद'ची तूट | 77,500.00 | | |
| | **1,25,950.00** | | **1,25,950.00** |

## मराठी अर्थशास्त्र परिषद : मिळालेल्या देणग्या व निधी

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रा. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक निधी | 2,334.99 |
| 2 | 'अर्थसंवाद' स्थायी निधी | 16,342.00 |
| 3 | धुळे जिल्हा प्राध्यापक संघ व्याख्यानमाला निधी | 6,281.90 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक निधी | 17,735.48 |
| 5 | प्रा. मो.स. भावे पारितोषिक निधी | 5,000.00 |
| 6 | कायम निधी | 1,28,185.00 |
| 7 | जमनालाल बजाज स्मृती उपक्रम निधी | 76,145.44 |
| 8 | डॉ. बी.एन. दातार यांच्याकडून देणगी | 1,00,000.00 |
| 9 | प्रा. सुशीला जोशी यांच्याकडून देणगी | 5,000.00 |
| 10 | मुंबई कार्यालयास महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली देणगी | 10,000.00 |
| | | **3,67,024.81** |

## मराठी अर्थशास्त्र परिषद : गुंतवणुकी (31 मार्च, 1998 अखेर)

| | | |
|---|---|---|
| 1 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 10,000.00 |
| 2 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 10,000.00 |
| 3 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 4 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 8,000.00 |
| 5 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 6 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 35,000.00 |
| 7 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 8 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 25,000.00 |
| 9 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 25,000.00 |
| 10 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 25,000.00 |
| 11 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 25,000.00 |
| 12 | भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया | 25,000.00 |
| 13 | The Associated Cement Co. | 5,000.00 |
| 14 | एच.डी.एफ.सी. | 15,000.00 |
| 15 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 1,00,300.00 |
| 16 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 10,000.00 |
| 17 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 10,000.00 |
| 18 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 15,000.00 |
| 19 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 20 | युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 21 | भारतीय तेल महामंडळ | 10,000.00 |
| 22 | भारत पेट्रोलियम महामंडळ | 15,000.00 |
| 23 | टाटा वित्त कंपनी | 15,000.00 |
| 24 | 20 वी वित्त कंपनी | 15,000.00 |
| 25 | बँक ऑफ इंडिया, मुंबई | 15,000.00 |
| 26 | टेल्को, पुणे | 10,000.00 |
| 27 | बँक ऑफ इंडिया | 8,000.00 |
| 28 | बँक ऑफ इंडिया | 15,000.00 |
| 29 | बँक ऑफ इंडिया | 6,807.00 |
| 30 | बँक ऑफ इंडिया | 18,000.00 |
| 31 | बँक ऑफ इंडिया | 5,000.00 |
| 32 | टाटा फंड | 20,000.00 |
| 33 | मंगळवेढा अर्बन बँक | 10,000.00 |
| 34 | बँक ऑफ महाराष्ट्र | 15,000.00 |
| 35 | एच.डी.एफ.सी. | 25,000.00 |
| 36 | एच.डी.एफ.सी. | 25,000.00 |
| 37 | विद्या सहकारी बँक | 5,000.00 |
| 38 | हुडको | 50,000.00 |
| 39 | बँक ऑफ इंडिया | 16,500.00 |
| 40 | बँक ऑफ इंडिया | 1,00,00.00 |
| 41 | स्टेट बँक ऑफ इंडिया | 10,000.00 |
| | एकूण | **7,83,607.00** |

# मराठी अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने

| वार्षिक अधिवेशने | अधिवेशनाचे दिनांक | संस्था व ठिकाण | अध्यक्ष | अध्यक्षीय भाषणाचा विषय | चर्चासत्रांचे विषय |
|---|---|---|---|---|---|
| पहिले | 25,26 नोव्हेंबर, 1977 | पोद्दार वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | प्रा. नी.वि. सोवनी, पुणे | मराठीतील अर्थशास्त्रीय वाङ्मय: इतिहास, परंपरा, समस्या व भावी वाटचाल | 1 चलन अतिवृद्धी<br>2 महाराष्ट्रातील सरकारची रोजगार हमी योजना |
| दुसरे | 26,27,28 ऑक्टोबर, 1978 | नागपूर विद्यापीठ, नागपूर | प्रा. वि.म. दांडेकर पुणे | भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद | 1 नफ्याविषयी सिद्धान्तन<br>2 लोकसंख्या आणि आर्थिक विकास<br>3 महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी योजना |
| तिसरे | 26,27,28 ऑक्टोबर, 1979 | मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. श्री. आ. देशपांडे, नागपूर | ग्रामीण विकास[illegible] स्था | 1 अर्थशास्त्रातील खंड सिद्धान्तन<br>2 महाराष्ट्रातील प्रादेशिक विकास व नियोजन<br>3 महाराष्ट्रातील शासकीय उद्योग व उपक्रम यांचे व्यवस्थापन व प्रश्न |
| चौथे | 31 ऑक्टोबर, 1,2 नोव्हें.,1980 | श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे महाविद्यालय, धुळे | डॉ. वि.वि. बोरकर, औरंगाबाद | महाराष्ट्रातील आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय | 1 अर्थशास्त्रातील समातोलाची संकल्पना<br>2 महाराष्ट्रातील शेतीमालाच्या विनियमित बाजारपेठा<br>3 महाराष्ट्रातील करव्यवस्था |
| पाचवे | 19,20,21 नोव्हेंबर, 1981 | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रा. या.शि. महाजन जळगांव | भारतातील सरकारी क्षेत्र-काही समस्या | 1 उद्योग संस्थाविषयीचे सिद्धान्तन<br>2 भारतातील चलनविषयक धोरण<br>3 स्वयंसेवी संघटना आणि ग्रामीण विकास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सहावे | 25,26,27 नोव्हेंबर,1982 | कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, संगमनेर (अहमदनगर) | डॉ. आनंद नाडकर्णी, पुणे | भारतीय करव्यवस्था | 1 अर्थशास्त्रीय वेतन सिद्धान्तन<br>2 भारताच्या परकीय चलनसंचयाचे प्रश्न<br>3 केन्द्र-राज्य वित्तीय संबंध |
| सातवे | 28,29,90 ऑक्टोबर, 1983 | श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ, पुणे येथील महाविद्यालय | डॉ. स.ह. देशपांडे, मुंबई | मार्क्सवाद आणि सामाजिक न्याय | 1 कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र<br>2 भारतातील औद्योगिक संरचना<br>3 सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ |
| आठवे | 7,8,9 डिसेंबर, 1984 | श्री स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालय, अंबेजोगाई (बीड) | डॉ.वि.बा. धुगे, कोल्हापूर | भारतातील भावफुगवटा | 1 केन्स यांचे अर्थशास्त्र आणि नंतर<br>2 डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे आर्थिक विचार<br>3 महाराष्ट्रातील नागरीकरण आणि त्याच्या समस्या |
| नववे | 1,2,3 नोव्हेंबर, 1985 | पदव्युत्तर शिक्षण व संशोधन केन्द्र, मुंबई विद्यापीठ, रामनाथी देवस्थान, फोंडा, गोवा | डॉ. ह.कृ. परांजपे, पुणे | भारतातीय नियोजनातील दिशाबद्दल इष्ट आहे का? | 1 अर्थशास्त्र: व्याख्या व व्याप्ती<br>2 महाराष्ट्राच्या कृषी उत्पादनाच्या समस्या<br>3 गोव्याचा आर्थिक विकास व नियोज- |
| दहावे | 25,26,27 ऑक्टोबर, 1987 | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | डॉ. रवीन्द्र स. सबनीस, मुंबई | भारतातील पैशाविषयीचे धोरण | 1 सनातन अर्थशास्त्रातील विचार आणि आर्थिक विकस<br>2 भारताचे राष्ट्रीय उत्पन्न: संकल्पना आणि मापन<br>3 महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाच्या समस्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अकरावे | 1,2,3,4 जानेवारी, 1987 | रयत शिक्षण संस्था, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय, सातारा | डॉ. गि.सो. कल्याणकर, औरंगाबाद | भारताचा परकीय व्यापार आणि व्यापारविषयक धोरण | 1 समाजवादी अर्थव्यवस्थेतील आर्थिक नियोजन आणि त्यातील बाजार व्यवस्था<br>2 नाका कर<br>3 महाराष्ट्रातील अर्थशास्त्र अध्यापनाच्या समस्या |
| बारावे | 25,26,27 नोव्हेंबर, 1988 | साहित्य, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, शहादा (धुळे) | प्रा. सौ. नलिनी पंडित, मुंबई | स्त्रिया आणि आर्थिक विकास | 1 शिक्षणाचे अर्थशास्त्र<br>2 भारतातील भांडवल बाजाराचे बदलते स्वरूप<br>3 महाराष्ट्रातील साखर उद्योग |
| तेरावे | 9,10,11 नोव्हेंबर, 1989 | गोविंदराम सेक्सरिया अर्थवाणिज्य महाविद्यालय, नागपूर | डॉ. रवीन्द्र दोशी, कोल्हापूर | महाराष्ट्रातील कृषी विपणन व्यवस्था | 1 सार्वजनिक खर्चाचे सिद्धान्तन<br>2 भारतातील दारिद्र्यनिवारणाच्या योजनांचे मूल्यमापन<br>3 महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय<br>4 केन्द्र-राज्य वित्तीय संबंध व पंचायत राज्य विधेयक |
| चौदावे | 10,11,12 नोव्हेंबर, 1990 | सोलापूर जिल्हा अर्थशास्त्र अध्यापक समिती व भारती विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सोलापूर | डॉ. श्री. वि. खांदेवाले, नागपूर | जर्मनीचे एकीकरण: १९९०-युरोपचा एकच बाजार: १९९२ | 1 आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास<br>2 भारताच्या अर्थव्यवस्थेतील नियोजन कालातील संरचनात्मक बदल<br>3 महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका : स्वरूप आणि समस्या<br>4 भारताच्या अर्थव्यवस्थेत रोजगारनिर्मितीची शक्यता व समस्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पंधरावे | 29,30 नोव्हेंबर 1 डिसेंबर,1991 | प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड | डॉ. ज.फा. पाटील कोल्हापूर | तुटीचे (अन) अर्थकारण: भारताच्या राजकोषीय व्यवहारांचे एक विश्लेषण | 1 पैसाविषयक सिद्धान्तातील आधुनिक प्रवाह<br>2 भारतातील अनौपचारिक क्षेत्रातील कामागारांच्या समस्या<br>3 महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील पर्यटन व्यवसाय<br>4 भारताचे नवे औद्योगिक धोरण |
| सोळावे | 25,26,27 डिसेंबर, 1992 | के.टी.एच. एम. कॉलेज, नाशिक | डॉ. शशिकांत गंधे, नवी दिल्ली | लोकसंख्या आणि आर्थिक अभिवृद्धी | 1 कल्याणाच्या अर्थशास्त्रातील आधुनिक विचार<br>2 भारतातील ग्रामीण उद्योगीकरण<br>3 महाराष्ट्रातील फलोद्यान व्यवसायाचे अर्थशास्त्र<br>4 देशाच्या अर्थव्यवस्थेत अर्थसाहाय्यांचे योगदान |
| सतरावे | 27,28,29 नोव्हेंबर,1993 | लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली | डॉ. व्यं.सु. पाटणकर, धुळे | भारतातील परिवहन: विकास आणि धोरण | 1 उपभोक्त्याच्या वर्तनाचे आर्थिक सिद्धान्तन<br>2 भारताची करव्यवस्था<br>3 महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था<br>4 डंकेल प्रस्ताव आणि भारत |
| अठरावे | 2,3,4 जानेवारी, 1995 | दि साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटी, बेळगांव | डॉ. रव्वा, घु. पठाण, पुणे | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भारतीय कृषी अर्थव्यवस्था : संरक्षणवादी नीतीपासून उदारीकरणापर्यंत वाटचाल | 1 पर्यावरणाचे अर्थशास्त्र<br>2 भारतीय रुपयाची परिवर्तनीयता<br>3 पश्चिम घाट विकास योजना<br>4 महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळे<br>5 भारतातील खाजगीकरणाचे धोरण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकोणिसावे | 4,5,6 नोव्हेंबर,1995 | टिळक महाराष्ट्र, विद्यापीठ, पुणे | प्रा. शि.ना. माने, सातारा | भारतातील ऊस किंमत धोरण (उसाच्या किमतीचे धोरणाभिमुख अर्थशास्त्र) | 1 आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्तातील नवे प्रवाह<br>2 भारतातील वित्तीय क्षेत्रातील सुधारणा<br>3 महाराष्ट्रातील अर्थशास्त्राचे विद्यापीठीय अभ्यासक्रम: सुधारणा आणि पुनर्रचना<br>4 महाराष्ट्र शासनाची झुणका - भाकर योजना: उत्पत्ती, प्रयोजन, प्रश्न व पर्याय |
| विसावे | 17,18,19 नोव्हेंबर, 1996 | प्रताप कॉलेज, अमळनेर | डॉ. भ.ग. बापट पुणे | आंतरराष्ट्रीय पैसा: काल, आज आणि उद्या | 1 एकोणिसाव्या शतकातील आर्थिक उदारमतवाद आणि तत्कालीन भारतीय अर्थशास्त्र<br>2 भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचे स्थान<br>3 महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्याचे अर्थशास्त्र<br>4 छोटी राज्ये व त्यांची स्वयंनिर्वाहिता |
| एकविसावे | 22,23,24 नोव्हेंबर,1997 | न्यू आर्ट्स,कॉमर्स व सायन्स कॉलेज, अहमदनगर | डॉ. दि.व्यं. जहागिरदार अमरावती | जागतिकीकरण, उदारीकरण आणि राज्याची भूमिका - एक विवेचन | 1 लोकसंख्या आणि आर्थिक विकास<br>2 संरचनात्मक बदलाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>3 महाराष्ट्राची जलसंपत्ती: नियोजन, वाटप व वापर<br>4 भारतीय स्वातंत्र्याची 50 वर्षे: आर्थिक वाटचाल. |
| बाविसावे | 13,14,15 नोव्हेंबर, 1998 | शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती | डॉ. र.पु.कुरुलकर, औरंगाबाद | महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल : समस्या आणि उपाय | 1 आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप<br>2 भारतातील बेकारीची समस्या<br>3 महाराष्ट्रातील ऊर्जा समस्या<br>4 दक्षिण-पूर्व आशियातील चलनसंकट व भारत |

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## तेविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे तेविसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर-नोव्हेंबर, 1999 मध्ये गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी येथे आयोजित होणार आहे. सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, पुणे येथील प्राध्यापक सु. दा. तुपे अध्यक्षस्थानी राहतील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निश्चित करण्यात आलेले आहेत.

(1) वि. म. दांडेकर यांचे आर्थिक विचार

(2) भारतातील शेतीमालाचे विपणन

(3) महाराष्ट्रातील आधारभूत संरचना : सध्य:स्थिती व भविष्यातील वाटचाल

चौथा विषय तत्कालिन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष यथावकाश जाहीर करतील.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. *निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.*

निबंध मराठीतच असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव आणि पत्ता हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र लिहिलेला वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

*31 ऑगस्ट, 1999* ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

***डॉ. सु.दा. तुपे,***
प्राध्यापक, सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट,
सर्व्हे क्र. 44/1, वडगांव (बुद्रुक),
सिंहगड रस्त्यापासून आत,
पुणे 411 041

***आ.गो. पुजारी***
**कार्यवाह–खजिनदार**

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

(1) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

(2) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करू नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ (interpretation) लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

(3) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण निबंधात् असू नये; कारण ते सर्वांना माहीत असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

(4) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक-सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

(5) निबंधात वेगवेगळ्या भागांमध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

(6) निबंधात शक्य तो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' आणि 'शासन व्यवहार कोश' यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

(7) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

(8) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करून वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरित नसावेत.

(9) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा/संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने दिलेली असावी.

(10) निबंधाच्या अखेरीस गोषवारा द्यावा (300 शब्द)

# निबंध लेखकांच्या मार्गदशनासाठी विषयांची रूपरेषा

## 1 वि.म. दांडेकर यांचे आर्थिक विचार

**स.ह. देशपांडे**
(भूतपूर्व प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ)

वि.म. दांडेकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा अभ्यास करू इच्छिणारांस त्यांचे काम सोपे करणाऱ्या काही सोयी उपलब्ध झाल्या आहेत. (1) *Journal of the Indian School of Political Economy* च्या Vol.7, No.4] Oct. - Dec. 1995 या अंकात 1951 पासून 1995 पर्यंत दांडेकरांनी केलेल्या इंग्रजी लेखनाची सूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. तीत एकूण 172 नोंदी आहेत. (2) मृत्यूपूर्वी काही वर्षे दांडेकर आपल्या एकूण लेखनाच्या आधारे भारताच्या अर्थव्यवस्थेचा तीन खंडांत आढावा घेण्याचा उपक्रम करीत होते. यातील पहिला खंड *The Indian Economy, 1947-92, Vol. 1: Agriculture* (Sage Publications, New Delhi, 1994) हा दांडेकरांच्या हयातीत प्रसिद्ध झाला. दुसरा खंड *The Indian Economy, 1947-92, Vol.2; Population, Poverty and Employment* (Sage Publications, New Delhi, 1996) हा दांडेकरांच्या निधनानंतर प्रकाशित झाला. तिसरा खंड *Production, Trade and Finance* यावरचे काम दांडेकर पुरे करू शकले नाहीत. (3) मी स्वतः वर (2) मध्ये उल्लेखिलेल्या पहिल्या खंडावर विस्तृत समीक्षा केली आहे: 'Professor Dandekar on Indian Agriculture,' *Journal of the Indian School of Political Economy,* Vol. 8. No. 3, July-Sept. 1996.

वर उल्लेखिलेल्या दोन ग्रंथांमध्ये दांडेकरांनी ज्या ज्या विषयांवर लेखन केलेले होते त्या सर्वांचा समावेश झालेला नाही; उदाहरणार्थ, भूसुधारणा (लँड रिफॉर्म), शेती विमा, सिंचन व्यवस्था, शेतीतील जनावरांचा प्रश्न, इत्यादी. हे विषय पहिल्या खंडात यावयास हवे होते. दांडेकरांनी त्यांचा ग्रंथात समावेश केला नाही याचे कारण ते त्याना महत्त्वाचे वाटले नाहीत असा नसावा. शेवटच्या कालात त्याना त्यांच्या प्रकृतीने साथ दिली नाही आणि ग्रंथांचे संपादन त्याना योग्य त्या साक्षेपाने करता आले नाही हे त्यामागचे खरे कारण असावे. उल्लेखित विषय आणि 'प्रादेशिक समतोल' यासारखे इतर विषय प्रकाशित खंडांमध्ये तर नाहीतच पण त्यानी योजिलेल्या तिसऱ्या खंडातही त्याना स्थान नव्हते हे स्पष्ट आहे. थोडक्यात, दांडेकरांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा समग्र अभ्यास करणाराना *The Indian Economy* च्या दोन खंडांपलीकडे जाऊन सूचीतील वाङ्मयाचे परिशीलन करावे लागेल. शिवाय दांडेकरांनी मराठीतही स्वतंत्र लेखन केलेले आहे. त्याची अगोदर सूची तयार करावी लागेल. यातले काही लिखाण महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, 'शरद जोशींचे एककलमी भावबंधन'..... पाणी पुरवठ्याबद्दलचेही काही लिखाण मराठी वृत्तपत्रांतून आल्याचे आठवते.

दांडेकरांच्या अर्थशास्त्राचा सामग्र्याने विचार करणे ही एक पद्धत अभ्यासकाला अवलंबिता येईल किंवा त्यानी स्पर्श केलेल्या विपुल विषयांपैकी काहींची अथवा एकाची निवड करता येईल.

सामग्र्याने विचार करताना दांडेकरांच्या एकूण लेखनामागे काही भूमिका आहे का याचा शोध घेता येईल. उदाहरणार्थ, त्यांचे काही स्थिर असे सामाजिक तत्त्वज्ञान आहे का? कालौघात ते बदलले का?

मला वाटते शेवटच्या कालात एकूण उदारीकरणाकडे त्यांचा कल स्पष्टपणे वळला. पहिल्या खंडाच्या शेवटी 'Future Agricultural Policy' हे त्यानी बहुधा नवीन लिहिलेले प्रकरण आहे. त्यात हा मतबदल दिसून येतो. दुसऱ्या खंडात मात्र असे त्यांच्या ताज्या विचारांचे प्रतिबिंब उमटविणारे प्रकरण नाही.

सुट्यासुट्या विषयांमध्ये दोन प्रकारांची विभागणी करता येईल. दांडेकरांचे काही लेखन 'सैद्धान्तिक' म्हणावे अशा प्रकारचे आहे. त्यातील प्रमुख विषय असे:

(1) Transforming Traditional Agriculture.

(2) Supply - response of Agricultural Prices in Underdeveloped Countries

सर्व संदर्भ *Indian Economy* च्या पहिल्या खंडात मिळतील. ते मुळातून वाचावेत अशी शिफारस करतो. याशिवाय वर क्र. (1) च्या संदर्भात मी लिहिलेला एक लेख प्रथम मराठीत *अर्थसंवाद*, खंड 1, क्र.3, ऑक्टो-डिसें., 1977 या अंकात 'गैरलागू सिद्धान्तनाचा एक नमुना (शुल्ट्झ यांचे ट्रॅन्सफार्मिंग ट्रॅडिशनल ॲग्रिकल्चर या शिर्षकाखाली प्रसिद्ध झाला आणि नंतर *Economic and Political Weekly*, Vol. XII, No. 53,Dec. 31 1977 या अंकात 'Transforming Traditional Agriculture' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला. शुल्ट्झ यांच्या तुलनेत दांडेकरांची गृहिते अधिक वास्तव आहेत असे मी माझ्या प्रतिपादनात दाखविले आहे. (Supply -response बद्दलच्या दांडेकरांच्या विवेचनावर ती JISPE मधील लेखात काही प्रश्न उपस्थित केले आहेत तेही पाहावे.)

(3) वर्गसंबंध आणि त्यांचे अर्थशास्त्र (सूचीतील 120,124,129,130,132 या नोंदी संदर्भासाठी पाहाव्या.)

दांडेकरांचे इतर बव्हंश लिखाण त्या त्या काळचे आर्थिक प्रश्न व आर्थिक धोरणे याबद्दलचे आहे. (या विधानात चूक असण्याची शक्यता आहे कारण समग्र दांडेकर अभ्यासल्याचा किंवा वाचल्याचा दावा मी करू शकणार नाही.) अशा लिखाणातील निवडक विषय द्यावयाचे तर पुढीलप्रमाणे देता येतील;

(1) **दारिद्र्य**: दांडेकरांची दारिद्र्याची संकल्पना व अमर्त्यकुमार सेन यांची संकल्पना यांची या संदर्भात तुलना केलेली फलदायी ठरेल. 'गणनेचा (measurement चा) प्रश्नही विचारात घेता येईल.

(2) **रोजगार** : रोजगाराच्या रूढ मोजणीच्या पद्धती निरर्थक आहेत असे दांडेकरांचे मत आहे त्याची चर्चा करता येईल.

(3) **रोजगाराची निर्मिती** : हमीयुक्त रोजगाराचा दांडेकरानी अखेरपर्यंत आग्रह धरलेला आहे. त्या अनुषंगाने दारिद्र्यनिवारणाच्या इतर उपाययोजनांचे (श्रमप्रधान तंत्र, स्वयंरोजगार, गृहोद्योग, गांधीवादी अर्थशास्त्र, इत्यादींचे) वैयर्थ्य दाखविण्याचा त्यानी प्रयत्न केला आहे. (या संदर्भात नीलकंठ रथ यानी स्वतंत्रपणे केलेले लेखनही अभ्यासकांना उपयुक्त होईल.) शिवाय एम.एल. दांतवाला, इंदिरा हिरवे यानीही या विषयावर मतप्रदर्शन केलेले आहे. हे लेख प्रामुख्याने *Economic and Political Weekly* मध्ये आले होते.)

(4) शेतीमालाचे भाव व शेतीमालाचा व्यापार

(5) शेतीचा पतपुरवठा

(6) शेतीचे नियोजन आणि प्रशासन

(7) शेतीविषयक संशोधन आणि विस्तार (extention)

(8) लोकसंख्याविषयक प्रश्न व धोरणे

(9) शिक्षण व्यवस्था

(4,5,6 व 7 चे संदर्भ *The Indian Economy* च्या पहिल्या खंडात आणि 8, 9 चे दुसऱ्या खंडात मिळतील.)

दांडेकरांनी म.भा. जगताप यांच्या सहकार्याने लिहिलेल्या दोन मराठी पुस्तकांची कुणीतरी विशेष दखल घेणे अगत्याचे आहे, कारण ती दुर्लक्षित आहेत. ती पुस्तके अशी: (1) *महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना*, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्स, 1957. पारंपरिक ग्रामीण समाजरचनेचे (उदा. बलुत्याची पद्धत) जे अवशेष रूरल क्रेडिट सर्व्हेच्या अनुषंगाने ध्यानात आले त्यांचे वर्णन या पुस्तकात आले आहे. तूलनेला लोकहितवादींचे *ग्रामरचना* व त्रि.ना. आत्रे यांचे *गावगाडा* (1915) ही पुस्तके घेता येतील. (2) *गावरहाटी*, ह.वि.मोरे प्रकाशन, पुणे, 1963. हे पुस्तक ग्रामीण जीवनाविषयीच्या वाङ्मयात काहीशा ललित पद्धतीने मोलाची भर घालणारे आहे. एक काल्पनिक पण महाराष्ट्राचे प्रातिनिधिक खेडे घेऊन त्याच्या वर्षभरातील आर्थिक, सामाजिक, राजकीय हालचालींचा ते वेध घेते. गावातील घराणी, त्यांच्यातील फळ्या, त्यांचे परस्परसंबंध, इत्यादींचे मार्मिक निरीक्षण या पुस्तकात आढळेल. (ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांचेही या पुस्तकाकडे लक्ष गेलेले दिसत नाही.)

दांडेकरांचे एकूण लेखन तर्ककर्कश, बांधीव, सुबोध, अभ्यासपूर्ण आणि रोखठोक असते. तरीही त्यांच्या लिखाणात क्वचित सैद्धान्तिक कच्चेपणा किंवा माहितीचा अपुरेपणा आढळला तर त्याचाही निर्देश करावा. तो पुढच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल; त्यामुळे दांडेकरांची अर्थशास्त्रज्ञ (आणि समाजविचारकही) म्हणून असलेली सर्वसंमत प्रतिष्ठा उणावेल अशी भीती बाळगण्याचे कारण नाही.

वर एके ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे दांडेकरांच्या समग्र लिखाणाशी माझा परिचय नाही. मला अपरिचित किंवा माझ्या नजरेतून सुटलेल्या लेखनाचा परामर्शही अभ्यासकांकडून अपेक्षित आहे.

(टीप : Rath, N., 'V. M. Dandekar : Social Scientist with a Difference', *Journal of the Indian School of Political Economy, Oct. - Dec. 1995, pp. 671 - 87* हा संदर्भ अवश्य पाहावा. या लेखाला जोडूनच प्राध्यापक दांडेकरांच्या प्रकाशनांची संपूर्ण सूची आहे - प्रमुख संपादक)

---

## 2 महाराष्ट्रातील आधारभूत संरचना: सद्य:स्थिती व भविष्यातील वाटचाल

**शशिकांत गंधे**

महासंचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

---

या विषयावर निबंध लिहिताना खालील बाबी ध्यानात ठेवाव्यात.

(1) भारतातील प्रमुख राज्यांपैकी महाराष्ट्र एक आहे. क्षेत्रफळ आणि जनसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. औद्योगिक विकासात महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. इतर आर्थिक क्षेत्रांतही महाराष्ट्राची प्रगती उल्लेखनीय आहे. तरीही महाराष्ट्रातील आर्थिक विकास परिपूर्ण नाही. अजूनही बरीच प्रगती या भागात व्हावयाला हवी. आधारभूत संरचनेचा समतोल आणि सर्वव्यापक विकास यापुढे व्हावयाला हवा.

(2) महाराष्ट्रात निरनिराळ्या प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. तसेच गेल्या 40-50 वर्षांत मानवी प्रयत्नाने आधारभूत संरचनाही चांगली विकसित झाली आहे. सुशिक्षित आणि तंत्रविज्ञानात प्रगत असे मनुष्यबळही महाराष्ट्रात आहे. या शक्तीचा व सुविधांचा योग्य वापर झाल्यास महाराष्ट्र देशातील सर्वात प्रगत राज्य होऊ शकते. निबंधात गेल्या 50 वर्षांत महाराष्ट्राने आधारभूत संरचनेच्या केलेल्या विकासाचा चिकित्सक आढावा घ्यायला हवा. हा आढावा विविध आर्थिक क्षेत्रांशी संलग्न असावा.

(3) शेतीविषयक प्रगतीला कारणीभूत असलेल्या जलसिंचन प्रकल्पांचा (लघु, मध्यम आणि मोठे) कसाकसा विकास होत गेला याचा आढावा घ्यायला हवा. तसेच जलसिंचनामुळे आणि मोठ्या पाटबंधारे योजनांमुळे शेतीमाल उत्पादनात विविधता आली, नगदी पिकांचा उदय झाला, फलोत्पादनात खूपच प्रगती झाली, तसेच अन्नधान्याबाबतीतही एकरी उत्पादन वाढले, इत्यादींची चर्चा व्हावयाला हवी. एकूण जलसाधन संपत्तीचा झालेला विकास, शेती उत्पादनातील त्यांचे महत्त्व आणि राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची यापुढील वाटचाल कशी असावी याचा विचार करावयाला हवा.

(4) औद्योगिक विकासात तर महाराष्ट्राने खूपच प्रगती केली आहे. यात शंका नाही. औद्योगिक विकासासाठी महत्वाची अशी मूलभूत संरचना महाराष्ट्रात गेल्या 50 वर्षांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाली आहे. उद्योगीकरणाला अत्यंत आवश्यक गोष्टी म्हणजे औद्योगिक विकास क्षेत्र (जमीन), पाणीपुरवठा आणि वीज या तिन्ही बाबतीत महाराष्ट्राने कशी प्रगती केली याचा विचार करताना महत्त्वाची आकडेवारी, विशेषकरून वीजनिर्मिती आणि विजेचे आणि पाण्याचे दर याबाबतीतील आकडेवारी निबंधात द्यावी. प्रशिक्षित कामगार वर्गाचा विकास आणि त्यामुळे औद्योगिक उत्पादनात झालेली वाढ, याचाही विचार व्हावा.

(5) परिवहन आणि दळणवळण या दोन मूलभूत संरचना तर आर्थिक विकासाचा पायाच असतो. या संदर्भात महाराष्ट्राने रस्ते, लोहमार्ग, हवाई मार्ग तसेच सागरी जलमार्ग क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा विस्तृत आढावा घ्यावयाला हवा. ग्रामीण भागात रस्ते झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेत एक प्रकारची क्रान्ती घडून आलेली आहे यात शंका नाही; पण याबाबतीत पूर्ण समतोल राखला गेला की नाही हे बघावयाला हवे. तसेच रस्त्यांच्या अभावी अजूनही काही भाग अविकसित राहिला आहे की काय याचा विचार व्हावा. लोहमार्गात झालेली वाढ आणि रुंदीकरण याचे विवेचन हवे. नवीन लोहमार्गामुळे कोकणासारख्या अविकसित राहिलेल्या भागावर होणारे परिणाम चर्चिले जावेत. देशाच्या इतर भागांच्या तुलनेत महाराष्ट्रात हवाई मार्गाचा कितपत विकास झाला आहे याचा आढावा घ्यावा. सागरी परिवहनात कितपत प्रगती झाली आहे आणि यापुढे या साधनांची वाटचाल कशी असावी हेही लक्षात घ्यावे.

(6) आर्थिक विकास प्रक्रियेत मानवी साधनसंपत्ती (human resource) अत्यंत महत्त्वाची असते. मानव शक्तीची सक्षमता वाढविण्यासाठी काही मूलभूत संरचनांची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, निरनिराळ्या विषयातील संशोधन केन्द्रे, प्रयोगशाळा, उच्च प्रतीच्या विज्ञान व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, सर्व स्तरातील शास्त्रज्ञांसाठी प्रशिक्षणाच्या सुविधा, इत्यादी. महाराष्ट्रात या संरचनांची उपलब्धता किती प्रमाणात आहे आणि गरजेच्या तुलनेत ती पुरेशी आहे किंवा नाही? उच्च शिक्षित शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञानींना येथे योग्य ते वातावरण आणि हव्या त्या सोयी आहेत की नाही? यांच्या अभावात विदेशी स्थलांतराचा प्रसंग त्यांच्यावर येतो की काय? इत्यादी गोष्टींचा विचार निबंधात व्हावा.

(7) एकविसाव्या शतकाची सुरुवातच एका नव्या तंत्रविज्ञानाने - माहिती तंत्रविज्ञानाने (information technology) होत आहे. संगणित्रांचा (computer) कल्पनातीत विकास आणि अमर्यादित उपयोग ही या नव्या तंत्रविज्ञानाची वैशिष्ट्ये आहेत. तसेच अंतराळात कृत्रिम उपग्रह उभारून त्याद्वारे जागतिक संचरण व्यवस्थेचे जाळे (network) निर्माण करण्याची सुरुवात या दशकातच झाली आहे. तिचा विकास व प्रसरण किती, कसा आणि कोठे होईल याची आज कल्पनाही करता येणार नाही ही एक नव्या युगाची सुरुवातच आहे आणि याचे मानवी जीवनावर दूरगामी परिणाम होणार आहेत यात शंकाच नाही. या नव्या तंत्रविज्ञानासाठी महाराष्ट्राची कितपत तयारी आहे आणि त्या नव्या तंत्रवैज्ञानिक युगासाठी कशा प्रकारची आधारभूत संरचना निर्माण होण्याची शक्यता आहे याचा थोडक्यात विचार व्हावयाला हवा.

एकूण, **'आधारभूत संरचना'** या संज्ञेचा व्यापक अर्थ लावून निबंध लिहावेत.

# 3 भारतातील शेतीमालाचे विपणन

**रवीन्द्र दोशी**

प्रमुख संपादक, अर्थसंवाद

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन 'कृषीप्रधान' असे केले जात असे. स्वातंत्र्योत्तर गेल्या अर्धशतकात कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा घटून 30 टक्क्यांपर्यन्त आला. असे असले तरी याच कालखंडात कृषी क्षेत्रात झालेल्या दूरगामी बदलांमुळे शेतीमालाचे उत्पादन लक्षणीय वाढले आहे एवढेच नव्हे तर पीक संरचनेमध्येही बदल घडून आले आहेत. शेतीमालाचे एकंदर उत्पादन वाढावे यासाठी विशेष धोरणे आखली तसेच तंत्रवैज्ञानिक बदलांचाही पाठपुरावा केला गेला. शेतकऱ्यांच्या दृष्टीने लाभदायक शेतीचा हा एक भाग होय. दुसरा, आणि अधिक महत्त्वाचा, भाग म्हणजे शेतीमालाच्या किफायतशीर विक्रीसाठी कार्यदक्ष विपणन व्यवस्था निर्माण करण्याचा आहे. त्यावरच अंतिमत: शेती व्यवसायाची लाभप्रदता अवलंबून राहणार आहे. याकरिता शेतीमालाच्या विपणनाचा सर्वांगीण अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. अभ्यासाचे अनेक पैलू आहेत. त्यांचा ढोबळ तपशील पुढे दिला आहे.

(1) शेतीमालाचे उत्पादन व विपणन यांची साखळी आहे. उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करीत असताना त्याचबरोबर मालाच्या विक्रीसाठी यथायोग्य व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी अपरिहार्यपणे येते. त्यात कसूर झाल्यास उत्पादन वाढीच्या प्रेरणांचे फलित मर्यादित राहते. या भूमिकेतून सर्वप्रथम विचार व्हावा तो विपणनाच्या संस्थात्मक व्यवस्थेचा. भारतात दीर्घकाल विनियमित बाजारव्यवस्था (regulated markets) तसेच सहकारी विपणनव्यवस्था अस्तित्वात आहे. याच्याच जोडीला केन्द्र/राज्य सरकारेही आपल्या यंत्रणेतून शेतीमालाची खरेदी करतात. याखेरीज विशिष्ट वस्तूंच्या विपणनासाठी 'वस्तू मंडळे' (commodity boards) आहेत. काही राज्यांनी 'ग्रामीण बाजार' (rural markets), 'ग्राहक बाजार' (consumer markets) असे प्रयोग शेतीमालाच्या विपणनासंदर्भात केले आहेत. निबंध लेखकांना यापैकी एखाद्या व्यवस्थेची निवड करून त्यासंबंधीचा अभ्यास व्यष्टीय/समष्टीय पातळीवर करता येईल. विशेष लक्ष वेधण्याजोगी बाब म्हणजे, महाराष्ट्रात 'कापूस एकाधिकार योजना' कार्यान्वित आहे. भारतातील सध्य:स्थितीतील एकाधिकार व्यवस्थेचे हे एकमेव उदाहरण आहे. उदारीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा करीत असताना दुसऱ्या बाजूने एकाधिकाराची व्यवस्था सांभाळण्याचे प्रयोजन उरते काय याचा चिकित्सक अभ्यास करता येईल. कापूस एकाधिकाराचा आजवरचा अनुभव ध्यानात घेऊन हा विषय हाताळता येईल.

(2) विपणनाचा अभ्यास विशिष्ट शेतीमाल/शेतीमाल गट यांच्या संदर्भातही करता येईल. तृणधान्ये, कडधान्ये, फळे व भाजीपाला, नगदी पिके, वगैरे वस्तूगट विचारात घेता येतील किंवा पर्यायाने गहू, तांदूळ, ज्वारी, आंबा, डाळिंब, द्राक्षे, संत्री, भुईमूग, मिरची, तंबाखू, ऊस, कापूस, ताग, रबर, अशा स्वतंत्र वस्तूंच्या संदर्भातही निबंध बेतता येईल. वस्तूनिहाय विपणनाचा अभ्यास विशिष्ट प्रदेशाच्या अनुषंगाने करून संबंधित विपणन व्यवस्थेतील बारकावे स्पष्ट करण्यासाठी अनुभवाधिष्ठित (empirical) विश्लेषण करण्यावर निबंध लेखकांनी भर द्यावा.

(3) कृषी विपणनात प्राणी बाजारही अंतर्भूत होतो. त्यामुळे बैल, म्हैशी, गाई, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, मासे, इत्यादी सजीवांच्या बाजारांचा अभ्यास केल्यास बरीच उपयुक्त माहिती पुढे येऊ शकेल.

(4) शेतीमालाच्या किंमत ठरण्याच्या प्रक्रियेबद्दलही निबंधलेखकांना चिकित्सक मांडणी करता येईल. किमान

आधार किंमत (minimum support price), प्रापण किंमत (procurement price), प्रशासित किंमत (administered price) याबाबत विशिष्ट शेतीमालाच्या संदर्भात लिहिता येईल. 'कृषी परिव्यय व किंमत आयोग' (Commission for Agricultural Costs & Prices) यांचे यासंदर्भातील स्थान, आयोगाकडून किमती ठरविण्याबाबत अनुसरली जाणारी पद्धती आणि त्या शिफारशींवर सरकारकडून होणारा निर्णय याची मीमांसा लेखक करू शकतील

(5) शेतीमालाच्या विपणनाच्या अभ्यासात वस्तूनिहाय अभ्यास करताना विपणनाचा 'परिव्यय' (costs) आणि 'गाळा' (margins) यासंबंधी अनुभवाधिष्ठित विश्लेषण मांडता येईल. हा अभ्यास कालौघाच्या संदर्भात, विविध बाजारांच्या तौलनिक स्थितीच्या संदर्भात आणि बाजाराची कार्यदक्षता (market efficiency) या संदर्भात असा त्रिमिती पद्धतीने करता येईल.

(6) विपणनातील सेवा हाही निबंध लेखकांना निवडण्यासाठी चांगला पैलू आहे. विपणनाचे कार्य सुकर होण्यासाठी साठवण व्यवस्था (गुदामे, शीतगृहे, इत्यादी), प्रतवारी, वाहतूक सुविधा, बाजारातील घडामोडींची माहिती (market information), इत्यादी विपणन सेवांपैकी एकावर सखोल अभ्यास होऊ शकेल.

(7) विपणनासाठी वित्तप्रबंध (marketing finance) हा एक स्वतंत्र विषय होऊ शकतो. शेतीमालाच्या विक्रीसाठी उत्पादकाला लागणारी पैशाची गरज, ती भागविण्याचे स्रोत व पद्धती आणि त्यांचे तौलनिक स्थान यांची मीमांसा निबंधात करता येईल. याचा परिव्ययही विचारात घ्यावयाचा आहे.

(8) शेतीमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करावयाचे आणि असा माल बाजारात विकावयाचा (उदाहरणार्थ, द्राक्षांपासून बेदाणे, फळांचे रस, लोणची, इत्यादी). असे केल्याने शेतकऱ्याला आपल्या शेतीमालापासून जास्त चांगले उत्पन्न मिळविता येते. अशा रीतीने चालणाऱ्या उपक्रमांचे अर्थशास्त्र काटेकोरपणे मांडण्याचे काम निबंध लेखकांना करता येईल.

(9) भारतातून विविध प्रकारच्या शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. त्याची संरचना, दिशा, संभार व त्यातील बदल यांचा विचार कालश्रेणी आकडेवारीनुसार करता येईल. उदारीकरणाच्या धोरणामुळे तसेच जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व भारताने स्वीकारल्यामुळे भारतातून शेतीमालाच्या निर्यातीला कशी चालना मिळेल याची साक्षेपी मांडणी करता येईल.

(10) कृषी विपणनाच्या अभ्यासात अलीकडे कृषी निविष्टींच्या (inputs) विपणनाचाही अभ्यास समाविष्ट केला जातो. विशेषत: बियाणे, खते, जंतुनाशके आणि यंत्रसामग्री यांच्या विपणनव्यवस्थेचा तसेच किमतींचा विचार या अनुषंगाने करता येईल. उदारीकरणाच्या धोरणाचा काय परिणाम झाला आहे आणि होत आहे हेही समजून घेता येईल.

(11) नाफेड, आंतरराष्ट्रीय वस्तू करार, वस्तू मंडळे यांचा ऊहापोहही करता येईल.

थोडक्यात, प्रस्तुत विषयाचे बरेच पैलू आहेत. निबंध लेखकांनी विशिष्ट पैलूवर लक्ष केन्द्रित करून व्यष्टीय/समष्टीय पद्धतीने विषयाचे प्रतिपादन करावे अशी अपेक्षा आहे. निबंध हा केवळ दुय्यम माहितीचे संकलन नसावा. याठिकाणी अनुभवाधिष्ठित संशोधनाला बराच वाव आहे. चिकित्सक आणि विश्लेषणात्मक पद्धतीने निबंध लिहून विषयाला योग्य तो न्याय द्यावा.

■■■■

# अर्थसंवाद

# (खंड 22, 1998-99)

## (अ) लेख सूची

### स्वतंत्र लेख


1 अर्थ शब्दांची वाट पाहे 249-54
2 अर्थ शब्दांची वाट पाहे 356-58
3 'अर्थसंवाद' चे दुसरे दशक (1987-97) 151-75
4 अर्थसहाय्ये प्रश्न आणि पर्याय 142-50
5 अर्थशास्त्रातील नोबेल 1998: अमर्त्य सेन 284-95
6 अमर्त्यकुमार सेन यांचे अर्थशास्त्र 322-44
7 अल्पजनाधिकार : नवे सैद्धान्तिक प्रवाह आणि भारतातील घटना 1-27
8 आंतरराष्ट्रीय नाणे निधीची कार्यकक्षा आणि मर्यादा 216-40
9 आशियाई चमत्काराचा आभास 204-15
10 इंग्रजी राज्याच्या खंडणीचे एक नवे संशोधित स्वरूप व त्याचे वैयर्थ्य 98-109
11 उत्पादन परिव्यय आकार आणि भारतीय उद्योग 255-83
12 जागतिक व्यापार संघटना आणि विकसनशील राष्ट्रातील शेती 241-48
13 भारतातील आर्थिक उदारीकरणाची वाटचाल 127-41
14 राष्ट्रीय उत्पन्न लेखांकन 46-57
15 वित्तीय क्षेत्रातील सुधारणा आणि बँकेतर वित्तसंस्था (1991-98) 110-26


### पारितोषिक प्राप्त लेख


1 अकोला जिल्ह्यातील जलसंपत्ती 37-45
2 औद्योगिक क्षेत्रातील संरचनात्मक बदलांची परिणती 28-36
3 भारतातील बेकारी : आंतरराज्य तुलना 345-51


### अध्यक्षीय भाषण


1 महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल : समस्या आणि उपाय 300-21


### ग्रंथ परीक्षण


1 किंमत सिद्धान्त 78-83
2 दारिद्र्याची मीमांसा 352-55
3 नागरीकरण आणि आर्थिक अभिवृद्धी 176-83


### टिपणे


1 कृत्रिम चलन एकके 62-66
2 पाणलोट क्षेत्र विकास 68-77
3 बाल कामगार समस्या 58-62
4 'यूरो' चलनात आला 298-99


### सांख्यिकी पुरवणी


1 भारतीय अर्थव्यवस्था : स्वातंत्र्योत्तर वाटचाल (2) 84-92
2 हिंदुस्थानचे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचे ताळेबंद (1858-1939) 184-201


### अधिवेशन वृत्तांत


1 'अर्थसंवाद', वार्षिक अहवाल-1997-98 381-85
2 आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप 372-77
3 कार्यवाहांचा अहवाल 386-97

4 दक्षिण - पूर्व आशियाई राष्ट्रांतील चलन संकट व भारत 378-80
5 भारतातील बेकारीची समस्या 359-65
6 महाराष्ट्राची उर्जा समस्या 366-71


### विषयांची रूपरेषा


1 भारतातील शेतीमालाचे विपणन 413-14
2 महाराष्ट्रातील आधारभूत संरचना : सद्य:स्थिती व भविष्यातील वाटचाल411-12
3 वि. म. दांडेकर यांचे आर्थिक विचार408-11


### संकीर्ण


1 म. अ.परिषदेचा ताळेबंद/अंदाजपत्रक 398-400
2 म. अ. परिषदेचे निधी व गुंतवणुकी 401
3 म. अ. परिषदेची वार्षिक अधिवेशने 402-06


## (आ) लेखक सूची

### स्वतंत्र लेख


1 कुलकर्णी, कल्याणी श्रीपाद 110-26
2 कुलकर्णी, सर्वोत्तम 46-57
3 केळकर, चंद्रकांत 204-15
4 खांदेवाले, श्रीनिवास 255-83
5 खेर, सी.पं. 216-40
6 खोबरे, शिवकुमार 356-58
7 जोशी, शरद शंकर 322-44
8 देशपांडे, विनायक 255-83
9 दोशी, रवीन्द्र 127-41
10 पंडित, नलिनी 241-48
11 भानुशाली, सु.गो. 1-27
12 माने, शि.ना. 142-50
249-54
13 रारावीकर, आशुतोष 284-95
14 रारावीकर, यशवंत 151-75
15 सोवनी, नी.वि. 98-109


### पारितोषिक प्राप्त लेख


1 कुलकर्णी, अंजली प्रकाश 28-36
2 गावडे, पां. ना. 345-51
3 पाटील ज.फा. 345-51
4 मानकर, सुलोचना 37-45


### अध्यक्षीय भाषण


1 कुरुलकर, र.पु. 300-21


### ग्रंथ परीक्षण


1 गोडबोले, वि.ज. 352-55
2 दातार, माधव 176-83
3 पाटणकर, व्यं.सु. 78-83


### टिपणे


1 दोशी, रवीन्द्र 298-99
2 नामदे, ना. भा. 68-77
3 मिरगे, बुद्धदास 58-62
4 सातव - मतकर, शर्मिष्टा 62-66


### सांख्यिकी पुरवणी


1 दोशी, रवीन्द्र 84-92
2 सोवनी, नी. वि. 184-201


### अधिवेशन वृत्तांत


1 ठोंबरे, सर्जेराव आसाराम 366-71
2 दास्ताने ,. संतोष 359-65
3 दोशी, रवीन्द्र 381-85
4 पेडगांवकर, श्रीराम 372-77
5 पुजारी आ.गो. 386-97
6 बोकील, शरद 378-80


### विषयांची रूपरेषा


1 गंधे, शशिकांत 408-11
3 दोशी, रवीन्द्र 413-14


## (इ) अंकांचा तपशील

| अंक | तिमाही | पृष्ठे |
|---|---|---|
| 1 | एप्रिल-जून, 1998 | 1-97 |
| 2 | जुलै-सप्टेंबर, 1998 | 98-203 |
| 3 | ऑक्टोबर-डिसेंबर, 1998 | 204-99 |
| 4 | जानेवारी-मार्च, 1999 | 300-317 |

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची विज्ञानावरील प्रकाशने

| अनु. | पुस्तकाचे नाव | लेखक / अनुवादक | किंमत |
|---|---|---|---|
| (1) | रेडिओ दुरुस्ती | श्री. श्री. वि. सोहोनी | 52-00 |
| (2) | रेकॉर्ड प्लेअर | - '' - | 11-50 |
| (3) | डिझेल इंजिन | प्रा. सुभाष सावरकर | 15-00 |
| (4) | अणुयुग | श्री. वि.त्र्यं. आठवले | 12-00 |
| (5) | पुस्तक बांधणी | श्री. वि. ना. लिमये | 18-00 |
| (6) | खनिज तेल व तज्जन्य रसायने | श्री. प. म.बर्वे | 16-00 |
| (7) | ध्वनिवर्धन आणि वितरण व्यवस्था | श्री. श्री.वि. सोहनी | 22-00 |
| (8) | तेल व मेदे भाग - 1 व 2 | डॉ. न.गं. मगर | 19-00 |
| (9) | वनश्री सृष्टी भाग - 1 व 2 | डॉ. म. वि. आपटे | 20-00 |
| (10) | भौतिक मानवशास्त्र | श्री. वि.श्री. कुलकर्णी | 33-00 |
| (11) | कापडावरील रासायनिक प्रक्रिया | डॉ. रा. श. भागवत | 18-00 |
| (12) | बहुरूपी बहुगुणी कार्बन | डॉ. रा. चं. जोशी | 14-00 |
| (13) | सैद्धान्तिक मृतिका बलविज्ञान | श्री. श. म. भालेराव | 42-00 |
| | ( श्री. तेरेगाझी लिखित पुस्तकाचा अनुवाद) | | |

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केन्द्रांवर मिळतील.**

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज,गांधी चौक,
औरंगाबाद - 431 001.

व्यवस्थापक ,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना
पुणे - 411 004.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई - 400 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार,
सिव्हिल लाइन्स,
नागपूर - 440 001.